**(सभापती स्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी.:** रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करु पाहणाऱ्या नैना प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध असणे

**मु.शी.:** रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करु पाहणाऱ्या नैना प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध असणे या विषयावर सर्वश्री.जयंत प्र.पाटील कपिल पाटील, विक्रम काळे बाळाराम पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आपली सूचना वाचतील आणि भाषणाला सुरुवात करतील. विशेष बैठकीत या दोन्ही अल्पकालीन चर्चा आपणाला पूर्ण करायच्या आहेत ही बाब सन्माननीय सदस्यांनी विचारात घ्यावी.

श्री.जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ९७ अन्वये पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करु पाहणाऱ्या नव्याने येऊ घातलेल्या सिडकोच्या नैना प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध असून नैना कडून गेली आठ वर्षे शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायामुळे नैना प्रकल्प रद्द करण्याची मागणी होत असणे. नैना प्रकल्पाचे संकट शेतकऱ्यांसाठी कोरोनापेक्षाही भयंकर आहे, त्यामुळे एकवेळ कोरोना होऊन मरण्यापेक्षा नैना प्रकल्पाच्या विरोधात लढून मेलो तरी बेहत्तर असा आक्रमक पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला असणे. जानेवारी २०१३ पासून नैना प्रकल्प आला पण आज पर्यंत येथे असलेले शेतकरी भुधारक ग्रामस्थ यांचे राहणीमान उंचावण्यासाठी मूलभूत, भौतिक सुविधा दिलेल्या नसणे, शेतकऱ्यांना, भूधारकांना विकासकांना ४० टक्के तुकडा आणि सिडकोला ६० टक्के हिस्सा, या प्रकल्पामध्ये शेतकरी आणि विकासक जे बाधित होतील त्यांना



असुधारित प्रत

मिळणाऱ्या अंतिम ४० टक्के भूखंडावर प्रत्येक गुंठ्यावर प्रचंड रक्कम आकारली जाणे, नैना प्रकल्प जुने मुंबई पुणे महामार्ग यांच्या पूर्व भागात असणाऱ्या ग्रामस्थांविरुध्द एक षडयंत्र असणे, तसेच नैना प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना शेतकरी असल्याचा दाखला सुध्दा मिळत नसणे, आपलं गाव सोडून किंवा नैना क्षेत्र सोडून या शेतकऱ्यांच्या कुठे जागा नसून, त्यामुळे त्यांची शेती गेल्यानंतर त्यांना अंतिम भूखंड मिळाल्यानंतर शेतकरी असल्याचा दाखला राहात नसून, त्यांना शेतकरी असल्याचा दाखला देण्याचे सिडकोने नाकारले असणे नैना प्रकल्पासाठी ग्रामपंचायतीच्या मालकीच्या शेकडो एकर जमिनी, गाव गवणी, तलाव, रस्ते व गुरचरण इत्यादी सिडकोच्या घशात घालण्याचा डाव असल्यामुळे नैना प्रकल्प रद्द करण्यात यावा. सबब शेतकऱ्यांमध्ये व प्रकल्पग्रस्तामध्ये चिंतेचे वातावरण पसरल्याने शासनाकडून करण्यात येत असलेली कार्यवाही व उपाययोजना." राज्य निवडणूक आयोग

सभापती महोदय, मी आपणास विनंती केली होती की, नियम ९७ च्या अल्पकालीन चर्चेच्या वेळी आपण विशेष बैठकीला चेअरवर यावे व आपण आलात त्यामुळे मी आपले मनापासून आभार व्यक्त करतो. आपण असला तर या विषयाला न्याय मिळेल, अशी माझी खात्री आहे. रायगड जिल्ह्यात सिडको प्राधिकरण आल्यानंतर त्यामध्ये अनेक बदल झाले. सिडको प्राधिकरणाची स्थापना १९६७ मध्ये झाली. सिडकोने तेथील स्थानिक लोकांना व शेतकऱ्यांना ज्या कमिटमेंट दिल्या होत्या त्या शासनाला पूर्ण करता आल्या नाहीत. त्या कमिटमेंट शासनाने पूर्ण केल्या नाहीत म्हूणन तेथील शेतकऱ्यांना रस्त्यावर यावे लागले. त्यासाठी पाच हुतात्मे आम्हाला द्यावे लागले. त्या भागातील हजारो लोक तुरुंगात गेले. त्यावेळी आम्हाला काही कळत नव्हते मी स्वत: २१ दिवस येरवडा जेलमध्ये होतो. रायगडच्या शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाला महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांनी पाठींबा दिला होता. पुन्हा तीच परिस्थिती आज तेथे निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी आंदोलन केल्यानंतर सिडको प्राधिकरणाने शेतकऱ्यांना साडेबारा टक्के जमीन दिली. ती जमीन

श्री.जयंत प्र.पाटील...

असुधारित प्रत

देतांना व कायम करताना शासनाने पुन्हा आमच्याकडून टॅक्स घेतला. १० ते ३० टक्के टॅक्स मागावून घेण्यात आला. जमीन आमची होती ती आम्हाला देतांना शासन त्यावर चार्ज लावते. साडेबारा टक्के जमीन देण्याची कमिटमेंट शासनाने केली होती. या व्यवहारात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची फसवणूक झाली. तेव्हा आम्हाला एफएसआय कळत नव्हता. टीपीचे नियम कळत नव्हते. टीपी काय आहे हे आम्हाला माहिती नव्हते. त्यामुळे तेथील गावठाणे बाधित झाली व त्यांची परिस्थिती आज अत्यंत दयनीय आहे. हा वेगळा विषय असला तरी त्यासंदर्भातील पार्श्वभूमी सांगायला पाहिजे म्हणून मी हे सांगत आहे. साडेबारा टक्के जमीन दिलेल्या अनेक शेतकऱ्यांच्या प्लॉटला आज संमती दिली जात नाही.

सभापती महोदय, त्यानंतर तेथे आंतरराष्ट्रीय विमानतळ आले त्यासाठी आम्ही आमची जमीन दिली व ५० टक्के जमीन आम्हाला परत द्या अशी मागणी केली. माजी मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना मी धन्यवाद देतो. या विषयाबाबत तडजोड झाली तेव्हा २२ टक्के जमीन शेतकऱ्यांना परत करण्याचा निर्णय घेण्यात आला. २२ टक्के जमीन देण्याची तडजोड झाल्यावर शासनाकडे पैसा नव्हता. त्यावेळी माजी मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्यासोबत लोकप्रतिनिधी यांची बैठक झाली. त्यांना मी बैठक थांबवून एक कल्पना सांगितली की, शासनाकडे पैसा नसेल तर आम्हाला एफएसआय वाढवून द्या. त्यानंतर आम्हाला एफएसआय वाढवून दिला. आता विमानतळ होत आहे त्याबाबत आमची कोणतीही आता अडचण नाही.

सभापती महोदय, हे नैना चे सोंग कोठून आले. नैना ही मैना सारखी नाचते अशी तेथे परिस्थिती झाली आहे. नैना प्रकल्पामुळे पनवेल तालुक्यातील सर्व शेतकरी हैराण आहेत. पनवेल, खालापूर व पेण या सर्व तालुक्यात घर बांधण्यासाठी किंवा घरांची दुरुस्ती करण्याची परवानगी काढायला बंधने घातली आहेत. शासनाने जमीन घेतली नाही, करारनामा झालेला नाही. शासन नोटीफिकेशन काढते व त्यानुसार कार्यवाही करण्यात येते मंत्री महोदय या बाबी बरोबर नाहीत.

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, नैना प्रकल्प आला तेव्हा आम्हाला असे वाटले होते की, ही मैना चांगली गोरीगोमटी दिसते. जे आहे ते मी सांगतो. नैना प्रकल्प आला तेव्हा आम्हाला असे सांगण्यात आले की, ६० टक्के जमीन शेतकऱ्यांना व ४० टक्के जमीन शासनाला देण्यात येईल. शासन सर्व जमीन डेव्हलप करेल. त्या बैठकीला मी स्वत: उपस्थित होतो. कोणताही खर्च शेतकऱ्यांना करावा लागणार नाही. ६० टक्के जागेत शेतकऱ्यांनी डेव्हलपमेंट करावी. कोठे हॉटेल बांधा, निवासी संकुले बांधा, हॉस्पीटल बांधा हे आम्हाला अतिशय चांगले वाटले होते ६० टक्के जागेवरील एफएसआय आम्हाला मिळेल. १० ते २० कोटी रुपये एकरी दर पडेल. त्यामुळे तेथील सर्व शेतकरी खूश झाले. आता नगरविकास विभागाने एक परिपत्रक काढले की, ४० टक्के जमीन शेतकऱ्यांना व ६० टक्के जमीन शासनाला द्यावी. जागेची जशी किंमत वाढेल तसे पुन्हा सांगण्यात येईल की, शेतकऱ्यांना २० टक्के जमीन मिळेल. यावर तेथील शेतकऱ्यांचा आक्षेप आहे.

सभापती महोदय, मी आपणास यासाठीच विनंती केली होती की, आपला नगर विकास विभागाचा दांडगा अभ्यास आहे. त्यामुळे मी आपले सुरुवातीला आभार मानले. शासनाने एकदा धोरण ठरविल्यावर ते बदला कसे येईल. त्या धोरणाप्रमाणे शेतकऱ्यांना कमिटमेंट दिली त्यानंतर शेतकऱ्यांनी संमती दिली त्यानंतर पुन्हा सरकार धोरण बदलत असेल तर यासाठी सर्व शेतकऱ्यांचा आक्षेप आहे. या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नागरिकरण झाले आहे. आता आमच्या ग्रामीण भागातील मुले शिकलेली आहेत. अनेक मुलांनी मला या विषयाच्या नोटस् काढून दिल्या आहेत. वेळेची मर्यादा असती तरी मला सविस्तर बोलावे लागेल. आताच्या नवीन मुलांना सर्व बाबी कळत आहेत. सिडको प्राधिकरण हे आर झोनचे काम व नागरिकरणासाठी तेथे आले आहे. आर झोनची सर्व डेव्हलपमेंट करण्यासाठी सिडको प्राधिकारण त्या भागात आले. त्यानंतर सिडको हे मोठे कुरण झाले आहे. तेथील अधिकारी यामध्ये गैरव्यवहार करीत आहेत, लोकप्रतिनिधींना त्यामध्ये कोणताही अधिकार दिलेला नाही. मी २२ वर्षे आमदार आहे डेव्हलपमेंटबाबत सिडकोचा

श्री.जयंत प्र.पाटील...

असुधारित प्रत

कोणताही अधिकारी मला भेटला नाही. कोणती डेव्हलपमेंट होणार आहे, अशी होणार हे आम्हाला कधीही सांगितले नाही.

सभापती महोदय, मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, सिडको स्थापन करताना यावर लोकप्रतिनिधीचा किती अधिकार आहे. मंत्री महोदयांचा किती अधिकार आहे याचा विचार केला नाही. तेथील एमडी यांना जास्त अधिकार दिले आहेत. आता तेथील एमडी बदलण्यात आले आहेत. एमडीची नियुक्ती होतांना दिल्लीतून सूचना येत होती मंत्री महोदयांचे ऐकण्यात येत नव्हते. मंत्री महोदय आपण २० वर्षे सदनाचे सदस्य आहात. तुमच्या मतदारसंघात सिडकोचा काही भाग येतो. या परिस्थिती काही बदल करण्यात येईल काय असा माझा प्रश्न आहे. सिडकोचा अधिकार नगर विकास मंत्री महोदयांना पाहिजे. त्यामुळे यामध्ये बदल केला पाहिजे. सिडकोमध्ये आता फक्त अधिकारी वर्गाचे राज्य सुरु आहे. मी कधीही कोणत्याही अधिकाऱ्याला भेटायला गेलो नाही. माझी ताकद सभागृहात आहे. मी सभागृहात विषय मांडतो व सभागृहातून निर्णय करुन घेतो. सभागृहात प्रश्न सुटू शकतात हे मी सिध्द केले आहे. २२ वर्षाच्या काळात मी अनेक प्रश्न सभागृहात मांडले व ते सोडविण्याचा माझा नेहमी प्रयत्न असतो.

सभापती महोदय, मला वाटले होते की, नैना प्रकल्प हा वेगळा असेल, सिडको सारखे वेगळे प्राधिकारण आहे असे मला वाटले होते. त्यासंदर्भात मी कोणताही अभ्यास केला नाही. जिल्हा परिषद सदस्या श्रीमती शेळके यांचे पती श्री.शेखर शेळके हा तरुण कार्यकर्ता आहे तो तेथे काम करतो तो मला भेटला, तो अत्यंत अभ्यासू आहे. त्यानंतर मी त्याचा चार ते पाच महिने अभ्यास केला तेव्हा हे अतिशय भयानक आहे असे मला कळले. त्या तरुणाने माझा ब्रेन वॉश केला की, हे सर्व चुकीचे आहे.

या नंतर श्री.बोरले...

श्री.जयंत प्र.पाटील.........

मी त्या भागात ताबडतोब बैठका घेतल्या. आम्हाला सिडको मान्य आहे. परंतु आम्हाला नैना प्रकल्प नको आहे. आम्ही नैना प्रकल्प होऊ देणार नाही. नैना प्रकल्प झाला तर आम्ही रस्त्यावर येऊ आणि आम्ही कशा प्रकारे रस्त्यावर येतो हे आल्याला माहिती आहे. आम्हाला कोणतेही राजकारण करावयाचे नाही. नैना प्रकल्पासाठी शेतकऱ्यांची जमीन मातीमोल किमतीने घेतली जात आहे. या संदर्भात धोरण कसे ठरविण्यात आले ? शेतकरी हळूहळू जमीन कसे विकतील असे धोरण आहे. स्थानिक शेतकरी श्री.निलेश म्हात्रे व श्री.के.जी.म्हात्रे यांनी माझ्याकडे पुरावे दिलेले आहेत. सिडको क्षेत्र व नैना क्षेत्र २० किलो मिटरच्या आत आहे. परंतु ते वरखेड पर्यंत आणण्यात आले, ते ३५ किलो मिटरचे अंतर आहे. आता तेथे ३५ त्रिज्येचे आराखडे तयार करण्याचे काम सुरु आहे. आपण २० किलो मीटर पर्यंत जाहीर केले. परंतु ते जेएसडब्ल्यू कंपनी पर्यंत येत आहेत. आज त्या गावात काय परिस्थिती आहे ? त्या ग्रामपंचायतीला कोणतेही अधिकार नाहीत. अधिकृत नळ जोडणी देण्यासाठी बंदी आहे. घरांची दुरुस्ती करण्यासाठी बंदी आहे. घर क्रमांक देण्यासाठी बंदी आहे. ग्रामपंचायतीला टॅक्स घेण्यासाठी बंदी आहे. मी मंत्री महांदयांना सांगू इच्छितो की, तेथील जमिनीचे सरकारी व्हॅल्युएशन १ कोटी ६८ लाख रुपये आहे. शासन म्हणते की, त्या जमिनीची किंमत १ कोटी ८६ लाख रुपये आहे आणि आपण आमच्याकडे २०-२५ लाख रुपये दराने जमीन मागत आहात ? यामध्ये किती तफावत आहे ? आपण नैना प्रकल्पाचा किती अभ्यास केला हे मला माहिती नाही. परंतु आपण प्रत्यक्ष पाहणी केली तर आपण सुद्धा माझ्या मताशी सहमत होणार याची मला खात्री आहे. आपल्याला डेव्हलपमेंट करावयाची आहे ती जरुर करावी. आपण ८ झोन डिक्लेअर करावेत. तेथे ८ झोन आहेत. आपण आम्हाला सांगावे की, अमूक ठिकाणी हॉस्पिटल, बँक, शाळा, रेसिडन्स झोन तयार करावयाचा आहे त्याप्रमाणे आम्ही विकास करु. आता गावोगावी इंजिनिअर्स आहेत. आमचा व्यवसाय आम्ही उभा करु शकतो किंवा आम्ही पार्टनर घेऊ शकतो. त्यासाठी यांची काय आवश्यकता आहे ? एक तरी स्थानिक माणूस आहे काय ? मी रायगड जिल्ह्यात माझ्या बँकेच्या

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील.........

माध्यमातून २०० बिल्डर्स उभे केले. त्यापैकी काही टाटा करुन गेलेले आहेत. आपण आमचे अधिकार तरी आम्हाला देणार आहात किंवा नाही ? अद्याप ग्रामपंचायतीचे क्षेत्र ताब्यात घेतले नाही, पॉलिसी तयार नाही आणि त्या ग्रामपंचायतीचे अधिकार तुम्ही काढून घेत आहात, हे बरोबर नाही. या संदर्भात सविस्तर चर्चा झाली पाहिजे. वेळेची मर्यादा आहे याची मला कल्पना आहे. आपल्याला या संदर्भात चर्चा करावी लागेल. आम्हाला नैना प्रकल्प नको आहे. सिडकोने विकास करावा त्यासाठी आमचे काहीही म्हणणे नाही.

सभापती महोदय, माननीय नगरविकास मंत्री महोदयांनी राज्यासाठी चांगला निर्णय घेतलेला आहे. आपण सर्व नगरपालिकांना २ एफएसआय दिलेला आहे. आजा पर्यंत असा निर्णय कोणीही घेतला नव्हता. आपण राज्यातील सर्व नगरपालिकांना २ एफएसआय दिला. आपण झोनमध्ये देखील बदल केला. मी त्यावेळी आपले अभिनंदन केले होते. परंतु नैना प्रकल्पामध्ये काय परिस्थती आहे ? नैना प्रकल्पामध्ये ०.५ एफएसआय आहे. यामध्ये खूप तफावत आहे. ही लूट आहे. आम्ही जागरुक राहिलो नाही ही आमची सुद्धा चूक आहे. मी प्रत्येक बैठकीत श्री.शेळके यांचे अभिनंदन करतो. आपल्याला तरी ०.५ एफएसआय पटतो काय ? आता ०.५ एफएसआय ठेवायचा आणि नंतर जी जमीन शेतकऱ्यांकडे राहील ती भांडवलदारांना द्यायची अशी कल्पना आहे. शेतकऱ्यांच्या घरी लग्न असेल किंवा त्याला अडचण आली तर तो जमीन विकणार आहे. नोकरशाहीने संपूर्ण नियोजन करुन हे षडयंत्र केलेले आहे. म्हणून माझा यासाठी आक्षेप आहे. तेथे एमएसआरडीसीचा आणखी एक प्रकल्प होत आहे. पुणे-मुंबई रस्त्याच्या बाजूने तो प्रकल्प होत आहे आणि त्यासाठी वेगळा दर आहे. १० फुटाच्या अंतरावर एक दर आणि दुसऱ्या बाजूला वेगळा दर असे होते काय ? आपण दक्षिण मुंबईमध्ये बसलेलो आहोत. मुंबईमध्ये सर्वात जास्त दर विधिमंडळाच्या आजुबाजूच्या परिसरात आहे. बोरीवली येथे जो दर आहे तो दर येथे नाही. परंतु येथून चौपाटी पर्यंत दर सारखाच

श्री.जयंत प्र.पाटील.........

राहणार आहे किंवा नाही ? परंतु तेथे दरात मोठी तफावत आहे. या संदर्भात चर्चा झाली पाहिजे. मंत्री महोदयांकडून या संदर्भात समर्पक उत्तर अपेक्षित आहे. आम्ही सर्व मान्य करु. परंतु नैना प्रकल्प मान्य करणार नाही. आपण सिडको ठेवावे, एमएसआरडीसीकडे घ्यावे. परंतु आम्हाला नैना प्रकल्प नको आणि करणार असाल तर आपण या निमित्ताने आम्हाला ठोस आश्वासन दिले पाहिजे. सिडको प्रकल्प असताना आज सुद्धा शाळा, हॉस्पिटल, क्रीडांगण, स्वच्छता, मल:निस्सारण केंद्र, जल वितरण केंद्र, सफाई कर्मचारी इत्यादींसाठी न्याय मिळत नाही.

सभापती महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, श्री.वाजेकर शेठ नावाचे नेते होते. कदाचित मंत्री महोदयांना त्याबाबत माहिती नसेल. ते उरण, मालंडचे राजे होते. १२ मालंड असे म्हटले जात होते. गाव पातळीवर त्यांचे स्वत:चेच राज्य होते. त्यांची उंची ८ फूट व वजन २०० किलो होते. ते जबरदस्त व्यक्तिमत्व होते. मी त्यावेळी लहान होतो. १२ गावातील सर्व मालंड उठवून व्हवांड येथे न्यावे, अशी मागणी होती. शेतकऱ्यांच्या बैठकीत या संदर्भात चर्चा होत होती. आज त्या १२ गावांची दैना झालेली आहे. तेथे सांडपाणी वाहून जाण्याची व्यवस्था नाही, साफसफाई होत नाही, आजुबाजूला गावठाणाचा विस्तार देखील झालेला नाही. सभापती महोदय, आपण चीन येथे जाऊन आलेला आहात. ज्यावेळी आपण चीन येथे जाणार होता त्यावेळी आपण मला बरोबर येण्याचा आग्रह केला. परंतु मी त्यावेळी आपल्या बरोबर येऊ शकलो नाही. मी ४-५ वेळी चीन येथे जाऊन आलेलो आहे. मंत्री महोदय चीनमध्ये जाऊन आले असतील. चीनमध्ये एखादे शहर वसवायचे असेल तर शंभर वर्षाचे नियोजन केले जाते. आपल्याकडे १० फुटाचे सुद्धा नियोजन केले जात नाही. चीनमध्ये कोणते सूत्र आहे ? प्रथम पुर्वसन केले जाते व त्यानंतर विकास केला जातो. आपल्याकडे तसे कधी होणार आहे ? आपण मुंबईचे शांघाय करण्याची भाषा करतो. मग आपल्याकडे ती पद्धत केव्हा सुरु होणार आहे ? कारण लोकप्रतिनिधींचा अंकुश नाही. आपण मंत्री आहात. आज तुमचा मुलगा खासदार

श्री.जयंत प्र.पाटील.........

आहे. कदाचित भविष्यात तुम्ही खासदार व्हाल. परंतु आपल्याला अधिकार नाही. आपण सांगितल्यानंतर अधिकारी हे जमणार नाही असे सांगतात. आपण स्व.आनंद दिघे यांच्या तालमीत तयार झालेला आहात त्यामुळे तुम्ही जोरात बोलून काम करुन घेत असाल. परंतु तेथे सर्व सामान्य मंत्री महोदयांचे काहीही चालत नाही. मी या निमित्ताने काही गोष्टी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आम्ही अधिवेशन सुरु होण्यापूर्वी पनवेल येथे नैना प्रकल्प बाधित शेतकऱ्यांसमवेत बैठक घेतली. सन्माननीय सदस्य श्री.बाळाराम पाटील त्या बैठकीसाठी उपस्थित होते. मी २ हजार कार्यकर्त्यांसमवेत बैठक घेऊन त्यांना आश्वासन दिले. मी अधिवेशन सुरु होण्यापूर्वी आपल्याला सांगितले की, आम्हाला नैना प्रकल्पासंदर्भात न्याय मिळाला पाहिजे.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील....

मंत्री महोदय, आपल्याला पुन्हा १० हुतात्मे पाहिजे आहेत का ? आपण आम्हाला अशा पद्धतीने पुन्हा तेथे आंदोलन करण्यास लावल्यास त्याकरिता आम्हाला वेगळया प्रकारची भूमिका घ्यावी लागेल. तेथील सिडको परिसर हा वाढीव मुंबईच्या होणाऱ्या नागरीकरणासाठी स्थापन झाला आहे. अशा परिस्थितीत तुम्ही तेथे इंडस्ट्रीज कशासाठी आणत आहात ? तेथील जमिनींवर तुम्ही औद्यागिक झोन करीत आहात. पुणे, रत्नागिरी तसेच लोणावळा सारख्या इतर ठिकाणी औद्योगिकीकरण न्यावे. सभापती महोदय, आपल्या भागांमध्ये इंडस्ट्रीज द्यावी याकरिता आपण माननीय उद्योग मंत्री यांच्याकडे मागणी करीत असल्याबाबत मी आपल्या दालनामध्ये ऐकलेले आहे. परंतु सर्व इंडस्ट्रीज आमच्या डोक्यावर का टाकत आहात ? या संदर्भात शासनाने ठोस निर्णय घेतला पाहिजे. सातारा जिल्हयातील कोयनाग्रस्त रायगड, खालापूर, नागाठाणे, पनवेल, रोहा येथे आलेले आहेत. त्यांची गावे ३-३ वेळा स्थलांतरित झालेली आहेत. ते १९६२ पासून तेथे आले असले तरी त्यांना जागा मिळालेल्या नाहीत, अद्याप त्यांचे प्रश्न सुटलेले नाहीत. परंतु आम्ही खंबीर असल्यामुळे पुनर्वसन करुन घेतलेले आहे. सभापती महोदय, मी या निमित्ताने अनेक मुद्दे मांडलेले आहेत त्यात आम्हाला पैसे नको, आमची डेव्हलपमेंट आम्ही करु, याबाबत प्लॅनिंग करावे. त्यानंतर नैना ठेवल्यास आमची काही हरकत नाही. तसेच तुम्ही सांगितल्याप्रमाणे आम्ही ठराविक वर्षांमध्ये डेव्हलपमेंट केली नाही तर त्याबाबतचे अधिकार काढून घेतल्यास आमचे काही म्हणणे नाही. आपण या संदर्भात चर्चा करु. परंतु आता तेथे एजंट येऊन सर्व काही गोळा करीत असतात. नैनाचा विषय नसला तरी साडेबारा टक्क्यांचे प्लॉट विकत घेताना व ते विकसित करीत असताना शेतकऱ्यांना अनेक अडचणी येत आहेत. मंत्री महोदयांनी या संदर्भात एक बैठक बोलवावी अशी मी मागणी करतो. सदर बैठकीस सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी देखील यावे. आपल्याला त्या संदर्भात चांगली माहिती आहे. सभापती महोदय, मी या निमित्ताने केलेल्या मागण्यांसंबंधी मंत्री महोदयांनी समाधान करावे. माझी आपल्याला विनंती आहे की, मंत्री महोदयांनी समर्पक उत्तर दिल्यानंतर

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील....

माझे समाधान झाल्यास मी नंतर याबाबत काही बोलणार नाही. परंतु माझे काही मुद्दे शिल्लक राहिल्यास त्याकरिता मला पुन्हा ५ ते १० मिनिटे बोलण्याची संधी द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो व याच ठिकाणी थांबतो

--------

असुधारित प्रत

श्री.बाळाराम पाटील (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम ९७ अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, दिनांक १० जून, २०१३ रोजी नैना प्राधिकरणासंबंधी नोटीफिकेशन काढण्यात आले. नव्या मुंबईची स्थापना झाल्यानंतर ९५ गावांमधील १८८ चौरस कि.मी.चा एरिया या प्रकल्पासाठी संपादित केला होता. नैनाच्या माध्यमातून सध्या १७५ गावे सदर प्रकल्पामध्ये समाविष्ट आहेत आणि ४६१ चौरस कि.मी. चा अवाढव्य परिसर नैना प्राधिकरणाच्या माध्यमातून विकसित करण्याचे धोरण महाराष्ट्र शासनाने स्वीकारले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सभोवताली चांगल्या पद्धतीचा विकास व्हावा याकरिता प्लॅनिंग ॲथॉरिटी म्हणून नैना प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर एखादा भांडवलदार ज्याप्रमाणे गोरगरिबांना लुटतो त्याप्रमाणे नैना प्राधिकरणाची पावले व पुढील धोरणे साकारली जात आहेत. सन २०१३ नंतर १० वर्षांच्या काळात पनवेल, खालापूर तसेच पेण तालुक्यांमधील भाग हा हॉट केक तसेच विकासाभिमुख असा पट्टा होता. परंतु नैना प्राधिकरण आल्यानंतर १० वर्षांच्या काळात त्यांच्या माध्यमातून फक्त २५० सीसी आणि ५० ओसी देण्यात आल्या. अशा प्रकारे  नैना प्राधिकरण आल्यानंतर विकासाचा वेग आणि विकासाच्या संधी वाढण्याऐवजी कमी झाल्या आहेत.  तसेच अतिशय महत्त्वाच्या असलेल्या विभागांचा विकास नैना प्राधिकरणामुळे संपूर्णपणे थांबला आहे. नैना प्राधिकरणामधील तरतुदी पाहिल्यास "भीक नको पण कुत्र आवर" अशी परिस्थिती तेथील जनतेची झाली आहे. त्यामुळे १७५ गावांमधील लोकांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे.  नैना प्राधिकरणाची स्थापना झाल्यानंतर नैना प्राधिकरणाने कधीही ग्रामस्थांबरोबर सुसंवाद साधलेला नाही, जन सुनावण्या झालेल्या नाहीत. कोविड काळात ऑनलाईन सुनावण्या घेण्यात आल्या. पनवेलच्या उत्तर पूर्व बाजूला असलेला हा पट्टा लक्षात घेता कोविड काळात ऑनलाईन सुनावण्या ॲटेंड करण्याची परिस्थिती तेथील नागरिक व शेतकऱ्यांनी निश्चितपणे नाही. काही दिवसांपूर्वी पनवेलमध्ये "भविष्यातील पनवेल" या विषयावर बोलत असताना सिडकोचे व्यवस्थापकीय संचालकांनी स्पष्टपणे सांगितले होते की,

असुधारित प्रत

श्री.बाळाराम पाटील .....

नागरिकांसमवेत आमचा संवाद झालेला नाही. या परिसराचा निश्चितपणे सुनियाजित विकास झाला पाहिजे. सर्व काही शिस्तीमध्ये झाले पाहिजे, त्यात कोणतीही अनियमितता नको. ही कार्यवाही करीत असताना विकासाचे फायदे तेथील शेतकरी, मेन स्टेक होल्डर्स तसेच ग्रामस्थांना मिळाले पाहिजेत. आजपर्यंत सिडकोने या क्षेत्रात विकासाच्या नावाने एकही रुपया खर्च केलेला नाही. अशा प्रकारे १० वर्षांच्या काळात संबंधित प्लॅनिंग ॲथॉरिटी विकासाकरिता एकही रुपया खर्च करीत नाहीत. दिनांक २० डिसेंबर, २०२० रोजी राज्यात युडीसीपीआर लागू झाल्यानंतर संपूर्ण क्षेत्राला १.१ एफएसआय देण्यात आला. परंतु या क्षेत्रामधील नागरिकांना नैना प्राधिकरणाच्या माध्यमातून फक्त ०.५ बेस एफएसआय देण्यात आला आहे. एमएसआरडीसी मुंबई पुणे एक्सप्रेस वे तसेच जुना मुंबई पुणे रस्त्यालगत असलेल्या क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून आहे. एमएसआरडीसीच्या माध्यमातून तेथील शेतकऱ्यांना मिळणारे लाभ त्याचप्रमाणे त्या लगत असलेल्या पनवेल महानगरपालिका क्षेत्रामधील जमीन मालक व शेतकऱ्यांना मिळणारे लाभ असो, एडीटीपी व जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून प्लॅन ॲप्रुव्हल केल्यानंतर तेथे दिलेल्या लाभासंबंधीचा तुलनात्मक तक्ता मी आपल्याकडे सादर करतो. अशा प्रकारे नैनाच्या माध्यमातून तेथील शेतकऱ्यांना विस्थापित करण्याचे कारस्थान राबविले जात आहे का ? अशी तेथील लोकांची मनस्थिती झाली आहे. युडीसीपीआर लागू झाल्यानंतर सर्व प्राधिकरणांमध्ये डेव्हलपमेंट चार्जेस समान झालेले आहेत. परंतु नैना प्राधिकरणाकडून डेव्हलपमेंट चार्जेस व्यतिरिक्त बेटरमेंट चार्जेस देखील जमीनधारक शेतकऱ्यांकडून वसूल करीत आहेत. सुरुवातीच्या काळात नैना प्राधिकरणाने जाहीर केले होते की, ६० टक्के विकसित भूखंड शेतकऱ्यांकडे राहील आणि ४० टक्के भूखंड हा रस्ते, क्रीडांगण, गार्डन अशा सामाजिक सुविधांसाठी सिडको घेईन. एमआरटीपीच्या निकषानुसार ३० टक्के क्षेत्र हे मूलभूत सुविधांसाठी आवश्यक असते.

यानंतर श्री.गागरे ....

श्री.बाळाराम पाटील .....

येथे ४०:६० असा रेश्यो ठरविला होता. तो कालांतराने अलगद ६० टक्के नैना व ४० टक्के शेतकरी असा बदलला गेला आहे. या विभागात विकास ४० टक्के भूखंडावर व्हर्टीकल डेव्हलपमेंट शेतकऱ्यांनी करावी अशी अपेक्षा नैनाच्या माध्यमातून व्यक्त होते. व्हर्टीकल डेव्हलपमेंटला गेल्यानंतर सातव्या मजल्यानंतर स्ट्रेट-वे दुपटीपेक्षा जास्त बांधकाम खर्च येतो. बाराव्या मजल्यानंतर तो खर्च अडीच पटीपेक्षाही जास्त होतो. पण ती डेव्हलपमेंट शेतकऱ्याने करावी अशी अपेक्षा या विभागामध्ये प्रोजेक्ट राबविताना नैनाला आहे. नैना येथे काम करीत असताना स्वत:च्या पदरचा एकही रुपया टाकत नाही. डेव्हलपमेंट चार्जेस घेतल्यानंतर त्या पैशातूनच त्या परिसराच्या विकासाच्या मुलभूत गोष्टी पूर्ण होतात. पण त्यावर बेटरमेंट चार्जेस, ६० टक्के जमीन ग्रोथ सेंटरच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून लुबाडण्याचे कारस्थान या प्रोजेक्टमध्ये आहे. नैनाचे पहिल्या फेजचे नकाशे पाहिले तर एक गोष्ट कटाक्षाने आपल्या लक्षात येते की, मेन रोडच्या बाजूला गुलाबी रंगामध्ये ग्रोथ सेंटर दाखविले आहे. म्हणजे नैनाच्या वाटयाला येणारी जमीन या विभागातील मुख्य रस्त्यांना असेल. ज्या शेतकऱ्याच्या जमिनीवर हा प्रकल्प होत आहे त्याला एकही रुपयाची नुकसानभरपाई नाही, त्याला अतिरिक्त लाभ नाही, त्याचे म्हणणे ऐकले जात नाही, त्याची कोठेही दखल घेतली जात नाही. शेतकऱ्याचे प्लॉट मागील बाजूला कोठेतरी छोटया रस्त्यावर नियोजनामध्ये दाखविले आहे. अतिशय फसवणुकीचे धोरण नैनाच्या माध्यमातून राबविले जात आहे. नैना आल्यावर कर्नाळा अभयारण्यातील हॉटेल्स तोडण्याचा निर्णय घेतला आहे. नैनाची स्थापना २०१३ ची आहे, स्थानिकांनी १९९९ साली बांधलेली हॉटेल्स निष्कासीत करायला निघाला आहात. विकास नक्की कोणासाठी आहे. जे भूमिपुत्र स्वत:चा व्यवसाय तेथे करीत आहेत, १९९९ साली बांधलेली हॉटेल्स निष्कासीत करुन २०१३ ची प्लॅनिंग ॲथॉरीटी अंमल करणार असा अतिशय बेगडी कारभार नैनाच्या माध्यमातून केला जात आहे.

श्री.बाळाराम पाटील .....

असुधारित प्रत

सभापती महोदय, आज मला बोलण्यासाठी थोडा अधिक वेळ द्यावा. कारण हा परिसर माझ्या मतदारसंघातील आहे. कोठेतरी व्यवस्थितपणे व्यासपीठावर या मंडळींचे दुखणे आले पाहिजे हा उद्देश ही चर्चा उपस्थित करण्यामागे आहे. आमची सरळ मागणी आहे की, नियोजित विकास आपण जरुर करावा. कोणतेही प्राधिकरण आम्हाला द्यावा, पीएमसीची हद्द वाढवा, नगरविकास मंत्री महोदयांच्या अधिपत्याखालील एमएसआरडीसी द्या, जिल्हाधिकारी यांच्या अधिपत्याखालील एडीटीपी द्या, पण नैनाचे विकासाचे मॉडेल आमच्या माथी लादू नका, अशा पध्दतीची मागणी आपल्या माध्यमातून मी शासनाकडे करीत आहे.

सभापती महोदय, विकास होत असताना हा पट्टा निसर्ग पर्यटन, साहसी खेळ यांना अतिशय पुरक व अतिशय लुभावना असा आहे. तेथे विकास करायचा असेल तर ऑस्ट्रीया, स्विझर्लंड, उत्तराखंडच्या धर्तीवर करावा, स्थानिकांना या विकासामध्ये स्थान देण्यात यावे. तेथे एकंदर सारीपाट मांडलेला आहे, गावाच्या दृष्टीने कोठेही विकास आराखडा करताना उद्याने, शाळा, रुग्णालये, क्रीडांगणे यांची निर्मिती करण्याचा प्रयत्न दिसत नाही. ज्या सुविधा द्यायच्या त्या विकसीत क्षेत्रात देणार पण मुळ गावठाणाला काहीही देणार नाही अशी परिस्थिती आहे. आपण पहायला गेले तर हा अतिशय त्रासदायक प्रकल्प आहे. ज्या क्षेत्रात वर्षाकाठी एक एक हजार सी.सी. होण्याचे पोटेंशीएल आहे, अशा या क्षेत्राचा विकास गेल्या १० वर्षात नैनाच्या रचनेनंतर संपूर्णपणे थांबला आहे. १० वर्षाचे २५० सीसी म्हणजे वर्षाला २५ सी.सी. येत आहेत. शेवटी हे कशासाठी व कोणासाठी हा प्रश्न निर्माण होत आहे. या परीसरातील तरुणांनी स्वत:च्या जमिनीवर ३-४ मजली इमारती बांधल्या, एडीटीपीची परवानगी घेऊन हे बांधकाम व्यवसाय करणारे अनेक स्थानिक बिल्डर तेथे निर्माण झालेले आहेत. पण त्यांना आपण एकदम व्हर्टीकल डेव्हलपमेंटमध्ये १८-२० मजल्याच्या इमारती बांधकाम करण्यास सांगितले तर मुळात देऊ केलेला हा एफएसआय ४० टक्के मिळत असलेल्या भूखंडामध्ये कंझ्युमही होत नाही ही वस्तुस्थिती आहे. हा महत्वाचा विषय अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून या सार्वभौम

श्री.बाळाराम पाटील .....

सभागृहाच्या पटलावर आलेला आहे. या विषयी सरकारचे प्रणेते माननीय श्री.शरद पवार साहेब, मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार, नगरविकास मंत्री महोदयांसोबत मी माझ्या सहकाऱ्यांनी नैना कमिटीच्या बैठकांच्या माध्यमातून चर्चा केलेली आहे. आमच्या मागण्यांची दखल घेतली जाईल असा सकारात्मक प्रतिसाद उपमुख्यमंत्री महोदयांनी दिलेला आहे. हे सर्व प्रकरण कोठे तरी बोसक्यात टाकले पाहिजे. खऱ्या अर्थाने स्थानिकांना विकासाची संधी मिळेल, विकास प्रक्रियेत स्थानिकांना प्राधान्य, स्थानिकांचे हितसंबंध सांभाळले जातील यादृष्टीने कोणता तरी पर्याय स्थानिकांसमोर ठेवला पाहिजे. प्रत्येक ग्रामस्थांसोबत सिडकोच्या जबाबदार वरिष्ठ प्रतिनिधींनी, तसेच महसूल पदाधिकारी यांचेसमवेत चर्चा केली पाहिजे, त्यांचे दुखणे ऐकले पाहिजे. त्यांचे मागणे काय आहे, काय मिळू शकते ते देण्याचा प्रयत्न केला पाहिजे तरच या विकासाला अर्थ राहणार आहे. अन्यथा या जमिनीची ॲटोमोबाईलच्या भाषेत तुलना करायची झाली तर मर्चिडीस, रेंज रोव्हर, ऑडी अशा कार नैनाच्या माध्यमातून कोठे तरी मारुती ८००, अल्टो कारच्या किंमतीला लाटण्याचा हा प्रयत्न आहे. एकही रुपयाची गुंतवणूक न करता, नैनाच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांच्या उरावर बसून अब्जावधीची प्रॉपर्टी निर्माण करण्याचा प्रयत्न नैनाकडून होताना डोळयादेखत दिसत आहे. भविष्यात या परिसरात आपणास संघर्ष नको असेल व या परिसरात शांतता हवी असेल तर नैनाला आवर घातला पाहिजे. नवी मुंबईतील प्रकल्पाच्या माध्यमातून १९७० सालापासून शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून दिवंगत श्री.दि.बा.पाटील, दत्तूशेठ पाटील, जनार्दन भगत यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्त लढत राहिले. सन १९९४ साली माननीय शरद पवार साहेब मुख्यमंत्री झाल्यानंतर याच सार्वभौम सभागृहाच्या माध्यमातून सिडको प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के योजनेचा लाभ दिला गेला, आज महाविकास आघाडी सरकार या राज्यात सत्तारुढ आहे. पुन्हा त्याचीच पुनरावृत्ती व्हावी व तेथील प्रकल्पग्रस्तांच्या व शेतकऱ्यांच्या भावनांची दखल घेत जो निर्णय १९९४ साली ९५ गावच्या शेतकऱ्यांसाठी १२.५ टक्क्याकरीता घेतला गेला, तेव्हा प्रचंड तीव्र आंदोलन झाले होते. विमानतळ पुनर्वसनाच्या संदर्भात प्रकल्पग्रस्तांच्या

श्री.बाळाराम पाटील .....

अग्रेषित प्रत

आंदोलनामुळे १२.५ टक्क्यामध्ये चांगल्या प्रकारचे पुनर्वसन तेथील १० गावांना दिले गेले. तोच निर्णय, तोच लाभ ४६१ चौरस कि.मी. मधील शेतकरी व प्रकल्पग्रस्तांना मिळवून द्यावा या उद्देशाने ही चर्चा या सभागृहात उपस्थित केली आहे. मला निश्चित अपेक्षा आहे की, या सार्वभौम सभागृहाच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांच्या हिताचा निर्णय घेण्यासाठी आपण भाग पाडाल या विश्वासासह आपणास धन्यवाद देतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

-------

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड(विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, नियम ५७ अन्वये सभागृहात उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.बाळाराम पाटील यांनी सभागृहात रायगड येथील नैना प्रकल्पासंदर्भात उत्तम मांडणी केलेली आहे. सन्माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे हे कर्तव्य दक्ष असे मंत्री सभागृहात उपस्थित आहेत म्हणून या विषयावर मी बोलण्याकरिता उभा आहे.

नैना प्रकल्पाच्या माध्यमातून एक नवीन महामुंबई निर्माण करण्याचा प्रयत्न रायगड येथे सरकारतर्फे केला जात आहे. मुंबई, नवी मुंबईचा विकास झाल्यानंतर, सिडकोची स्थापना झाल्यानंतर सरकारने २०१३ मध्ये नैनाचे नवीन धोरण आणण्याचा प्रयत्न केला. याकरिता सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि संबंधित शेतकरी यांच्याकडून याकरिता सातत्याने विरोध केला गेलेला आहे. मी याबाबतच्या मुद्दयांची पुनरावृत्ती करणार नाही. रायगडमध्ये १२.५ टक्के, २२.५ टक्के, एअरपोर्ट ऑथॉरिटी डेव्हलपमेंटच्या माध्यमातून, कोयना प्रकल्पाच्या माध्यमातून, महाराष्ट्रातून विविध ठिकाणाहून विस्थापित लोक राहायला येत आहेत. मुंबईबाहेर जाण्याकरिता रायगड येथील या प्रकल्पाकडे एक पर्याय म्हणून पाहिले जात आहे. रायगडमध्ये सिडको व्यतिरिक्त नैना, एमएसआरडीसी, जिल्हापरिषद या वेगवेगळया ऑथॉरिटीज काम करतात आणि त्या परवानग्याही देतात. नैना प्रकल्पाच्या जवळ ४६१ स्क्वे.कि.मी.भागाच्या व्यतिरिक्त काही भागांमध्ये एमएसआरडीसीच्या माध्यमातून परवानग्या देण्याचे काम केले जाते. मला माननीय मंत्रीमहोदयांच्या माध्यमातून हेच विचारायचे आहे की, काही भागामध्ये म्हणजे मोरवे धरणाच्या आजुबाजूचा परिसर, खालापूरच्या आसपासच्या परिसरात प्रायव्हेट फॉरेस्ट करण्याचे काम सरकारने केलेले आहे. प्रायव्हेट फॉरेस्टची संकल्पना कुठेही स्पष्टपणे लिहिलेली नाही. संबंधित शेतकऱ्याने तेथे शेती करायची का, तेथे किती पर्सेंटेज घर बांधण्याकरिता शेतकऱ्यांना परवानगी मिळेल ? याकरिता परवानगी देण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला आहेत का ?

अप्रकाशित प्रत

श्री.प्रसाद लाड .................

असल्यास, प्रायव्हेट फॉरेस्ट च्या संकल्पनेच्या दृष्टीने शेतकऱ्याने तेथे किती टक्के घरांचे बांधकाम केले पाहिजे ? सदरहू बांधकामाचा प्लान पास झाल्यानंतर एमएसआरडीसी, नैना, सिडको, जिल्हापरिषद यापैकी कुठे गेला पाहिजे ? या सर्व बाबींमुळे स्थानिक जनता व शेतकरी त्रस्त झालेले आहेत. कर्जत, खालापूर, पनवेलच्या पुढील भागात मुंबईतील, मुंबईच्या परिसरातील, पुण्यातील लोक विविध प्रकल्पांमध्ये "सेकंड होम"ची कन्सेप्ट राबवित आहे. सीआरझेडच्या जाचक अटींमुळे अलिबागची लोक देखील कर्जत, पेण, पनवेल, खालापूर या भागाकडे वळायला लागलेली दिसून येत आहेत.

सभापती महोदय, मला माननीय मंत्रीमहोदयांना दोन विषय प्रामुख्याने विचारायचे आहेत. या विषयांबाबत शेतकऱ्यांची चर्चेची अपेक्षा आहे. या संदर्भात कोणत्याही प्रकारची नोटीस, लेखी सूचना न देता कारवाई केली जात आहे. तसेच, या संदर्भात संबंधितांना उत्तर देण्याची संधीही दिली जात नाही. माझी विनंती आहे की, गावनिहाय शेतकरी समिती निर्माण करावी. सदर समितीच्या माध्यमातून चर्चा करावी. प्रत्येक गावातील गुरचरण, गावठाण, फॉरेस्ट या जागा ग्रामस्थ वर्षानुवर्षे वापरत आहेत, या माध्यमातून शासनाने अनेक जाचक अटी या ग्रामस्थांना लावलेल्या आहेत. जेथे नवी मुंबईच्या व्यतिरिक्त महामुंबईचे स्वप्न पाहिले जात आहे, त्या सर्व भागांमधील जाचक अटी काढून या संदर्भातील एक नियमावली निश्चित करण्यात येणार आहे का ? जसे, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, डिमार्केशन प्लानकरिता नैना ठेवण्यात यावे. एखादे शहर वसवित असताना त्याचे डिमार्केशन करावे, त्या प्लानकरिता नैनाला ऑथॉरिटी देण्यात यावी किंवा एमएसआरडीसीला ऑथॉरिटी देण्यात यावी. हे करत असताना गावातील शेतकऱ्यांची ही जमीन आहे, त्यांचा त्यांच्या जमिनीवरील हक्क काढून घेण्यात येऊ नये. आपल्या मनातील असलेल्या प्रकल्पांमध्ये हॉस्पिटल,शाळा, कॉलेज, इमारती, मॉल आणि इतर जे काही ग्रीनफील्ड करायचे आहेत ते शासनाने जरुर करावे. परंतु पुन्हा एकदा उद्योग समुहाचा घाट घालून नवीन वसवू पाहणाऱ्या या शहराला

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड .......

प्रदूषणामध्ये टाकण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये. गावठाण, फॉरेस्ट, गुरचरण याबाबत माननीय मंत्रीमहोदयांनी आपली भूमिका स्पष्ट करावी. रायगडमधील माझ्या शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा, अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------------

असुधारित प्रत

श्री.अनिकेत तटकरे (रायगड-रत्नागिरी-सिंधुदूर्ग स्थानिक प्रा.संस्था): सभापती महोदय, नियम ५७ अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

रायगडमधील एका महत्त्वाच्या प्रकल्पाबाबत ही अल्पकालीन चर्चा सन्माननीय सदस्य श्री.जयंत.प्र.पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.बाळाराम पाटील यांनी सभागृहात उपस्थित केलेली आहे. खरे पाहिले तर रायगड जिल्हा देशभरात सर्वाधिक उद्योग व नागरीकरणाचा जिल्हा म्हणून होऊ घातलेला आहे.

या काळात गेल्या ५० वर्षांपासून सिडकोने जी काही जागा घेतलेली आहे, त्याचे नियोजन व त्या संदर्भातील आवश्यक ती पुर्तता अद्यापपावेतो सिडकोच्या माध्यमातून झालेली नाही. गेल्या दहा वर्षांपासून नैना हा प्रकल्प येथे येऊ घातलेला आहे. नैना म्हणजे "नवी मुंबई एअरपोर्ट इन्फ्ल्यूएन्स नोटिफाईड एरिया" खरे तर या संदर्भातील माहिती अजूनही रायगडवासियांना आणि त्या भागातील शेतकऱ्यांना थेट पोहोचू शकलेली नाही. या संदर्भात निश्चितपणे कोणते धोरण शासनाने अवलंबविलेले आहे, याची माहिती तेथे संबंधितांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून या परिसरात कशा प्रकारे विकास होणार आहे, नेमका कशाचा अंतर्भाव यामध्ये केला जाणार आहे, याची माहिती त्या भागातील शेतकरी व नागरिकांना गेल्या दहा वर्षांपासून दिलेली नाही. या प्रकल्पाच्या विरोधात शेतकरी उत्कर्ष समिती व शेतकरी यांच्याकडून सातत्याने उपोषणे व आंदोलने केली जात आहेत. यासंदर्भातील न्याय कोणाकडे मागायचा ? कोणाकडे जाऊन आपली वेदना मांडायची ? हा प्रश्न देखील शेतकऱ्यांसमोर आणि आम्हा नागरिकांसमोर उपस्थित झालेला आहे. शेतकऱ्यांच्या मनातील संभ्रम दूर करण्यामध्ये सिडको, नगरविकास खाते, किंबहुना रायगड जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधी हे सर्व जण अयशस्वी झालेले आहेत. या संदर्भात पावले उचलण्याची आवश्यकता आहे. या बाबतीतील संभ्रम लोकांच्या मनातून दूर करणे आवश्यक आहे. दहा-दहा वर्षे एखादा प्रकल्प येऊनही त्याच्या संदर्भातील स्पष्टता अद्याप न येणे ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने भुषणावह नाही. विकासाच्या दृष्टीने हॉटस्पॉट म्हणून नैना हा प्रकल्प विकसित करण्याचा प्रयत्न

असुधारित प्रत

श्री.अनिकेत तटकरे....

शासनाच्या माध्यमातून होत आहे. सात ते दहा वर्षांमध्ये नैनाच्या माध्यमातून तुरळकच विकास कामे झाल्याचे पाहायला मिळत आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, सन्माननीय सदस्य श्री.बाळाराम पाटील यांनी शेतकरी व भुमिपूत्र यांचे प्रश्न सभागृहात मांडलेले आहेत. सन्माननीय मंत्रीमहोदय श्री.एकनाथ शिंदे आपण गरिबांचे कैवारी म्हणून ओळखले जातात, आम्हा शेतकऱ्यांना आपण न्याय देणार, अशा अपेक्षेने आम्ही सर्व जण आपल्याकडे पाहत आहोत. स्वत:चे कुटुंब वाढल्यानंतर घर बांधायचे झाले तर त्याकरिता परवानगी नक्की कोणाकडे मागायला जायची ? हा प्रश्न तेथील नागरिकांमध्ये निर्माण झालेला आहे, ही परवानगी निश्चितपणे जिल्हाधिकारी,सिडको, नैना, एमएसआरडीसी, शेतकरी उत्कर्ष समिति यांच्याकडे मागायला जायची का ?याबाबत अजूनही संभ्रम कायम आहे. परिणामी, बांधकामाच्या परवानगीबाबत पत्र घेऊन विविध कार्यालयांमध्ये हेलपाटे सर्वसामान्यांना मारावे लागत आहेत. या संदर्भातील स्पष्टता देखील लवकर येणे गरजेचे आहे. आज दहा वर्षे झाली तरीही याबाबतचे अधिग्रहण झालेले नाही. खरे तर अधिग्रहणाच्या नोटीसेस निघाल्यानंतर दोन वर्षे अधिग्रहण झालेले नसेल तर त्या जमिनी पुनश्च शेतकऱ्यांकडे देण्यासंदर्भात उच्च न्यायालयाकडून आदेश देण्यात आलेले आहेत. आज तेथील अधिकृत वा अनधिकृत घरे असतील, त्यांची बांधकामे झाल्यानंतर कशा तऱ्हेने पुनर्वसन होणार याबाबतचे देखील धोरण तयार करणे गरजेचे असणार आहे. आज सिडकोच्या माध्यमातून खारघर, उलवे, कामोठे, पनवेल, नवीन पनवेल येथे वस्ती वसविण्यात आलेली आहे. मात्र आजही तेथे पाण्याची व्यवस्था झालेली नाही. असे असताना नैना प्रकल्पासारखे भूत रायगडच्या डोक्यावर बसविले जात आहे. याबाबत शासनाने पाण्याची देखील उपाययोजना कशा पध्दतीने केली जाईल, याचा विचार करणे आवश्यक आहे. अन्यथा आम्ही रायगडकर नवी मुंबई आणि मुंबई यांना पाणी देऊ, परंतु प्रत्यक्ष रायगडकर मात्र तहानलेले राहता कामा नये. याकरिता पाण्याचे नियोजन कसे केले जाणार आहे, याची स्पष्टता येणे गरजेचे राहणार आहे. दहा वर्षे झाली तरी अजून सिडको किंवा अन्य नियोजन प्राधिकरणाने डीपी प्लान तयार केलेला नाही.

यानंतर श्री.सोनावणे.....

असुधारित प्रत

श्री. अनिकेत तटकरे........

माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भातील स्पष्टता सांगण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, बाळाराम पाटील यांनी त्यांच्या अल्पकालीन चर्चेत असे म्हणाले होते की, शेतकऱ्यांचा पूर्वी ६० टक्के सहभाग राहणार होता. त्यानंतर ४० टक्के आणि आता तर ४० टक्क्यावरुन ३० टक्क्यांपर्यंत त्यांचा सहभाग आलेला आहे. आणखी ५ ते ६ वर्षानंतर शेतकऱ्यांचा सहभाग १० टक्के तरी राहिल किंवा कसे अशी शंका मनात निर्माण झालेली आहे. शेतकऱ्यांचा सहभाग घेऊन, त्यांना स्टेक होल्डर म्हणून घेऊन.... जसे पुण्यासारखी मगरपट्टा सिटी असेल किंवा अन्य परिसरात जसा विकास झाला तशाच प्रकारचे मॉडेल या आजच्या कार्यक्रमात समावेश करावा अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भातील निर्णय आणि संभ्रम लवकरात लवकर दूर करण्यासाठी शेतकरी आणि आमच्यासमवेत बैठक आयोजित करुन प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती करतो आणि एवढे बोलून मी अल्पकालीन चर्चेवरील माझे विचारांना विराम देतो.

--------

असुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे ( नगर विकास मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपील पाटील, प्रसाद लाड, अनिकेत तटकरे यांनी म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चेत भाग घेतला असून, त्यांनी काही मौलिक सूचना आणि काही मागण्या केलेल्या आहेत. त्याचा शासनाकडून नक्कीच गांभीर्याने विचार केला जाईल. यामध्ये काही अडचणी आहेत. वनविंडो सिस्टिम राबवितो. काही निर्णय महसूल विभागाकडे, जिल्हाधिकारी, भूमी अभिलेख विभाग आणि नगर रचना विभागाकडे आहेत. हे प्रश्न एकत्रित आल्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या भावना योग्य आहेत.

सभापती महोदय, दिनांक १० जानेवारी, २०१३ रोजी सिडकोने मुंबई शहराला पर्याय म्हणून नवी मुंबई शहर विकसित केले आहे. अशा प्रकारचा विकास नैना प्रकल्पाच्या माध्यमातून होईल असे लोकांना वाटत होते. परंतु, काही कारणांमुळे आणि अडचणींमुळे नैना प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली नाही हे मी प्रामाणिकपणे सदनाला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, दिनांक १० जानेवारी, २०१३ रोजी नैना प्राधिकरण घोषित झाल्यानंतर २३ गावांसाठी अंततिरम विकास योजना दिनांक २७ एप्रिल, २०१७ च्या अधीसूचनेद्वारे ३७ चौरस किलो मिटर क्षेत्रासाठी मंजूर झाली होती. त्यानंतर दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजी १५२ गावांसाठी ३३४ चौरस किलो मिटर क्षेत्रांपैकी २ हजार ६७६ हेक्टरसाठी ११ टाऊन प्लॅनिंग योजना तयार करण्यात येत आहेत. शासनाने टीपी-१ आणि टीपी-२ साठी मंजुरी दिलेली आहे. टीपी-१ योजनेचा विकास पूर्ण झालेला आहे. टीपी-२ योजनेसाठी निविदा मागविलेल्या आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. टीपी-३ योजना ही शासन मंजुरीसाठी सादर करण्याचे अंतिम टप्पयात असून, विकासासाठी जागेवर सीमांकन करण्यात येत आहे. टीपी-४, टीपी-५, टीपी-६, आणि टीपी-७ योजनेवरील सूचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यात येत आहेत. ४० टक्के आणि ६० टक्क्यांचे धोरण आहे. सिडकोने १२.५ टक्क्यांचा निर्णय घेतलेला आहे. त्यानंतर मोबदला न देता जास्तीची जमीन द्यावी म्हणून २२.५ टक्के देण्याचा निर्णय घेतला. हे करीत असताना दिवाबत्ती, रस्ते, संपूर्ण

श्री. एकनाथ शिंदे......

पायाभूत सुविधा विकसित करुन मूळ भुमिपूत्राला २२.५ टक्के देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. आपण काही कारणांमुळे नक्कीच मागे आहोत. परंतु, या धोरणात २२.५ टक्क्यांऐवजी ४० टक्के जमीन भुमिपूत्रांसाठी आरिक्षत ठेवली आहे. यामध्ये एनए, रस्ते, दिवाबत्ती, एसटीपी प्लॅन्ट आणि सर्व सोयीसुविधा त्यांना देय आहेत. आता थोड्याच वेळा पूर्वी संबंधित सन्माननीय सदस्य असे म्हणाले होते की, सिडको नैना प्रकल्पाकरिता जमीन संपादित करण्यासाठी निधी खर्च करीत नाही. पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सिडको निधी खर्च करणार आहे. यामध्ये ६० टक्के जमीन सिडकोकडे येणार आहे. यामध्ये रस्ते, गटारे, भुयारी गटार योजना, पाणीपुरवठा योजना, दिवाबत्ती, वाहतूक व्यवस्था, मैदाने, शाळा, हॉस्पिटल, सुरक्षा, सुविधा, इतर विकास कामे आणि बगिचांचा त्यामध्ये समावेश असून, ती कामे करावयाची आहे. गावकऱ्यांनी या प्रकल्पाच्या विरोधात आंदोनले केलेली आहेत. पुनश्च आंदोलन करण्याची वेळ येणार नाही एवढी खात्री सन्माननीय सदस्यांनी बाळगावी. कारण जे काही करणार आहोत त्याची माहिती मी देत आहे. सिडकोकडे ४० टक्के आणि ६० टक्क्यांची योजना आली नसती तर जमीन मालकांना.....जर ते रेग्युलर पध्दतीने सिडकोकडे आले असते तर त्यामध्ये ४० टक्के जमिनीवर २.५ टक्के एफएसआय मिळतो. त्या ठिकाणी त्यांना ग्रीन झोनमध्ये ०.०२ टक्के एफएसआय मिळाला असता. निवासी क्षेत्रात केवळ १ एफएसआय मिळाला असता. सिडको, नैना प्रकल्पाकडे जेव्हा लेआऊट मंजुरीसाठी आले असते त्यावेळेस ओपन स्पेस, पार्किंग, पब्लिक युटिलिटी आणि इन्स्टीट्यूशनल रिझर्व्हेशनसाठी ४० ते ४५ टक्के जागा द्यावी लागली असती. १ एफएसआय कमी मिळाला असला तर शेतकऱ्यांच्या हातात काय मिळाले असते याचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. रोड आणि ओपनस्पेस गृहीत धरले असते तर २० टक्के + १० टक्के असे मिळूण ३० टक्के मिळाले असते. ४० ते ४५ टक्के तर सोडून द्या. दोन हेतूसाठी देखील ३० टक्के त्यांचा एफएसआय कमी झाला असता. २३ गावांसाठी सन २०१७ आणि सन २०१९ रोजी १५२ गावांवाठी जी टीपी योजना मंजूर केलेली आहे. आकुर्ली, बेलवली आणि चिखली पहिल्या टीपी योजनेमध्ये विकास केलेला

असुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे......

आहे. त्यानंतर पुढील ११ योजना टप्प्याटप्प्याने पुढे नेल्या जात आहे. आपण ०.५ टक्के एफएसआयचा उल्लेख केला होता, तो ०.५ टक्के नसून, २.५ एफएसआय आहे. ४० टक्के त्याचे बांधकाम आहे आणि तो त्याचा मालक आहे ४० टक्के त्याला विथ इन्फ्रास्ट्रक्चर आणि विथ एनए मिळणार आहे. आज अकृषिक किंवा ग्रीन झोनमधील जागा असेल तर त्याची किंमत समजा १० हजार रुपये असेल तर माझ्या माहितीप्रमाणे हे सर्व इन्फ्रास्ट्रक्चर विकसित केल्यानंतर ४० टक्के संबंधितांना मिळाल्यानंतर त्याचा तो मालक झाल्यानंतर मला वाटते की, काही पटींने त्याचे पोटँशिअल वाढणार आहे. ही वस्तुस्थिती आपल्याला लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. अडचणी आहेत. अडचणी नाहीत असे मी म्हणणार नाही. सन्माननीय सदस्यांनी एमडीचा उल्लेख केलेला आहे. पूर्वीची ती परिस्थिती असू शकते. दिल्लीवरुन ते येत होते. आणखी कोठून तरी येत होते. पण आजची परिस्थिती तशी नाही.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.एकनाथ शिंदे....

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्य कामानिमित्त माझ्याकडे येतात. नगर विकास मंत्री या नात्याने संबंधितांना सांगितल्यानंतर त्यांची कामे होतात. माझा सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, आता पूर्वीसारखी परिस्थिती राहिलेली नाही. पूर्वीच्या परिस्थितीत आता बदल झालेला आहे. शेवटी आपल्याला ही कामे लोकांसाठीच करावयाची आहेत. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, नवी मुंबईत भूमिपुत्रांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न आपण सोडविला आहे. ती घरे आता त्यांच्या मालकीची होत आहेत. युनिफाईड डीसीपीआरच्या माध्यमातून या बाबत अनेक लोकांनी अभिनंदन केले आहे. नामांकित वर्तमानपत्रांनी सुद्धा त्याची दखल घेतली आहे. हा विषय अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार आम्ही त्या भागात एफएसआय वाढविला आहे. लोकांना परवडणारी घरे उपलब्ध करुन द्यायची झाल्यास मागणी आणि पुरवठा यांचा ताळमेळ बसला नाही तर ती घरे देणे शक्य होणार नाही. अशा प्रकारचे अनेक निर्णय नगर विकास विभागाच्या माध्यमातून घेण्यात आले आहेत.

सभापती महोदय, ही योजना यशस्वी होण्यासाठी सिडकोला काही अधिकार द्यावयाचे आहेत. मी अगोदर सांगितल्यानुसार महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग, नगर विकास विभाग या विभागांचे अधिकार सिडकोला देऊन वन विंडो सिस्टीम करावी लागेल. तशा प्रकारचा प्रस्ताव महसूल विभागाकडे सादर केला आहे. कारण यामध्ये महसूल विभागाची महत्त्वाची भूमिका आहे. या विभागाचा यामध्ये महत्त्वपूर्ण सहभाग आहे. वन विंडो सिस्टीममध्ये सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या अखत्यारितील नैनाच्या अधिकाऱ्यांकडे एक अधिकार असला तर परवानग्या घेण्यासाठी ५० ठिकाणी जाण्याची आवश्यकता भासणार नाही. या दृष्टीने सुद्धा निर्णय घेण्यात येत आहे. ४० टक्के आण ६० टक्के जमीन वाटपाबाबत सांगतो. या संदर्भात शेतकरी असल्याचा दाखला मिळत नाही, या जमिनी मिळाल्यानंतर त्यांचा दाखला संपुष्टात येतो. त्या लोकांना शेतकरी दाखला मिळाला पाहिजे या

श्री.एकनाथ शिंदे....

बाबतीत देखील निर्णय घेत आहोत. पूर्वीच्या शासन निर्णयात या भागातील जमीन मालकांचा विषय समाविष्ट केल्यानंतर त्यांना शेतकरी दाखला दिला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी खाजगी वन, गावठाण, प्राप्त झालेल्या नोटीसेस इत्यादी विषय उपस्थित केले. मी सांगू इच्छितोा की, कोणत्याही परिस्थितीत त्या भागातील शेतकऱ्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जाणार नाही. मुळात त्यांना अशा प्रकारच्या नोटीसेस दिल्या जाणार नाहीत. जर अशा नोटीसेस दिल्या जात असतील तर त्या तत्काळ थांबविण्यात येतील. खाजगी वनासंदर्भातील प्रकरणे तपासून त्यावर निर्णय घेण्यात येतील.

सभापती महोदय, ७/१२ च्या उताऱ्यावर खाजगी वने अशा प्रकारच्या नोंदीची बाब महसूल विभागाची संबंधित आहे. या विषयी त्या विभागासोबत चर्चा करण्यात येईल. या प्रकरणी जो काही निर्णय घ्यावयाचा आहे तो घेता येईल. सन्माननीय सदस्यांचा नैना, मैना प्रकल्पाच्या बाबतीत जो राग आहे त्याचा अँगत्यांनी ल थोडासा बदलावा. जेणेकरुन आपल्या सहकार्याने या प्रकल्पाला चांगला आकार देऊ शकू. या भागातील जो एरिया एयरपोर्टमुळे प्रभावित झाला आहे त्यात सुधारणा करण्यासाठी आपण यामध्ये नैना प्रकल्प अंतर्भूत केला आहे. या विषयी बैठक सुद्धा घेता येईल. माननीय सभापती यांना सुद्धा या विषयी बरीच माहिती आहे. त्या भागातील भूमिपूत्र त्यांच्या मागण्या घेऊन सभापती महोदयांकडे येत असतात.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बेटरमेंट चार्जेसचा उल्लेख केला. त्या भागातील शेतकऱ्यांकडून बेटरमेंट चार्जेस घेण्यात येतात. मी सभागृहाच्या माध्यमातून सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांकडून बेटरमेंट चार्जेस वसूल करण्याच्या प्रक्रियेला मी स्थगिती देत आहे. शेतकऱ्यांकडून बेटरमेंट चार्जेस न घेता जेव्हा खरेदी-विक्री होईल, जो एंड युजर आहे त्यांच्याकडून चार्जेस घेण्याबाबतचे धोरण ठरविले

असुधारित प्रत

श्री.एकनाथ शिंदे....

जाईल. जी डेव्हलपमेंट करण्यात येते त्यासाठी डेव्हलपमेंट चार्जेस, बेटरमेंट चार्जेस नक्की घेण्यात येतील. परंतु त्यांचा शेतकऱ्यांवर भार पाडणार नाही.

**सभापती** : मंत्री महोदय, डेव्हलपमेंट चार्जेस आणि बेटरमेंट चार्जेस यामध्ये काय फरक आहे आणि दोन्ही चार्जेस कशासाठी वसूल करण्यात येतात ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, त्या ठिकाणी शेतकऱ्यांकडून बेटरमेंट चार्जेस घेत आहोत. परंतु बेटरमेंट चार्जेस शेतकऱ्यांकडून न घेता एंड युजरच्या वेळी हे चार्जेस वसूल करण्याबाबतचे धोरण ठरविता येईल. परंतु शेतकऱ्यांकडून जे बेटरमेंट चार्जेस वसूल केले जात आहे त्याला स्थगिती देत आहोत.

सभापती महोदय, शेतकरी दाखल्याच्या बाबतीत सांगतो की, एकदा ते ४० टक्क्यामध्ये आल्यानंतर त्यांची शेतकरी म्हणून असलेली ओळख संपुष्टात येते. परंतु या कारणामुळे त्यांची ओळख संपुष्टात येऊ नये म्हणून उचित निर्णय घेण्यात येईल. यामध्ये मूळ दुखणे असे आहे की, शेतकरी म्हणतात की आम्ही जमीन मालक आहोत, आम्ही प्रकल्पासाठी जमीन देऊनही आम्ही लीजधारक राहतो. मी सांगू इच्छितो की, लीज होल्डची जमीन फ्री होल्ड करण्यासाठी, म्हणजेच त्याला ४० टक्क्याच्या मर्यादेत स्वत:ला मालक बनविण्यासाठी काय निर्णय घेता येईल, या बाबतीत सुद्धा निर्णय घेण्यात येईल. हा विषय इतर विभागांशी संबंधित असल्यामुळे या विषयी बैठक घेण्यात येईल. शेतकरी दाखला देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. तसेच बेटरमेंट चार्जेस आकारण्यास तत्काळ स्थगिती देत आहोत. या बाबतीत धोरण ठरवून पुढील निर्णय घेण्यात येतील. सन्माननीय सदस्यांच्या या व्यतिरिक्त काही तक्रारी असतील तर त्या बाबतीत नक्की समाधान करण्यात येईल.

**सभापती** : मला वाटते मंत्री महोदयांनी या विषयी बैठकच आयोजित करावी.

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. ते आता २५ टक्क्यांपर्यंत आले आहेत. माझी विनंती आहे की, आपल्या दालनात या विषयी विस्तृतपणे बैठक आयोजित केली पाहिजे. परंतु त्या दिवशी अन्य कोणतीही बैठक आयोजित करता कामा नये. शेतकऱ्यांचे मत परिवर्तन केले त्या बाबतीत माझे काही म्हणणे नाही. आम्हाला नैना प्रकल्प नको. आम्हाला सिडको चालेल. त्यावर आम्हाला बोलता येईल. तसेच दुसरी बाब अशी की, ग्रामपंचायतींवर निर्बंध घातले आहेत. गावातील घरे दुरुस्त करण्यावर बंदी आहे. माझी मागणी आहे की, ही बंदी ताबडतोब मागे घेतली पाहिजे. तसेच गावातील घरे बांधण्याची परवानगी पूर्ववत करावयास पाहिजे. मी एरियाच्या वादात जात नाही. तसेच दुसरी बाब अशी की, या भागात गावकीच्या मालकीच्या जमिनी आहेत, ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जमिनी आहेत, गावगवणीच्या जमिनी आहेत. पुढील २५ वर्षात गावठाण वाढेल याचा विचार करुन राज्य सरकारचे ब्रिटिशकालीन धोरण आहे, त्या धोरणानुसार राखीव जागा ठेवलेली आहे. ती जागा सिडको विनामूल्य घेणार काय ? आमचे परंपरागत तलाव आहेत. ते तलाव सिडको बुजवून ती जमीन विकते. या संदर्भात कोणती नुकसान भरपाई देणार आहात, हे सांगितले पाहिजे. या अल्पकालीन चर्चेला वेळेची मर्यादा आहे याची मला जाणीव आहे. मी पुनश्च एकच विनंती करतो की, या संपूर्ण विषयी आपल्या दालनात विस्तृपणे बैठक आयोजित करावी.

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्यानुसार या विषयी बैठक आयोजित करण्यात येईल. त्या बैठकीत उर्वरित प्रश्न वा अडचणी सोडविण्यात येतील. मी या विषयी सकारात्मक आहे, मी सन्माननीय सदस्यांच्या बाजूने आहे, तेथील लोकांच्या बाजूने आहे. त्यामुळे नैना असो किंवा सिडको असो, आपल्याला लोकांच्या हिताची कामे करावयाची आहेत. त्यासाठी अपेक्षित विकास करण्यास चालना देण्यात येईल.

असुधारित प्रत

**सभापती** : या विषयी बैठक आयोजित करण्यास माझा नकार नाही. सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांना सुद्धा त्या बैठकीला आमंत्रित करण्यात येईल. परंतु माझी एकच सूचना आहे की, सदरहू बैठकीत जे विषय चर्चेला घ्यावयाचे आहेत ते अगोदर माझ्याकडे दिले तर बरे होईल.

श्री.जयंत प्र.पाटील : ठीक आहे.

**सभापती** : आता अल्पकालीन चर्चा संपली आहे.

--------

असुधारित प्रत

## अल्पकालीन चर्चा क्रमांक-२

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर अनुक्रमांक-२ वर सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे व इतर वि.प.स. यांच्या नावे दर्शविण्यात आलेली अल्पकालीन चर्चा पुढे ढकलण्यात येत आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता पुन्हा सुरु भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी ११.०९ ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------------

नंतर श्री.कांबळे......

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे

## कुर्ला (मुंबई) येथील कृष्णलाल मारवाह मार्गावरील पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१) * १२२५६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला (मुंबई) येथील कृष्णलाल मारवाह मार्गावरील पिकनीक हॉटेल जवळ ७ मीटर रुंदीच्या पूलाच्या पुनर्बांधणीचे काम दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास ए.आर.कन्स्ट्रक्शन कंपनीला विनानिविदा देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुर्ला-कलिना रस्त्यावर मिठी नदीवरील अस्तित्वात असलेल्या पुलाच्या रुंदीकरणाचे काम नियमानुसार माहे नोव्हेंबर, २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना, सदर पुलाचे काम अद्यापपर्यंत अपूर्ण असतानाही कंत्राटदार ए.आर.कन्स्ट्रक्श्न कंपनीस रुपये ९ कोटी ६६ लाख अदा करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विनानिविदा काम देणाऱ्या प्रशासनातील दोषी अधिकारी व पुलाचे काम अपूर्ण ठेवणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) कुर्ला-कलिना रस्त्यावरील मिठी नदीवरील अस्तित्वात असलेल्या पुलाच्या रुंदीकरणाचे काम मे.ए.आर. कन्स्ट्रक्शन यांना स्थायी समितीच्या दिनांक ०७/०४/२०१८ रोजीच्या ठरावानुसार देण्यात आले. सदर कामाचा कंत्राट कालावधी पावसाळा वगळून १९ महिने इतका होता. तसेच सदर कामासाठी माहे एप्रिल, २०१८ मध्ये कार्यादेश देण्यात आला.

त्यानुसार दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करणे अपेक्षित होते. तथापि, वाहतूक पोलिसांची परवानगी मिळाली नसल्याने माहे

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२२५६....
श्री. एकनाथ शिंदे ....
जानेवारी, २०१९ मध्ये वाहतूक पोलिसांमार्फत वाहतुकीची पर्यायी व्यवस्था करण्यात आल्यानंतर प्रत्यक्षात काम सुरु करण्यात आले. तथापि, कोविड-१९ च्या टाळेबंदीमुळे दिनांक २३ मार्च, २०२० ते माहे सप्टेंबर, २०२० पर्यंत काम पूर्णपणे बंद होते. तसेच, टाळेबंदीनंतर काम सुरु झाल्यानंतर विमानतळ प्राधिकरणाने आर.सी.सी. गर्डर्स लॉचिंग करण्यासाठी क्रेन वापरण्यास आक्षेप घेतल्याने सदर गर्डर्स कार्यस्थळावर तयार करण्यात अतिरिक्त वेळ गेला. सदर काम माहे मे, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. सदर कामाची कंत्राट किंमत रुपये १४.२२ कोटी इतकी असून, त्यापैकी रुपये ६.७० कोटी इतक्या रकमेचे अधिदान बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कंत्राटदारास करण्यात आले आहे.

तसेच, कृष्णलाल मारवाह मार्गावरील पिकनीक हॉटेलजवळ पुलाची संरक्षक भिंत दिनांक ११ जून, २०२१ मध्ये कोसळल्यामुळे व पुलाच्या स्लॅबला तडे गेल्यामुळे सदर पूल वाहतुकीसाठी बंद केला आहे. सदर पूल हा साकीविहार रस्ता व मरोळ मरोशी रोडवरील सेव्हन हिल्स हॉस्पिटलला जाण्याकरीताचा मुख्य मार्ग आहे. सदर पूल बंद असल्यामुळे सदर भागात वाहतूक कोंडी होत होती. सदर काम तातडीने करणे गरजेचे होते. त्यामुळे
पुलाचे काम त्वरीत करण्याकरीता मे.ए.आर. कन्स्ट्रक्शनमार्फत कुर्ला कलिना येथील मिठी नदीवरील पुलाच्या कामात मारवाह पुलाच्या पुनर्बांधणीचे अतिरिक्त काम करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६९(ई) सह ६९(क) अन्वये स्थायी समितीच्या दिनांक २९/१२/२०२१ रोजीच्या ठरावानुसार कंत्राटदारास देण्यात आले आहे. सदर कामाकरीता कंत्राटदारास दिनांक २४/०१/२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यादेश देण्यात आले आहेत.

सदर पुलाचे अतिरिक्त काम कंत्राटदारास महानगरपालिकेच्या २०१३ च्या दरसूचीनुसार देण्यात आले आहे. सध्या बृहन्मुंबई महानगरपालिकेत दरसूची २०१८ नुसार निविदा मागविल्या जातात. दरसूची २०१८ व दरसूची २०१३ यातील दराची तफावत पाहता पुलाच्या पुनर्बांधणीचे काम नियुक्त कंत्राटदारास देणे महानगरपालिकेस फायदेशीर आहे.

ता.प्र.क्र.१२२५६....
श्री. एकनाथ शिंदे ....

सदर अतिरिक्त कामाची कंत्राट किंमत रुपये ११.८४ कोटी इतकी असून, सदर काम दिनांक ३१/१२/२०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. तसेच, सदर अतिरिक्त कामासाठी कंत्राटदारास अद्यापपर्यंत कोणतीही रक्कम प्रदान करण्यात आलेली नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, महानगरपालिकेच्या स्थायी समितीला निविदेशिवाय किती रकमेपर्यंत काम देता येते ? माझ्या ज्ञानाप्रमाणे, अकाऊंट कोडप्रमाणे आता नवीन नियम झाला आहे. सुरुवातीला ३ लाख रुपयांपर्यंत मर्यादा होती आणि आता १० लाख रुपयांपर्यंत निविदेशिवाय तातडीचे काम देऊ शकतो. मात्र हे १५ कोटी रुपयांचे काम आहे आणि निविदेशिवाय केले आहे. एक्स्ट्रा क्लेममध्ये १३ कोटी रुपये आहेत. हे काय चालले आहे ? स्थायी समितीला मुंबई महानगरपालिकेचा वेगळा ॲक्ट आहे का ? कंपनीला त्याप्रमाणे पैसे दिले आहेत. ए.आर.कन्स्ट्रक्शन स्थायी समितीचा जावई आहे का ? हे काम कोणत्या कायद्याने दिले याची मला माहिती पाहिजे. काम दिले असेल तर मुंबई महानगरपालिकेमध्ये असा कोणता विशिष्ट कायदा केला आहे, मुंबई महानगरपालिकेसाठी वेगळा कायदा आहे का ? येथे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालत आहे. मुंबई महानगरपालिकेने किती कामे निविदेशिवाय दिली आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : सभापती महोदय, कृष्णलाल मारवाह मार्ग यातील ७ मिटर रुंदीच्या पुलाचे बांधकाम दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजीच्या सुमारास ए.आर. कन्स्ट्रक्शन कंपनीला निविदेशिवाय देण्याबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. ए.आर. कन्स्ट्रक्शन कंपनीला या पुलाचे काम निविदा काढून दिले. त्याच भागामध्ये दुसरा पुल आहे. कुर्ला-कलिना रस्त्यावरील मिठी नदीवरील पुलाची जुनी निविदा आहे.

असुधारित प्रत

मारवाह पुल सन २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे धोकादायक झाला होता. त्या पुलाला तडे गेले होते. तो पूल त्याचा पाया खचल्यामुळे वाहतुकीसाठी बंद करण्यात

ता.प्र.क्र.१२२५६....
श्री. एकनाथ शिंदे ....

आला होता. त्या पुलाच्या भिंतीमधील सांध्याचे काँक्रिट देखील जागेवर निखळले होते. काँक्रिटमधील सळया मोठ्या प्रमाणात गंजल्याचे निदर्शनास आले होते. हा पूल धोकादायक झाल्यामुळे पाडला. जुना पूल आहे. त्याची निविदा काढली होती. त्याला लागूनच हा पूल असल्यामुळे थोडा जवळ आहे. त्या वॉर्डात आहे. फार लांब नाही. तो पूल ठाण्याला नाही. त्या भागातील सन्माननीय लोकप्रतिनिधी, खासदार श्री. अरविंद सावंत, सन्माननीय आमदार श्री. दिलीप लांडे, सन्माननीय स्थानिक नगरसेविका श्रीमती अश्विनी माटेकर या सर्वांनी विनंती केली. कारण त्यावेळी कोविडचे संकट होते. कोविड केंद्राकडे, सेव्हन हिल हॉस्पिटलकडे जाणारा मुख्य मार्ग होता. सद्य:स्थितील पूल बंद झाल्याने ५-६ कि.मी.अंतर वळसा घालून जावे लागत होते. कोविडच्या संकटामध्ये या सर्व बाबींचा विचार करुन या पुलाचे काम ए.आर. कन्स्ट्रक्शन कंपनीला दिले. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६९ ई सह क अन्वये स्थायी समितीच्या दिनांक २९.१२.२०२१ रोजीच्या निर्णयाप्रमाणे ते काम त्यांना दिले. सन २०१३ चा डीएसआर होता. तो १५ ते २० टक्के कमी होता. आपण सन २०१८ चा डीएसआर धरला असता तर जवळपास त्यामध्ये ५८ लाख रुपये किंबहुना त्याहीपेक्षा जास्तीची रक्कम महानगरपालिकेकडून अदा करावी लागली असती. कोविडचे संकट, सेव्हन हिल हॉस्पिटलला जाणारा मार्ग, सन्माननीय लोकप्रतिनिधी, सन्माननीय खासदार, सन्माननीय आमदार, सन्माननीय नगरसेविका यांनी मागणी केल्यामुळे ते काम दिले आहे. त्यामध्ये कोणताही भ्रष्टाचार नाही. उलट महानगरपालिकेच्या पैशाची बचत झाली आहे.

असुधारित प्रत

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, महानगरपालिकेमध्ये भ्रष्टाचार आहे हे उघड सत्य आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितलेले एकदम सत्य आहे. मुंबई

ता.प्र.क्र.१२२५६....
श्री. भाई गिरकर ....

महानगरपालिकेमध्ये पुलाच्या कामामध्ये, गाळ काढण्याच्या कामामध्ये भ्रष्टाचार नाही. चुकीच्या रेड पडत आहेत. रेड टाकण्याऱ्या व्यक्तींवर कारवाई केली पाहिजे. कारण भ्रष्टाचार नसताना रेड पडत आहेत. मूळ प्रश्न विचारला होता की, स्थायी समितीला असा अधिकार आहे का, कमाल किती रकमेचे काम निविदेशिवाय देता येते ? कोविडचे संकट होते, अमुक होते, हे ठीक आहे. काम निविदेशिवाय आहे. तुम्हाला सर्व बाबी माहीत आहेत. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चा कायदा सांगितला आहे. स्थायी समितीला निविदेशिवाय किती रकमेचे काम घेता येते ? हा पूल निकृष्ट दर्जाचा बांधला होता. हा पूल किती वर्षांपूर्वी बांधला होता ? तो निकृष्ट दर्जाचा बांधून ठेवला पूल देखील कदाचित निविदेविनाच झाला असेल. जुना असू द्या. पूल कधी बांधला, स्थायी समितीला अधिकार आहेत का, निविदेशिवाय किती रकमेपर्यंत काम द्यायचे आहे ? सेव्हन हिल हॉस्पिटलला जाण्यासाठी रस्ता नव्हता, कोविडचे संकट होते हे सर्व मान्य करतो. मात्र आपल्याला शॉर्ट पिरिएडमध्ये टेंडर काढता आले असते.

श्री. एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सेव्हन हिल हॉस्पिटलला जाण्याचा रस्ताच बंद झाला तर तुम्ही शॉर्ट पिरिएडमध्ये किती टेंडर काढणार आहात ? कारण त्यामध्ये दोन महिने जाणार आहेत.

असुधारित प्रत

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, किती रकमेपर्यंतचे काम निविदेशिवाय करता येते, किती रकमेचा अधिकार आहे ?

श्री. एकनाथ शिंदे : सभापती महोदय, महानगरपालिकेच्या कायद्यातील कलम ६९ सी व ई यामध्ये एखादे काम करताना व्हेरिएशनला लिमिट नाही. कामामध्ये व्हेरिएशन होते. जास्तीचा खर्च होतो. त्यामध्ये लिमिट नाही. तसे अधिनियमामध्ये आहे. या ठेकेदाराला या पुलाच्या कामाचे कोणतेही पैसे अदा केलेले नाहीत. आपण

ता.प्र.क्र.१२२५६....
श्री. एकनाथ शिंदे ....

मारवाहचा पुल करीत आहोत. आपण त्याचे पैसे अदा केलेले नाहीत. हा मोठा विषय नाही. २०० कोटी रुपयांचा मोठा पूल दिला आहे असे नाही. ११ कोटी रुपयांचे नवीन काम आहे. डीएसआरच्या दराची तुलना केली तर निविदा जास्त दराची आली असती ही वस्तुस्थिती आहे. स्थायी समितीच्या नियमाप्रमाणे हे काम दिले आहे.

श्री. प्रवीण दटके : सभापती महोदय, मी महानगरपालिकेमध्ये सध्या काम करीत असल्याने २ स्पेसिफिक प्रश्न विचारतो. स्थायी समितीला एखाद्या निविदेनंतर एक्स्टेंशन देण्याकरिता निविदा न काढता किती टक्के वाढ देण्याचा अधिकार आहे आणि किती कालावधीकरिता निविदा काढण्याचा अधिकार आहे ?

श्री. एकनाथ शिंदे : सभापती महोदय, मी आताच सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांच्या प्रश्नाला उत्तर दिले आहे. कलम ६९ सी व ई मध्ये व्हेरिएशनवर मर्यादा नाही.

श्री. प्रवीण दटके : सभापती महोदय, आता महानगरपालिकेला सर्व नियम पीडब्ल्यूडीचे लागू होतात. महानगरपालिकेला सर्व जीआर पीडब्ल्यूडी पाठविते. तेथे सी हा पीडब्ल्यूडीचा येतो. त्यानुसार सर्व परिपत्रकांच्या आधारे काम चालते.

असुधारित प्रत

महानगरपालिकेच्या अधिनियमामध्ये काहीही लिहिले असेल, पण आता पीडब्ल्यूडीच्या नियमानुसार महानगरपालिकेचे, पीडब्ल्यूडीचे काम चालते.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२२५६....

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, कधी कधी निकडीची बाब म्हणून अशी कामे करण्यात येतात. यामध्ये भ्रष्टाचार झाला असे आपले म्हणणे आहे काय ? स्थानिक खासदार, आमदार व नगरसेवक यांनी ही कामे तत्काळ व्हावीत अशी सूचना केली होती. टेंडर प्रक्रियेला विलंब लागला असता म्हणून ही छोटी कामे करण्यात आली आहेत.

श्री.राजहंस सिंह : सभापती महोदय, यामध्ये व्हेरिएशनची अट आहे, त्यामध्ये १५ टक्के पेक्षा जास्त व्हेरिएशन करता येत नाही. व्हेरिएशन केल्यानंतर तो विषय स्थायी समितीसमोर यायला पाहिजे. सेव्हन हिल्स हॉस्पीटल व कलिना यामध्ये अंतर भरपूर आहे. सेव्हन हिल्स हॉस्पीटलचा रस्ता कोठे आहे. पवई येथे सेव्हन हिल्स हॉस्पीटल आहे. मंत्री महोदय उत्तर देत आहेत की, कोरोना काळात सेव्हन हिल्स हॉस्पीटल येथे जाण्यासाठी रस्ता नव्हता म्हणून हे काम तातडीने करण्यात आले. माझ्या माहिती नुसार कलिना-कल्पना समोरील हा पूल आहे.

श्री.एकनाथ शिंदे : स्थायी समितीचा व्हेरिएशनचा विषय आहे. स्थायी समितीच्या दिनांक २९/१२/२०२१ च्या बैठकीत ठराव करण्यात आलेला आहे. ठराव क्रमांक १६८७ नुसार कार्यादेश देण्यात आले आहेत.

------------

असुधारित प्रत

**मौजे भंडार्ली (जि.ठाणे) येथील डंम्पिंग ग्राऊंड सुरु करण्याबाबत**

**(२)** * **१२४५६ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील कचऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर भंडार्ली येथील ३ लाख ६५ हजार २२७ चौरस फूट जागा एका वर्षासाठी रुपये ५.५० प्रती चौरस फूट भाड्याने घेण्याचा निर्णय ठाणे महानगरपालिकेने घेतल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी परवानगी दिली असून जिल्हास्तरीय घनकचरा व्यवस्थापन समितीनेही कचऱ्याच्या शास्त्रोक्त विल्हेवाटीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिले तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून परवानगी मिळाली नसल्याने डम्पिंग ग्राऊंड संदर्भातील आवश्यक कामे रखडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भंडार्ली डंम्पिंग ग्राऊंडसाठी आवश्यक परवानगी मिळवून डंम्पिंग ग्राऊंड सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) ठाणे शहराचा घनकचरा प्रश्न सोडविण्याकरीता ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर मौजे भंडार्ली येथील खाजगी मालकाची सर्वे क्र. १०४ मधील सुमारे ३.४० हे. जागा रेडीरेकनर पेक्षा जास्त दराने भाडे तत्त्वावर घेण्याकरीता दिनांक २०/१०/२०२१ च्या महासभेच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी दिनांक ०६/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर केला.

तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७६ व ७७ मधील तरतुदी विचारात घेऊन तसेच शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दती व प्रचलित नियमांचे पालन करुन सदर प्रकरणी आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्याकरीता दिनांक १०/१२/२०२१ रोजी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना आदेशित करण्यात आले आहे.

ता.प्र.क्र.१२४५६...

श्री.एकनाथ शिंदे...

मौजे भंडार्ली येथे ठाणे महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकरीता उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या अनुषंगाने खालील सद्य:स्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे :-

- सदर प्रकल्पास जिल्हास्तरीय घनकचरा व्यवस्थापन समितीची मान्यता प्राप्त झाली आहे.
- तसेच या संदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे Authorization करीता अर्ज करण्यात आलेला असून दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या बैठकीत Authorization देणेबाबत निर्णय झालेला आहे. सदरचे आदेश प्रतिक्षित आहेत.
- सदर प्रकल्प उभारणीस होणाऱ्या विरोधाच्या अनुषंगाने स्थानिक नागरिकांशी संवाद साधून विविध शंकांचे निरसन करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
- तथापि, प्रस्तावित जागेवर ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकरीता आवश्यक त्या सोयीसुविधा उभारण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.रविंद्र फाटक : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या लेखी उत्तरामुळे माझे समाधान झाले आहे.

-------

असुधारित प्रत

## बृहन्मुंबई महानगरपालिकेचे क्रीडा भवन सुरु करण्याबाबत

**(३)** * **११९०५ श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने सन १९२६ मध्ये क्रीडा भवनाची स्थापना केली असून, सन २०१० मध्ये क्रीडा भवनाच्या कार्यकारणीमधील सदस्यांवर झालेल्या गैरकारभाराच्या आरोपानंतर क्रीडा भवन बंद करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात क्रीडा, कला व सांस्कृतिक सुविधा पुरविण्यासाठी करण्यात येणाऱ्या तरतूदी सन २०१६ पासून स्थगित ठेवण्यात आल्या असून, लेखा विभागाच्या गैरकारभार व गैरव्यवहारामुळे कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याने याप्रकरणी संकुलात कार्यरत कर्मचाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व अन्य संबंधित पदाधिकारी यांचेकडे दिनांक ७ एप्रिल, २०२१ रोजी निवेदन सादर केले आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्रीडा भवन पुन:श्च सुरु करण्यासाठी सन २०१७ मध्ये विधी समिती आणि पालिका सभागृहात निर्णय घेण्यात आला असतानाही, ४ वर्षाहून अधिक कालावधी होऊनही क्रीडा भवन सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेचे क्रीडा भवन पुन:श्च सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्रीडाभवनाच्या संचालक मंडळाने केलेल्या गैरव्यवहारामुळे सन २०१४ मध्ये संचालक मंडळ बरखास्त करुन अभिलेख सीलबंद करण्यात आले होते. क्रीडाभवनाच्या खेळाडू/ सभासदांच्या खेळावर परिणाम होऊ नये म्हणून महानगरपालिकेमार्फत आयुक्तांच्या मान्यतेने सन २०१५ मध्ये प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. तद्नंतर सन २०१६ मध्ये क्रीडाभवनाच्या आझाद मैदान येथील इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती करुन सदर

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१९०५...

श्री.एकनाथ शिंदे...

इमारत सभासदांसाठी खुली करण्यात आली. सद्य:स्थितीत, क्रीडाभवनाच्या सदर इमारतीमध्ये खेळाडू/ सभासद उपलब्ध असलेल्या खेळांचा उपभोग घेत आहेत.

क्रीडाभवनाच्या अखत्यारितील शिवाजी पार्क येथील इमारत मोडकळीस आल्यामुळे वापरास धोकादायक झाल्याने सन २०१४ मध्ये महानगरपालिकेमार्फत सीलबंद करण्यात आली होती. सदर इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आला होता. परंतु, सदर जागेचे आरक्षण ‘‘महानगरपालिका जिमखाना’’ ऐवजी ‘‘महानगरपालिका निवासस्थान’’ असे बदलण्यात आल्यामुळे सदर जागेवर महापौर, मुंबई यांचे निवास्थान बांधण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सी.एस.टी. येथील क्रीडाभवनाकरीता सन २०१७-१८ पर्यंत अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. तसेच शिवाजी पार्क, दादर येथील क्रीडाभवनाकरीता सन २०१९-२० पर्यंत अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. तद्नंतर उपभोक्ता विभागामार्फत प्रस्ताव प्राप्त न झाल्याने अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली नाही.

लेखा विभागाचा गैरकारभार, गैरव्यवहार व कर्मचाऱ्यांवर होणारे अन्याय या कारणांमुळे संकुलात कार्यरत कर्मचाऱ्यांमार्फत महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार करण्यात आला नाही.

(३) क्रीडाभवनाकरीता अस्तित्वात असलेल्या नियमावलीमध्ये आमुलाग्र बदल करुन महानगरपालिकेमार्फत नवीन नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर नियमावलीनुसार, क्रीडाभवनाच्या संचालक मंडळाची निवडणूक होण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिका आयुक्त यांना सादर करण्यात आला होता. महानगरपालिका आयुक्त यांनी, सदर प्रस्तावाची तपासणी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश विधी अधिकारी यांना दिले होते. विधी अधिकारी यांच्या अभिप्रायानुसार महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजूरीने प्रशासकामार्फत सदर प्रस्ताव विधी समितीकडे मान्यतेकरीता सादर करण्यात आला असून तो विधी समितीच्या मंजूरीकरीता प्रलंबित आहे.

(४) व (५) क्रीडाभवनामध्ये झालेल्या गैरव्यवहार/ भ्रष्टाचाराबाबत अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) यांनी दिनांक २१/०२/२०१३ रोजी तत्कालीन संचालक मंडळाच्या

ता.प्र.क्र.१९०५...

श्री.एकनाथ शिंदे...

मुख्य सचिव, क्रिकेट सचिव, खजिनदार व २ जिमखाना सचिव यांच्याविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश पारित केले होते. त्यानुसार महानगरपालिकेच्या उपप्रमुख चौकशी अधिकारी यांच्यामार्फत चौकशी पूर्ण करण्यात आली असून खालीलप्रमाणे संचालक मंडळातील पदाधिकाऱ्यांना शिक्षा देण्यात आल्या होत्या :-

- मुख्य सचिव यांच्या मूळ निवृत्ती वेतनातून रुपये १०००/- पुढील एक वर्षासाठी काढून घेण्यात आली.
- क्रिकेट सचिव व खजिनदार यांची एक वार्षिक वेतनवाढ हंगामी स्वरुपात रोखून ठेवण्यात आली.
- २ जिमखाना सचिवांपैकी एकाचे दिनांक १७/११/२०१३ रोजी निधन झाल्याने त्यांच्या विरुध्दची खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी रद्द करण्यात आली. उर्वरित १ जिमखाना सचिवाची एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखून ठेवण्यात आली.

तद्नंतर, आरोपांच्या तुलनेत सदर शिक्षा कमी असल्याची तक्रार मा.लोकप्रतिनिधींमार्फत महानगरपालिकेस प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिका आयुक्त यांनी, चौकशी अहवाल तपासून पुन्हा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुषंगाने महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेतील क्रीडा भवनाचे काम सुरु करण्याबाबत माझा प्रश्न आहे. मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, सन २०१४ मध्ये संचालक मंडळ बरखास्त केले. अभिलेख सीलबंद करण्यात आले. क्रीडाभवनाच्या खेळाडू सभासदांच्या खेळावर परिणाम होऊ लागला म्हणून सन २०१५ मध्ये प्रशासकाची नियुक्ती केली. सन २०१६ मध्ये आझाद मैदानातील क्रीडाभवनाच्या इमारतीची दुरुस्ती करुन इतर सभासदांसाठी ते खुले करण्यात आले. या दोन्ही विषयाच्या उत्तरात मला काहीही तथ्य आढळून येत नाही. शिवाजी पार्क येथे महानगरपालिकेचे क्रीडा भवन आहे. त्याची इमारत नादुरुस्त

ता.प्र.क्र.१९०५...

श्री.प्रसाद लाड.....

झाली आहे. कोणत्याही सदस्यांना तेथे जाता येत नाही. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना ते वापरता येत नाही. आझाद मैदानातील क्रीडा भवनाची इमारत मेट्रोच्या कामामुळे बंद आहे. मी स्वत: मुंबई क्रिकेट असोसिएशनचा सदस्य आहे. तेथे आमचा क्रिकेट क्लब आहे. ते देखील काढून घेण्यात आले आहे. आता मुंबईमध्ये मुलांना खेळण्यासाठी क्रीडा भवन राहिले नाही. प्रायव्हेट क्लबची मेंबरशीप १४,१५,२५ व ३० लाख रुपये आहे. माझे तीन प्रश्न आहेत. सदर क्रीडा संकुलासाठी सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वर्षात किती अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली. संचालक मंडळाची नियुक्ती करण्याचे अथवा निवडणूक घेण्याबाबत महानगरपालिका आयुक्त कधीपर्यंत निर्णय घेतील. क्रीडा भवनात झालेल्या गैरव्यवहाराबाबत व भ्रष्टाचारामुळे ज्या कर्मचाऱ्यांना किरकोळ शिक्षा देण्यात आली त्यांचे पुनर्विलोकन महानगरपालिका आयुक्त कधीपर्यंत पूर्ण करणार आहेत ? ज्यांना शिक्षा झाली त्यांची शिक्षा कधीपर्यंत पूर्ण होईल. या व्यतिरिक्त मी एक विषय आपणासमोर मांडतो. मी एमसीएचा सदस्य असल्यामुळे मुंबईच्या सर्व क्लब मध्ये आम्हाला मेंबरशीप मिळते. सनदी अधिकाऱ्यांना सर्व्हीस मेंबरशीप मिळते. तशी सर्व्हीस मेंबरशीप विधानसभा व विधानपरिषदेतील सर्व सन्माननीय सदस्यांना मुंबईत व राज्यात देण्यात येईल काय ? या जमिनी महानगरपालिका व सरकारच्या आहेत. याबाबत मंत्री महोदयांनी धोरणात्मक निर्णय घ्यावा. सर्व क्लबमध्ये विधानसभा व विधानपरिषदेच्या सदस्यांना जाण्याची परवानगी द्यावी अशी मी विनंती करतो.

**सभापती** : विषय असा आहे मुंबईचे बहुतेक सर्व क्लब सरकारी जागेवर आहेत. सरकारने जमिनी दिल्यामुळे सन्माननीय सदस्यांची टर्म संपेपर्यंत मेंबरशीप देण्यास काहीच हरकत नाही. याबाबत मी स्वत: माजी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांना सांगितले होते हा विषय काढा. खाजगी हॉस्पीटलच्या जमिनी सरकारच्या मालकीच्या आहेत तेथे १० टक्के खाटा राखीव ठेवाव्यात असा निर्णय घेतला असला तरी तसे कोणी करीत नाही. सर्व शहरांमध्ये हीच परिस्थिती आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१९०५...

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, लिलावती हॉस्पीटल हे म्हाडाच्या जमिनीवर आहे त्याचे एक रुपया भाडे आहे. म्हाडा कर्मचारी व सदस्यांना २५ टक्के सूट द्यावी असे त्यांच्या करारनाम्यात नमूद केले आहे तरी तशी सूट दिली जात नाही, ते दादागिरी करतात.

**सभापती** : ठीक आहे, वेगळा विषय काढून यावर नंतर बोलता येईल.

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी क्रीडा भवनासंदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. मुंबई महानगरपालिकेचे क्रीडा भवनची इमारत १९२६ मध्ये बांधलेली आहे. त्यांच्या दोन इमारती आहेत एक आझाद मैदान व दुसरी शिवाजी पार्क दादर येथे आहे. क्रीडा भवनाच्या संचालनासाठी महानगरपालिकेतर्फे दर तीन वर्षांनी सभासदांकडून संचालक मंडळाची निवड करण्यात येते. ही बाब आपणाला माहिती आहे. सन २०१० ते २०१३ या कालावधीसाठी संचालक मंडळाची निवड करण्यात आली होती. संचालक मंडळातील पदाधिकारी यांनी गैरव्यवहार, भ्रष्टाचार केला त्यासंदर्भातील माहिती दिनांक २६/०७/२०११ मध्ये महानगरपालिका आयुक्तांना सादर केली होती. आयुक्तांच्या आदेशानुसार तत्कालीन सहाय्यक आयुक्त यांनी प्राथमिक चौकशी करुन दिनांक २३/०१/२०१२ रोजी अहवाल सादर केला. या अहवालात नियमांच्या काही बाबी निष्पन्न झाल्या आहेत. यामध्ये अनियमितता झालेली आहे, नियमांचे उल्लंघन करुन आर्थिक व्यवहार करणे असा ठपका ठेवण्यात आला आहे. अभिलेखे अद्ययावत न ठेवणे. क्रीडा भवनाची कायदेशीर नोंदणी करण्याकरिता प्रयत्न न करणे. या कारणांसाठी संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले. त्यानंतर सहाय्यक आयुक्त यांना तेथे प्रशासक म्हणून नियुक्त केले. प्रशासक नियुक्त केल्या नंतर दिनांक २१/१२/२०१३ रोजी अतिरिक्त आयुक्त यांनी संचालक मंडळातील पदाधिकाऱ्यांविरोधात खात्याअंतर्गत सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश पारीत केले आहेत. यामध्ये श्रीकांत कामथेकर, मोहन शांताराम पाटील, अविनाश दुधाने, विजय पोखरकर यांनी संचालक मंडळाच्या बरखास्तीच्या निर्णयाविरुध्द माननीय

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१९०५...

श्री.एकनाथ शिंदे...

न्यायालयात दावा दाखल केल्या प्रकरणी श्री.प्रसाद शशिकांत कुलकर्णी, जिमखाना सचिव यांच्या विरुध्द दिनांक २९/१०/२०१४ रोजी प्राथमिक चौकशी करण्यात येऊन त्याचा अहवाल दिनांक ९/०१/२०१५ रोजी सह आयुक्त आपत्कालीन व्यवस्था यांना सादर करण्यात आला आहे. कुलकर्णी सचिव यांच्या विरोधात चौकशीचे आदेश पारित केले आहेत. त्यानंतर यातील दोषी लोकांवर कारवाई करण्यात आली आहे. श्रीकांत कामथेकर यांच्या मूळ निवृत्ती वेतनातून १००० रुपये पुढील एक वर्षासाठी काढून घेण्यात आले आहे. अविनाश दुधाने, क्रिकेट सचिव, मोहन शांताराम पाटील, खजिनदार यांची एक वार्षिक वेतनवाढ हंगाची स्वरुपात राखून ठेवली आहे. त्याचप्रमाणे विजय पोखरकर, जिमखाना सचिव यांचे दिनांक १७/११/२०१३ रोजी निधन झाल्यामुळे त्याच्या विरोधात कोणतीही चौकशी करण्यात आली नसून ती रद्द करण्यात आली आहे. त्यानंतर प्रसाद कुलकर्णी यांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी राखून ठेवली आहे. ही सर्व कारवाई झाल्यानंतर जिमखान्याची लवकरात लवकर निवडणूक घ्यायला पाहिजे. आता तेथे सहाय्यक आयुक्त हे प्रशासक आहेत, त्यांचा कालावधी अगोदर संपुष्टात आणावा लागेल. निवडणूक घेण्यासंदर्भातील सूचना महानगरपालिका आयुक्तांना देण्यात येतील व संचालक मंडळ कार्यान्वीत करण्यात येईल. आझाद मैदान येथील क्रीडाभवन सुरु आहे. निवडणूक झाल्यावर संचालक मंडळ कार्यान्वीत होईल व त्यानंतर सर्व बाबी नियमित सुरु होतील. यासाठी पाच कोटी रुपयांची बजेटमध्ये तरतूद करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांना मेंबरशीप देण्याबाबत तपासून घेण्यात येईल. यासाठी माननीय सभापती यांच्याबरोबर चर्चा करण्यात येईल.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११९०५........

**सभापती :** मंत्री महोदयांनी जे सांगितले ते योग्य आहे. आपण सर्वंकष माहिती घ्यावी. सरकारी जमिनीवर असेल आणि देता येत असेल तर सन्माननीय सदस्यांना अधिकार दिलाच पाहिजे. त्यासाठी माझी हरकत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी अनेक वेळा या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. आयएएस अधिकारी एकदा सभासद झाल्यानंतर ते कायम स्वरुपी सभासद राहतात. परंतु आमदारांना कायम स्वरुपी सभासद राहता येत नाही.

**सभापती :** मी स्वत: यामध्ये लक्ष घालतो.

श्री.सुनील शिंदे : सभापती महोदय, मूळ तारांकित प्रश्न मी उपस्थित केलेला आहे. आज ७ रस्ता परिसरात आग लागल्यामुळे मला तेथे जावे लागले. त्यामुळे मला सभागृहात येण्यासाठी विलंब झाला. त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. मी सभागृहात येण्यापूर्वी सदर तारांकित प्रश्नावर उप प्रश्न विचारण्यात आलेले आहेत. सदर क्लब मागील ८ वर्षांपासून बंद आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, आझाद मैदान येथील क्लब अंशत: सुरु आहे. परंतु मुख्य क्लब व इतर छोटे २६ क्लब पूर्ण क्षमतेनने केव्हा सुरु होणार आहेत ? सदर क्लबवर ८ वर्षांपासून प्रशासकाची नियुक्ती केलेली आहे. मंत्री महोदयांनी निवडणूक घेण्याचे मान्य केले आहे. जे कायम स्वरुपी सभासद आहेत त्यांना नवीन नियमावलीनुसार नियमित करण्यात येणार आहे काय ? कारण प्रशासक त्या संदर्भात वेगळा विचार करीत असल्याची चर्चा आहे. तसेच, जुन्या नियमावलीत जो बदल करावयाचा आहे तो निर्णय वार्षिक सर्वसाधारण सभेत घेण्यात येणार आहे का प्रशासक परस्पर निर्णय घेणार आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे प्रशासकाची कारकीर्द संपुष्टात आणून तातडीने निवडणूक घेण्यात येईल. निवडणूक झाल्यानंतर संचालक मंडळ कार्यान्वित होईल. (...अडथळा...) मघाशी सांगितल्याप्रमाणे ५ कोटी रुपयांची तरतूद आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.सुनील

ता.प्र.क्र.११९०५........

श्री.एकनाथ शिंदे.......

शिंदे यांना सांगू इच्छितो की, आझाद मैदान क्लब संदर्भात काही त्रुटी असतील तर त्या आपण दूर करु. तसेच, इतर जिमखान्यांच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. खऱ्या अर्थाने सर्व जिमखान्यांचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. शिवाजी पार्क जिमखान्यासाठी किंवा आपण तेथे पर्यायी जिमखाना उभा करु शकतो. हा तेथील लोकांच्या सोईचा विषय आहे. आपण प्रशासक म्हणून आयुक्तांची नेमणूक केलेली आहे. जेवढे जिमखाने आहेत त्यांची सद्य:स्थिती काय आहे, त्यामध्ये काय करण्याची आवश्यकता आहे याबाबत आयुक्तांना सूचना देण्यात येतील.

----------

असुधारित प्रत

**महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे नोंदणी झालेल्या गृहप्रकल्पांना मुदतवाढ देण्याबाबत**

**(४) * १२६५१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणकडे (महारेरा) नोंदणी झालेल्या सुमारे ३० हजार गृहप्रकल्पांपैकी सन २०१७ ते २०२१ या कालावधीत वेळेत पूर्ण न झालेल्या ३३७१ गृहप्रकल्पांचा काळ्या यादीत समावेश करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काळ्या यादीत टाकलेल्या गृहप्रकल्पांद्वारे किती घरांची निर्मिती राज्यातील कोणकोणत्या ठिकाणी करण्यात येणार होती,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गृहप्रकल्पांस मुदतवाढ देवून गृहप्रकल्पांचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) व (२) स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार ज्या प्रकल्पाची मुदत पूर्ण करण्याचा कालावधी संपुष्टात आलेला आहे, अशा प्रकल्पांची यादी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर दिनांक ०७/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत राज्यात विकासकांनी प्रकल्प पूर्ण केले नाही अशा २८४९ प्रकल्पांचा समावेश असून, त्यामध्ये १,७१,५४५ घरे, भूखंड, वाणिज्य यांची निर्मिती अपेक्षित असून राज्यातील सर्व जिल्ह्यांतील गृहप्रकल्पांचा समावेश आहे.
(३) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे अर्धन्यायिक स्वरुपाचे काम पार पाडले जाते. सदर प्रकल्प पूर्ण करण्याच्या अनुषगांने स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार ज्या प्रकल्पातील ग्राहक संयुक्तपणे

अग्रिम प्रत

ता.प्र.क्र.१२६५१.....

डॉ.जितेंद्र आव्हाड.......

कलम ७ अन्वये तक्रार दाखल करतात अशा प्रकल्पातील ग्राहकांची, विकासकाची संयुक्तपणे सुनावणी घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

-----------

असुधारित प्रत

**औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळांचे थकीत अनुदान देण्याबाबत**

**(५) * १२४५५ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या शहरात ७१ शाळा असून या शाळांच्या इमारतीच्या भाड्यापोटी शासनाकडून दरवर्षी महानगरपालिकेला मिळणारे अनुदान सन २००४ पासून मिळालेले नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळांच्या इमारतीच्या भाड्यापोटी मिळणारे थकीत अनुदान देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळांचे सन २००४ पासूनचे थकीत अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या ७१ शाळा कार्यरत असून त्यापैकी महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतींमध्ये ५१ शाळा सुरु आहेत. शालेय शिक्षण विभाग, दिनांक १७/०७/२००६ च्या पत्रान्वये, मुंबई प्राथमिक शिक्षण १९४९ नियम क्र.१४५ (१) व (२) नुसार संबंधित नगरपालिका/ नगर पंचायत/ महानगरपालिका यांना इमारत भाडे अनुदान शासनाच्या पूर्व मान्यतेने/ शासनाकडून प्रशासकीय आदेश मिळाल्यानंतर देय ठरते. तसेच, सन २००५-०६ करीता मागणी सामंजस्य करारानुसार वेतनेतर अनुदान सन २००४ पर्यंतच अनुज्ञेय असून, त्यानंतर वेतनेतर अनुदान देय नाही, असे तत्कालीन शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना कळविण्यात आले आहे. यामुळे २००४ पासूनचे इमारत भाड्यापोटी अनुदान मिळण्याबाबत प्रश्न उद्भवत नाही.

(२) हे खरे नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४५५.......

श्री.एकनाथ शिंदे.......

(३) शालेय शिक्षण विभाग, दिनांक १७/०७/२००६ च्या पत्रान्वये, मुंबई प्राथमिक शिक्षण १९४९ नियम क्र.१४५(१) व (२) नुसार संबंधित नगरपालिका/ नगर पंचायत/ महानगरपालिका यांना इमारत भाडे अनुदान शासनाच्या पूर्व मान्यतेने/ शासनाकडून प्रशासकीय आदेश मिळाल्यानंतर देय ठरते. तसेच, सन २००५-०६ करीता मागणी सामंजस्य करारानुसार वेतनेतर अनुदान सन २००४ पर्यंतच अनुज्ञेय असून, त्यानंतर वेतनेतर अनुदान देय नाही, असे तत्कालीन शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना कळविण्यात आले आहे. यामुळे २००४ पासूनचे इमारत भाड्यापोटी अनुदान मिळण्याबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, सदर ५१ शाळा सुरु झाल्यापासून मार्च, २००४ पर्यंतचे इमारत भाडे अनुदानापोटी थकीत रुपये ८३,१७,३०,६८४/- इतक्या अनुदानाची मागणी शालेय शिक्षण विभागाकडे आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी दिनांक २०/०४/२०१४ पासून केली आहे.

या प्रस्तावासंदर्भात प्राप्त त्रुटीच्या अनुषंगाने पूर्तता केली असून अनुदान उपलब्धतेबाबत आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांच्याकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अंबादास दानवे : सभापती महोदय, संभाजीनगर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे ८३ कोटी १७ लाख ३० हजार ६८४ रुपये अनुदान थकित आहे. तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केलेले आहे की, "सन २००४ पासूनचे इमारत भाड्यापोटी अनुदान मिळण्याबाबत प्रश्न उद्भवत नाही." परंतु सन २००४ नंतर शिक्षण विभाग व नगरविकास विभागाने महानगरपालिकेबरोबर पत्र व्यवहार करुन किती इमारती भाड्याने घेण्यात आलेल्या आहेत व त्यापोटी किती अनुदान द्यावयाचे आहे याबाबत माहिती मागविलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, सन २००४ पूर्वीचे

ता.प्र.क्र.१२४५५.......

श्री.अंबादास दानवे......

८३ कोटी रुपयांपेक्षा जास्त अनुदान थकित आहे ते देण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अंबादास दानवे यांनी औरंगाबाद महानगरपालिका शाळेच्या थकबाकी संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी या संदर्भात माहिती घेतलेली आहे. शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णयामध्ये मुंबई प्राथमिक शिक्षण १९४९ नियम क्र.१४५(१) व (२) मध्ये प्राधिकृत नगरपालिकेकरिता अनुदानाची तदतूद आहे आणि आपण उपस्थित केलेला विषय महानगरपालिकेबाबतचा आहे. यामध्ये प्रिंटींग मिस्टेक झाली का समज, गैर समज झाला हे माहिती नाही. परंतु महानगरपालिकेचे आयुक्त सन २००४ पासून आमची अमूक एवढी थकबाकी असल्याचे सांगत आहेत. माझ्याकडे शासन निर्णयाची प्रत आहे. नियम क्र.१४५ (१) मध्ये प्राधिकृत नगरपालिकांना शासकीय अनुदान देय असल्याचे म्हटले आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण या संदर्भात बैठक घेऊ. कारण, यामध्ये अधिक स्पष्टता येण्याची आवश्यकता आहे. नगरपालिका की महानगरपालिका असा विषय असल्यामुळे आपण या संदर्भात बैठक घेऊन यामध्ये अधिक स्पष्टता आणून निर्णय घेऊ.

---------

असुधारित प्रत

**नागपूर महानगरपालिकेच्या करासंदर्भातील परिपत्रकाची व शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(६) * १२५४६ श्री.प्रवीण दटके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ ऑगस्ट, २०१९ पासून वस्तू व सेवा करप्रणाली लागू झाली असून, तत्पुर्वी कार्यादेश दिलेली आणि दिनांक १ जुलै, २०१७ नंतर पुर्णत्वास आलेल्या कामांच्या बाबतीत वस्तू व सेवाकरामुळे अतिरिक्त भार पडत असल्याने (मुल्यवर्धित व इतर कर कपात नंतर) तफावतीच्या रकमेबाबत कंत्राटदाराने कार्यकारी अभियंता यांचेकडे मागणी करावी अशा सूचना नागपूर महानगरपालिकेने परिपत्रकाद्वारे व शासन निर्णयानुसार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ चे नागपूर महानगरपालिकेचे परिपत्रक व शासन निर्णय, दिनांक १९ सप्टेंबर, २०२१ द्वारे सूचित केलेल्या निर्देशानुसार कार्यवाही होत नसल्याचे, तसेच कंत्राटदाराकडून मागणीचे प्राथमिक अर्ज नागपूर महानगरपालिकेकडून स्वीकारण्यात येत नसल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य अभियंता, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक ३० जुलै, २०२१ रोजीच्या पत्रान्वये सर्व विभाग प्रमुख, नागपूर महानगरपालिका यांना फरकाची रक्कम संकलित करण्याबाबत सूचना देवूनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या परिपत्रकाची व शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ५ एप्रिल, २०२१ चे लेखी निवेदन नागपूर महानगरपालिकेकडे प्राप्त झाले आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२५४६.......

श्री.एकनाथ शिंदे........

(३) व (४) मुख्य अभियंता नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक ३० जुलै, २०२१ च्या पत्रान्वये सर्व विभाग प्रमुख, नागपूर महानगरपालिका यांना फरकाची रक्कम संकलित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून संकलनाची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदय, सदर तारांकित प्रश्न महानगरपालिकेत ज्या वर्क ऑर्डर झालेल्या आहेत त्या संदर्भात आहे. तारांकित प्रश्नाला योग्य लेखी उत्तर दिलेले असल्यामुळे मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. माझा प्रश्न असा आहे की, जीएसटी व व्हॅट मधील फरक यापूर्वी महानगरपालिकेत कंत्राटदारांना देण्यात आलेला आहे काय, त्याची प्रोसेस काय आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाने परिपत्रक किंवा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे काय, त्या परिपत्रकात काय नमूद केले आहे, तसेच आपण सदर परतावा देणार आहोत काय, जीएसटी व व्हॅट मधील फरकाची रक्कम देण्याची पात्रता त्या त्या महानगरपालिका विशेषत: नागपूर महानगरपालिकेत आहे काय ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रवीण दटके यांनी नागपूर महानगरपालिकेच्या जीएसटी परताव्याबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. वित्त विभागाने दिनांक १९.०८.२०१७ व दिनांक ११.०९.२०१७ रोजी परिपत्रके काढलेली आहेत. जीएसटी अंमलबजावणी संदर्भातील नियम थोडे ढोबळ आहेत. त्यामध्ये सविस्तर कार्यप्रणालीचा उल्लेख नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी जीएसटी परताव्याबाबत उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये प्रस्तावाबरोबर कोणती कागदपत्रे सादर करावीत, तपासणी कशा प्रकारे करावी याबाबत सूचना दिलेल्या नाहीत. स्वयंस्पष्ट सूचना नसल्यामुळे

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२५४६.......

श्री.एकनाथ शिंदे......

महानगरपालिकेला प्रस्तावाची तपासणी करणे थोडे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे या संदर्भात अधिक स्पष्टीकरणाची आवश्यकता आहे. आपल्याला कंत्राटदाराने सादर केलेल्या प्रस्तावावर तपासून कार्यवाही करता येईल. महानगरपालिकेकडे एकूण ३ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. माझ्या माहिती प्रमाणे एका कॉन्ट्रॅक्टरला प्रस्ताव तपासून परतावा देण्यात आलेला आहे. एकूण १५०० वर्क ऑर्डर असल्याने काही कोटी रुपयांची देयके आवश्यक राहतील. खरे म्हणजे त्यांनी ३० दिवसात सुनावणी घेऊन परताव्याबाबत निर्णय घेतला पाहिजे.

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदय, दिनांक २१ जानेवारी, २०२१ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाने परिपत्रक काढलेले आहे. त्यामध्ये नियमावली व कोणती कागदपत्रे सादर करावयाची हे नमूद केले आहे.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२५४६ ...

श्री.प्रवीण दटके ....

हा प्रश्न नागपूर महानगरपालिका नव्हेतर सर्व महानगरपालिकांशी संबंधित आहे. संबंधित महानगरपालिकांमध्ये येणाऱ्या बजेटमध्ये याबाबतची तरतूद असली पाहिजे. जेणेकरुन महानगरपालिकांना फायदाच होणार आहे. काही ठिकाणी महानगरपालिकांना पैसे मिळणार आहेत व काही महानगरपालिकांना पैसे द्यावे लागणार आहेत. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, संबंधित महानगरपालिकांच्या बजेटमध्ये अशा प्रकारची तरतूद असावी याकरिता सर्व महानगरपालिकांना टाईमबाऊंड कार्यक्रम देणार आहात का ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, नागपूर महानगरपालिका किंबहुना इतर महानगरपालिकांमध्ये अशा प्रकारचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय व परिपत्रकानुसार संबंधित कंत्राटदार किंवा निविदाकारांनी सर्व कागदपत्रे सादर करावीत. जेणेकरुन एक महिन्यामध्ये त्यावर आपल्याला निर्णय घेता येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, महानगरपालिकांमध्ये अशा प्रकारची कार्यप्रणाली असल्यास त्यापेक्षा ग्रामपंचायती बऱ्या आहेत असे म्हणावे लागेल. निविदा भरताना त्यात टॅक्स व जीएसटीचा समावेश असतो. त्यानुसार कर असतो. परंतु विना निविदा १५ ते १६ कोटी रुपयांची रक्कम आहे.

**सभापती** : ही बाब ग्रामपंचायतीकरिता सुरु करायची असल्यास शासनाने ग्रामपंचायतीकरिता हा नियम लागू होतो किंवा नाही ? ही बाब तपासून घ्यावी.

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, ठीक आहे.

------------

असुधारित प्रत

## औरंगाबाद येथील क्रांती चौक उड्डाण पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(७)** * **११८७९ श्री.सतीश चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील क्रांती चौक उड्डाण पुलाची उभारणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत सन २०१२ ते सन २०१४ या दरम्यान करण्यात आली असून, सदर पुलावरुन प्रतीदिन किमान १०,००० वाहने ये-जा करत असून एम.एस.आर.डी.सी. ने सन २०१८ ते आजतागायत उक्त पूल सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित केला नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाण पुलाच्या जोडणीत अंतर पडल्याने त्याची दुरुस्ती करण्याची जबाबदारी नेमकी कुणाची हा प्रश्न निर्माण झाला असून, हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण न झाल्याने एम.एस.आर.डी.सी., मनपा, सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचेमार्फत जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर उड्डाण पुलाचे दुरुस्तीचे काम तसेच हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करुन, पुलाची देखभाल करण्याची जबाबदारी निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

शासन निर्णय क्र. पासुस-२०००/प्र.क्र.२३ का.१४७४(२) दिनांक २३/०२/२००१ अन्वये औरंगाबाद शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेंतर्गत क्रांती चौक उड्डाणपुलाचे काम दिनांक ३०/०६/२०१२ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे.

शासन निर्णयातील मुद्दा क्र.४ नुसार काम पूर्ण झाल्यानंतर औरंगाबाद महानगरपालिकाकडे हस्तांतरित करण्याबाबतचे निर्देश आहेत. या कार्यालयाचे पत्र दिनांक ०८/१२/२०१५ व दिनांक २१/०७/२०१७ अन्वये पुलाचे काम शहर

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८७९ ...

श्री.एकनाथ शिंदे ....

अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका यांना हस्तांतरित करण्यात आलेले होते.

तद्नंतर, मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे आदेशान्वये तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक १६/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये क्रांती चौक उड्डाणपुल हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२-I चा भाग असल्याने या कार्यालयाचे दिनांक ०३/११/२०१८, २१/१२/२०१८ व ई-मेल दिनांक २१/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये क्रांती चौक उड्डाणपुल राष्ट्रीय महामार्ग (सा.बां) विभाग यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आला होता.

त्यानंतर, सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय यांचे दिनांक १२/०३/२०२० रोजीच्या अधिसुचनेनुसार राष्ट्रीय महामार्ग ७५२-I ची शहरातील लांबी (बाबा पेट्रोल पंप ते केंब्रीज शाळा) De-notify झालेली असल्यामुळे सद्य:स्थितीमध्ये रस्त्याची सदर लांबी सा.बां. विभागाकडे देखभाल दुरूस्तीसाठी हस्तांतरित झालेली आहे.

मुख्य अभियंता, सा.बां.प्रा. विभाग, औरंगाबाद यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत एकात्मिक रस्ते विकास योजनेंतर्गत पूर्ण झालेल्या पुलांच्या संदर्भात दिनांक १०/०१/२०२२ रोजी सर्व संबंधित विभाग प्रमुखांची (सा.बां., रा.म.सा.बां., महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ) बैठक घेऊन बैठकीच्या इतिवृत्तांतात नमूद केल्याप्रमाणे (बाबा पेट्रोलपंप ते केबीन स्कूल) शहरातील लांबीची व त्यावरील पुलांची देखभाल व दुरूस्ती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांनी करावी असे निर्देशीत केलेले आहे. तसेच दोष निवारण कालावधी (D.L.P.) तील कामांची देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून करुन मग हस्तांतरित करावी, असे ठरले.

मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांच्या सूचनेनुसार या कार्यालयाकडून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांना दिनांक १८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये क्रांती चौक उड्डाण पुल व त्यावरील सेवा रस्ते हस्तांतरण करून घेण्याबाबत कळविलेले आहे.

सद्य:स्थितीमध्ये क्रांती चौक उड्डाणपुलाची देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहे व पुलांच्या हस्तांतरणाची कार्यवाही प्रगतीत आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८७९ ...

श्री.एकनाथ शिंदे ....

(२) हे खरे नाही.

क्रांती चौक उड्डाणपुलाचा जोडणीत अंतर पडले नसून, उड्डाणपुलावरील असलेल्या Expansion Joint मधील रबरी भाग निघून गेलेला होता. त्याबाबतची तात्काळ दुरूस्ती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयामार्फत करून घेण्यात आली असून, सद्य:स्थितीत पुलावरून वाहतूक सुरळीत सुरू आहे. तसेच उड्डाणपुलावरील खड्डे भरुन घेण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांच्या सुचनेनुसार या कार्यालयाकडून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना दिनांक १८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये क्रांती चौक उड्डाण पूल हस्तांतरित करून घेण्याबाबत कळविण्यात आलेले आहे व हस्तांतरण कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या उत्तरात असे नमूद केले आहे की, सद्यस्थितीमध्ये पुलावरुन वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे. परंतु ती वाहतूक खड्डयामधून सुरु आहे. तसेच उड्डाण पुलावरील खड्डे भरुन घेण्यात आले असल्याचे सांगण्यात आले आहे. मी तेथे माझा माणूस पाठवला होता. अद्याप सदर एक्सपांशन जाईंट अद्यापही दुरुस्त करण्यात आलेले नाहीत. ही लेटेस्ट माहिती आहे. एक्सपांशन जॉईंट मधील रबरी भाग टाकण्यासाठी एमएसआरडीसीकडे एक्सपर्टाइज नाही. याकरिता त्यांनी एल अँड टी कंपनीकडे सल्ला मागितला आहे. सदर एक्सपांशन जॉईंट कधी भरुन घेणार आहात ? तसेच ते लवकरात लवकर भरुन घेणार आहात का ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य यांनी औरंगाबाद येथील क्रांती चौकातील उड्डाण पुलासंबंधी प्रश्न विचारला आहे. एक्सपांशन जाईंट मधील रबरी भाग निघाल्यामुळे त्यात मोठी दरी झाल्याचे वाटत आहे. एक्सपांशन जॉईंटमधील रबरी भाग निघाल्यामुळे आकुंचन करणे अशा प्रकारची ती एक टेक्निक

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८७९ ...

श्री.एकनाथ शिंदे ....

आहे. आयटी कॉलेजमधील स्थापत्य शाखेमधील प्राध्यपकांनी सदर उड्डाणपुलाचा सर्व्हे करुन पाहणी केली आहे. सदर उड्डाणपुलाला कोणताही धोका नाही. आता सदर एक्सपांशन जॉईटचे काम सुरु करण्यात आलेले आहे. माझ्याकडे त्याबाबतचे लेटेस्ट फोटोग्राफस् आहेत. युद्धपातळीवर सदर काम करुन घेतले जाईल. तसेच कोणत्याही परिस्थितीत त्या पुलाला धोका निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

श्री.अंबादास दानवे : सदर उड्डाणपुलासंबंधी एमएसआरडीसी व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामध्ये एकमेकांवर सातत्याने आरोप केले जातात. एमएसआरडीसीने सदर उड्डाणपुलाची दुरुस्ती करण्याचे मान्य केले आहे. परंतु त्याबाबत पुढील जबाबदारी आमची नाही असे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. एमएसआरडीसीने सदर उड्डाणपुलाची दुरुस्ती करुन तो संबंधित यंत्रणेकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. हा पुल ज्या यंत्रणेकडे हस्तांतरित करायचा आहे त्यांचे असे म्हणणे आहे की, उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतरच हस्तांतरित प्रक्रिया पूर्ण होईल. ही बाब विचारात घेता एमएसआरडीसीने सदर उडडाणपुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन हस्तांतरणाची संपूर्ण प्रक्रिया कधी केली जाणार आहे ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, एमएसआरडीसीने सदर उड्डाणपूल बांधला असून त्याच्या पुढील देखभाल दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे त्वरित हस्तांतरित करण्याबाबत मी येथे सूचना देत आहे.

----------

असुधारित प्रत

## राज्यातील नगरपालिकेतील रचना सहायक व सहायक नगर रचनाकार यांच्या मुदतपूर्व बदल्या रद्द करणेबाबत

**(८) * १२२४६ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रचना सहायक व सहायक नगर रचनाकार या पदांवरील ९३ पैकी ७५ कर्मचाऱ्यांच्या बदल्या नगरपालिकेबाहेर मुदतपूर्व करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिका निवडणुका, जनगणना यांसारखे महत्त्वाचे काम करुन घेण्यासाठी सर्व नगरपालिकेच्या रचना सहायक व सहायक नगर रचनाकार यांसारख्या तांत्रिक कर्मचाऱ्यांची गरज असून त्यांना शहरातील प्रत्येक रस्ता, झोन विकास आराखडा, नकाशा व प्रगणक गटाची माहिती असते, परंतु, सहायक नगर रचनाकार व रचना सहायक यांची नगरपालिकेबाहेर बदली केल्यामुळे सदरहू कामे करण्यास अडचणीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहायक नगर रचनाकार व रचना सहायक यांच्या बदल्या कर्मचाऱ्यांची तीन वर्षे सेवा पूर्ण होण्याअगोदरच मुदतपूर्व तसेच मंजूर कामाव्यतिरिक्त इतर कामासाठी करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नगरपालिका निवडणुका होईपर्यंत नगररचना विभागाने रचना सहायक व सहायक नगर रचनाकार यांच्या नगरपालिकेच्या बाहेर केलेल्या बदल्या रद्द करुन, याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सन २०२१ मध्ये महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार राज्यातील नगरपरिषद व नगर पंचायत येथे कार्यरत असलेल्या रचना सहायक/ सहायक नगर रचनाकार या संवर्गातील ७० अधिकाऱ्यांच्या बदल्या कामाची निकड, संबंधित अधिकाऱ्यांची वैयक्तिक विनंती व त्यांची अथवा कुटुंबियांची वैद्यकीय कारणे लक्षात घेता सक्षम प्राधिकरणाच्या

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२२४६ ...

श्री.एकनाथ शिंदे ....

मान्यतेने मुदतपूर्व करण्यात आलेल्या आहेत. तसेच, १६ अधिकाऱ्यांच्या अन्य नगरपरिषद/ नगर पंचायतमध्ये मुदतपूर्व बदल्या करण्यात आलेल्या आहेत.

(२) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीव्ही-१९०८/११८४/प्र.क्र.१/२००९/ नवि-२७, दिनांक २८/०१/२०१० अन्वये राज्यामधील महानगरपालिका/ नगरपरिषदांमध्ये काम करणाऱ्या नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाच्या अधिकाऱ्यांची कार्य व कर्तव्ये निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये निवडणूक व जनगणना यांचा समावेश नाही.

तसेच, सहायक नगर रचनाकार संवर्गातील १३८ रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामर्फत करण्यात येत असून, रचना सहायक संवर्गातील १०५ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संचालक, नगर रचना, पुणे यांच्या स्तरावर सुरु आहे. सदर भरती प्रक्रियेनंतर अथवा सन २०२२ च्या सार्वत्रिक बदल्यांमध्ये नगरपरिषद/ नगर पंचायतीमध्ये सहायक नगर रचनाकार/ रचना सहायक संवर्गातील अधिकारी उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

(३) व (४) मुदतपूर्व बदल्या ह्या कर्मचाऱ्यांच्या विनंती तसेच, कार्यालयीन कामकाजाची सोय लक्षात घेऊन, बदली अधिनियमातील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाला लेखी उत्तर दिलेले असले तरी काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. एकाच वेळी मोठया प्रमाणात बदल्या केल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत. संबंधित मुख्याधिकाऱ्यांना विश्वासात न घेता, सहायक नगर रचनाकार/ रचना सहायक संवर्गातील अधिका-यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. ही बाब खरी आहे का ? तसेच त्यांची आस्थापना नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी यांच्याकडे वर्ग करणे आवश्यक असताना ती कार्यवाही का करण्यात आली नाही ? नवीन अधिकारी/कर्मचारी यांना ३ वर्षे पूर्ण

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२२४६ ...

श्री.सुरेश धस ....

झाली नसताना त्यांची १८ महिन्यांमध्ये बदली करण्यात आली, ही बाब खरी आहे का ? निवडणुकीचे कारण दाखवून नगररचना विभागामधील अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. त्यामुळे अडचणी निर्माण झालेल्या आहेत. अशा प्रकारे निवडणुकीचे कारण दर्शवून चुकीच्या पद्धतीने त्यांच्या बदल्या करणारे संचालक, सचिव, उप सचिव, अवर सचिव यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांनी नगररचना विभागातील बदल्यासंबंधी प्रश्न उपस्थित केलेला आहे. वित्त विभागाचा दिनांक ४ मे, २०२० रोजच्या शासन निर्णयानुसार कोविड-१९ च्या प्रार्दुभावामुळे कोणत्याही संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची बदली करण्यात येऊ नये अशा सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार सन २०२० मध्ये रचना सहायक व सहायक नगर रचनाकार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या विशेष कारणास्तव मध्यावधीत बदल्या करण्यात आल्या नव्हत्या. दिनांक ३१ जुलै, २०२१ अखेर नगर परिषद / नगर पंचायतीमध्ये रचना सहायक व सहायक नगर रचनाकार संवर्गात ५५६ मंजूर पदे असून त्यापैकी ३०३ पदे कार्यरत आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९ जुलै, २०२१ नुसार दिलेल्या सूचनांनुसार तसेच बदली अधिनियम २००५ मधील तरतुदींनुसार राज्यातील नगरपरिषदा, शासकीय कार्यालये, विविध स्वायत्त प्राधिकरणे येथील नगररचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील कार्यरत असलेले एकूण ९४ सहायक नगर रचनाकार व रचना सहायक संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सन २०२१ मध्ये मुदतपूर्व बदल्या करण्यात आल्या आहेत. कामाची निकड, अधिकाऱ्यांनी केलेली वैयक्तिक विनंती तसेच त्यांची अथवा त्यांच्या कुटुंबातील लोकांना कोविड होणे इत्यादी कारणे लक्षात घेता नगरपंचायती तसेच नगर रचना संचालनालयामध्ये असलेल्या सहायक नगर रचनाकार व रचना सहायक संवर्गातील ७० अधिकाऱ्यांच्या सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने मुदतपूर्व बदल्या करण्यात

ता.प्र.क्र.१२२४६ ...

श्री.एकनाथ शिंदे ....

आल्या आहेत. तसेच १६ अधिकाऱ्यांच्या अन्य नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये मुदतपूर्व बदल्या करण्यात आल्या आहेत. प्रत्येक नगरपरिषदेमध्ये किमान २ व कमाल ५ तांत्रिक अधिकारी, १७ अ वर्ग अशी पदे मंजूर आहेत. तसेच शासकीय कार्यालयामध्ये १ किंवा २ पदे मंजूर आहेत, अशा शासकीय कार्यालयांमध्ये अतिशय अल्प प्रमाणात अधिकारी कार्यरत असल्यामुळे तेथील पदे भरणे प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने आवश्यक होते. त्यामुळे संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक नगर रचनाकार संवर्गातील एकूण २४३ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत व संचालनाच्या स्तरावर सरळसेवेने भरण्याची कार्यवाही सद्यस्थितीत सुरु आहे. त्यानंतर सन २०२२ मध्ये सार्वत्रिक बदल्या होतील त्यात नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये सहायक नगर रचनाकार, रचना सहायक संवर्गातील अधिकारी उपलब्ध करुन देणे शक्य होईल. सबब तूर्तास या सर्व बदल्या नियमानुसार केलेल्या आहेत.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२२४६.....

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदय, नागपूर महानगरपालिका ही अ वर्ग आहे. इतर महानगरपालिकांमध्ये टाऊन प्लॅनर डायरेक्टली आहे. आमच्याकडे अे.डी.टी.पी. आहे. अ वर्ग महानगरपालिका असल्याने तेथे टाऊन प्लॅनर असला पाहिजे, तो का नाही. आमच्याकडे ए.डी.टी.पी. आहे, नागपूर शहरात मोठया प्रमाणात कन्स्ट्रक्शन ॲक्टीव्हीटीज आहेत. पण गोंदियाचा अधिकारी नागपूरला ए.डी.टी.पी. म्हणून १० टक्के चार्जवर काम करीत आहे. नागपूर हे उपराजधानीचे शहर आहे त्यामुळे येथे पूर्णवेळ टाऊन प्लॅनर असावा. तेच अधिकारी चार्जवर येतात व यामुळे भ्रष्टाचार होण्याची शक्यता आहे. नागपूर हे स्वत:चे घर बांधणारे शहर आहे, माझी विनंती आहे की, येथे पूर्णकालीन टाऊन प्लॅनर अधिकारी असावा.

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, नागपूर महानगरपालिकेने तसा प्रस्ताव तत्काळ सादर करावा, त्यावर कार्यवाही केली जाईल असे मी सन्माननीय सदस्य श्री.प्रवीण दटके यांना सांगू इच्छितो.

-------

असुधारित प्रत

## <u>शिवणी (जि.अकोला) विमानतळाच्या धावपट्टीचे</u>

## विस्तारीकरण करण्याबाबत

**(९) * १२३०१ श्री.विप्लव बाजोरिया : तारांकित प्रश्न क्रमांक १०२९१ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील शिवणी विमानतळाच्या धावपट्टी विस्तारीकरणाचा प्रश्न खाजगी जमिनींच्या हस्तांतराअभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.मुख्यमंत्री यांनी आयोजित केलेल्या बैठकीत अकोला विमानतळाच्या विकासाबाबत व विस्तारीकरणाबाबत व्यवहार्यता अभ्यास अहवाल करण्यास सुचविले असून, अकोला विमानतळ हे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या मालकीचे असल्याने सदर विमानतळाचा व्यवहार्यता अभ्यास अहवाल भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी करावे असे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने दिनांक २ मार्च, २०२० रोजीच्या पत्राद्वारे कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडून अकोला विमानतळाचा माहितीचा अहवाल (Information report) शासनास दिनांक १३ सप्टेंबर, २०२१ रोजी प्राप्त झाला असून सदर अहवालात कोणतीही तांत्रिक शक्यता नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे योग्य व्यवहार्यता अहवाल (feasibility report) देण्याबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी ई-मेल द्वारे पुन्हा कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अतिरिक्त खाजगी जमिनीचे भूसंपादन व इतर आवश्यक बाबींकरीता अंदाजित रुपये ७० कोटींची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२३०१.....

**श्री.दत्तात्रय भरणे, श्री.उध्दव ठाकरे यांच्याकरीता :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) भूसंपादन व इतर आवश्यक बाबींकरीता अंदाजित रुपये ९५.४८ कोटी खर्चाची आवश्यकता आहे.

(५) भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने उपलब्ध जागेतच धावपट्टीचे विस्तारीकरण करुन विमानतळ विकसीत करण्यात येईल असे कळविले आहे.

तसेच मागणीनुसार नाईटलॅंडिग सुरू करण्यासाठी ५१.६५ एकर एवढी जमीन राखीव ठेवण्याची भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने शासनास विनंती केली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विप्लव बाजोरिया : सभापती महोदय, मी तीन प्रश्न विचारु इच्छितो. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने १० वर्षापूर्वी जागा दिल्यानंतर धावपट्टी न वाढविण्याचे कारण काय आहे. धावपट्टी किती दिवसात वाढ होणार, राज्य व केंद्र शासनाकडून आतापर्यत किती निधीचे नियोजन याकरीता केलेले आहे.

श्री.दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, अकोला शिवणी येथील विमानतळाची धावपट्टी १४०० मीटर लांबीची असून ४० प्रवाशी क्षमतेची इमारत आहे, विमानतळावर प्रिसीजन ॲप्रोच पार्क इंडिकेटर लाईट व इतर उपकरणे उपलब्ध आहेत. सध्या हे विमानतळ भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे. या विमानतळावर सध्या एटीआर ४२ किंवा त्यापेक्षा कमी प्रवासी क्षमतेचे विमाने उतरु शकतात. परंतु अधिक प्रवासी क्षमतेचे विमान उतरविण्यासाठी विमानतळाची धावपट्टी वाढविण्याची आवश्यकता आहे. याकरीता डॉ.पंजाबराव देशुख कृषी विद्यापीठाने ६० हेक्टर क्षेत्र भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडे वर्ग केलेले आहे. उर्वरित खाजगी क्षेत्रातील २२.२४ हेक्टर भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. खाजगी क्षेत्रातील भूसंपादनास ८० कोटी रुपये, कार्यालयीन आस्थापना खर्च व भविष्यातील वाढ याकरीता ९५ कोटी ४८ लक्ष रुपये इतका खर्चाचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी प्राप्त झालेला आहे. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी अकोला विमानतळ विस्तारीकरणासाठी बैठक झाली व

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२३०१.....
श्री.दत्तात्रय भरणे .....

व्यवहार्यता अभ्यास अहवाल सादर करण्याचे निदेश दिले होते. त्याप्रमाणे भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडून अकोला विमानतळाचा फिजिबिलीटी रिपोर्ट मागविण्यात आला. तथापि सदर अहवालात कोणतीही तांत्रिक शक्यता निदर्शनास न आल्यामुळे योग्य फिजिबिलिटी रिपोर्ट देण्याबाबत भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास २४.९.२०२१ रोजी कळविण्याल आले आहे. त्यानुसार अध्यक्ष भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी दिनांक १३.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविले आहे की, अकोला विमानतळाचा समावेश उड्डाण योजनेत केल्यास तेथील धावपट्टी आहे त्या जागेतच १८०० मीटर लांब व ४५ मीटर रुंद विस्तारीकरण करता येईल. तथापि विमानतळावर नाईट लँडींगची सुविधा उपलब्ध करुन द्यायची असल्यास त्यासाठी सुमार २२.२४ हेक्टर आर जमिनीची आवश्यकता आहे. उडे देश का आम नागरीक ही केंद्र शासनाची योजना आहे. या योजने अंतर्गत राज्यातील ९ विमानतळांना अधिसूचित करण्यात आलेले आहे. अकोला विमानतळाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे ताबडतोब पाठविण्यात येईल व समावेश झाल्यानंतर आहेच त्या जागेतच विस्तारीकरण होणार आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न मागील अधिवेशनात उपस्थित झाला होता, तेच उत्तर येत आहे. फिजिबिलिटी रिपोर्ट महाराष्ट्र एअरपोर्ट कार्पोरेशनने इंडीयन एअरपोर्ट ॲथॉरीटीला पाठविलेला आहे. तो परत आपल्याकडे पाठविला कारण तो फिजिबल नव्हता. आधीचा रिपोर्टसुध्दा आपल्याच अधिकाऱ्यांनी तयार केला होता. मी सांगू इच्छितो की, एअरपोर्ट ॲथॉरीटी ऑफ इंडिया व महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन यामध्ये काही तरी मार्ग काढणार आहात की नाही. येथून तेथे व तेथून पुन्हा येथे हा प्रश्न येत आहे. यापेक्षा एअरपोर्टला महाराष्ट्र एअरपोअर् डेव्हलपमेंट कार्पोरेशनने ताब्यात घेऊन विकसीत करावा, कारण आपणच ती जमीन  निधी देऊन अधिग्रहीत केलेली आहे. सध्या ही जमीन आपल्याकडे असूनसुध्दा उपयोगात येत नाही. जमीन घेऊनही धावपट्टीला उपयोग होत नाही. लाईट

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२३०१.....
डॉ.रणजित पाटील .....

लँडींग आम्हाला व्यवस्था नको आहे, आम्हाला डे लँडींगची व्यवस्था करुन द्यावी. याकरीता महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन कंपनीला जी जमीन संपादीत करावयाची आहे त्याकरीता निधी उपलब्ध करुन देईल का.

श्री.दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या उड्डाण योजनेत समावेश केला तर आपणास जास्त जागेची आवश्यकता लागणार नाही. महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशनला हे काम करता येईल का याबाबत तपासून निर्णय घेण्यात येईल.

----

असुधारित प्रत

**बीड व जळगाव जिल्हयांना जोडणाऱ्या अंबाजोगाई-गिता-जळगाव रस्त्याच्या बांधकामाबाबत**

**(१०) * १२८७७ श्री.संजय दौंड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई-गिता-जळगाव रस्ता बीड व जळगाव या दोन जिल्ह्यांना जोडणारा असून, सदर रस्त्याच्या बांधकामासाठी गळीत धान्य संशोधन उपकेंद्र, अंबाजोगाई या शासकीय मालकीच्या ० हे. ६८ आर. जमिनीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता हस्तांतरित करण्याबाबत कृषी विद्यापीठाने ठराव करुन मान्यता दिलेली आहे, तसेच रस्ता शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधण्यात येणार असून जमीन सुध्दा शासकीय मालकीची असल्यामुळे उपरोक्त जमिनीची मालकी रस्त्याच्या कामासाठी देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या कामासाठी ० हे. ६८ आर. जागा हस्तांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) गळीत धान्य संशोधन उपकेंद्र यांची जमीन कृषक अथवा अकृषक प्रयोजनासाठी न देण्याचे शासनाचे धोरण आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दौंड : सभापती महोदय, अंबाजोगाई गिता जवळगाव याऐवजी छापील पुस्तिकेत बीड व जळगाव असे प्रसिध्द झालेले आहे ही चुक सुधारण्यात यावी. अंबाजोगाई गिता जवळगाव हा रस्ता बीड व लातूर या दोन जिल्हयाला जोडणारा प्रमुख रस्ता आहे. हा रस्ता अंबाजोगाई शहराच्या वाडीवस्तीमध्ये आला आहे. पूर्वीचा रस्ता हा प्रमुख जिल्हा मार्ग आहे. आता हा रस्ता टाऊन प्लॅनिंगच्या

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२८७७.....

श्री.संजय दौंड .....

नवीन नियमाप्रमाणे १०० फुटाचा रस्ता झाला आहे. कृषी विभागाच्या जागेत ४७५ मीटरपर्यंत रस्त्याची जागा आहे व याकरीता कृषी विभागाची ६८ आर जागा या रस्त्यासाठी लागणार आहे. कृषी विद्यापीठाने या जागेसंदर्भात सदर जमीन हस्तांतरणाच्या मोबदल्यात सार्वजनिक बांधकाम विभाग रस्त्याच्या बाजूने संरक्षक भिंत बांधून देणार का. सदर जमिनीचा मावेजा विद्यापीठाकडे जमा करणार का ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, मराठवाडयातील दोन जिल्हे जोडणारा हा रस्ता आहे व त्याच्या रुंदीकरणाचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, रस्ता रुंदीकरणाची ही जागा तालुका बीज गुणन केंद्राच्या जमिनीचा भाग आहे. कृषी विभागाने दिनांक ८ सप्टेबर २०११ रोजी परिपत्रक काढले आहे की, अशा कोणत्याही प्रकारच्या जागा ज्या विद्यापीठाच्या किंवा कृषी विभागाच्या आहेत, त्या कोणत्याही विभाग, स्वायत्त संस्था, अशासकीय खाजगी संस्था, व्यक्ती यांच्यामार्फत प्राप्त होणारे कोणतेही प्रस्ताव स्वीकारण्यात येऊ नये, असे कृषी विभागाचे परिपत्रक आहे.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२८७७.....

श्री.अशोक चव्हाण......

**त्यामुळे हे छोटंस काम अडलेले आहे. त्या भागामध्ये ट्रॅफिक आहे. मागील-पुढील रस्ता रुंद आहे. हा विशिष्ट प्रश्न जो सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे, या प्रश्नाशी संबंधित भागाची रुंदी ही केवळ ८.५ मीटर इतकीच आहे. उर्वरित भागाची रुंदी २४ मीटर इतकी आहे. यामुळे येथे एक बॉटल नेक तयार झालेला आहे. पूर्ण भागातील रस्ता २४ मीटरचा आहे. प्रश्न विचारलेले जे क्षेत्र आहे, त्याची रुंदी केवळ ८.५ मीटर इतकी आहे. यामुळे प्रश्न निर्माण झालेला आहे. हा प्रश्न सोडविण्याकरिता मी कृषी विभागाशी निश्चितपणे बोलणार आहे. संबंधितांसमवेत या संदर्भात बैठक घेऊन लोकहितार्थ हा निर्णय घेणे आवश्यक आहे. मराठवाडयातील दोन जिल्हयांना जोडणारा हा भाग आहे. ही वस्तुस्थिती आहे की,कृषी खात्याच्या सीड फार्मची ही जागा आहे. याबाबत आनंदाची गोष्ट अशी आहे की, कृषी विद्यापीठ देखील याकरिता सकारात्मक आहे. वसंतराव नाईक,मराठवाडा कृषी विद्यापीठ यांनी १६ ऑक्टोबर,२०२० रोजी ठराव घेऊन या कामाकरिता ना-हरकत दिलेली आहे. या कामाकरिता सुदैवाने सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक ती तरतूद देखील केलेली आहे. या कामाकरिता पैशांची देखील अडचण नाही. सदर कामाकरिता निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. मार्च,२०१९ मध्ये ५ कोटीच्या कामाची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. यामुळे या सर्व गोष्टी होत असताना केवळ कृषी विभाग जागेकरिता परवानगी देत नाही, एवढाच हा विषय आहे. शासनस्तरावर याबाबत मी आजच पाठपुरावा करुन सदरील कामाकरिता विभागाने जागा उपलब्ध करुन द्यावी. हा विषय महत्त्वाचा आहे. या कामाबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवून प्रयत्न करण्यात येईल.**

**पुणे-बंगळूर महामार्गाचे रुंदीकरण करण्याबाबत**

**(११) * १२०२० श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-बंगळूर नवीन महामार्गाकरीता पुणे, सातारा, सांगली जिल्ह्यातील हजारो एकर सुपीक आणि बागायती शेतीजमीन बाधित होणार असल्यामुळे या भागातील हजारो शेतकरी भूमिहीन होणार असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे-बंगळूर नवीन महामार्ग तयार करण्यापेक्षा, वापरात असलेल्या महामार्गाचे रुंदीकरण व दुरुस्ती केल्यास सदर महामार्गाच्या ८ पदरीकरणासाठी लागणाऱ्या खर्चाची सुध्दा बचत होणार असल्यामुळे, सध्या वापरात असलेल्या महामार्गाची दुरुस्ती व रुंदीकरण करण्यात यावी, अशी स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे-बंगळूर नवीन महामार्ग विकसित करण्याऐवजी वापरात असलेल्या महामार्गाचे ८ पदरीकरण करुन रुंदीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) पुणे-बंगळूर नवीन महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रस्तावित आहे.

हे खरे नसून सद्य:स्थितीत पुणे-बंगळूर नवीन महामार्गाच्या आखणीचा प्रस्ताव हा प्राथमिक स्वरुपात असून आखणी अदयाप अंतिम झालेली नाही. आखणी अंतिम करताना सर्व भौगोलिक बाबींचा विचार करण्यात येत आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) अशा आशयाची मागणी स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी केलेली नाही. तथापि, नवीन आखणी करताना सर्व बाबींचा आढावा (Comparative Study) घेवून अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

असुधारित प्रत

**ता.प्र.क्र.१२०२०.......**

श्री.अरुण लाड : सभापती महोदय, केंद्रीय परिवहन मंत्रालयाने नवीन किंवा पर्यायी पुणे-बँगलोर महामार्ग विकसित करण्याचा निर्णय घेतलेला आहे का, असल्यास, या महामार्गाकरिता पुणे सातारा सांगली जिल्हयातील सुपीक जमीन ज्या जमिनीवर लोकांनी स्वत:च्या शेतीकरिता पाणी आणलेले आहे, अशी जमीन संपादित करण्यात येणार आहे का ? हजारो एकर जमीन जाऊन लोक भुमिहीन होणार आहेत का ? नवीन पुणे-बँगलोर महामार्ग याकरिता लागणारा खर्च ४०,००० कोटी रुपये इतका आहे. जुन्या महामार्गाच्या रुंदीकरणाकरिता ५००० कोटी रुपये इतका खर्च लागणार आहे. नवीन महामार्ग काढून त्यामध्ये जमिनी संपादित करण्यापेक्षा जुन्याच महामार्गाचे रुंदीकरण केले तर लोकांच्या जमिनी व शासनाचे पैसे वाचविण्याचे काम हे शासन करणार आहे का ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, प्रश्नच जर वाचला तर त्यामध्ये पुणे-बँगलोर या नवीन महामार्गाचा हा विषय आहे. केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेल्या महामार्गाचा हा विषय आहे. सदरील महामार्ग हा प्राधिकरणामार्फत करण्याचे ठरविलेले आहे. हा विषय प्राथमिक अवस्थेत आहे. या रस्त्याकरिता पुणे,सातारा, सांगली येथील अशी एकूण साधारण सर्व एकंदरीत महाराष्ट्रातील २०३ कि.मी. आणि कर्नाटकातील ४९६ कि.मी.जमीन संपादित करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील १६८५ एकर जमीन संपादित होण्याकरिता प्रस्तावित आहे. याबाबतचा अंतिम अलाईनमेंटचा वगैरे निर्णय झालेला नाही.

सभापती महोदय, यामध्ये ट्रॅफिकची परिस्थिती पाहिली तर या भागामध्ये मोठया प्रमाणावर ट्रॅफिक आहे. या भागातील वर्दळीचा विचार केला तर साधारणत: १,३८२१ पीसीयू एवढया प्रकारची वाहतूक वर्दळ या भागात आहे. सदर रस्त्याची लांबी ज्याप्रमाणे प्रस्तावित करण्याच्या मन:स्थितीत सरकार आहे, त्याप्रमाणे त्याचा अहवाल तयार करण्याकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्राथमिक सर्वेक्षणाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. इंडियन रोड काँग्रेसच्या मानकाप्रामणे साधारण १२० कि.मी.प्रती तास इतक्या वेगाने वाहने जातील, त्याकरिता तो रोड डिझाईन करण्याचा विचार चालू आहे. हा रस्ता झाल्यास सदरील

पुणे-बँगलोर या शहरांमधील १३१ कि.मी. इतके अंतर कमी होणार आहे. सध्या पुणे बँगलोर राष्ट्रीय महामार्गाचे अंतर ८३० कि.मी. लांबी असून नवीन प्रस्तावित

**ता.प्र.क्र.१२०२०.......**

श्री.अशोक चव्हाण.....

ग्रीनफील्ड अलाईनमेंट प्रस्तावित आहे, त्याचा विचार केला तर तो महामार्ग ६९६ कि.मी.इतका होणार आहे. एकंदर हिशोब जर काढला तर साधारणत: १३१ कि.मी. अंतर यामुळे कमी होणार आहे. सन्माननीय सदस्यांना मी विनंती करेल. जरुर सुपीक जमिनी जाऊ नयेत, ज्या शेती उपयोगी जमिनी नसतील, त्यांचाच संपादनाकरिता विचार करणे आवश्यक आहे, हा विचार चुकीचा आहे. हा रस्ता झाल्यामुळे त्या भागातील आर्थिक उन्नतीकरिता फायदा होणार आहे. या रस्त्यामुळे तेथील अनेक भागांचे कमर्शियलायजेशन झालेले आहे. जमिनीला भावही चांगले प्राप्त झालेले आहे. तेथे रोजगारही चांगला प्राप्त झालेला आहे. मला वाटते की, हे सर्व पुणे-बँगलोरचा जो सर्व सेक्शन आहे, त्याचा विचार केला तर या रस्त्यामुळे तेथे आगामी काळात मोठा फायदा होणार आहे. सुरुवातीच्या काळात लोकांची तक्रार असते. परंतु आता भूसंपादनाच्या कायद्यामुळे पैसे चांगले मिळतात. भूसंपादनाला लोकांचा विरोध महाराष्ट्रात जाणवत नाही. लोक स्वत: पुढाकार घेतात, हे एक जनरल ऑब्झर्व्हेशन आहे. जी जमीन शासन संपादित करते, त्यावर कोणताही कर लागत नाही. हा विषय प्राथमिक अवस्थेत आहे. याबाबतचा अंतिम अलाईनमेंट बाबतचा निर्णय झालेला नाही. हा निर्णय झाल्यानंतर जे काही प्रश्न असतील, त्यांचा विचार करण्यात येईल.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, मी जुन्या पुणे-बँगलोर महामार्गाबाबत बोलत आहे. पुणे-सातारा जो रोड आहे, सभापती महोदय, आपण आणि इतर सर्व जण त्यावरुन ये-जा करतो. केंद्र शासनाचा हा राष्ट्रीय महामार्ग असताना राज्य शासनाला त्यामध्ये हस्तक्षेप करता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे का ? राज्य शासनाच्या हद्दीमध्ये हा रस्ता असताना तो रस्ता निकृष्ट दर्जा झालेला असल्याचे सर्व लोकप्रतिनिधींनी सांगितलेले आहे. माननीय श्री.नितीन गडकरी यांच्यासमवेत याबाबत पुणे येथील बैठकीत याबाबत कारवाईचे संकेत दिले गेले होते. परवाच्या दिवशी राज्य शासनाने याबाबत उत्तरामध्ये असे सांगितलेले आहे की, कोर्टाला असे सांगितले गेलेले आहे की, आता सरकारच टोलनाक्याचे पैसे वसूल करत आहे. अशा

असुधारित प्रत

प्रकारचा उल्लेख याबाबत केला गेलेला आहे. एका बाजूला रस्ता रिलायन्सला दिलेला आहे, तो वर्षानवर्षे पुर्णपणाने अडचणीत आलेला असताना या रस्त्यासंदर्भात शासन काय करणार आहे, जुन्या रस्त्याचे रुंदीकरण करुन शासन न्याय देणार आहे का ? जो चुकीच्या पध्दतीने रस्ता केलेला आहे, त्यासंदर्भात सरकार रिलायन्सवर कारवाई करणार आहे का ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, हा जो विषय सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. त्यावर उत्तर देण्याकरिता मी उभा आहे. जुन्या महामार्गावर देखील अनेक प्रश्न आहेत. महाराष्ट्रातील अनेक महामार्गावर अनेक असे विषय आहेत, कॉन्ट्रॅक्टर्स फेल झालेले आहेत, ते कामे वेळेवर करत नाहीत. याची दुसरी बाजू देखील सांगितली पाहिजे की, केंद्रीय मंत्रीमहोदय श्री.नितीन गडकरी यांचे देखील महाराष्ट्रातील रस्त्यांवर खूप लक्ष आहे, त्यांची राज्यातील रस्त्यांच्या कामांबाबात खूप सहकार्याची भूमिका आहे. अनेक वेळा माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत त्यांच्याबरोबर बैठका होत असताना या सर्व गोष्टी मी त्यांच्या निदर्शनास आणलेल्या आहेत. ज्या ठिकाणी ठेकेदार काम करीत नाहीत, ज्या ठिकाणी ठेकेदार अपेक्षित परफार्मन्स देत नाहीत. रस्ते खराब झालेले आहेत. अशा अनेक केसेस महाराष्ट्रात आहेत. ज्यामुळे याही बाबत लक्ष घातले जाईल. जुना जो रस्ता आहे, जुनी जी अलाईनमेंट आहे, त्याबाबत माहिती घेऊन त्याच्यामध्ये ज्या काही सुधारणा करण्याची गरज आहे त्या निश्चितपणे केल्या जातील.

**सभापती :** सन्माननीय मंत्रीमहोदय श्री.अशोक चव्हाण आमच्या सर्वांशी संबंधित असलेला हा रस्ता आहे. याबाबतच्या अनेक तक्रारी देखील रास्त आहेत. यापूर्वी आपण याबाबत माननीय श्री.नितीनजी गडकरी यांच्यासमोर देखील बऱ्याच तक्रारी मांडल्या होत्या. आपण जरा याबाबत थोडा वेळ काढा. आमच्या तक्रारी घेऊन आपण राज्य शासनातर्फे केंद्र शासन किंवा सर्फेस ट्रान्सपोर्टकडे प्रस्ताव पाठविला तर बरे होईल. याबाबत मी एक बैठक लावतो, आपण त्याकरिता आपला वेळ द्यावा.

-----------

**पाथरी (जि.परभणी) येथे श्री साईबाबा तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१२) * १२०७७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथे श्री साईबाबा तीर्थक्षेत्राच्या रुपये १४९ कोटीच्या विकास आराखड्यास मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या सन २०२१ मध्ये वा दरम्यान झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदय अध्यक्ष असलेल्या शिखर समितीच्या बैठकीत त्यास अंतिम मान्यता देवून तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने श्री साईबाबा तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास शिखर समितीची मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक १७/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला रुपये २०३ कोटी इतक्या किंमताचा पाथरी येथील श्री साईबाबा तीर्थक्षेत्र विकास आराखडा मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीसमोर दिनांक ०४ जून, २०२१ रोजी सादर करण्यात आला. या प्रस्तावास मुख्य सचिव तथा अध्यक्ष, उच्चस्तरीय समिती यांनी मान्यता दिली नसून, प्रस्तावामध्ये सुधारणा करण्याबाबत सूचित केले आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, विषय साधर्म्य असलेले मा.विधानसभा सदस्य यांचे दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२१ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

असुधारित प्रत

(३) दिनांक ०४/०६/२०२१ रोजी उच्चस्तरीय समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार,

ता.प्र.क्र.१२०७७....

श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी.....

तसेच मुख्य सचिव तथा अध्यक्ष, उच्चस्तरीय समिती यांनी दिलेल्या निदेशानुसार दिनांक ३०/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले असून, जिल्हाधिकारी, परभणी यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----------------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री. जयंत पाटील (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा एकवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री. आदित्य ठाकरे (पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

असुधारित प्रत

**पृ.शी. /मु.शी.** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री. भाई गिरकर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. /मु.शी.** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्री. अमोल मिटकरी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा पहिला अनुपालन अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा पहिला अनुपालन अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. /मु.शी.** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री. रमेशदादा पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

असुधारित प्रत

## पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून सभागृहाचे एका गंभीर विषयाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, सभागृहात माननीय सार्वजनिक बांधकाम )सार्वजनिक उपक्रम वगळून( श्री. अशोक चव्हाण साहेब उपस्थित आहेत. त्यांनी "कायम" हा शब्द काढून "कायम विनाअनुदानित" शाळांना "कायम अनुदान" देण्याचा त्यावेळी निर्णय घेतला होता. त्याला आता जवळ जवळ १२ वर्षे झालेली आहेत. एक तप उलटून देखील शिक्षकांना आजतागायत एक छदामही मिळालेला नाही. यापूर्वीच्या शासनाने शिक्षकांना २० टक्के अनुदान देण्याची घोषणा केली होती. त्याच्यापुढे शासनाने एक पाऊलही पुढे उचलले नाही. शासनाने शिक्षकांना गेल्या १० ते १२ वर्षे अनुदानावर आणल्यानंतर, तशी घोषणा केल्यानंतर विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना पगार मिळत नसतील आणि त्यांना शासनाकडून असे सांगितले जाते की, तुम्ही काम करीत नाही. लक्षावधी मुला-मुलींनी विनामोबदला शिकविण्याचे काम शिक्षक करीत आहेत. अधिवेशन सुरु झाले की, दरवर्षी शिक्षक आपल्या न्याय हक्कांच्या मागण्यांसाठी आझाद मैदानात येतात आणि शिष्टमंडळ माननीय मंत्री महोदयांची भेट घेऊन निवेदन देते. त्यावेळी मंत्री महोदयांकडून आम्ही तपासून सांगतो, त्रुटी दूर करतो. मग त्रुटी काढायच्या. त्रुटींच्या शाळा वेगळया आणि त्यानंतर टप्पा अनुदानाच्या शाळा वेगळया, अघोषित आणि घोषितच्या शाळा वेगळया आहेत. दरवेळी एक नवा शब्द शोधला जातो आणि त्यांना लटकवत ठेवण्याचे काम शासनाने वेळोवेळी केलेले आहे. यासंदर्भात मला शासनाची शरम वाटते. आपल्या राज्यात शिक्षणाची पहाट उगवली गेली. मी महात्मा फुले आणि सावित्रीबाईंचे नाव घेतो. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यानंतर आणि बाळासाहेब देसाई यांचे नाव

आजही लोक काढतात की, आपल्या राज्यातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाईल. मधुकरराव चौधरी, शिक्षण मंत्री असताना त्यांनी शिक्षकांना पगार दिले आणि

श्री. कपिल पाटील.....

पगारासाठी शिक्षकांना कोणाकडेही तोंड दाखविण्याची वेळ येणार नाही अशी हमी दिली. आज याच महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यानंतर मागील दोन वर्षापासून कोरोनोच्या काळात शिक्षकांनी आपल्या न्याय मागण्या मंजूर होतील या आशेवर होते. आता कोविडची महामारी दूर झालेली आहे. आता आमदारांच्या वाहनचालकांचा आणि स्वीय सहाय्यकांचा पगार वाढविलेला आहे. योग्य निर्णय केला त्याचे सर्वांनी स्वागत केले. किमान वेतन देण्याचा निर्णय योग्य होता. किमान वेतन मिळण्याचा अधिकार शिक्षकांना नाही काय ? शिक्षकांनी पुन्हा आपल्या पोटासाठी झगडत रहायचे काय ? शिक्षक सेवकांना ७ ते ८ हजार रुपयांचा आज देखील पगार मिळत आहे आणि तेवढीच रक्कम ही विनाअनुदानित शिक्षकांना पहिल्या टप्प्यासाठी दिली जाते. दुसऱ्या टप्प्यासाठी पुन्हा तपासणी केली जाते. एकदा तपासणी झाली. पुन्हा तपासणी झाली. तिसऱ्यांदा तपासणी झाली. आता पुढील टप्पा मंजूर करण्यासाठी पुन्हा तपासणी करावयाची, पुन्हा त्यामध्ये त्रुटी काढायच्या आणि नंतर पुन्हा पैसे घेण्यासाठी रांगा लावायच्या.... मी सन्माननीय सदस्य श्री. नागोराव गाणार यांना सांगू इच्छितो की, जो भ्रष्टाचार चालतो तो वेगळा आहे. आज शिक्षकांची लूट सुरु आहे. जनतेचा पैसा आहे. राज्यात राईट टू एज्युकेशनचा कायदा आलेला आहे. महाराष्ट्र राज्याने त्याला संमती दिलेली आहे. राज्यातील सर्व मुला-मुलींच्या शिक्षणाची हमी घेतलेली आहे. हा प्रश्न शिक्षकांच्या पगाराचा नाही. मुला-मुलींच्या शिक्षणाच्या अधिकाराचा आहे आणि तो अधिकार द्यावयाचा असेल तर शिक्षकांची व्यवस्था करणे क्रमप्राप्त आहे. सन १८८० मध्ये हंटर कमिशनपुढे महात्मा फुले यांनी मोफत आणि सक्तीचे शिक्षण, बहुजन वर्गातील शिक्षक पुढे आले पाहिजेत आणि त्यांना सन्मानपूर्वक वेतन मिळाले पाहिजे असे तीन मुद्दे उपस्थित केले होते. महात्मा फुले यांचे नाव घेणारे सरकार जर काहीच करीत नसेल तर अशा वेळी आम्ही

असुधारित प्रत

काय करायचे असा प्रश्न आम्हाला पडलेला आहे. आता शिक्षकांचा अंत पाहू नये. आता खूप झाले. आता शासनाने शिक्षकांना उद्यापासून १०० टक्के पगार दिला

असुधारित प्रत

श्री. कपिल पाटील.....

जाईल अशी हमी देण्याची गरज आहे. १०० टक्क्यांच्या पगाराशिवाय आम्हाला अनुदानाची काहीच गरज नाही. आम्ही आमच्या निढळाच्या घामाचा पैसा मागत आहोत. दुसरा एक छदाम देखील मागत नाही. आम्ही आमदार निधी वाढवून मागत नाही. न मागता शासनाने आमदार निधी वाढवून दिलेला आहे. शिक्षकांच्या पगारासाठी किती निधी लागणार आहे, याचा देखील शासनाने विचार करण्याची गरज आहे. आमदार निधीसाठी रक्कम वाढवून दिली जातो, त्याच्या किती तरी कमी रक्कम ही शिक्षकांच्या पगारासाठी लागणार आहे. ही रक्कम देण्यास शासन तयार नाही. मी आमदार आहे. मी आमदार निधीची मागणी केली नव्हती. दोन्ही सभागृहात आमदार निधी वाढवून द्यावा म्हणून कोणीही मागणी केली नव्हती. मला विकासाच्या प्रश्नासंबंधी लक्ष घालयाचे नाही. महाविकास आघाडी सरकारची राज्याचा विकास करण्याची जबाबदारी आहे. दिल्लीत पंजाब सरकार स्थानापन्न झाल्यानंतर माननीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांनी चार ओळीत एबीपी माझाला प्रतिक्रीया दिली होती. ते असे म्हणाले होते की,... माननीय श्री. शरदचंद्र पवार साहेब काय म्हणाले ते ऐकून घेण्याची गरज आहे. माननीय श्री. शरदचंद्र पवार साहेब त्यांच्या स्टाफला असे म्हणाले होते की, कोणाला आणि का मते दिली. ते म्हणाले यासाठी दिली की, दिल्लीतील शाळा चांगल्या केल्या आणि तेथील शिक्षकांना चांगले वेतन दिले आणि तेथील हॉस्पिटल चांगली केली. म्हणून त्यांना दिले. माननीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांनी परवाच्या शिक्षण संमेलनात सरकारची कान उघाडणी करुन यामध्ये लक्ष देण्यास सांगितले होते. माननीय मंत्री श्री. जयंत पाटील साहेब शिक्षण संमेलणासाठी होते पण ते त्यांच्या भाषणात काहीच म्हणाले नाही. गोड बोलून पोट भरत नाही. आम्ही देऊ, उद्या देऊ किती दिवस देऊ असा प्रश्न आहे. शिक्षकांना १०० टक्के पगार देणार की नाही असा माझा पॉईंट आफ इन्फर्मेशन आहे. त्रुटी किंवा अघोषित आम्हाला काहीच नको. सर्व गोष्टी बाजूला ठेऊन शिक्षकांना १०० टक्के पगार देणार की नाही असा माझा प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर द्यावे

असुधारित प्रत

श्री. कपिल पाटील.....

आणि त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक सुरु करावी, अशी माझी आग्रही मागणी आहे.

-----

असुधारित प्रत

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून सभागृहाचे एका गंभीर विषयाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात दोन वेळा हा प्रश्न राखून ठेवला होता. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाले आणि ते संस्थगित होण्यासाठी अजून दोन दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. माननीय सभापती महोदयांनी सूचना केली होती.

**सभापती** : कोणत्याही सन्माननीय सदस्यांना एंटरटेंन्टमेंट केले जाणार नाही. यावर सन्माननीय सदस्यांनी प्रश्नोत्तराच्या तासासारखी प्रश्ने विचारु नयेत.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय सभापती महोदयांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक आयोजित करावी म्हणून सूचना दिली होती. आजतागायत तशी बैठक झालेली नाही.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित

श्री.विक्रम काळे.....

गेल्या अडीच महिन्यांपासून हे शिक्षक आझाद मैदान येथे आंदोलन करीत आहेत. काल आंदोलनातील एकाचा मृत्यू झाला आहे. आमची मागणी आहे की, सरकारने हे अधिवेशन संपण्यापूर्वी या शाळांना अनुदान देण्याबाबतचा निर्णय घेतला पाहिजे. आमची हीच ठाम भूमिका आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांना बोलवावे. या विषयाच्या बाबतीत निर्णय झाला पाहिजे. जर याबाबतचा निर्णय होत नसेल तर आपण सभागृह स्थगित करावे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, आपण मागणी केली म्हणून मी सभागृह स्थगित करणार नाही. आपण उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या बाबतीत मी आश्वासन दिले होते. तसेच या प्रश्नाला उत्तर देत असताना मी आजच मुख्यमंत्री महोदयांना पत्र देखील लिहिलेले आहे. मी वेळेच्या सोयीनुसार मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक आयोजित करणार आहे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**सभापती** : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी १.१० ते १.२० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------------

नंतर श्री.कांबळे.......

अनुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**(दोन्ही बाजुंचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत वेलमध्ये येतात.)**

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी जागेवर जाऊन बसावे.

(दोन्ही बाजुंचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

अशा गोंधळाच्या परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक ५ मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

**(सभागृहाची बैठक दुपारी १.२० ते १.२५ वाजेपर्यंत स्थगित झाली.)**

----

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**(दोन्ही बाजुंचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत वेलमध्ये येतात.)**

**सभापती : सन्माननीय सदस्यांनी जागेवर जाऊन बसावे. मला एक निवेदन करावयाचे आहे. आपल्या सर्वांच्या भावना मला समजलेल्या आहेत, जाणवलेल्या आहेत. मी जरी संस्थाचालक असलो तरी गेली कित्येक वर्षे हा प्रश्न अनुत्तरित असल्याचे विधानपरिषद व विधानसभा सभागृहांत पाहिले आहे. मागच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी हा विषय मांडला होता. मीच आश्वासन दिले होते. आपल्याकडे अधिवेशनाचे अजून दोन दिवस शिल्लक आहेत. माननीय मुख्यमंत्री, माननीय अर्थमंत्री यांच्याबरोबर बैठक घेऊन यावर काही तरी निर्णय करु. मला हे सर्व करण्यासाठी अजून २ दिवस लागतील. त्यामुळे आपण हे सदन चालू द्यावे, अशी माझी विनंती आहे.**

**श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, बैठक कधी घेणार आहात ?**

**सभापती : आज घेण्यात येईल.**

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, आपण म्हणाल्याप्रमाणे सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांची भावना लक्षात घेता आपल्या स्तरावर एक बैठक बोलवावी आणि त्या बैठकीमध्ये याबाबत तोडगा काढण्यासाठी पुढाकार घ्यावा.

**सभापती** : मागच्या वेळीच मी आश्वासन दिले होते. आजच बैठक होईल. मी आज पत्र देखील तयार करुन ठेवले आहे. मला वेळ मिळाला, मी आसनावरुन उठलो की, माननीय मुख्यमंत्री व माननीय अर्थमंत्री यांना फोन करणार आहे. आज किंवा उद्या बैठक घेऊ.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, आजच बैठक घ्यावी.

**सभापती** : मी आज बैठक घेण्यास तयार आहे. पण त्यांनी वेळ दिला पाहिजे.

**पृ.शी./मु.शी.: मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत तसेच मराठा समाजातील विविध प्रलंबित मागण्यांबाबत ॲड निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना**

श्री. अशोक चव्हाण (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी सूचना क्रमांक १७ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

ॲड निरंजन डावखरे : सभापती महोदय, मराठा समाजातील विविध प्रश्न अजुनही प्रलंबित आहेत. मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत व इतर मागण्यांची पूर्तता करण्यात शासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे मराठा समाजामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. मराठा समाजाचे ईएसबीसी आरक्षण रद्द करुन ईडब्ल्यूएचा लाभ देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे मराठा समाजाच्या तरुणांवर अन्याय होत आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मराठा समाजातील विद्यार्थ्यांना लागू करण्याचा निर्णय सरकारकडून घेण्यात आला आहे. मात्र त्याचा अद्यापही लाभ मिळालेला नाही. आरक्षण कायदा रद्द होण्यापूर्वी निवड झालेल्या मराठा समाजाच्या उमेदवारांना तात्काळ नियुक्ती देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, मराठा मोर्च्यामध्ये मृत्युमूखी पडलेल्या व्यक्तिंच्या वारसांना शासन सेवेत घेणार का ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेले विधान अर्धसत्य आहे. त्यांना याबाबतीतील कदाचित पूर्ण माहिती उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी ते विधान केले असावे. शासनाच्या वतीने संपूर्ण विस्तृत असे निवेदन सर्व सन्माननीय सदस्यांना देण्यात आले आहे. मी ते निवेदन पटलावर ठेवतो. शासन स्तरावर काय झाले हे मी वाचायला गेलो तर वेळ जाईल. ५ ते ६ पानांचे विस्तृत निवेदन आहे.

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयात स्टे मिळाल्यापासून आतापर्यंत जे झाले तो सर्व वृत्तांत येथे दिला आहे. आपल्याला कल्पना आहे की, सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती आल्यानंतर ज्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले, त्या सर्वांना नियुक्त्या दिल्या आहे. मात्र ज्यांची निवड झाली, पण नियुक्ती मिळाली नव्हती असे अंदाजे २ हजार लोक आहेत. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण रद्द झाल्यानंतर ही सर्व प्रक्रिया थांबली. शासनाची इच्छा असुनही हे प्रकरण पुढे जाऊ शकले नाही. कारण त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती होती. त्यामुळे आम्ही निर्णय घेतला आहे, त्यामध्ये कायदेशीर सल्ला घेण्यात आला आहे, मात्र तोही फारसा अनुकूल नाही हे मला स्पष्ट केले पाहिजे. सदरील प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणून लवकरात लवकर

श्री. अशोक चव्हाण ....

म्हणजे पुढच्याच मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये घ्यावयाचा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगितीमुळे ज्या उमेदवारांची निवड होऊ शकली नाही त्यांच्या बाबतीत काय निर्णय घ्यायचा याबाबतीतील सविस्तर प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या येणाऱ्या बैठकीत घेण्याचा शासनाचा इरादा आहे.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत**

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत विषय मांडत आहेत, सभागृहात महसूल मंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री उपस्थित आहेत, मी जो विषय मांडतो तो अतिशय महत्वाचा आहे. कै.शिवाजीराव देशमुख यांचे स्मारक व्हावे अशी मागणी सांगली जिल्हयातून व विशेषत: शिराळा तालुक्यातून होत आहे. कै.शिवाजीराव देशमुख हे ज्येष्ठ नेते होते. सन १९७८ मध्ये ते अपक्ष म्हणून पहिल्यांदा निवडून आले. त्यानंतर १९८०, १९८५ व १९९० अशा वेगवेगळ्या कालावधीत त्यांनी शिराळा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. डोंगराळ भागाच्या विकासाचे शिल्पकार म्हणून त्यांचे नाव घेण्यात येते. कोकरुड या त्यांच्या जन्मगावी त्यांचे स्मारक करण्याबाबत शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, कै.एन.डी.पाटील यांचे स्मारक व्हावे अशी मागणी वाळवा तालुक्यातून करण्यात येत आहे. ते ज्येष्ठ शेतकरी नेते होते. दोन्ही सभागृहाचे ते सदस्य होते. शेतकऱ्यांच्या व दिन दलितांच्या प्रश्नांवर त्यांनी राज्यात मोठे काम केले आहे. त्यांचे स्मारक करण्याबाबत शासनाने आदरपूर्वक विचार करावा अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सभागृहात मंत्री महोदय उपस्थित आहेत, हा प्रश्न मागे देखील सभागृहात उपस्थित करण्यात आला होता. त्याबाबत मी निदेश देल्याचे मला आठवत आहे. या विषयाबाबत अधिवेशन संपल्यानंतर मी बैठक बोलवितो. अशा पध्दतीचा निर्णय घेण्याचा आपण प्रयत्न करु या.

-----

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत**

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यात कोरोना परिस्थितीमुळे सातत्याने लॉकडाऊन लावल्यामुळे शाळा बंद झाल्या होत्या. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने शिक्षक बंधू भगिनींनी जो अभ्यासक्रम ठरवून दिला होता तो पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. आता राज्यात दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षा सुरु आहेत. त्या अगोदर इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा व्हायला पाहिजे होती ती परीक्षा झालेली नाही. एनटीएस व एमएमएस परीक्षा असतात त्या झालेल्या नाहीत. शैक्षणिक वर्ष संपायला एक महिन्याचा अवधी राहिला आहे. या परीक्षा होतील किंवा नाही असा मोठा संभ्रम राज्यातील विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या मनात निर्माण झाला आहे. परीक्षा होणार असतील तर त्या कधी होतील हा प्रश्न निर्माण झाला आहे. या परीक्षा झाल्यानंतर या गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांना केंद्रीय परीक्षा द्यायच्या असतात. या परीक्षा कधी घेण्यात येतील त्याचे वेळापत्रक विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने जाहीर करावे अशी मागणी मी करीत आहे.

**सभापती** : शासनाने नोंद घ्यावी व उचित कार्यवाही करावी.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, होय.

-----

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत**

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी आपणाला धन्यवाद देतो. मी आपल्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. कै.आमदार अण्णासाहेब पाटील यांची आज पुण्यतिथी आहे. त्यांनी कामगार व माथाडी कामगारांसाठी आयुष्य वेचले आहे. मराठा समाजासाठी बलिदान दिले. त्यांची आज पुण्यतिथी आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य आपण पुन्हा त्याच मुद्यांवर येणार असला तर मी हे रेकॉर्डवर घेणार नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझी आपणाला विनंती आहे की, त्यांनी ज्या विषयासाठी बलिदान दिले तो विषय आज नियम ९३ च्या सूचनेअंतर्गत चर्चेला आला पण त्यावर चर्चा झाली नाही. त्या विषयाला न्याय देण्यासाठी नियम ९७ अन्वये या विषयाची अल्पकालीन चर्चा घ्यावी व त्यांना न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : कै.आमदार अण्णासाहेब पाटील जसे तुम्हाला तुमचे वाटतात तसे ते आमच्या जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील आहेत. त्यामुळे तुम्हाला इतकी काळजी करण्याचे काही कारण नाही. आज त्यांची पुण्यतिथी आहे म्हणून सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे हे आपणा सर्वांच्या वतीने तेथे जाऊन अभिवादन करुन आले आहेत.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यात अनेक ठिकाणी जुगार व मटका सुरु असणे

**मु.शी.** : हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यात अनेक ठिकाणी जुगार व मटका सुरु असणे यासंबंधी डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.प्रज्ञा सातव (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यात अनेक ठिकाणी जुगार व मटका मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी व त्या सुमारास उघडकीस येणे, या अवैध धंद्यांमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाल्याचे आढळून येणे, या मटका व जुगारामुळे कित्येक लोक देशोधडीला लागल्याचे आढळून येणे, या अवैधपणे सुरु असलेल्या जुगार व मटका धंद्यांबाबत ग्रामस्थांद्वारे वारंवार संबंधित पोलिस स्टेशनला तक्रार करण्यात येणे, यासंदर्भात पोलिसांनी घातलेल्या छाप्यात तब्बल ३४ जुगाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येणे, मात्र काही दिवसांनी हे गुन्हेगार बाहेर आल्यावर पुन्हा अवैध मटका व जुगार पूर्वीप्रमाणेच सुरू असल्याचे आढळून येणे, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे व भीतीचे वातावरण, सध्या हिंगोली जिल्ह्यातील सुरू असलेले मटका जुगार हे अवैध धंदे कायमस्वरुपी बंद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.शंभूराज देसाई (गृह राज्यमंत्री (ग्रामीण)) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

असुधारित प्रत

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

**(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)**

डॉ.प्रज्ञा सातव : सभापती महोदय, कोणी वंदा, कोणी निंदा हिंगोली जिल्ह्यात मटक्याचा आहे जोरात धंदा. एकीकडे कोणत्याही पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध धंदे सुरु होऊ नयेत यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी वेळोवेळी पोलिसांना सूचना करीत असतात. असे असताना हिंगोली जिल्ह्यात खुलेआम सेनगाव येथील बस स्थानकालगत व शहराच्या महत्वाच्या टी पॉईंट जवळ अशा दोन ठिकाणी भाड्याने दिलेल्या शटरमध्ये गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने छापा टाकला. त्या ठिकाणी तितली भोवरा, मटका व जुगार सुरु होता. पोलिसांना पाहताच मटका बहाद्दरांमध्ये धावपळ झाली. घटनास्थळी पोलिसांना २१ मोबाईल, चार दुचाकी, मटक्याचे साहित्य, तितली भोवऱ्याचे साहित्य व जुगाराचे साहित्य व रोख रक्कम असा एकूण ५,१४,३५०/- रुपये ऐवज जप्त केला. जिल्ह्यात अनेक ठिकाणी मटका व जुगारावर जेव्हा छापे टाकले जातात तेव्हा हिंगोली जिल्ह्यातील जुगाऱ्यांसह विदर्भातील काही जुगाऱ्यांचा आरोपीमध्ये समावेश असतो. त्यामुळे हा मटका जुगार किती जोमात सुरु असतो हे स्पष्ट होते. स्थानिक पोलिसांचे या जुगाऱ्यांकडे दुर्लक्ष कसे झाले हा माझा प्रश्न आहे. सेनगाव शहरात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा टाकला त्या अवैध धंद्याच्या छाप्यात तब्बल ३६ जुगाऱ्यांना अटक झाली. त्यांच्याकडून मोठा ऐवज व मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही ठिकाणी तितली भोवरा व मटका जुगार भाड्याने घेतलेल्या शटरमध्ये सुरु होते. मोक्याच्या ठिकाणी सुरु असलेले हे अवैध धंदे नेमके कोणाच्या आर्शीवादाने सुरु आहेत. याबाबतचा उलगडा पोलीस पथकाने अजूनही केलेला नाही. या प्रकरणात पोलीस अधीक्षकांनी बारकाईने लक्ष घातले तर या धंद्यांची खोलवर रुतलेली पाळेमुळे उघडकीस येण्याची शक्यता आहे. किरायाच्या जागेत अवैध धंदे कोणाच्या आर्शीवादाने चालत आहेत हा माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

सभापती महोदय, हिंगोली जिल्ह्यात अनेक ठिकाणी मटका व जुगार यांनी व्यवसाय स्थापले आहेत. हिंगोलीच्याच नव्हे तर विदर्भातील जुगाऱ्यांनी हिंगोली जिल्ह्यात मटका सुरु केला आहे. याची खबर पोलिसांनी नाही असे दिसून येते.

डॉ.प्रज्ञा सातव....

हिंगोली जिल्ह्यात अनेक ठिकाणी जुगार व मटका मोठ्या प्रमाणात अवैधरित्या सुरु आहे. या अवैध धंद्यामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. मटका व जुगारात कित्येक लोक देशोधडीला लागले आहेत. अवैध धंद्याबाबत ग्रामस्थांनी वारंवार पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रारी केल्या आहेत. हिंगोलीच्या महिला अनेक समस्यांना व प्रश्नांना तोंड देत आहेत. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे नमूद केले आहे की, ३६ आरोपींना ताब्यात घेण्यात येऊन त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर दोन्ही गुन्ह्यांमध्ये आरोपींविरुध्द माननीय न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. या ३६ जुगाऱ्यांना पुन्हा सोडण्यात आले आहे. ते बाहेर आल्यावर पुन्हा या धंद्याने जोम धरला आहे काही दिवसात हे लोक बाहेर आले व मटका आणि जुगार त्यांनी पुर्वीप्रमाणे सुरु केला.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

डॉ.प्रज्ञा सातव..........

त्यामुळे ग्रामस्थांमध्ये चिंतेचे व भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. सध्या हिंगोली जिल्ह्यात सुरु असलेला अवैध मटका व जुगार कायम स्वरुपी बंद करण्याबाबत शासन कोणती पाऊले उचलणार आहे ? "हिंगोली जिल्ह्यात खूप झाला मटका आणि गुटका, सरकार देणार काय याला झटका आणि हिंगोलीकरांना मिळणार काय या मटक्यापासून सुटका."

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.प्रज्ञा सातव यांनी हिंगोली जिल्ह्यातील अवैध मटका, जुगार संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात सविस्तर माहिती नमूद केलेली आहे. दिनांक २१.१०.२०२१ रोजी सेनगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत हिंगोली जिल्हा पोलीस दलाच्या वतीने छापा टाकण्यात आला होता. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यामध्ये एकूण २ गुन्हे नोंदविण्यात आले होते. गुन्हा रजिस्टर नंबर २७२/२०२१, कलम १२(अ) आणि गुन्हा रजिस्टर नंबर २७३/२०२१, कलम १२(अ) अन्वये २ गुन्हे दाखल करून दोन्ही गुन्ह्यांमध्ये ३६ आरोपींना अटक करण्यात आली. त्यामध्ये ५,७३,४००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सन २०२१ मध्ये पोलीस दलामार्फत सेनगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत जुगाराच्या ८६ आणि अवैध दारु व दारुबंदीच्या ७८ केसेस दाखल झाल्या होत्या. सेनगाव येथे जो छापा टाकण्यात आला त्यामध्ये लोकल क्राईम ब्रँच आणि स्थानिक पोलीस सहभागी होते. त्या माध्यमातून आमच्याकडे जी माहिती उपलब्ध झाली किंवा जे अनपूट प्राप्त झाले त्यानुसार तेथे ऑपरेशन लिड करण्यात आले. तेथील बीट अंमलदार यांच्यावर कडक कारवाई करुन त्यांना दिनांक २३.१०.२०२१ रोजी निलंबित करण्यात आले आहे. मी सांगू इच्छितो की, हिंगोली जिल्ह्यात एकूण ४३९ केसेस दाखल झालेल्या आहेत. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात या संदर्भात माहिती नमूद केलेली आहे. सेनगाव येथील प्रकार घडल्यानंतर आपण कम्पॅरिटिव्ह काढले. सन २०२० मध्ये हिंगोली जिल्ह्यात दारुबंदीच्या १०५१ केसेस दाखल होत्या. सन २०२१ मध्ये दारुबंदीच्या १०६०

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई.........

केसेस नोंदविण्यात आलेल्या आहेत. सन २०२० मध्ये जुगाराच्या ३१२ केसेस नोंदविण्यात आल्या होत्या. सन २०२१ मध्ये त्या ४२९ झालेल्या आहेत. सन २०२० मध्ये गुटक्याच्या ३७ केसेस होत्या. सन २०२१ मध्ये त्या ४९ झालेल्या आहेत. सन २०२० मध्ये अंमलीपदार्थाच्या ५ केसेस होत्या. सन २०२२ मध्ये त्या ६ झालेल्या आहेत. सेनगाव हद्दीत दारुबंदीच्या ५३ केसेस होत्या. सन २०२२ मध्ये त्या ७८ झालेल्या आहेत. यामध्ये २५ केसेसची वाढ झालेली आहे. जुगाराच्या ३४ केसेस होत्या. सन २०२१ मध्ये ४६ केसेस दाखल झालेल्या आहेत आणि गुटक्याच्या ३ केसेस होत्या त्या सन २०२१ मध्ये ४ झालेल्या आहेत. मी ही वस्तुस्थिती यासाठी सांगत आहे की, वर्षभरात ही बाब लक्षात आल्यानंतर आपण दोन्ही पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना सतर्क करुन मोठ्या प्रमाणावर मोहीमा राबविलेल्या आहेत. सेनगाव येथील बीट अंमलदाराला निलंबित करण्यात आलेले आहे. मी सांगू इच्छितो की, सेनगाव येथील अधिकारी ४ महिन्यांपूर्वीच रुजू झालेले आहेत. कदाचित पूर्वी जे अधिकारी होते त्यांच्या काळात हे झाले असेल. परंतु ४ महिन्यांपूर्वी जे अधिकारी रुजू झाले त्यांच्या काळात मोहीमा राबविण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी एकूण ३ प्रश्न विचारलेले आहेत. अवैध धंदे बंद करण्यासाठी कोणती पाऊले उचलण्यात येणार आहेत असा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. मी सांगू इच्छितो की, दिनांक ९.१२.२०२२ ते १२.१२.२०२२ अशा ४ दिवसांच्या कालावधीत हिंगोली जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करण्यासाठी मोहीम राबविण्यात आली. उपरोक्त ४ दिवसात जुगाराच्या ७, मटक्याच्या १७, दारुबंदीच्या ६२, मटक्याच्या १७, गुटक्याच्या ३ व वाळू चोरीच्या ५ केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. आपण हिंगोली जिल्ह्यातील सर्व ठाणे प्रभारींना सूचना देऊन कडक मोहीम राबविलेली आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, कोणत्याही परिस्थितीत अशा पद्धतीने अवैध व्यवसाय चालणार नाही याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षकांना पुन्हा एकदा सूचना देण्यात येतील.

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मोहीम राबविण्यात आल्याचे सांगितले. पूर्वी किती गुन्हे नोंद होते, आता किती गुन्हे नोंदविण्यात आले याबाबत त्यांनी सभागृहाला माहिती दिली. परंतु तेथे अवैध धंदे सर्रास सुरु आहेत, पोलिसांची भीती नाही असे चित्र दिसून येते. पोलिसांचा धाक राहिलेला नाही असा याचा अर्थ होतो. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, ज्या लोकांवर कारवाई केली ते बाहेर आल्यानंतर पुन्हा अवैध धंद्याचा सुळसुळाट झालेला आहे. ज्यांना अटक करण्यात आली होती त्यांच्यावर पुन्हा अशा प्रकारचे गुन्हे दाखल झालेले आहेत काय आणि त्या लोकांवर सातत्याने अशा प्रकारचे गुन्हे दाखल झाले असतील तर त्यांच्यावर तडीपार किंवा इतर कारवाई करण्यात येणार आहे काय ? तसेच, आपण जी गुन्ह्यांची आकडेवारी दिली ती शून्यावर येण्यासाठी पोलीस कार्यवाही करणार आहेत काय ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे हिंगोली जिल्ह्यातील सर्व ठाणे प्रभारींना त्यांच्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध व्यवसाय थांबविण्यासाठी मोहीम राबविण्याच्या सूचना ऑलरेडी देण्यात आलेल्या आहेत. त्याच बरोबर पोलीस अधीक्षक हिंगोली यांनी स्वत:चा वैयक्तिक मोबाईल क्रमांक जिल्हा माहिती अधिकारी यांच्या मार्फत वर्तमानपत्रे, सोशल मीडिया, पोलिसांचा व्हॉट्‌ॲप ग्रुपमध्ये प्रसिद्ध केलेला आहे. पोलीस स्टेशनमध्ये तक्रार घेत नसतील, कोणाला तक्रार करावयाची असेल तर थेट पोलीस अधीक्षकांकडे तक्रार करावी अशी स्पष्ट भूमिका पोलीस दलाने अवैध व्यवसाय बंद करण्यासाठी घेतलेली आहे.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, ज्या आरोपींवर गुन्हे नोंदविण्यात आले होते ते तुरुंगातून बाहेर आल्यानंतर पुन्हा अवैध व्यवसाय करीत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, हे तपासून घ्यावे लागेल. अशा पद्धतीने घडत असेल तर त्या संदर्भात अहवाल मागविला जाईल आणि अहवाल प्राप्त झाल्यानंतर तपासून योग्य ती कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, हिंगोली जिल्ह्याप्रमाणे नांदेड जिल्ह्यात सुद्धा अवैध धंद्याचा महापूर आलेला आहे. नांदेड जिल्ह्याच्या पलीकडे कर्नाटक, तेलंगणा राज्याची सीमा आहे. कर्नाटक, तेलंगणा राज्यातून नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गुटका येतो. महाराष्ट्रात गुटक्यावर बंदी आहे. त्यामुळे अवैध गुटक्यावर निर्बंध घालण्यात येणार आहेत काय ? पीएसआय, पीआय नांदेड येथे बदली व्हावी यासाठी प्रयत्न करीत असतात. सीमेवर चेकपोस्ट निर्माण करुन गुटक्याची अवैध वाहतूक होणार नाही यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत काय ? तसेच, अवैध बायोडिझेलची खुलेआम विक्री सुरु आहे. ज्या व्यक्तीकडे १००-२०० वाहने आहेत त्यांना अवैध रितीने बायोडिझेल पुरविले जाते. बायोडिझेलचा काळाबाजार होत असल्यामुळे पेट्रोलपंपावर देखील परिणाम होतो. शासन बायोडिझेलची अवैध विक्री बंद करणार आहे काय ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरनाथ राजूरकर यांनी लक्षवेधी सूचनेच्या स्कोपच्या बाहेरचा प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरनाथ राजूरकर यांची काल विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाच्या गटनेते पदी निवड झालेली आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई ....

**तसेच गटनेते झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी सदनामध्ये पहिलाच प्रश्न विचारला आहे व एक सकारात्मक सूचना केली आहे. आपल्या राज्यात गुटखाला मनाई केली आहे. बॉर्डर राज्यातून नांदेड जिल्हयात अवैधरित्या गुटखा वाहतूक होत असल्यास त्यासंबंधी आजच नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षकांना सूचना दिल्या जातील. चेकपोस्ट नाही. परंतु तेथील पेट्रोलिंग वाढवून रात्रीची गस्त घालून गुप्त पध्दतीने मोठया प्रमाणात माहिती जमा केली जाईल. अशा प्रकारे अवैध गुटखा वाहतूक रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासंबंधी जिल्हा पोलीस अधीक्षकांना आदेश दिले जातील.**

सभापती महोदय, बायो डिझेलच्या बाबतीत सांगायचे झाल्यास पेट्रोल पंपावर अवैधरित्या बायो डिझेल मिक्स केले जाते. मध्यंतरी या संदर्भात काही जिल्हयांमधून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर आपण यासंबंधी आढावा घेतला होता. नांदेड जिल्हयामध्ये ज्याप्रमाणे अवैध गुटखा वाहतुकीसंबंधी सूचना दिल्या जातील त्याप्रमाणे बायो डिझेलच्या संदर्भात काही केसेस आढळून आल्यास त्यासंबंधी कडक कारवाई करण्याबाबत पोलीस अधीक्षक नांदेड यांना आदेश दिले जातील.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या संदर्भात चांगले व सकारात्मक उत्तर दिलेले आहे. परंतु अद्याप २ प्रश्न अनुत्तरीत आहेत. रिपिटेड ऑफेंडर आहेत. आमची अशी माहिती आहे की, सदर गुन्हेगार धातुरमातूर दंड भरतात. पोलीस आणि गुन्हेगार यांच्यात छापे पाडण्यासंबंधी संगनमत असते. अशा प्रकारे पोलिसांनी छापे टाकल्यानंतर सदर गुन्हेगार धातुरमातूर दंड भरुन परत जातात. त्यामुळे रिपिटेड ऑफेंडरांवर तडीपारीची कारवाई करणार आहात का ? तसेच ज्या दुकानांमध्ये जुगार, मटका यासारखे गुन्हे घडलेले आहेत. सदर प्रकरणी दुकान मालकांवर काही कारवाई केली जाणार आहे का ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी मी यापूर्वीच उत्तर दिलेले आहे. या संदर्भातील माहिती एकत्रित करुन आपल्याला त्यासंबंधीचा अहवाल प्राप्त करावा लागेल. या संदर्भात

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई ....

पोलीस अधीक्षकांना तशा सूचना दिल्या जातील. सन्माननीय सदस्या डॉ. प्रज्ञा सातव यांनी प्रश्न विचारल्याप्रमाणे माझ्याकडे प्राप्त झालेल्या माहितीनुसार हिंगोलीमध्ये ज्या ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या होत्या. तेथे आतापर्यंत तशा प्रकारचे व्यवसाय पुन्हा सुरु झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सदर छापे ज्या ठिकाणी टाकण्यात आले होते ती जागा कोणाच्या मालकीची होती व ती कोणी चालविण्यास घेतली होती ? या सर्व गोष्टी तपासून कायद्यानुसार योग्य ती कारवाई केली जाईल.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** श्री.योगेश्वरी देवस्थान अंबाजोगाई प्रकरणी संबंधितांची बाजू ऐकून न घेता संगनमताने अर्जदार व उप जिल्हाधिकारी (सामान्य) भूसुधार बीड यांनी अर्जदाराचा मालकी हक्क मान्य करणे

**मु.शी.:** श्री.योगेश्वरी देवस्थान अंबाजोगाई प्रकरणी संबंधितांची बाजू ऐकून न घेता संगनमताने अर्जदार व उप जिल्हाधिकारी (सामान्य) भूसुधार बीड यांनी अर्जदाराचा मालकी हक्क मान्य करणे यासंबंधी श्री.संजय दौंड, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.संजय दौंड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मसहूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मौजे अंबाजोगाई, जि.बीड येथील इनाम जमीन स.नं.१८४ क्षेत्र ५ हेक्टर ०४ आर च्या महसूली अभिलेखानुसार मालकी रकान्यात श्री योगेश्वरी देवस्थान अंबाजोगाई असे नमूद असून पदसिध्द अध्यक्ष तहसिलदार अंबाजोगाई असणे, सदर प्रकरणी अर्जदार यांनी उपजिल्हाधिकारी (सामान्य) भुसुधार बीड यांचेकडे गैर अधिकाराने व गैरहेतुने सदर मिळकतीसाठी हक्क मिळणेकरिता अर्ज सादर करणे, सदर प्रकरणी हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदाने कायदा १९५४ च्या तरतुदी लागू होत नसणे, तसेच या प्रकरणात अतियात चौकशी कायदा, १९५२ व इतर अनुषंगिक कायद्यातील तरतुदींचा अंतर्भाव होत असतानाही त्याकडे जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सर डोळेझाक करण्यात येणे, सदर प्रकरणी श्री योगेश्वरी देवस्थान अंबाजोगाई यांची मालकी रकान्यात नोंद असतानाही तसेच तहसिलदार अंबाजोगाई हे पदसिध्द अध्यक्ष असतानाही त्यांना जाणीवपूर्वक प्रतिवादी न करण्यात येणे, याप्रकरणी सर्व

अप्रकाशित प्रत

श्री.संजय दौंड ....

संबंधितांची बाजू ऐकून न घेता संगनमताने अर्जदार व उपजिल्हाधिकारी (सामान्य) भुसुधार बीड यांनी अर्जदारांचा मालकी हक्क मान्य करणे, त्यामुळे सदर देवस्थान, स्थानिक जनता व भाविक यांच्यामध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व त्यामुळे शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.संजय दौंड : सभापती महोदय, हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. अंबाजोगाई शहरात श्री.योगेश्वरी देवस्थान आहे. हा आपल्या मतदार संघातील विषय आहे. अंबाजोगाई शहरात श्री.योगेश्वरी देवस्थानाच्या नावे अनेक ठिकाणी भूखंड आहेत. त्यापैकी अंबाजोगाई शहरालगत एक कि.मी. अंतरावर सर्व्हे नं.१८४ मध्ये ५.४ हेक्टर जमीन देवस्थानच्या मालकीची आहे. तेथे जमिनीचे प्रति एकर दर सव्वा ते दीड कोटी रुपये इतके आहेत. तेथे आजुबाजूला सर्व प्लॉटिंग झालेले आहे. आज सुध्दा त्या जमिनीसंबंधी ७/१२ उतारावर देवस्थानचे मालकीखान्यात नाव आहे. इतर हक्कामध्ये ज्यांची नावे आहेत त्यांनी काही भूमाफियांना हाताशी धरुन या जमिनीची विक्री करण्याकरिता परवानगी काढली आहे. दुसरा महत्त्वाचा विषय असा आहे की, सन २०१२ मध्ये तहसील कार्यालयातील १०० ते १५० वर्षांपूर्वीचे सर्व रेकॉर्ड जळाले. परंतु ते सर्व रेकॉर्ड जाळले गेले असा माझा स्पष्ट आरोप आहे. सदर प्रकरणी अद्याप कोणतीही चौकशी झालेली नाही. त्या संदर्भात बोगस रेकॉर्ड तयार करुन अशा प्रकारे जमिनींच्या खरेदी विक्रीचे व्यवहार होत आहेत. अंबाजोगाई जि.बीड येथील तहसील कार्यालयातील निजामकालीन रेकॉर्ड रुममध्ये १०० वर्षांपूर्वीचे जुने रेकॉर्ड होते. त्यात खासरा पत्रक, पाहणी पत्रक व सर्व प्रकारचे महसूल रेकॉर्ड जतन करुन ठेवल्यानंतर सन २०१२ साली ते सर्व रेकॉर्ड पूर्णपणे जळून गेले. त्यानंतर सदर प्रकरणी बोगस रेकॉर्ड तयार करुन सर्व्हे नं.१८४ मधील श्री.योगेश्वरी देवस्थानाच्या मालकीच्या असलेल्या जमिनीची विक्री परवानगी गैरमार्गाने मिळविण्यात आली. या प्रकरणी मोठया प्रमाणात भ्रष्टाचार व आर्थिक व्यवहार झालेला आहे. सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी दिनांक २० फेब्रुवारी, २०२२ रोजी एसआयटीची नेमणूक करण्यात आली. ज्यांनी सदर प्रकरणामध्ये गैरव्यवहार करुन आर्थिक व्यवहार केलेले आहेत अशा संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द व लोकांविरुध्द गुन्हे दाखल केले जाणार आहेत का ? दरवर्षी देवस्थानच्या सर्व जमिनींचा एक वर्षाकरिता लिलाव करणार आहात का ? सदर लिलावातून आलेली रक्कम देवस्थानच्या डागडुजीकरिता व दुरुस्तीकरिता वापरणार आहात का ?

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एक विशिष्ट विषयासंबंधी लक्षवेधी सूचना दिलेली आहे. सन २०१२ मध्ये कोणत्या प्रकारचे रेकॉर्ड जळाले याबाबत माझ्याकडे काही माहिती नाही. तसेच लिलाव करुन पुढे कशा प्रकारची कार्यवाही करावी याबाबत त्यांनी सांगितलेले आहे. सर्व्हे नं.१८४ मधील जमिनीवर श्री.योगेश्वरी देवस्थानचे नाव आहे. तहसीलदार हे देवस्थान समितीमध्ये पद्सिद्ध अध्यक्ष आहेत. श्री.विलास फुलारी नावाच्या वहिवाटदाराने सदर क्षेत्र १९५४ च्या कायद्याअंतर्गत इनाम जाहीर करावे म्हणून अर्ज केला होता. त्यानंतर तेथील उप जिल्हाधिकाऱ्यांनी तो अर्ज मान्य केला. अशी वस्तुस्थिती आहे. त्यानंतर देवस्थान समितीच्या सचिवांनी या बाबतीत अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे अपिल दाखल केले होते. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी तो आदेश रद्द केला आहे. आता सदर प्रकरणी अप्पर आयुक्तांकडे पुन्हा अपिल दाखल झालेले आहे. सदर प्रकरणामधील संबंधित अधिकारी यापूर्वीच निलंबित झालेले आहेत. या प्रकरणामध्ये जे दोषी अधिकारी असतील त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाईल.

-------------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** मुंबई उपनगरांमधील गृहनिर्माण संस्था व भूखंडधारकांना लाखो रुपयांचा अकृषिक कर भरण्यासंबंधी नोटीसा जारी करणे

**मु.शी.:** मुंबई उपनगरांमधील गृहनिर्माण संस्था व भूखंडधारकांना लाखो रुपयांचा अकृषिक कर भरण्यासंबंधी नोटीसा जारी करणे यासंबंधी श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.विलास पोतनीस (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई उपनगरातील सर्वच गृहनिर्माण संस्था व भूखंडधारकांना लाखो रुपयांचा अकृषिक कर भरण्याच्या नोटिसा जारी करण्यात आल्या असणे, दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत हा कर न भरल्यास रहिवाश्यांना भरमसाठ दंड व प्रसंगी गृहनिर्माण संस्थांचे खाते जप्त करण्याच्या देण्यात आलेल्या धमक्या, सन २००६ मध्ये या कराच्या दरात बदल करून रेडीरेकनरनुसार कर आकारणी सुरू झालेली असणे, तद्नंतर त्यास स्थगिती देण्यात आलेली असून सदरहू स्थगिती गतवर्षी उठविण्यात आली असणे, त्यानंतर या नोटिसा पाठविण्यास सुरुवात झालेली असणे, शहर आणि गावठाण परिसर तसेच ज्या भूखंडांना अकृषिक करातून वगळण्यात आले अशांना हा कर लागू नसणे, मात्र उपनगरातच हा कर लागू ठेवणे अन्यायकारक असणे, कर आकारणीबाबतची स्थगिती उठविल्यानंतर मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने म्हाडाच्या मुंबई मंडळाला १८२ कोटी रुपये थकीत अकृषिक सारा भरण्यासंदर्भात नोटीस पाठविली असणे, सदरहू नोटीसीच्या अनुषंगाने मुंबई मंडळाने उपनगरातील सहकारी गृहनिर्माण संस्थांना थकीत अकृषिक कर व्याजासह भरण्यासाठी नोटीसा पाठविल्या असणे, तर तहसीलदार यांनी भूखंडधारकांना नोटीसा

श्री.विलास पोतनीस ....

बजावल्या असणे, त्यामुळे मुंबई उपनगरीय जनतेत पसरलेली कमालीची नाराजी, सद्य:स्थिती शासन स्तरावरील गतकाळातील धरसोड लक्षात घेता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदींचा शासनाने आढावा घेवून अकृषिक कर रद्द करून अथवा या करात सवलत देण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.विलास पोतनीस : सभापती महोदय, काल माननीय महसूल मंत्री यांनी विधानसभेत अकृषिक कराला स्थगिती देऊन आढावा समिती नेमली. मी त्याबद्दल मुंबई उपनगरांमधील तमाम रहिवाशांतर्फे सर्वप्रथम मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो व आभार मानतो. सन २०१० मध्ये विद्यमान महसूल मंत्र्यांनी अकृषिक कराच्या वसुलीकरिता स्थगिती दिली होती. परंतु मागील शासनाच्या काळात तत्कालीन महसूल मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजी शासन निर्णय काढून आपण दिलेली स्थगिती उठविली. तसेच पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे सन २००१ पासून आजपर्यंत अकृषिक कर वसूल करण्याची सूचना दिली. त्यामुळे सोसायट्या, भूखंडधारक यांना अकृषिक कराच्या मोठया रकमा भरण्यासंबंधी नोटीसा प्राप्त झाल्या होत्या. या अनुषंगाने माझे २ प्रश्न आहेत. शासनाने नेमलेल्या आढावा समितीमध्ये कोणाचा समावेश केला जाणार आहे व त्या समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश केला जाणार आहे का ? सभापती महोदय, करोनाच्या पार्श्वभूमीवर सामान्य जनतेची आर्थिक परिस्थिती खालावली असल्यामुळे त्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन राज्यातील मुंबई उपनगरांसह महापालिका हद्दीतील सर्व निवासी जमिनींना अकृषिक करातून कायमस्वरुपी सूट देण्याबाबत शासन चाचपणी करणार आहे का ? ही बाब शक्य नसल्यास अकृषिक कराच्या रकमेवरील दंड माफ करुन करामध्ये आणि कर भरण्याच्या मुदतीत शासन सवलत देणार आहे का ?

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी चाचपणी ऐवजी शासन निर्णय घेणार आहे का ? असा उल्लेख करावयास पाहिजे होता.

यानंतर श्री.गागरे...

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सदरहू लक्षवेधी सूचनेवर विधानसभेतदेखील चर्चा झाली आहे. हा विषय पूर्वीपासून चालत आलेला आहे. पूर्वी त्याकरीता स्थगिती होती. परंतु जुन्या पध्दतीने त्याची वसूली चालू होती. त्यामुळे तक्रारीचा प्रश्न येत नव्हता. २०१७ मध्ये कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यात आली व किती टक्के आकारावी याचा विचार झाला. हमी कालावधी पाच वर्षांचा करण्यात आला व २०१८ मध्ये निर्णय जाहीर केला. नवीन पध्दतीने पूर्वीच्या वसुलीचा फरक देखील काढण्यास सांगण्यात आले. त्यावेळी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी या दोन वर्षात होत आहे. देण्यात आलेल्या नोटीसा सोसायटयांना न परवडणाऱ्या आहेत अशा प्रकारच्या तक्रारी मोठया प्रमाणात माझ्याकडे येत होत्या. त्यामुळेच आम्ही तुर्त यास स्थगिती दिलेली आहे, अजून याकरीता समिती केलेली नाही. परंतु यावर अभ्यास करुन निर्णय घेण्याकरीता नवीन पध्दती कशी असावी हे ठरविण्याकरीता विशेषत: अधिकाऱ्यांची समिती गठीत करावी लागेल. लोकप्रतिनिधींचे विचार नवीन धोरण ठरविताना विचारात घेतले जातील.

--------

असुधारित प्रत

| | |
|---|---|
| **पृ.शी.** : | पाचशे चौरस फुटापेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या कोळीवाडे, गावठाण व आदिवासी पाड्यांना मालमत्ता कर माफ करण्याची आवश्यकता |
| **मु.शी.** : | पाचशे चौरस फुटापेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या कोळीवाडे, गावठाण व आदिवासी पाड्यांना मालमत्ता कर माफ करण्याची आवश्यकता, यासंबंधी सर्वश्री रमेशदादा पाटील, प्रवीण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना. |

श्री.रमेशदादा पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई शहरात पाचशे चौरस फुटांच्या घरांना मालमत्ता कर माफीचा निर्णय नवीन वर्षाच्या सुरुवातीला माननीय मुख्यमंत्री महोदय यांनी जाहीर करणे, मात्र या निर्णयाचा कुठलाही फायदा मुंबई शहर व उपनगरातील कोळीवाडे गावठाण आणि आदिवासी पाड्यांना होणार नसून या ठिकाणी असणाऱ्या पाचशे चौरस फूटांहून अधिक जागा असलेल्या घरांना कर भरावाच लागणार असल्याने अशा घरमालकांना करातून सूट देण्याचा अधिकार मुंबई महापालिकेच्या अधिनियमात नसल्यामुळे या निर्णयाचा भूमिपुत्रांना कुठलाही लाभ होणार नसणे, मुंबईसह पश्चिम व पूर्व उपनगरात ४२ कोळीवाडे १८९ गावठाण आणि २२२ आदिवासी पाडे असून पिढ्यान पिढ्या मुंबईत वास्तव्यास असून त्यांची घरे पाचशे चौरस फुटांहून अधिक असल्याने या घरांना मालमत्ता कर माफ करण्यासाठी शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.प्राजक्त तनपुरे ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.रमेशदादा पाटील : सभापती महोदय, मुंबई शहरात ४२ कोळीवाडे, १८९ गावठाण, २२२ आदिवासी पाडे असून ते पिढयानपिढया मुंबईतील समुद्रकिनाऱ्यावर राहतात. त्यांची घरे पाचशे स्क्वेअरफुटापेक्षाही मोठी आहेत. त्यांना मालमत्ता कर माफ करण्याचा निर्णय शासन घेईल का. महाराष्ट्र शासनाने २०१२ मध्ये निर्णय घेतला की, कोळीवाडे व गावठाणाचे सिमांकन करण्यात यावे. परंतु तो निर्णय अद्यापही प्रलंबित आहे. या शहरात २०२२ मध्ये १८८८ चा महानगरपालिका अधिनियम बदलून ५०० स्क्वेअरफुटापर्यंतचे निवासी आहेत त्यांना करात सुट देतात. आमचे म्हणणे आहे की, कोळीवाडयातील मच्छिमार पिढ्यानपिढया राहात आहेत त्यांचे अद्याप सिमांकन झालेले आहे त्यांचा डीसीआर झालेला नाही. ५०० स्क्वेअरफुटापर्यंतच्या घरांना करमाफी दिली जाते. २०१२ च्या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. सिमांकन झालेले नाही. हा निर्णय आपण कोळी बांधवांना लागू करण्याची आमची मागणी आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, निवासी बांधकामास ५०० स्क्वेअरफुटाच्या आतमध्ये सरसकट करमाफीचा हा नियम सर्वांसाठी केलेला आहे. हा मोठा स्वागतार्ह निर्णय घेतलेला आहे. कोळीवाडे व गावठाण यांनाही बहुतांश लाभ होणार आहे.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, सन २०१७ मध्ये तेव्हाच्या सत्ताधाऱ्यांनी करातून सुट देण्याचे आश्वासन दिले होते. सुट देण्यास पाच वर्षे लागली, निवडणुकीच्या तोंडावर घोषणा देखील झाली, पण ती दिशाभूल करणारी घोषणा आहे. सर्वसाधारण करातून सुट मिळाली तरी उर्वरित मालमत्ता कर भरावाच लागतो. मुंबईमध्ये ४२ कोळीवाडे, १८९ गावठाण, २२२ आदिवासी पाडे आहेत यांना डीसीआर नियमाप्रमाणे व सरकारच्या धोरणाप्रमाणे अद्याप मालमत्ता करात सुट मिळालेली नाही. ५०० स्क्वेअरफुटापर्यंत घरांना मालमत्ता कर माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे पण तो ७०० स्क्वेअरफुटापर्यंत करणार का. कोळीवाडे, गावठाण, आदिवासी पाडे यांना क्षेत्रफळाची मर्यादा टाकू नयेत, कारण कोळी बांधव, आगरी बांधव हे भूमिपुत्र आहेत. यांचे कोळीवाडे अगोदर तयार झाले व नंतर मुंबई

श्री.प्रसाद लाड.....

तयार झाली. आपण झोपडपट्टयांना करमाफी करीत आहात, रस्त्यावरील व फुटपाथवरील लोकांना घरे देत आहोत. यांच्या दोन विषयापैकी पहिला विषय बांधकामांना परवानगी देण्याचा आहे. तसेच त्यांच्या घरांना ७०० स्क्वेअरफुटापर्यंत करमाफी द्यावी, या दोन विषयास मंजूरी देणार का ?

श्री. प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, २०१७ मध्ये सर्वसाधारण कर माफ करण्यात आला होता. बाकीचे बरेच कर तसेच होते. त्यातील वन ऑफ द पोरशन माफ झाला. मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केले आहे की, ५०० स्क्वेअरफुटापर्यंत शुन्य कर लागणार आहे, याकरीता खरे तर अभिनंदन केले पाहिजे, जो अर्धा ग्लास भरलेला आहे त्याच आस्वाद घेतला पाहिजे. २३ लाख निवासी घरे आहेत, त्यापैकी १६ लाखाना याचा लाभ होणार आहेत, यामध्ये कोळीवाडे व गावठाण देखील आहेत. आपण सरसकट याचा लाभ दिलेला आहे.

-----

असुधारित प्रत

| | |
|---|---|
| **पृ.शी.** : | शासनाच्या मार्गदर्शनानुसार पुणे महानगरपालिकेने डीआरसीबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी न करणे. |
| **मु.शी.** : | शासनाच्या मार्गदर्शनानुसार पुणे महानगरपालिकेने डीआरसीबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी न करणे, या संबंधी सर्वश्री प्रवीण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, सदाशिव खोत, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, विनायकराव मेटे, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री निलय नाईक, प्रवीण दटके, रमेशदादा पाटील, चंदूभाई पटेल, नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना. |

श्री.प्रसाद लाड (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"संपूर्ण राज्यासाठी विकास हस्तांतरण हक्क (टीडीआर) संदर्भात नवीन नियमावली दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी लागू करण्यात आलेली असणे, त्यानुसार, पुणे शहरातील टीडीआर झोन रद्द होऊन, शासकीय जमीन दरानुसार (रेडी रेकनर रेट) टीडीआर अदा करण्यात येणे, सदर नियमावलीनुसार, दिनांक २९ जानेवारी, २०१६ पूर्वी टीडीआर झोननुसार अदा केलेल्या, परंतु दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी शिल्लक असलेल्या डीआरसी सदर तारखेपासून एक वर्षात म्हणजेच दिनांक २८ जानेवारी, २०१७ पर्यंत टीडीआर झोननुसार वापरता येतील असे नमूद असूनही त्यात काही अडचणी उद्भवल्यामुळे पुणे मनपाने वेळोवेळी नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनाचे मार्गदर्शन प्राप्त करुन घेणे, त्यानुसार अंतिमत: नगर विकास विभागाने दिनांक ६ ऑगस्ट २०२१ रोजी मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना पत्र पाठवून संपूर्ण प्रक्रिया सुस्पष्ट करणे, तरीही आजतागायत, पुणे महानगरपालिकेने सदर मार्गदर्शनानुसार संदर्भीय डीआरसीबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी केलेली नसणे, यामुळे अशा अनेक डीआरसी सध्या अडकून पडल्या असून, सदर डीआरसी धारकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असणे, परिणामी डिआरसी धारकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.प्राजक्त तनपुरे ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेत २०१७ मध्ये नवीन ११ गावे समाविष्ट झाली आहेत. सध्या येथे प्रादेशिक आराखडा असून अद्यापही विकास आराखडा तयार झालेला नाही. २०१७ साली जुनी हद्द बहुतांशी विकसीत होती. पण तेथे जमिनीचे रेडी रेकनर दर जास्त होते. सदर समाविष्ट ११ गावे ही विकसीत झाली नसल्याने रेडी रेकनरचे दर खूप कमी झाले व जुन्या हद्दीशी नव्या हद्दीची तुलना करणे, टीडीआर इंडेक्समध्ये २०-३० टक्क्याच्या पटीने मिळकतीत टीडीआरमध्ये वाढ होणार होती. तसा प्रस्ताव देखील आला होता हे नाकारता येणार नाही. तसेच निर्गमित झालेले टीडीआर खर्ची पाडण्याचे क्षेत्र कमी होईल टीडीआर जास्त प्रमाणात शिल्लक राहिल, टीडीआरची मागणी कमी होईल त्यामुळे विकास आराखडयातील रस्ते ताब्यात घेणे अडचणीचे होईल. त्यामुळे विकास आराखडा अंमलजबजावणीवर त्याचा परिणाम होईल. याबाबत मुठभर विकासकांना पुणे शहरातील जुन्या हद्दीत गावांना समावेश करण्याचे धोरण आपण प्रथम आखणार आहात का. २०२१ च्या नगरविकास विभागाच्या टीडीआर प्रक्रियेनुसार पुणे महानगरपालिकेत अंमलबजावणी न करण्याची कारणे काय, विलंबास कोण कारणीभूत आहे. २०१७ मध्ये बहुतांशी जुनी हद्द विकसीत होती, तेथे रेडी रेकनरचे रेट जास्त होते. सदर समाविष्ट ११ गवे विकसीत झालेली नसल्याने तेथील दर खूप कमी होते. त्या हद्दीची तुलना करुन टीडीआरची विक्री होऊन हा प्रस्ताव तुम्ही मान्य करणार का. टीडीआरबाबत ११ गावांचा विषय २०१७ पासून अद्यापपर्यत प्रलंबित आहे. हा प्रलंबित मुद्दा नवीन विकास आराखडा पुणे मनपामध्ये घेणार का ?

सभापती महोदय, यामध्ये गैरसमज असा आहे की, २०१७ मध्ये ११ गावे समावेश करण्याचा निर्णय झाला, ती गावे घेण्याच्या वेळी त्यांचा रेडी रेकनर दर खूप जास्त होता. त्यामुळे टीडीआरचा रेटही जास्त जात होता त्यामुळे तो निर्णय रखडला आहे व तो निर्णय अद्यापही झालेला नाही. तो निर्णय घेणार का. याबाबत आपल्याकडे माहिती नसेल व अभ्यास नसेल तर निर्णय पेंडींग ठेवला तरी चालेल.

यानंतर श्रीमती नाफडे .....

श्री.प्रसाद लाड

पण हा अभ्यासपूर्ण उत्तर देण्याचा विषय आहे. कारण की, पुणे येथील ११ गावे नव्याने महानगरपालिकेत समाविष्ट होणार आहेत, त्याबाबतचा हा विषय आहे. पुण्यातील टीडीआरचा यामध्ये विषय आहे. पुण्यातील बिल्डर लॉबीने या टीडीआरचा वापर कसा केलेला आहे, त्याबाबतचा हा विषय आहे. याबाबत मंत्रीमहोदयांनी अभ्यास करुन उद्या जरी उत्तर दिले तरी चालण्यासारखे आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, यामध्ये प्रलंबित ठेवण्याचा काही विषय नाही. मी सन्माननीय सदस्यांना स्पेसिफिक प्रश्न विचारण्यास सांगितलेले आहे. लक्षवेधी सूचनेमध्ये मूळ विषय असा आहे की, शासनाने मार्गदर्शन करुन देखील महापालिका त्यावर अंमलबजावणी करत नाही. पूर्वी पुणे शहरामध्ये किंवा सर्वच महापालिकांमध्ये झोन नुसार एखादा डीसीआर किंवा टीडीआर जनरेट झाला तर तो त्याच झोनमध्ये वापरण्याचा विषय होता. आता नवीन सुधारित नियमाप्रमाणे तो इंडेक्सिंगप्रमाणे वापरतो. एखाद्या ठिकाणी टीडीआर जनरेट झाला, तो दुसऱ्या ठिकाणी वापरताना तेथील रेडीरेकनरचा रेट व इंडेक्सिंगच्या फॉर्म्यूल्यानुसार तो टीडीआर वापरला जातो. यामध्ये वेगवेगळया टप्प्यात नवीन गावे, ग्रामपंचायती ज्या महापालिकेत समाविष्ट झाल्यामुळे कन्फ्यूजन निर्माण झालेले आहे. पूर्वी १९९७ मध्ये २३ गावे समाविष्ट झालेली आहेत. सन २०१७ मध्ये ११ गावे, सन २०२१ मध्ये पुन्हा २३ गावे पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेली आहेत. याबाबत थोडे कन्फ्यूजन झाले होते. परंतु राज्य शासनाने महानगरपालिकेला क्लियरकट मार्गदर्शन केले होते. परंतु महानगरपालिकेने त्याची अंमलबजावणी केली नाही, हा एक प्रश्न आहे. वास्तविक पाहता महानगरपालिकेला अंमलबजावणी करताना जर अडचणी होत्या, त्या त्यांनी लगेच शासनाला सांगायला पाहिजे होत्या. आता ही लक्षवेधी सूचना चर्चेला लागल्यानंतर संबंधित अधिकारी माझ्याकडे आले. मी त्यांच्यासमवेत चर्चा केली. या चर्चेमध्ये त्यांनी जे काही मुद्दे मांडले, त्यामध्ये त्यांनी त्यांची बाजू मांडलेली आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, ते असे का करु शकत नाही. अधिका-यांचा याबाबतचा मूळ मुद्दा असा होता की,

श्री.प्राजक्त तनपुरे......

सन २०१७ पूर्वी याचा डीसीआर जनरेट झालेला असेल तर परत तो त्याच गावात युटिलाईज केला तर मोठया प्रमाणात त्याचे इंडेक्सिंग वाढते. असे केले तर२०-३० पटींनी त्याचा बिल्डरला लाभ होईल, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. ज्या कारणाने आपण हे सर्व करीत आहोत, त्या कारणालाच हरताळ फासल्यासारखे होईल, असे महापालिकेचे म्हणणे आहे. महापालिका अधिकाऱ्यांच्या म्हणण्यात देखील तथ्य आहे. मूळ लक्षवेधीमध्ये असा विषय आहे की, राज्य शासनाने मार्गदर्शन करुन देखील महापालिकेने त्याप्रमाणे अंमलबजावणी का केली नाही ? यापाठीमागचे लॉजिक काल रोजी संबंधित अधिकाऱ्यांनी मला सांगितलेले आहे. त्यांचे यामागचे लॉजिक विचार करण्यायोग्य आहे. ते शासनाला आधीच सांगायला पाहिजे होते. प्रधान सचिव नगरविकास (२), आयुक्त, महानगरपालिका पुणे, प्रॉपर्टी टॅक्स अधिकारी यांच्यासमवेत बैठक घेऊन यातून काहीतरी मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

**तालिका सभापती ( श्री.विक्रम काळे ) :** सदर बैठकीला सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनाही बोलाविण्यात यावे.

------------

असुधारित प्रत

**पृ.शी**. : सातारा जिल्हयातील जावळी तालुक्यातील करंजे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना जलजीवन मिशनमार्फत चालू करण्यासंदर्भात

**मु.शी**. : सातारा जिल्हयातील जावळी तालुक्यातील करंजे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना जलजीवन मिशनमार्फत चालू करणे यासंबंधी श्री.शशिकांत शिंदे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.शशिकांत शिंदे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सन २००८ मध्ये सातारा जिल्हयातील जावळी तालुक्यात करंजे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात येणे, सदर प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत मौ.करंजेसह मामुर्डी, चोरांबे, गवडी, आंबेघर आदी गावांसह २१ गावांचा समावेश असणे, त्यानुसार या गावांना पाणीपुरवठा मागणीनुसार टंचाई कालावधीत पाणीपुरवठा करण्यात येणे, तथापि सन २०१४ पासून सदर योजनेच्या विद्युत देयकांची थकबाकी राहिल्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने वीजपुरवठा खंडीत करणे व तेव्हापासून सदर पाणीपुरवठा योजना बंद स्थितीत असणे, सदर पाणीपुरवठा योजनेचा देखभाल दुरुस्ती खर्च व पाणीपट्टी खर्च परवडत नसल्याने सदर गावे मागील १० वर्षापासून प्रादेशिक योजनेतून पाणी घेत नसणे, सन २०११-२०१३ पर्यंत गावांमध्ये स्वतंत्र योजना राबविण्यात येऊन सद्य:स्थितीत त्या दोन गावांना स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा होत असणे, मामुर्डी, गवडी, सावली, जवळवाडी व चोरांबे या गावांना मजिप्रामार्फत जलजीवन मिशनअंतर्गत कोणतेही काम प्रस्तावित नसल्यामुळे जिल्हा परिषदेमार्फत त्याप्रकरणी कार्यवाही व्हावी असे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून त्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजीच्या

श्री.शशिकांत शिंदे......

पत्रान्वये मा.मुख्य अभियंता, मजिप्रा प्रादेशिक विभाग, पुणे यांना कळविण्यात आलेले असणे, त्यामुळे जलजीवन मिशन रेट्राफिटिंग मार्गदर्शक तत्वानुसार, ज्या योजनेचे रेट्रोफिटिंग करुन ५५ लिटर दरडोईप्रमाणे पाणीपुरवठा करता येईल अशा सर्व योजनांचे रेट्रोफिटिंग घेता येईल त्यानुसार सावली, मामुर्डी, जवळवाडी, चोरांबे या गावांच्या स्वतंत्र योजनांचे रेट्रोफिटिंगचे प्रस्ताव तयार करण्यात येणे, त्यानुसार सदर प्रकरणी कार्यवाही करण्याची आवश्यकता त्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.गुलाबराव पाटील ( पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, सातारा जिल्हयातील जावळी तालुक्यामध्ये कण्हेर धरण आणि कण्हेर धरणाच्या दोन्ही बाजूला २१ गावे आहेत. या २१ गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासंदर्भात २००८ मध्ये प्राधिकरणाची योजना झाली. ती कालांतराने बंद झाली. २०१३ मध्ये करंजे पाणीपुरवठा योजना प्राधिकरणामार्फत पुन्हा करण्यात आली. गावे छोटी असल्यामुळे प्राधिकरणाच्या योजनेचा फायदा झाला नाही. काही बिले भरण्याच्या अडचणीमुळे या योजना अनेक वर्षांपासून बंद आहेत. या लोकांना फार मोठी अडचण निर्माण झालेली आहे. या जलजीवन प्राधिकरणामार्फत केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने प्रचंड पैसे उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यांनी याबाबत तशा प्रकारच्या मागण्या केलेल्या आहेत. गावांना स्वतंत्रपणे प्राधिकरणाऐवजी जलजीवनमधून योजना द्याव्यात. त्याप्रमाणे प्रस्ताव देखील पाठविण्यात आलेले आहेत. परंतु त्या प्रस्तावांना असे सांगण्यात आलेले आहे की, जोपर्यंत प्राधिकरणामार्फत एनओसी दिली जाणार नाही, तोपर्यंत या योजना जलजीवनमध्ये बसविता येणार नाही. शासनाने प्राधिकारणामार्फत एनओसी देऊन या प्रस्तावांना जलजीवनाच्या माध्यमातून मंजूरी देऊन या योजनांमध्ये या गावांना समाविष्ट करुन घेण्यात येणार आहे का ?

श्री.गुलाबराव पाटील : सभापती महोदय, मजीप्रामार्फत २००८ मध्ये या योजनेचे काम करण्यात आले. माननीय आमदार यांनी सांगितल्याप्रमाणे सन २०१४ मध्ये या योजनेचे लाईट बिल न भरल्यामुळे त्या योजना बंद करण्यात आल्या. त्यानंतर २०१३-२०१४ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेय-योजनेमार्फत पुन्हा या योजनेंचे काम करण्यात आले. हे काम करत असताना भामुर्डी-सावली-जवखेडी या व अशा पाच गावांकरिता ही पाणीपुरवठा योजना आणण्याकरिता सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी माझ्याकडे मागणी केलेली आहे. पूर्वी देखील पत्राद्वरे त्यांनी माझ्याकडे मागणी केली होती. आमदार सपकाळ म्हणून देखील यामध्ये आहेत. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख श्री.एकनाथराव आंबोळे या सर्वांनी देखील याबाबत मागणी केली होती. आपली सर्वांची माहिती खरी समजून याकरिता प्राधिकरणाची एनओसी देण्यात येऊन या योजनांचा जलजीवन मिशनमध्ये करुन त्या गावांना पाणीपुरवठा करण्यात येईल.

----------------

असुधारित प्रत

**पोलीस अधिकाऱ्यांच्या रखडलेल्या प्रमोशनबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशनचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, पोलिसांची संघटना नाही, लोकप्रतिनिधींकडे पोलीस जाऊ शकत नाहीत. सन २०११ साली पोलीस सेवेत जॉईन झालेल्या पोलीस उप अधीक्षक पदावरील अधिकाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण होऊन १० वर्षे झालीत तरी त्यांना परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र गेली दहा वर्षे मिळालेले नाही. १२-१२ वर्षे पोलीस खात्यात नोकरी होऊनही स्थायित्त्व म्हणजेच कायम केले जात नाही.

परिविक्षाधीन कालावधी पूर्णत्त्व व स्थायित्त्व फाईल तत्कालीन अप्पर मुख्य सचिव आणि विद्यमान मुख्य सचिव यांच्याकडे प्रलंबित होती व आजही आहे. महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस अधीक्षक / पोलीस उप आयुक्त ( अ संवर्ग ) यांची ३० पदे सध्या रिक्त आहेत पण दीड वर्षे ही फाईल प्रलंबित असावी. पोलिसांच्या आयुष्यात बदली व बढती हे आस्थेचे विषय आहेत. माजी पोलीस महासंचालक व सध्याचे मुंबईचे पोलीस आयुक्त श्री.संजय पांडे यांचे पण मनापासून कौतुक करतो कारण त्यांनी पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांच्यासाठी ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. प्रत्येक पोलीस शिपाई आता किमान पीएसआय होणार आहे, पोलिसांना २० रजा मिळणार आहेत. पांडे साहेबांनी भरपूर अधिकाऱ्यांना प्रमोशन दिले. पोलिसांच्या बदल्यांमध्ये पारदर्शकता आणली. पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक अनेक अडचणी सुटत चालल्या आहेत परंतु त्यावरील अधिकाऱ्यांची म्हणजेच डीवायएसपी आणि त्यावरील अधिकाऱ्यांचे सर्व अधिकार मंत्रालयात गृह विभागाकडे आहेत पण गृह विभागातील काही हुकूमशाही अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे पोलीस उप अधीक्षक यांच्या बढत्या रेंगाळलेल्या आहेत. वरिष्ठ आपीएस अधिकारी स्वत:चे विषय मार्गी लावतात आणि कनिष्ठ अधिकारी यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करतात.

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत.......

कोरोनाच्या काळात जीवावर उदार होऊन काम करणारे पोलीस अधिकारी तसेच महापुरात लोकांना मदत करणारे पोलीस अधिकाऱ्यांना गृहमंत्री महोदय श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी न्याय द्यावा, अशी मी मागणी करतो.

**तालिका सभापती :** शासनाने निवेदन करावे.

आता लक्षवेधी सूचना संपलेल्या आहेत.

-------------

असुधारित प्रत

## विशेष उल्लेखाच्या सूचना

**तालिका सभापती :** आज बुधवार,दिनांक २३ मार्च,२०२२ रोजी मान्य केलेल्या म.वि.प.नियम १०१ अन्वये विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचे मी घोषित करत आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

( दुपारी २.१९ ते ३.०० वाजेपर्यंत मध्यंतर )

---------

असुधारित प्रत

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री. सदाभाऊ खोत : सभापती महोदय, सभागृहात माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत आणि कोरम देखील नसल्यामुळे सभागृहाची बैठक स्थगित करावी अशी माझी सूचना आहे.

**सभापती** : ठीक आहे. सभागृहात माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत. तसेच कोरम देखील होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी ३.०० ते ३.१५ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.मनिषा कायंदे)**

**तालिका सभापती** (डॉ.मनिषा कायंदे) : सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी ३.१५ ते ३.३० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------------

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.** : निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, आज एकूण १० सन्माननीय सदस्यांच्या निरोपाचा कार्यक्रम आहे. वर्षांनुवर्षे ही प्रथा सुरु आहे. दर २ वर्षांनी नवीन सन्माननीय सदस्य येत असतात आणि ६ वर्षांकरिता या सभागृहामध्ये प्रतिनिधीत्व करीत असतात. आपण स्वत: देखील त्यामध्ये आहात. आपण साधारणपणे जुलै महिन्यामध्ये निवृत्त होत आहात. मी तर आपली कारकीर्द फार जवळून पाहिली आहे. सन १९९५ ला आपण पहिल्यांदा महाराष्ट्राच्या विधीमंडळामध्ये पदार्पण केले, त्यानंतर अनेक वर्षे आपण विधानसभेचे सन्माननीय सदस्य होता आणि त्यानंतर मात्र तुम्ही या सभागृहाचे सन्माननीय सदस्य झाला. आपण अनेक वर्षे येथे काम करीत आहात. महाराष्ट्राच्या राजकारणात अभ्यासू, सुसंस्कृत, उच्चशिक्षित व्यक्तिमत्व म्हणून आपली ओळख आहे. सभागृहातील खूप जणांना माहीत नसेल पण फलटण राजघराण्याचे २९ वे वंशज म्हणून देखील आपले जनमाणसात एक वेगळ्या प्रकारचे स्थान आहे. मी त्या जिल्ह्याचा पालकमंत्री या नात्याने अतिशय जवळून पाहिले आहे. कारण सन १९९९ ते सन २००४ या काळात त्या जिल्ह्याचे पालकत्व करण्याची संधी मला माझ्या पक्षाने, त्या वेळच्या सरकारमधील मुख्यमंत्र्यांनी दिली होती.

सभापती महोदय, आपण कायद्याचे प्राध्यापक, फलटणचे नगराध्यक्ष, विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे आमदार म्हणून काम केले आहे, राज्यमंत्री म्हणून काम केले आहे. आपण त्यानंतर विधानपरिषदेचे सभापती झाला. आपण अशा जबाबदाऱ्या अतिशय यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. मी येथे ३० वर्षांच्या राजकीय जीवनात काम करीत असताना मला बऱ्याच सन्माननीय सभापतींच्या कामाची पध्दत

असुधारित प्रत

श्री. अजित पवार ....

पहायला मिळाली आणि त्याबद्दल मी व आम्ही स्वत:ला भाग्यवान समजतो. त्यामध्ये त्यावेळचे सन्माननीय सभापती ना.स.फरांदे साहेब, सन्माननीय सभापती जयंतराव टिळक साहेब आहेत. आपली कारकीर्द येथे अतिशय उजवी अशी पहायला मिळाली.

सभापती महोदय, सभागृहामध्ये कधी-कधी दोन्ही बाजुंच्या सन्माननीय सदस्यांचे वेगवेगळया विषयांवर वेगवेगळे विचार येऊ शकतात, वेगवेगळया विषयांवर वेगवेगळी मते येऊ शकतात. परंतु त्यातून समन्वय साधायचा आणि त्यातून मार्ग काढायचा हे गरजेचे असते. काम करताना अतिशय आदर देऊन त्यांनी काम केलेले आम्ही सर्वांनी अनुभवले आहे. आपण कोणत्याही पक्षाला कधी झुकते माप दिले असे मला तरी जाणवले नाही. अतिशय नि:पक्षपणे जबाबदारी पार पाडण्याचा आणि सर्व सन्माननीय सदस्यांना न्याय देण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. राजकीय नेते म्हणून आपण जरी दिसत असला तरी आपण खेळामध्ये क्रिकेटवर अतिशय प्रेम केले. महाराष्ट्राच्या रणजी क्रिकेट संघाच्या निवडीसाठी पात्र ठरलेल्या २२ खेळांडुमध्ये त्यावेळी आपली निवड झाली होती. श्री. सुनील गावस्कर आणि श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांना क्रिकेट शिकवणारे कोच त्यावेळी एकच होते, ही गोष्ट फार कमी लोकांना माहीत आहे म्हणून मी त्या गोष्टीचा उल्लेख केला आहे.

सभापती महोदय, आपणास कमल भांडारकर सरांनी क्रिकेट शिकविले. त्या भांडारकर सरांकडून काही काळ श्री. सुनील गावस्कर, विख्यात क्रिकेटपटू यांनी देखील प्रशिक्षण घेतलेले होते. दुर्दैवाने खेळ खेळताना कधी गंभीर दुखापत होते. अशाच खेळात गुडघ्याला झालेल्या दुखापतीमुळे आपल्याला क्रिकेट खेळ सोडावा लागला आणि आपण राजकारणात आला. अतिशोयक्ती नाही, पण महाराष्ट्र, देश चांगल्या क्रिकेटपटूला मुकले असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. तुमची क्रिकेटची शेवटची मॅच झाली, त्यामध्ये तुम्ही जवळपास ८२ धावा काढल्या होत्या. तुमची सेंच्युरी १८ धावांनी हुकली होती. मला विश्वास आहे की, क्रिकेटच्या मैदानात अपूर्ण

असुधारित प्रत

श्री. अजित पवार ....

राहिलेली आपली सेंच्युरी आपण आयुष्याच्या मैदानात नक्की पूर्ण कराल. मी त्याबाबतीत सभागृहाच्या वतीने, दोन्ही बाजुंच्या सन्माननीय सदस्यांच्या वतीने आपल्याला शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, जुलैमध्ये १० सन्माननीय सदस्य निवृत्त होणार आहेत. निरोप देण्याची वेळ जरी आली असली तरी अनेकदा खूप जण पुन्हा एकदा सभागृहात येत असतात. तसे जर काही घडणार असेल तर कोणी थांबवू शकत नाही. आमच्या सर्वांची अपेक्षा आहे की, तुम्ही पुन्हा सभागृहात यावे. आपण पुन्हा सभागृहात यावे अशा मी शुभेच्छा देतो. आपण विधानसभेनंतर या सभागृहाचे सदस्य झाला आहात तसे एकदा पुढील काळात संसदेचे सदस्य देखील आपण व्हावे अशा मी शुभेच्छा देतो. मी हे पुढील काळात म्हणत आहे, आता नाही. आपल्या आजपर्यंतच्या कामांतून सभागृहाची उंची वाढविण्याचा प्रयत्न निश्चितपणे झाला आहे. माननीय सभापतींबाबत अनेक आठवणी सर्वांच्या मनात राहतील, या विश्वासासह पुन्हा एकदा मी माननीय सभापतींचे आभार मानतो आणि त्यांना पुढच्या वाटचालीसाठी मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, आपला कालावधी संपत आहे तसा सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र फाटक यांचाही कालावधी संपत आहे. ८ जूनला त्यांची मुदत संपत आहे. आज त्यांना सभागृहात निरोप देण्यात येत आहे. मी माझ्या आणि सभागृहाच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र फाटक साहेबांना पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा देतो आणि त्यांच्या त्या कारकिर्दीसाठी देखील त्यांचे अभिनंदन करतो. ठाणे व पालघर हे नंतर निर्माण झालेले नवीन जिल्हे आहेत. पूर्वी ठाणे हा एकच जिल्हा होता. मागे मीच सरकारमध्ये असताना पालघरची नवीन निर्मिती झाली. त्या प्राधिकारी संस्था मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र फाटक करीत आहेत. शिवसैनिक ते शिवसेनाचा आमदार असा त्यांचा

असुधारित प्रत

राजकीय प्रवास राहिला आहे. सभागृहाला आठवत असेल की, त्या भागाचे प्रतिनिधीत्व अनेक वर्षे स्व. वसंतराव डावखरे यांनी केले. मला वाटते की, १८ वर्षे

श्री. अजित पवार ....

डावखरे साहेबांनी त्या भागाचे, संस्थेचे प्रतिनिधीत्व केले. सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र फाटक साहेब निवडून आले, त्यावेळी आम्हाला थोडासा धक्का बसला आणि वाटले की, असा निकाल कसा लागला. परंतु त्यांनी दरम्यानच्या काळात राजकीय पर्यायांचा वेगवेगळ्या प्रकारचा अभ्यास केला, अनुभव घेतला. मला विश्वास आहे की, त्यांचे मन आता मूळ असणाऱ्या शिवसेनेमध्येच रमेल आणि ते तेथेच राहून पुन्हा येथे प्रतिनिधीत्व करण्याची संधी घेतील. संकल्प प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात काम आहे. विधीमंडळात पुन्हा येण्याचा त्यांचा संकल्प निश्चितपणे सिध्दीस जाईल यासाठी देखील मी त्यांना शुभेच्छा देत आहे. मी सांगू इच्छितो की, तुमचे शिवसेना प्रमुख श्री. उद्धव ठाकरे राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्याशी असणारे संबंध तसेच तुम्हाला मतदान करीत असणाऱ्या लोकप्रतिनिधींशी असणारे संबंध लक्षात घेता तुम्हाला निश्चितपणे पुढे संधी मिळेल याबाबत माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. मी तुम्हाला देखील मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर सभागृहात उपस्थित नाहीत. मला आठवते की, मागच्या वेळी ६ वर्षांपूर्वी असाच प्रसंग आला होता, त्यावेळी आपणच माननीय सभापती होता. सन्माननीय श्री. धनंजय मुंडे साहेब विरोधी पक्षनेते होते. तुम्हा दोघांनाही पुन्हा संधी मिळाली. ते पुन्हा विरोधी पक्षनेते झाले आणि तुम्ही देखील सभापती झाला. मला तो ६ वर्षांपूर्वीचा काळ आठवत आहे. आपण तशाच पध्दतीने आता सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांना निरोप देत आहोत.

नंतर श्री. खर्चे ....

अप्रकाशित प्रत

श्री.अजित पवार....

दोन्ही महत्वाच्या पदावरील व्यक्ती एकाच वेळी निवृत्त होत आहेत, उच्च पदस्थ सन्माननीय सदस्यांची उणीव निश्चितपणे सभागृहाला जाणवेल. माननीय श्री.प्रवीण दरेकर यांचे नेतृत्व सहकारी क्षेत्रात व बँकींग क्षेत्रात काम करीत असताना योग्य वेळी वेगवेगळ्या प्रकारची गुंतवणूक करणे, केलेली गुंतवणूक योग्य वेळी काढून घेणे महत्वाचे असते. माननीय श्री.प्रवीण दरेकर यांना गुंतवणुकीचे गणित बरोबर जमले आहे. मला कोणावर वेगळ्या प्रकारची टीका करायची नाही. मला आठवते तसेच आपणा सर्वांना आठवत असेल, उप सभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांना देखील आठवत असेल की, सन्माननीय श्री.राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून ते सुरुवातील आमदार म्हणून निवडून आले होते. माननीय श्री.प्रवीण दरेकर यांना संधी मिळताच ते योग्य वेळी त्या पक्षातून बाहेर पडले व योग्य वेळी भारतीय जनता पक्षात आले. त्या पक्षात गेल्यावर पक्षश्रेष्ठीकडे त्यांनी जवळीक साधली ती सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड सर्वांना जमते अशातला भाग नाही. कोणत्याही पक्षात गेल्यावर तेथे जवळीक साधणे हे महत्वाचे आहे. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड हे निष्णांत आहेत, ते आमच्या पक्षात होते तेव्हा ते एकदम आमच्या जवळचे होते. अजूनही ते आमच्या जवळ आहेत हे मी नाकारीत नाही. आमच्याकडून गेल्यावर ते माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अतिशय जवळ गेले. यातील गंमतीचा भाग जाऊ द्या. एकंदरीत काम करीत असताना आपल्या बद्दल दुसऱ्याच्या मनात तेवढी विश्वासार्हता निर्माण करणे यासाठी मोठे कौशल्य असावे लागते. विधानपरिषदेवर निवडून आल्यावर ते विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते झाले. मागील आठ वर्षात माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने जी प्रगती केली, त्यापेक्षा अधिक वेगाने माननीय श्री.प्रवीण दरेकर यांनी प्रगती केली आहे. त्यांना या प्रगतीचे गणित कसे जमले याचे कोडे मला नाही तर भारतीय जनता पक्षाच्या जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांना व स्वयंसेकांना पडले आहे. त्यांनी विरोधी पक्ष नेता म्हणून सभागृहात अतिशय चांगल्या प्रकारे काम केले आहे. मी अनेक विरोधी पक्ष नेते पाहिले आहेत. माननीय श्री.विनोद तावडे यांची कारकींद पाहिली आहे, माननीय श्री.नितीन गडकरी यांची कारकींद पाहिली आहे. अशा

असुधारित प्रत

श्री.अजित पवार...

अनेकांनी विरोधी पक्ष नेते पदाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. काही कालावधीसाठी माननीय श्री.शदर पवार साहेब विरोधी पक्ष नेते होते. माननीय श्री.छगन भुजबळ हे विरोधी पक्ष नेते होते. अशा अनेक मान्यवरांनी विधानपरिषद विरोधी पक्ष नेता म्हणून काम केले आहे. राज्यात कोणतीही घटना घडली तर त्या भागात तातडीने पोहचण्याचा प्रयत्न विरोधी पक्ष नेते करतात. माननीय श्री.प्रवीण दरेकर हे वेगवेगळ्या चॅनेलमध्ये लगेच प्रतिक्रया देतात. तत्काळ प्रतिक्रीया देण्यासाठी उपलब्ध असलेला नेता म्हणून त्यांची महाराष्ट्राला ओळख आहे. त्यांच्या अगोदर भाजपचे विरोधी पक्ष नेते माननीय श्री.विनोद तावडे हे मोटर सायकलवर मागे बसून न्यूज चॅनलला मुलाखती दिल्याचे मी स्वत: पाहिले आहे. अशा पध्दतीने त्यांनी कामे केली आहेत. माननीय श्री.प्रवीण दरेकर यांनी विरोधी पक्ष नेता म्हणून अनेक चांगले मुद्दे सभागृहात उपस्थित केले आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. प्रवीण दरेकर यांनी काल सभागृहात सहकार विभागाच्या प्रस्तावावर मोठे भाषण केले. मी काल सभागृहात नव्हतो परंतु मी ते ऐकले आहे. त्यावर सभापती महोदय जेव्हा उत्तर देण्यास सांगतील तेव्हा उत्तर देण्यात येईल. आज तो विषय बोलण्याचा नाही याची मला जाणीव आहे. मी असे पाहिले की, विरोधी पक्ष नेते कोणताही विषय असला तरी त्यांची भूमिका, पक्षाची भूमिका व महाराष्ट्राची भूमिका मांडण्याचे ते काम करतात. त्यांची आता मुदत संपत आहे, त्यांची कारकींद पाहता त्यांचा पक्ष त्यांना निश्चितपणे पुन्हा संधी देईल याबाबत माझ्या मनात तीळमात्र शंका नाही. ते पुन्हा या सभागृहाचे सदस्य होतील. त्यांना पुढील वाटचालीसाठी मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, राज्याचे उद्योग मंत्री व या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देसाई यांना निरोप देत आहे. माननीय श्री.सुभाष देसाई यांच्याबाबत महाराष्ट्राच्या व सभागृहाच्या मनात आदराची भावना आहे. त्यांच्या वयाचा विचार केला तर त्यांचे वय बरेच झाले आहे. स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत त्यांचे असलेले संबध व त्यानंतर माननीय श्री. उद्धव ठाकरे यांच्यासोबत त्यांचे असलेले संबंध त्यामुळे त्यांना ते नेहमी उपयोगी पडले. पक्षाला वेगळ्या पध्दतीने मोलाचा

श्री.अजित पवार....

सल्ला देण्याचे काम त्यांनी केले आहे. अगोदरच्या पिढीपासून आताच्या पिढीपर्यंत शिवसेनिकांमध्ये आदर्श असलेले माननीय श्री.सुभाष देसाई हे सभागृहाचे सदस्य म्हणून निवृत्त होत आहेत. मंत्री म्हणून ते आपणासमोर असणार आहे. तो अधिकारी माननीय श्री.उद्धव ठाकरे यांचा आहे. त्याबाबत कोणाच्या मनात तीळमात्र शंका नाही. या सभागृहात त्यांना पुन्हा निवडून आणण्याचा सकारात्मक विचार त्यांचा पक्ष करीन अशा शुभेच्छा देण्यास काही हरकत नाही.

सभापती महोदय, उद्योग मंत्री व मराठी भाषा विभागाचे मंत्री म्हणून ते काम करीत आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळायला पाहिजे यासाठी ते प्रयत्नशील आहेत. गुढीपाडव्याला मुख्यमंत्री महोदयांनी वेळ दिलेला आहे. गुढीपाडव्याला मराठी भाषेची सुरुवात होते त्या दिवशी मराठी भाषा भवनाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी त्यांनी मुख्यमंत्री महोदय व माझ्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. ही बाब आम्ही अनुभवली आहे. औद्योगिक,व्यापारी व आर्थिकदृष्ट्या प्रगत राज्याचे उद्योग मंत्री म्हणून काम करीत असताना या राज्यात औद्योगिक गुंतवणूक वाढावी, उद्योग धंद्याचा विकास व्हावा, उद्योगासाठी पोषक वातावरण निर्माण व्हावे, यासाठी त्यांनी केलेले काम निश्चित कौतुकास्पद आहे, त्यामध्ये वाद नाही. शिवसेना पक्ष व शिवसेना नेत्यांचे मराठी प्रेम हे सर्वांना माहिती आहे.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे मराठी भाषेचे प्रेम आपण अनेकदा अनुभवले आहे. माननीय श्री.सुभाष देसाई मराठी भाषेचे नेतृत्व करीत असताना त्यांनी अपेक्षेपेक्षा चांगल्या पध्दतीने जबाबदारी पार पाडली आहे. याबाबत कोणाचेही दुमत नाही. माननीय श्री.सुभाष देसाई हे महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील मराठी गावे व मराठी लोकांना पुन्हा महाराष्ट्रात आणण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. संयुक्त महाराष्ट्रासाठी बिदर, भालकी, बेळगांव, निपाणी सह सीमा भागातील मराठी गावे महाराष्ट्रात सामील करुन घेणे हे आपल्या पूर्वजांचे स्वप्न साकार करण्याचे ध्येय सर्वांचे आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयात प्रकरण आहे तेथे त्याचा निकाल लवकर

असुधारित प्रत

श्री.अजित पवार...

लागावा व ते ध्येय पूर्ण करण्यासाठी सभागृहातील सर्वांची व महाराष्ट्राची साथ अतिशय मोलाची ठरणार आहे. माननीय श्री.सुभाष देसाई यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपत असल्याने त्यांना निरोप देत असताना पुन्हा त्यांनी या सभागृहात निवडून यावे अशा मनापासून शुभेच्छा देतो. माननीय श्री.सुभाष देसाई यांची साथ, सहवास, नेतृत्व, मार्गदर्शन लाभावे व त्यांना निरोगी व दीर्घायुष्य लाभावे अशी मी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो व त्यांना शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, शिवसेना पक्षाचे दुसरे नेते या सदनाचे ज्येष्ठ सदस्य माजी मंत्री सन्मानीय श्री.दिवाकर रावते यांचा या सभागृहातील कार्यकाळ ७ जुलै २०२२ रोजी संपत आहे. त्यांच्या पुढील वाटचालीकरिता मी मनापासून शुभेच्छा देतो. शिवसेना प्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे कट्टर शिवसैनिक म्हणून सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांची ओळख आहे. शिवसैनिकातील कट्टरपणा त्यांच्यात पुरेपूर उतरला आहे. मुंबई बरोबर मराठवाडा, पश्चिम विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रात शिवसेना पक्षाच्या संघटनेची ताकद वाढविण्याचे त्यांनी केलेले काम आपण सर्वांनी पाहिले आहे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.अजित पवार........

मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक म्हणून त्यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाली. मुंबई महानगरपालिकेचे उपाध्यक्ष, स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून मुंबई शहराच्या सर्वांगीन विकासासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांनी सभागृहात सामान्य जनता, मराठी बांधव किंवा कष्टकरी बांधवांचे प्रश्न अतिशय तळमळीने मांडलेले आम्ही अनेक वेळा अनुभवले आणि ते प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा देखील केलेला आहे. राज्याच्या मंत्रिमंडळात देखील त्यांनी आदर्शवत काम केलेले आहे असे त्यांच्या बरोबर मंत्रिमंडळात काम केलेले सन्माननीय सदस्य सांगतात. त्यावेळी आम्ही आमदार म्हणून विरोधी पक्षात काम करीत होतो. आम्हाला सुद्धा त्यांच्या कामाचा अनुभव येत होता. महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील न्याय हक्कासाठी सीमा भागात जाऊन त्यांनी केलेल मार्गदर्शन किंवा त्यांनी सीमावर्ती मराठी बांधवांचे मनोबल उंचाविण्यासाठी किंवा त्यांना ताकद देण्यासाठी जे काम केले ते खरोखरच अतिशय उजवे आहे. शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी भाषेसाठी आणि मराठी बांधवांसाठी हक्काच्या लढढ्याचा दिलेला वसा आणि वारसा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी पुढे नेण्याचे काम केले. या सभागृहातील त्यांची भाषणे तोच विचार पुढे नेणारी आहेत हे आपहण नेहमीच अनुभवत आहोत. मला एका गोष्टीचा आनंद आहे की, आपण अर्थसंकल्पात मुंबई शहरात मराठी भाषा भवनासाठी १०० कोटी रुपयांची आणि ऐरोली येथील मराठी भाषा संशोधन उप केंद्रासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद केली. प्रत्येक जिल्ह्यातील एका गावात पुस्तकांचे गाव साकारण्यात येत आहे. त्यामुळे त्यांचे निश्चितपणे समाधान झाले असेल. ज्यावेळी हा निर्णय घेण्यात आला त्यावेळी त्यांनी मला फोन करुन सांगितले की, आमची अनेक वर्षांपासूनची मागणी होती, आता ती मागणी पूर्णत्वाकडे जात आहे. उशिरा का होईना, परंतु चांगला निर्णय झालेला आहे. मुंबई शहरात मराठी भाषा भवन उभे राहत आहे. महाराष्ट्रासाठी, मराठी माणसांसाठी तळमळीन काम करणाऱ्या सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांच्या

असुधारित प्रत

श्री.अजित पवार........

अनुभवाचा उपयोग महाविकास आघाडी सरकारला होत राहील याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही. मी त्यांना पुढील वाटचालीसाठी, निरोगी व दिर्घायुष्यासाठी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांची मुदत दिनांक ७ जुलै, २०२२ रोजी संपणार आहे. त्यांना सुद्धा मी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत हे शेतकरी संघटनेच्या चळवळीतून पुढे आलेले नेतृत्व आहे. शेतकरी संघटनेचे नेते दिवंगत शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी चळवळीच्या कामाला सुरुवात केली. सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील मौजे मरळनाथपूर सारख्या छोट्या गावातील सामान्य शेतकऱ्याच्या घरी जन्मलेल्या आणि इयत्ता ७ वी पर्यंत शिक्षण घेतलेला त्यांच्या सारखा युवक सभागृहाचा सदस्य होतो, राज्याच्या मंत्रिमंडळात काम करतो ही मोठी गोष्ट आहे. मी याबद्दल त्यांचे कौतुक करतो, अभिनंदन करतो. ही सर्व पुण्याई त्यांना पाठबळ देणाऱ्या राज्यातील शेतकऱ्यांची आहे. ते पूर्वी छातीवर लावत असलेल्या शेतकरी संघटनेच्या लाल बिल्ल्याची आहे यावर कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. त्यांचे सुद्धा दुमत नसेल. भारतीय जनता पक्षाबरोबर जाण्याच्या मुद्यावरुन त्या काळात शेतकरी संघटनेत उभी फूट पडली आणि माजी खासदार श्री.राजू शेट्टी साहेबांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेची स्थापना केली. सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी सन २०१० मध्ये माजी खासदार श्री.राजू शेट्टी यांचा हात धरला. ते स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष देखील झाले. त्यांनी राज्यभर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर रान उठविले. ते मंत्री असताना ऊसाचे आंदोलन किंवा वेगवेगळया चर्चेच्या निमित्ताने आम्हाला त्यांच्या बरोबर चर्चा करण्याचा अनुभव आला. सन २०१४ मध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेने भारतीय जनता पक्षासोबत युती केली. शेवटच्या टप्प्यात स्वाभिमानी संघटनेच्या कोट्यातून त्यांची सभागृहाचे सदस्य म्हणून एन्ट्री झाली. माजी मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून

असुधारित प्रत

श्री.अजित पवार........

काम करण्याची त्यांना संधी मिळाली. मात्र त्याच काळात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा आणि माजी खासदार श्री.राजू शेट्टी यांचा हात सुटला आणि ते आता एकटेच पुढे जात आहेत. आम्हाला काही वेळा वेगवेगळया बातम्या ऐकावयास मिळतात. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील व ते अनेक वेळा गप्पा मारत असतात. ते कोणत्या विषयावर गप्पा मारतात हे मला माहिती नाही. पूर्वी त्यांचे फारसे जमत नव्हते. परंतु राजकारणात कोणी कोणाचा शत्रू नसतो आणि मित्रही नसतो हे त्रिवार सत्य आहे. हे कोणीही नाकारु शकत नाही. आपण सर्वांनी याचा अनुभव घेतलेला आहे. हे मी नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. शेतकरी संघटनेत, आंदोलनात काम करणाऱ्या सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांचा पेहराव आता बदललेला आहे. त्यांच्या अंगावर पांढरा ड्रेस आलेला आहे. आता तो ड्रेस आणखी पांढरा शुभ्र झालेला आहे. आज त्यांनी लाईट कलरचा शर्ट परिधान केलेला आहे. आता त्यांच्या ड्रेसची घडी मोडत नाही. पूर्वी आंदोलनामुळे त्यांचा रापलेला चेहरा आता फारसा रापलेला दिसत नाही. कारण आता त्यांना सभागृहात बसावे लागते. सभागृहात एअर कंडिशनर आहे. आपण गमतीचा भाग सोडून द्यावा. आता त्यांचा चेहरा निखरु लागला आहे. त्यांच्या चेहऱ्यार हे नवतेज कायम राहावे, अशी मी इच्छा व्यक्त करतो. त्यांच्या चेहऱ्यावरील निखार त्यांचा सहयोगी पक्ष कायम ठेवेल. त्यांना या सभागृहात पुन्हा काम करण्याची संधी मिळेल याबद्दल माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. आपण ज्या सन्माननीय सदस्यांना निरोप देत आहोत त्यापैकी काही सन्माननीय सदस्य पुन्हा सभागृहाचे सदस्य म्हणून निवडून येतील. भारतीय जनता पक्ष त्यांना पुन्हा संधी देईल याबद्दल दुमत नाही. त्यांना पुन्हा संधी मिळते किंवा नाही हे काही दिवसातच कळणार आहे. मी त्यांना पुढील वाटचालीसाठी मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुजितसिंह मानसिंह ठाकूर हे मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यातील नेते आहेत. त्यांनी विधिमंडळात

असुधारित प्रत

श्री.अजित पवार........

मराठवाड्याचे प्रतिनिधीत्व केले. त्यांची राजकीय कारकीर्द, सामाजिक जीवनाची सुरुवात परांड्यातून झाली. भूम-परांड्यामध्ये परांडा नावाचा तालुका आहे. त्यांनी राजकारण, समाजकारण, सहकाराच्या बरोबरीने शिक्षण क्षेत्रात योगदान दिलेले आहे. त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा उपयोग त्यांना सभागृहात काम करताना निश्चितपणे झालेला आहे. तसे बघितले तर त्या भागात भारतीय जनता पक्षाची फारशी ताकद नव्हती. तेथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, काँग्रेस पक्ष व शिवसेना पक्षाची ताकद होती. पक्ष संघटनेत पदाधिकारी, परांडा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पदापासून त्यांचा राजकीय प्रवास सुरु होऊन ते विधान परिषदेचे सदस्य झाले. जुलै महिन्यात त्यांची मुदत संपणार असल्यामुळे आपण त्यांना आज निरोप देत आहोत. मी त्यांना पुढील वाटचालीसाठी, राजकीय व सामाजिक कारकिर्दीसाठी मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेबांना देखील आपण निरोप देत आहोत. ते मराठवाड्याचे सुपूत्र आहेत. ते तुमच्याकडे येण्यापूर्वी आमच्याकडे होते. आमच्याकडे असताना ते सातत्याने माझ्या बरोबर राहत असत. मी व त्यांनी अनेक दौरे केलेले आहेत. आम्ही पक्ष संघटनेच्या कामानिमित्त अनेक वेळा विमानातून एकत्र प्रवास केलेला आहे. प्रत्येकाच्या मनात वेगवेगळी मते, विचार येतात. त्यांनी वेगळी भूमिका घेतली. आता ते भारतीय जनता पक्षासोबत काम करीत आहेत. त्यांना सभागृहात निवडून येण्यासाठी त्यांच्या सहयोगी पक्षाकडून पुन्हा संधी मिळेल, असा विश्वास मी व्यक्त करतो. विधानसभेचे माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत त्यांचे जवळचे संबंध आहेत. त्यांचे संघटन कौशल्य चांगले आहे. ते कोठेही असले तरी त्यांना मानणारा वर्ग आहे. त्यांच्याकडे वक्तृत्व आहे, वकूब आहे, त्यांच्या या गुणांचा फायदा मराठा समाजाला व्हावा यासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केलेला आहे. मराठा समाजाचे विविध प्रश्न मांडताना ते सभागृहात कशा प्रकारे आग्रही मागणी करतात हे आपण अनेक वेळा अनुभवले आहे. त्यांची देखील मुदत संपणार आहे. मी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.

असुधारित प्रत

श्री.अजित पवार........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांना देखील आपण निरोप देत आहोत. राजकारण, समाजकारण, उद्योग, सेवा अशा अनेक क्षेत्रात एकाच वेळी काम करणारे हे नेतृत्व आहे.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

श्री.अजित पवार....

राज्यातील एका उद्योगशील प्रतिनिधीला सदनाच्या माध्यमातून आपण निरोप देत असल्याची भावना आपल्या सर्वांच्या मनामध्ये आहे. मला आठवते की, आमच्या पक्षामधून त्यांना सदनामध्ये आणण्याचा आम्ही प्रयत्न केला होता. परंतु तेव्हा थोडी गडबड झाली आणि काही मतं फुटली. त्यामुळे १-२ मतांनी त्यांची संधी गेली होती. त्यानंतर त्यांनी वेगळी भूमिका घेतली. त्यावेळी सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पक्षामध्ये ते गेले. सभापती महोदय, त्यांच्या नावामध्येच प्रसाद आणि लाड यांचा समावेश आहे. त्यामुळे कोणी कोणाचे लाड केले व कोणी कोणाला प्रसाद दिला ? हे काही सांगता येणार नाही. आता ते सासरेबुवा झालेले आहेत. म्हणून मी त्यांच्यावर जास्त घसरणार नाही. आज या कार्यक्रमाच्या निमित्ताने मी त्यांना भविष्यातील वाटचालीकरिता शुभेच्छा देतो. भाजपा नेतृत्त्वासमवेत त्यांचे असलेले संबंध लक्षात घेता त्यांना सदनामध्ये काम करण्याची निश्चितपणे पुन्हा संधी मिळेल. पुढील वेळी जे सदस्य येणार आहेत त्यात शिवसेनेचे २ सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे २ सदस्य, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा एक सदस्य आणि भाजपाचे ४ सदस्य १०० टक्के येणार आहेत. तसेच उर्वरित एक सदस्य सर्वांमध्ये कसा निवडून येईल ? हा प्रश्न आहे. यात नशीब आणि लोकांच्या पाठिंब्याचा देखील भाग असतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय पंडितराव दौंड यांच्या संदर्भात सांगायचे झाल्यास त्यांच्या वडिलांनी विधानसभेमध्ये अनेक वेळा प्रतिनिधित्व केले होते. तसेच त्या काळात स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या विरोधात त्यांनी निवडणूक लढली होती. सर्वसामान्य माणसांमधून स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेबांसारखे नेतृत्त्व पुढे आले होते. तसेच एक लोकनेता म्हणून त्यांची झालेली ओळख संपूर्ण महाराष्ट्राने व आपण सर्वांनी अनुभवली व पाहिली आहे. सर्वांना बरोबर घेऊन जाणारे त्यांचे नेतृत्त्व होते. बीड जिल्हयातील परळी मतदार संघातून श्री.संजय दौंड प्रतिनिधित्व करीत आहेत. श्री.धनंजय मुंडे जेव्हा एमएलए झाले, तेव्हा सदर जागा रिक्त झाल्यानंतर माननीय श्री.शरदचंद्र पवार साहेबांनी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने उर्वरित टर्म पूर्ण करण्यासाठी श्री.संजय दौंड यांना संधी दिली होती. श्री.संजय दौंड

श्री.अजित पवार....

यांनी मिळालेल्या मुदतीत सर्वसामान्य लोकांचे प्रश्न सातत्याने उपस्थित करीत होते. मी त्यांचे मनापासून आभार मानतो. बीड जिल्हयातील परळी तालुक्यातील दौंडवाडी गावामध्ये श्री.संजय दौंड यांचा जन्म झाला होता. श्री.संजय दौंड यांचे वडील व माजी मंत्री श्री.पंडितराव दौंड यांचा राजकीय व सामाजिक वारसा लाभला. तो वारसा सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड अतिशय समर्थपणे पुढे चालवित आहेत. ही अत्यंत समाधान आणि आनंदाची बाब आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड यांनी विधिमंडळाच्या पायरीवर केलेल्या शीर्षासनामुळे त्यांची संपूर्ण राज्यात चर्चा झाली. मला अनेक जणांनी विचारले की, तुमचे काही काही आमदार शीर्षासन वगैरे करतात, त्यांना काय काय जमते ? यावर मी त्यांना असे सांगितले की, त्यांना हे सर्व जमते म्हणूनच ते आमदार होतात. तसेच श्री.प्रकाश गजभिये हे काहीही करु शकतात. सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड हे नियमितपणे व्यायाम करतात व चांगले पैलवान देखील आहेत. त्यांनी केलेल्या अनोख्या आंदोलनामुळे संपूर्ण राज्याने व चॅनलवाल्यांनी त्यांची दखल घेतली. शीर्षासन करण्याकरिता नियमित व्यायाम आणि सराव महत्त्वाचा असतो. त्यामुळे कोणीही शीर्षासन करण्याचे धाडस करु नये. सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल की, आमचे एन.डी. निंबाळकर होते. त्यांचे भाऊ शीर्षासन करीत असताना गेले होते. माननीय सभापती यांनी सदर व्यक्ती माहीत आहे. तेथे अशा प्रकारची एक दु:खद घटना घडली होती. म्हणून मी सांगत आहे की, सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड शीर्षासन करतात म्हणून कोणीही शीर्षासन करण्याच्या भानगडीत पडू नये. ते अतिशय बॅलन्सने करावे लागते. सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड हे प्रयोगशील शेतकरी आहेत. ते अद्यापही स्वत:च्या शेतीमध्ये जाऊन काम करतात. ही बाब अतिशय कमी लोकांना माहीत आहे. अनेक जण बांधावरचे नव्हेतर कागदावरील शेतकरी असतात. परंतु सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड हे हाडाचे शेतकरी असून ते स्वत: शेतामध्ये कष्ट करतात. त्यामुळे त्यांना शेतकरी व कष्टकऱ्यांचे प्रश्न व अडचणी माहिती आहेत. शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या प्रश्नासाठी त्यांनी सदनामध्ये अनेकवेळा आवाज उठवला व आपल्या कामाचा ठसा सदनामध्ये उमटवला

असुधारित प्रत

श्री.अजित पवार....

असल्याचे आपण सर्वांनी अनुभवलेले आहे. पक्षाने सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड यांना शब्द दिला होता. त्यानुसार पक्षाने आपला शब्द पूर्ण केला. त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन भविष्यात त्यांना निश्चितपणे चांगली जबाबदारी मिळेल असा मी विश्वास व्यक्त करतो. सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड यांना मी त्यांच्या राजकीय, सामाजिक वाटचालीकरिता मनापासून शुभेच्छा देतो. सभापती महोदय, आज येथे १० सन्माननीय सदस्यांचा निरोप समारंभ होत आहे. मी आपल्या सह सर्व सन्माननीय सदस्यांना मनापासून शुभेच्छा देतो व याच ठिकाणी थांबतो.

**सभापती** : आज माननीय विरोधी पक्षनेते सदनामध्ये नाहीत. त्यामुळे या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

----------

असुधारित प्रत

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सदनाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी निरोप समारंभाच्या कार्यक्रमासंबंधी अतिशय सर्वांगीण भाषण केले असून आम्हाला त्यात बोलण्यासाठी काही ठेवले नाही. सभापती महोदय, आज सदनामध्ये माननीय विरोधी पक्षनेते नसल्यामुळे मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय श्री.रामराजे निंबाळकर साहेब हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असल्याचे आज आम्हाला समजले. आपल्याला क्रिकेटपासून सर्व विषय माहीत आहेत. मी परवा सदनामध्ये मल्लखांबसंबंधी चर्चा करीत असताना आपण त्यावेळी मला पाठिंबा दिला होता. सभापती महोदय, मी सदनामध्ये अनेक सामाजिक विषय मांडले आहेत. त्यात सफाई कामगारांचे, अनुसूचित जातीचे प्रश्न असतील. आपण त्या संदर्भात चेअरवरुन अनेक वेळा निर्देश दिले आणि त्याबाबतीत अनेकवेळा आपल्या दालनात बैठका देखील घेतलेल्या आहेत. आपण भविष्यामध्ये सन २०२४ मध्ये खासदार व्हावे अशी त्यांनी इच्छा व्यक्त केली आहे. मी सदनाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना सांगू इच्छितो की, आपण पुन्हा सदनामध्ये कसे येऊ शकाल, याबाबत त्यांनी बघावे. आपण नेहमी समन्वयाची भूमिका घेत असतात. सदनामध्ये अनेकवेळा गोंधळ किंवा गडबड झाली तरी आपल्या कार्यकाळात सदनामध्ये कधीही कोणाचे निलंबन झाले नाही किंवा कोणाला निलंबित करावे लागले नाही. आपण अतिशय सामजंस्यपणे सदनाचे कामकाज हाताळले आहे. आपण पुन्हा येणारच आहात. मी आपल्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. तसेच आपल्याला उत्तम आरोग्य लाभो अशी परमेश्वराकडे प्रार्थना करतो.

सभापती महोदय, माननीय श्री.प्रवीण दरेकर सदनाचे विरोधी पक्षनेते झाले. त्यांच्या जिल्हा मध्यवर्ती बँकेची उलाढाल दीड हजार कोटी रुपयांपर्यंत होती. त्यांनी आपल्या काळात जिल्हा मध्यवर्ती बँकेची उलाढाल दहा हजार कोटी रुपयांपर्यत वाढविली. सहकार क्षेत्रातील एक धडपड करणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची गणना केली जाईल. विरोधी पक्षनेता झाल्यानंतर त्यांनी मोठा प्रवास केला. त्यात कोविड

श्री.भाई गिरकर ....

काळाचा समावेश आहे. तसेच कोठेही एखादी घटना घडल्यास तातडीने तेथे धावून जाणारा नेता अशी त्यांची ख्याती आहे. तसेच एखादी घटना घडल्यानंतर त्यासंबंधी वर्तमानपत्रे किंवा चॅनलवर प्रतिक्रिया देऊन संबंधित व्यक्तीला न्याय मिळवून देण्यासाठी ते सातत्याने धडपडत असतात. मी त्यांना देखील शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड हे देखील त्यांच्यासमवेत निवडून आले होते. त्यांनी या सदनामध्ये मुबई तसेच म्हाडाच्या प्रश्नांवर आवाज उठवला. तसेच ते म्हाडाचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांचा म्हाडासंबंधी चांगला अभ्यास आहे. ते उत्तम उद्योजक आहेत. त्यांनी जवळपास ८५ हजार लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिला. अशा प्रकारे ८५ हजार कुटुंबाचा उदरनिर्वाह हा त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या रोजगारामुळे सुरु आहे. मी या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांना देखील शुभेच्छा देतो. तसेच ते सदनामध्ये पुन्हा येतील अशी मला खात्री आहे.

सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे सर्वपक्षीय सदस्य आहेत. प्रत्येक विषयासंबंधी प्रश्न विचारण्याकरिता ते नेहमी हात वर करीत असतात. विशेषत: मराठा समाज तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी असलेली त्यांची धडपड आपण सर्वांनी पाहिली आहे. तसेच प्रवास करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.भाई गिरकर ....

जसे उपमुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांनी खूप प्रवास केला. ते मुंबईपासून सर्व प्रांतात प्रवास करतात. संघटना वाढीसाठी ते काम करीत असतात त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत हे शेतकरी नेते आहेत, ते मंत्री असताना अवकाळी पावसात पालघरला प्रवास केला, तेथे खाली बसून त्यांनी तेथील शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी केली. तेथील तलाठी व अधिकाऱ्यांना सूचित केले होते की, या शेतकऱ्यांना कशी मदत करता येईल. त्यांना मंत्री पदाचा कालावधी कमी मिळाला तरी त्यांनी ठसा उमटवला. ते देखील पुन्हा सभागृहात येतील अशा त्यांना मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुजितसिंह ठाकूर यांनी उस्मानाबाद जिल्हयातील परांडाचे नगराध्यक्षही होते. संघटनेचे भाजपा सरचिटणीस म्हणून महाराष्ट्रातील बुथ प्रमुखांची योजना, बुथपर्यंत कार्यकर्ते येण्याची योजना त्यांनी राबविली. दुर्दैवाने ते आजारी आहेत, मध्यंतरी त्यांचे एक ऑपरेशन झाले, त्यामुळे सभागृहात येत नाहीत. त्यांना चांगले आरोग्य लाभो अशा त्यांना शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.आर.एन.सिंग यांचे मध्यंतरी निधन झाले, ते मितभाषी होते, उत्तरभारतीयांमध्ये ठसा असणारा व मोठे काम असलेला कार्यकर्ता यांचे मागील महिन्यात निधन झाले. त्यांनाही भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड यांनी खाली विधान भवनच्या पायऱ्यांवर शिर्षासन केले. माझ्याही लक्षात आले की, असे शिर्षासन कोठेही करता येत नाही. पायऱ्यावर शिर्षासन करणे हा एक इतिहास विधान भवनात झालेला आहे. ते खेळाडू आहेत, सभागृहात मलखांब विषय आला. या खेळाला महाराष्ट्र शासनाने बळ द्यावे, नोकरीत प्राधान्य द्यावे या माझ्या विषयाला त्यांनाही लावून धरले. त्यांनीही मागणी केली की, तेथील व्यायामशाळांना सरकारने मदत

श्री.भाई गिरकर ....

करावी, असे ते अष्टपैलू व्यक्तीमत्व आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड यांनाही शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे ज्येष्ठ नेते आहेत, ते व मी महानगरपालिकेत एकाच विभागात नोकरीस होतो. ते कर्मठ शिवसैनिक आहेत, शिवसेनेला जरा कोणी काही बोलले तर अनेकांशी त्यांनी वैमनस्य घेतले आहे. मी सभागृहातही त्यांचा रुद्रावतार पाहिलेला आहे. विशेषत: मराठवाडा व विदर्भात शिवसेना वाढविण्याचा व रुजवण्याचा प्रयत्न त्यांनी केला, अनेकदा दिंडी काढली, पायी प्रवास केला, असे ते शिवसेनेचे कर्मठ नेते आहेत. मंत्री पदावर असताना कोणत्याही चिठ्ठीला ते लगेच उत्तर देत होते, असा मंत्री म्हणून त्यांचा गाजलेला कालखंड आहे, अशा कर्मठ शिवसैनिकाला मी शुभेच्छा देतो. शिवसेनेच्या नेत्यांना विनंती करतो की, पुन्हा त्यांना सभागृहात येण्याची संधी द्यावी, ते येतील अशी मला खात्री वाटते.

सभापती महोदय, मंत्री महोदय श्री.सुभाष देसाई हे जुने शिवसैनिक आहेत व माननीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे सहकारी आहेत, आता माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे यांचे सहकारी आहेत. यांनी शिवसेना वाढवली तसेच सामना दैनिक वाढवले. गोरेगावमध्ये प्रबोधन ही मोठी संस्था त्यांनी उभी केली, प्रबोधनचे अनेक खेळाडू मुंबई, महाराष्ट्र व देशात नाव गाजवत आहेत. मंत्री पदावर त्यांनी त्यांच्या कामाचा ठसा उमटवला आहे. उद्योग क्षेत्रात त्यांनी केलेले भरीव काम महाराष्ट्राच्या लक्षात राहील. मी त्यांना दिर्घायुष्याच्या व पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रवींद्र फाटक हे देवगडचे आहेत. कोणताही प्रश्न आला ते उभे राहतात व त्या प्रश्नाला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असतात. अनेक मंत्री महोदयांशी बोलून प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. कोकण, ठाणे, पालघरच्या विकासासाठी व शिवसेनेच्या ॲक्टीव्हीटीजमध्ये ते सतत कार्यरत असतात. संकल्प नावाची त्यांची संघटना आहे

असुधारित प्रत

श्री.भाई गिरकर ....

यामार्फत अनेक उपक्रम त्यांनी राबविले आहेत. त्यांनाही मी शुभेच्छा देतो व ते पुन्हा येतील अशी खात्री बाळगतो. या सर्व सदस्यांना उत्तम आरोग्य लाभो व पुढील काळ आनंदाचा व सुखाचा जावो अशी मी परमेश्वराकडे प्रार्थना करतो. धन्यवाद.

--------

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजात एवढे व्यस्त होतो की, ध्यानीमनी नव्हते की, आज निरोप समारंभ आहे. आदरणीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यावेळी सरकारला आग्रह करुन मला या सभागृहात प्रवेश मिळवून दिला, मला ही संधी दिल्याबद्दल मी त्यांना मन:पूर्वक, कृतज्ञतापूर्वक वंदन करतो. त्यांच्यानंतर माननीय श्री.उद्धव ठाकरे यांनी संधी दिली. मंत्री महोदय ॲड अनिल परब येथे उपस्थित आहेत. आम्ही रात्री दोन वाजेपर्यंत ती यादी बनवत बसायचो. आम्ही दोघे त्या यादीमध्ये होतोच. पण बाकीचे कोण घ्यायचे. त्यावेळी आम्ही सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांच्याही घरी गेलो होतो. आदरणीय श्री.उद्धव ठाकरे यांनी मला या सभागृहात पुन्हा येण्याची संधी दिली त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो, त्यांच्या नेतृत्वात मला येथे मला येथे काम करायला मिळाले याचाही शिवसैनिक म्हणून मला मनापासून आनंद होतो.

सभापती महोदय, या सभागृहाबाबत खूप आठवणी आहेत. येथे झालेले संघर्ष हे जनतेकरीता असतात, व्यक्तीगत नसतात, एकेरीवर संघर्ष असतात. एवढे सर्व मांडणे आज शक्य नाही. मर्यादीत वेळेत व्यक्त होणे फार महत्वाचे आहे. प्रत्येक मुख्यमंत्री महोदयांचे भाषण आम्ही अनुभवले. कधी कटूता न येणारे विलासराव देशमुख होते, कटूता येऊ न देण्याचे त्यांचे चातुर्य आम्ही पाहिले आहे. आंतरराष्ट्रीय किर्ती मिळविणारे मुख्यमंत्री म्हणून दोन मुख्यमंत्री महाराष्ट्रात अनुभवले व पाहिले आहेत. त्याबाबत नमूद करताना मला अभिमान वाटतो. महाराष्ट्राच्या सर्वोच्च विधिमंडळात काम करीत असताना हे अनुभवायला मिळणे महत्वाचे असते. आदरणीय शरद पवार मुख्यमंत्री असताना मी येथे नव्हते. लातूरला भूकंप झाला तेव्हा सकाळी ६.१५ वाजता मला माननीय शिवसेना प्रमुखांचा फोन आला. त्यावेळी दूरदर्शन नव्हते. त्यांनी मला सांगितले की, लातूरला भूकंप झालेला आहे व मोठया प्रमाणावर हानी झाली आहे. त्यावेळी मी मराठवाडयाचा प्रमुख होतो, ते म्हणाले की, ताबडतोब निघ. मी तीन वर्ष त्या भूकंपामध्ये काम करीत होतो. माननीय श्री. शरद पवार साहेब त्यावेळी मुख्यमंत्री होते. ते सोलापूरला येऊन थांबले होते. सर्व व्यवस्था होईपर्यंत ८-१० दिवस तेथून ते हलले नव्हते.

यानंतर श्रीमती नाफडे .....

श्री.दिवाकर रावते.......

ते त्यांचे काम मी पाहत होतो. या सभागृहात आल्यानंतर देखील मी त्यांचे काम अनुभवलेले आहे. भुकंपात केलेले आदरणीय श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या कामाची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली गेली. स्व.अटलबिहारी वाजपेयी ज्यावेळी पंतप्रधान झाले, त्यावेळी आदरणीय श्री.शरदचंद्रजी पवार यांना देशातील व्यवस्थापन करण्याची प्रमुख जबाबदारी दिली गेली. त्यावेळी गुजराथ येथे भूकंप झाला होता. हा महाराष्ट्राने मिळविलेला एक लौकिक आहे. अशा वेळी विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष हा विषय असतो. कर्तृत्त्वाला जो सन्मान असतो, तो मी अनुभवलेला आहे. भुकंपाचे जे संकट होते, त्याच्यापेक्षाही गंभीर संकट हे कोविड-१९ चे गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्रावर आलेले आहे. शिवसेना प्रमुख आदरणीय श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री म्हणून काम करत असताना महाराष्ट्राबद्दलची त्यांची तळमळ कोविड संकटामध्ये घराघरामध्ये पोहोचलेली आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक घर माझे आहे, प्रत्येक घरातील माणूस हा माझा आहे, प्रत्येक घरातील माणूस वाचला पाहिजे, जगाला पाहिजे. त्याला सर्व काही सोयी-सुविधा, उपचार-औषधी वगैरे मिळाले पाहिजे, या आपुलकीने त्यांनी कोविड काळात विलक्षण काम केलेले आहे. माझ्या महाराष्ट्रातील प्रत्येक कुटुंबात सर्व सोयी-सुविधा, उपचार-औषध, जागरुकता व इतर सर्व बाबी मिळाल्याच पाहिजेत, असा त्यांचा आग्रह कायम राहिलेला आहे. देशभरात महाराष्ट्र राज्यात कोविडचे संकट सर्वात जास्त होते. आपण तर अनेक मुख्यमंत्री पाहिलेले आहेत. एवढया मोठया संकटात मुख्यमंत्री पद प्रथमत: आयुष्यात आल्यानंतर प्रशासकीय यंत्रणेची जाण करुन घेत असताना देखील अशा प्रकारे कोविडच्या या महा संकटाला सामोरे जाण्याचे दुर्दैवी असे क्षण आमच्या शिवसेना प्रमुख आदरणीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नशिबी आले. परंतु त्यातही लढवय्या शिवसैनिक कसा असतो, हे त्यांनी त्यांच्या कृतीतून सिध्द केलेले आहे, याची नोंद देखील जागतिक स्तरावर घेतली गेलेली आहे. महाराष्ट्र राज्यात कोविडचे जे काम झालेले आहे, महाराष्ट्रात कोविडचे केले गेलेले काम जगात क्रमांक ०१ वर गणले जाते. याचा उल्लेख या सभागृहात कधी केला गेलेला नाही.

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते........

कोविड आल्यानंतर धारावीत काय होणार, ही एकमेव चर्चा सर्व वर्तमानपत्रातून केली जात होती. धारावीच्या शेजारी मातोश्रीमध्ये आदरणीय मुख्यमंत्री राहत होते. धारावीत माननीय मुख्यमंत्री यांनी कोविड संकटाच्या दृष्टीने बारीक व काटेकोर लक्ष घातले. "धारावी व्यवस्था" अशी एक निर्माण केली गेली की आज जगभरातील अनेक छोटया-छोटया देशांनी ही "धारावी व्यवस्था" स्वीकारुन कोविडचा सामना केलेला आहे. धारावी पॅटर्न म्हटले असते तर सर्वांच्या अधिक जलद लक्षात आले असते. महाराष्ट्राचा कोविड नावाच्या या संकटाचा सामना करण्याच्या पध्दतीचा लौकिक जागतिक स्तरावर गौरविला जात आहे. अशा प्रकारचा लौकिक निर्माण करणारा एक मुख्यमंत्री या देशाने व राज्याने पाहिलेला आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. भूकंपाच्या बाबतीत आदरणीय श्री.शरदचंद्रजी पवार आणि कोविडच्या बाबत आदरणीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन मुख्यमंत्री महोदयांच्या संकटकाळी केलेल्या कामाची मला माहिती आहे. अन्य अनेक मुख्यमंत्री महोदयांची कामे देखील मी पाहिलेली आहेत, परंतु सर्व काही बोलण्याकरिता आता वेळेची मर्यादा असल्यामुळे त्याचा उल्लेख करता येत नाही. परंतु उपरोल्लेखित या दोन मुख्यमंत्री महोदयांचे जागतिक दर्जाचे काम मी स्वत: अनुभवलेले आहे.

सभापती महोदय, संघर्ष तर या सभागृहामध्ये खूप केले आपण ! मला तर तीन वेळा निलंबित देखील केले गेलेले आहे. परंतु त्याबद्दल मी मी कधीही उलट प्रश्न विचारलेला नाही. सभापती महोदयांचे आदेश म्हणजे या विधिमंडळामध्ये अंतिम असतात. या विधीमंडळामध्ये विधानपरिषद सभागृह हे वरिष्ठ सभागृह आहे. सभापती हे विधिमंडळाचे वरिष्ठ आहेत. त्यानंतर अध्यक्ष आहेत. सभापतींचा आदेश हा अंतिम असतो, तो योग्य की अयोग्य याबाबतचा विचार सदस्यांनी कधीही मनात आणायचा नसतो.

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते........

सभापती महोदय, मला कसे निलंबित केले ? सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर आपल्याला धक्का बसेल ! आता येथे जे माननीय श्री.भुजबळ बसलेले आहेत, तेथे त्यावेळी माननीय श्री.अजित पवार बसले होते. त्यांच्या बाजूला दुसरे कोकणातील मंत्रीमहोदय बसलेले होते. त्यांचे आपसात काहीतरी बोलणे चालू असताना मी सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड आता जेथे बसलेले आहेत, तेथे त्यावेळी मी बसलो होतो. तेथून मी काहीतरी हातवारे करुन माझ्या पध्दतीने निषेध व्यक्त केला. हातवारे केले म्हणून मला त्यावेळी निलंबित केले गेले होते. अशा प्रकारे याबाबत लिहून....अं..... माझे निलंबन केले गेलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर आता जेथे बसलेले होते, तेथे मी एकदा बसलो होतो. त्यावेळी तेथे आमच्या जवळ स्व.नवलकर बसत होते. आम्ही त्यांच्या मागे बसत होतो. काहीतरी प्रसंग घडला आणि मी शेजारच्यांशी खाली बसून काहीतरी बोललो होतो. त्याच्यावरुन माझे पुन्हा एकदा निलंबन झाले होते. माझ्याकडे पत्र आले की, बसून मी अमुक बोललो म्हणून माझे निलंबन झाले. बसून बोलल्याची देखील हे लोक नोंद घेतात, हे मला पहिल्यांदाच कळले होते. मी खाली बसून अमुक अमुक बोललो म्हणून त्यावेळी माझे निलंबन केले गेले. परंतु मी कधीही याबाबत तक्रार केली नाही.

सभापती महोदय, २६/११ चे जे झाले ते प्रचंड मानसिक दडपण देणारे होते. प्रत्येकावर त्याचे प्रचंड मानसिक दडपण होते. आपण तर राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते आहोत, आपल्यावर तर ते दडपण होतेच. या सभागृहामध्ये कशी लोकांची बाजू मांडावी याबाबत त्यावेळी एक प्रकारची अहमहमिका होती. मी समोर बसलो होतो, त्यावेळी या बाजूला सन्माननीय श्री.अजित पवार होते. सन्माननीय श्री.जयंत पाटील हे आमचे गृहमंत्री होते. कारण आमच्या आबांना उगाचच त्यावेळी घरी जायला लागले होते. सभागृहाची बैठक संपली होती. सभागृह संपल्यानंतर आमची नेहमीसारखी बोलाचाली एकमेकांवर आक्रमक बोलणे वगैरे चालू होते. त्यावेळी सभागृहाची बैठक संपली होती. सभागृहाची बैठक संपल्यानंतर देखील मी अशा प्रकारे सभागृहामध्ये मंत्री महोदयांशी वागलो,

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते.....

याकरिता मला त्यावेळी निलंबित केले गेले होते. सभागृहाची बैठक संपल्यानंतर खरेतर काहीच नव्हते. न्यायालयाने बारा आमदारांच्या बाबत कसा निर्णय दिलेला आहे ? त्यावेळी जे अध्यक्ष बसले होते, ते कामचलाऊ अध्यक्ष होते. ते तालिकेवर होते. ते खाली उतरल्यावर साधे आमदार असतात, त्यांना बोलले तर अध्यक्षांना बोलण्यासारखे लागू केले गेले होते.... (अडथळा)...याबाबत सुप्रिम कोर्टाने देखील म्हटले होते. आहे का ते जजमेंट ! सभागृहाची बैठक संपल्यानंतर आमच्या कृतीवर आक्षेपाचा खरंतर काही अधिकार नसतो. मी हे मुद्दाम का निदर्शनास आणले कारण भविष्यात काम करताना याकडे लक्ष द्यावे. माननीय सभापतींचा निर्णय हा अंतिम असतो, तो निर्णय चांगला की वाईट, योग्य की अयोग्य, माझे काय आणि मला काय हा विषयच नसतो. माननीय सभापती हे विधिमंडळाचे सर्वोच्च पद आहे. हेच या सभागृहाचे सर्वोच्चपण आहे. मला या सभागृहामध्ये काम करत असताना संघर्ष करायला लागला. संघर्ष वगैरे सर्व काही चालूच असते. संघर्ष तर राजकीय व सामाजिक जिवंतपणाचे द्योतक आहे. संघर्ष झाला नाही तर समाज जीवनातील जिवंतपणा दिसून येत नाही. समाजाचा जिवंतपणा मांडण्याकरिता आपण येथे येतो. आपले स्वत:चे अस्तित्त्व दाखविण्याकरिता आपण येथे येत नाही. आम्ही कोण आहोत, हे सांगण्याकरिता आपण सर्व जण येथे येत नाही. समाजाचे जिवंतपण येथे मांडण्याकरिता ज्यावेळी आपण येथे येतो, त्यावेळी ते संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेपर्यंत पोहोचत असते. हे येथे जे बसलेले आहेत, ते लोकांपर्यंत हे सर्व पोहोचविणारे देवदूत, राजदूत असे जे काही आपण म्हणतो ना, त्याप्रमाणे हे जे येथे बसलेले आहेत, ते लोकदूत आहेत. यांनी मनात आणले तर तुम्हाला कुठल्याकुठे ते वरपर्यंत वगैरे नेऊन ठेवू शकतात. हे या सभागृहाचे सर्वात मोठे असे सामर्थ्य वर बसलेले आहे.

सभापती महोदय, मी या सभागृहामध्ये कृषी आणि शेतकरी क्षेत्रातील समस्यांबाबत देखील काम केलेले आहे. सभापती महोदय, मी मुंबईत मी महापौर पदापर्यंत देखील काम केलेले आहे. नंतर मात्र मला माननीय शिवसेना प्रमुखांनी ग्रामीण भागामध्ये काम करण्यासाठी पाठविले.

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते.....

कारण स्व. मनोहर जोशी आणि मी आम्ही सर्व एकाच मतदारसंघातील होतो. आम्ही दोघेही दादरचे होतो. येथे आम्हाला कधी ऊर्जितावस्थेचा असा काही प्रश्न नव्हता. शिवसेनाप्रमुखांचे द्रष्टेपण होते की, कार्यकर्ते मोठे झाले पाहिजेत. तो जो मी गेलो, त्यानंतर आजपर्यंत मुंबईमध्ये कसल्याच बाबतीत परत आलेलो नाही. बॅनरवर देखील मी मुंबईत परत आलेलो नाही.

सभापती महोदय, मी काल आमच्या सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे यांना सांगत होतो की, आयुष्याच्या पुढील कारकिर्दीत काम करत असताना लोकांचे आसू घेऊन इकडे या, आणि त्या आसुतून हासू कसे निर्माण करता येईल, याकरिता हे सभागृह वापरावे. आसुमधून हासू निर्माण करण्याचे सामर्थ्य या सभागृहामध्ये आहे. गमती-जमती, टिका-टिप्पणी फार वरच्या स्तरावर करावयाची असते. अरे-तुरे वर आले की या सभागृहाची गरिमा हा शब्द देखील मी मुद्दाम येथे वापरला नाही. गरिमा या शब्दाला देखील वेगळे महत्त्व आहे. अरे – तुरे वर आले की या सभागृहाची प्रतिष्ठा जी असते, ती धुळीला मिळते.

सभापती महोदय, शेतकरी व शेतकऱ्यांची व्यथा मांडत असताना अनेक बारीक सारीक गोष्टी माझ्या लक्षात आल्या. या क्षेत्रात काम करत असताना सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत, सन्माननीय श्री.राजूअण्णा शेट्टी, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे भेटत असत. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांचे इतर अनेक विषय असतील, परंतु आमची मात्र शेती या विषयावरच केवळ चर्चा होत होती. शेतकऱ्यांचे आसू मी पाहिलेले आहे. ताई, तुम्हाला आठवते का, तुम्ही त्यावेळी या सभागृहात होतात. मी एकदा एक वेगळाच झब्बा घालून सभागृहात आलो होतो. त्यावेळी दिवाळी संपली होती. माझी सर्व दिवाळी शेतकऱ्यांमध्ये जाते. मी रक्षाबंधनाला देखील कधीही मुंबईत नसतो, त्यावेळी आत्महत्त्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नी ज्या माझ्या भगिनी आहेत, त्यांच्यामध्ये मी असतो. अशा सणाच्या वेळी त्यांच्या मध्ये आपण उपस्थित असलो की, त्यांना त्याबद्दल आधार वाटतो.

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते.......

आत्महत्याग्रस्त कुटुंबातील माझ्या भगिनींकडून जाऊन राखी बांधली की, त्यांनाही आमचा आधार वाटतो. एकदा मी संपूर्ण दिवाळी पायी चालून, शेकडो माझ्या विधवा भगिनींशी बोलून, त्यांच्या व्यथा ऐकून त्यांच्याकडून राख्या बांधून घेऊन, तोच संबंधित झब्बा घालून सभागृहात आलो होतो. मी सभागृहात आल्यानंतर मला तत्कालीन सभापती स्व.देशमुख साहेब वगैरे म्हणाले होते की, हे काय ! त्यांनी मला त्याबद्दल विचारणा केली होती. अंगावरील झब्ब्यावर चित्रविचित्र राख्या घेऊन मी सभागृहात आलो होतो. मी तो झब्बा अद्यापपर्यंत जपून ठेवलेला आहे. माझा मृत्यू झाल्यानंतर तो झब्बा घालूनच मी जाणार आहे, याकरिता तो झब्बा मी जपून ठेवलेला आहे. तो झब्बा नसून त्या वेदना, व्यथा आहेत. त्या झब्ब्यावरील सर्व मला बांधलेल्या राख्या होत्या. ज्यावेळी सभापतींना उठून सांगितले की, हा झब्बा कसला आहे ? त्यावेळी सुन्न झालेले हे सभागृह आजही माझ्या डोळयासमोरुन जात नाही. सभागृहामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींच्या वेदना मला प्रत्येक चेहऱ्यावर दिसत होत्या. अगदी हेच मला त्या झब्ब्यातून सभागृहातील सर्व सदस्यांना सांगायचे होते. कारण या सभागृहातील प्रत्येक सदस्यांमध्ये मला या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींकरिता एक चांगले भविष्य निर्माण करु शकणारे कोणीतरी दिसत होते.

यानंतर श्री.सोनावणे.....

असुधारित प्रत

श्री. दिवाकर रावते.......

येथे पक्ष नसतो आणि इतर कोणीही नसतात. मानवता आणि मानुसकी कशी असते हे मला अनुभवता आले आहे.

सभापती महोदय, मी मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचा अध्यक्ष होतो. त्यावेळी राज्यात आमचे सरकार होते. त्यावेळी मोठ्या साहेबांची इच्छा होती की, मी मंत्री व्हावे. त्यावेळी मी एक सामान्य कार्यकर्ता होतो. शेवटच्या दोन वर्षात मला परिवहन विभागाचा मंत्री करण्यात आले. त्यावेळी मला आमदारकी किंवा विधिमंडळ काय असते ते देखील माहीत नव्हते. मी महानगरपालिकेच्या पलीकडे जाऊन कधीच काम केलेले नाही. त्यावेळी सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी मला मार्गदर्शन केले होते. त्यावेळी मी कोराकरकरीत होतो. त्यानंतर मला सहकार मंत्री पद दिले. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना माहीत असेल की, त्यावेळी मी अतिशय विनम्रपणे काम करीत होतो. काल म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावासंबंधी जरंडेश्वर कारखान्याचा विषय उपस्थित झाला होता. त्यावेळी मला जुन्या आठवणी जाग्या झाल्या होत्या. वसंतदादा पाटील हे माननीय शिवसेना प्रमुखांच्या अतिशय जवळचे मित्र होते. त्यावेळी कामानिमित्त माननीय उप सभापती माझ्याकडे येत होत्या. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, मी तुमच्याकडे येतो. त्या मला म्हणाल्या होत्या की, तुम्ही मंत्री आहात. मला प्रथा आणि परंपरा माहीत नव्हत्या. तेव्हा पासून मी ऐकत आहे. कारण मी या सदनाचा काल परवा मंत्री आणि सदस्य होतो. माननीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे आणि माननीय श्री. उद्धव बाळासाहेब ठाकेर यांच्या सहकाराने आणि आशीर्वादाने मी अनुभवले आहे. त्यानंतर जेवढी जमेल तेवढी जनसेवा केलेली आहे आणि करीत राहीन. विधिमंडळात सर्वात जास्त वेळ मी घालविलेला आहे. मी पथ्य पाळले. भ्रष्टाचार हा विषय मी कधीही घेतला नाही. ते योग्य आहे की अयोग्य आहे याबद्दल माझे कोणतेही मत नाही. चुकीचे आहे की बरोबर नाही याबद्दल माझे कोणतेही मत नाही. ते मांडावे की मांडू नये याबद्दल माझे कोणतेही मत नाही. जनतेचे प्रश्न या सदनात उपस्थित करुन

श्री. दिवाकर रावते.......

ते सोडविण्यासाठी मी अव्याहतपणे कामे केलेली आहेत. मी माझ्या आयुष्यात व्यक्तीगत टीका कधीही कोणावर केलेली नाही. प्रश्नांवर मी टीका केलेली आहे. मी राजकीय पक्षांवर क्वचित प्रसंगी टीका केलेली असली तर. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपापल्या परीने कामे करीत असतात. आपण काम करीत असताना मी काय करतो याला महत्व आहे. मी म्हणजे आपला पक्ष तु किती वाईट आहे हे सांगण्यापेक्षा आम्ही तुमच्यासाठी किती योग्य आहे या पध्दतीने मी आजपर्यंत कामे केलेली आहेत. मी कधीही कोणत्याही गोष्टीसाठी नकारात्मकता केलेली नाही. टीका आणि टिप्पणी किंवा द्वेष याच्या पलीकडे जाऊन आपण काहीच करु शकत नाही. अनुभव घेत असताना क्वचित प्रसंगी कडवट अनुभव येतात. मी माझ्या नेतृत्वाशी आणि पक्षाशी प्रामाणिक रहावे आणि ती मरेपर्यंत तशी इच्छा ठेवावी, मला काय मिळते यापेक्षा मी दुसऱ्याला काय देऊ शकतो यासाठी आपल्याला नेतृत्वाने घडविलेले आहे. माननीय श्री. उद्धव बाळासाहेब ठाकेर यांनी अतिशय तळमळीने बोललेल्या एका वाक्याकडे मी सार्वभौम सभागृहाचे लक्ष वेधणार आहे. माननीय शिवसेना प्रमुख यांचा दिनांक २३ जानेवारी, २०२२ रोजी वाढदिवस होता. आपल्याला घडविण्यासाठी त्यांनी किती श्रम घेतलेले असतात याची आपल्याला कल्पना नसते. मला काय देता, माझे काय ? नाही ना तर मग मी चाललो. आज कोण कोणाचे नाही अशी म्हणण्याची वेळ आलेली आहे. ती राजकारणात आणि सदनातील सन्माननीय सदस्यांसाठी महत्वाची आहे. ती प्रामाणिकपणे समर्पित केली तर आपल्या नेतृत्वाला आणि पक्षाला तर त्यांच्यासाठी अखंड मरेपर्यंत जीवनामध्ये तुम्हाला सत्व देणारी आहे. ती जपली पाहिजे. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री माननीय श्री. उद्धव बाळासाहेब ठाकेर आमच्याशी संवाद करताना असे म्हणाले होते की, आईचे दूध विकणारी औलाद निर्माण करणारी नको आहे मला. जायचे असेल त्यांनी खुशालपणे जावे

असुधारित प्रत

आणि जे माझ्यासमवेत असतील अशा निष्ठावंतासोबत मी पुन्हा एकदा या महाराष्ट्रात तीच झुंज देऊन भगवाचा तेजा फडकवून दाखविन. दुखावलो जातो. पण नेतृत्वाचा

असुधारित प्रत

श्री. दिवाकर रावते.......

अवमान होता कामा नये. एवढे मी राजकारणात शिकलेलो आहे आणि ते येथे राहून मी प्रामाणिकपणे पाहिलेले आहे. माननीय श्री. अजित पवार हे रोखठोक बोलण्यासाठी प्रसिध्द असल्यामुळे ते माझ्यासाठी एक आदर्श आहेत. त्यांनी कधीही लपवालपवी केलेली नाही. प्रामाणिकपणेला फार मोल आणि किंमत असते. आपल्याला दिलेल्या संधीचा फायदा आपण जनसेवा करण्यासाठी केला पाहिजे. १२ कोटी जनतेपैकी विधानसभेत २८९ आणि विधानपरिषदेत ७८ एवढेच आमदार होत असतात. आमदार होण्याचे भाग्य आपल्या नशीबी आले. आपल्याला आई-वडिलांनी जन्म दिलेला आहे. समाजातील सन्मान आपल्याला नेतृत्वाने आणि पक्षाने मिळवून दिलेला आहे. त्यामुळे आपण आपल्या पक्षाशी आणि नेतृत्वाशी प्रामाणिक राहिले पाहिजे. या सदनाच्या माध्यमातून जनतेला भरभरुन जे देता येईल त्यासाठी आपण कटिबध्द असले पाहिजे. मरताना मात्र अंतिम क्षणामध्ये त्या आठवणीतून मी सुखाने जाईन. होय छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रातील मी एक मर्द मराठा म्हणूनच मी आता चाललो आहे. छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात प्रामाणिकपणा टिकलाच पाहिजे. आपण महाराष्ट्रातील आहोत. मी जयंतराव टिळकांपासून अनेक मान्यवरांना जवळून काम करताना पाहिलेले आहे.

माननीय सभापती महोदयांचा अनुभव वेगळ्याच पध्दतीचा आहे. आपण राजे आहेत. आपले नाव माननीय श्री. रामराजे नाईक-निंबाळकर असे आहे. आपण सर्वांना चांगली वागणूक दिलेली आहे. आपण सर्वांप्रती आदर व्यक्त केल्यामुळे मी आपल्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी देखील मला खूप आधार दिल्यामुळे मी सर्वांचा कृतज्ञ आहे. प्रत्येकाला अशी संधी मिळत नाही. देश, समाज आणि राज्य घडविण्यासाठी सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत. माननीय श्री. अजित पवार यांनी त्यांच्या भाषणातून शुभेच्छा दिलेल्या असल्यामुळे मी त्यांचा मनापासून आभारी आहे. महाराष्ट्राचा शौयदीन हा केवळ तानाजी मालुसरे

असुधारित प्रत

श्री. दिवाकर रावते.......

आणि बाजीप्रभू देशपांडे यांच्यापर्यंत सीमित आहे. इतरांसाठी नाही. सन्मानदीन असू शकतो. शौर्यदीन हा फक्त तानाजी मालुसरे आणि बाजीप्रभू देशपांडे या दोघांच्या विरत्वातरचा असू शकतो. इतर शौर्यदीन असू शकत नाही. सन्मानदीन असू शकतो. कोंढाणा किल्ला तानाजी मालुसरे यांनी जिंकलेला आहे. शेलार मामा यांच्या अनुभवामुळे कोंढाणा किल्ला जिंकता आला. तानाजी मालुसरे यांचे शौर्य आणि शेलार मामा यांच्या अनुभवासारखे सभागृहात त्यांच्यासारखे कर्तुत्व आणि भविष्य निर्माण करु शकलो तर हे सर्वोच्च सभागृह म्हणून त्याची नोंद होईल. शौर्याची गरज ही युध्द जिंकण्यापर्यंत जाते आणि शेलार मामा नसतील तर युध्द जिंकता येत नाही आणि आपल्याला हे कधीही विसरता कामा नये. म्हणून हे सर्वोच्च सभागृह आहे. हे शेलार मामांचे सभागृह आहे. या ठिकाणी तानाजी देखील असला पाहिजे. शौय आणि अनुभव यांच्या माध्यमतातून आपल्याला पुढे जाता आले तर खूप चांगले होईल. माननीय श्री. अजित पवार यांनी सर्व सन्माननीय सदस्यांची नावे घेतलेली आहेत. माझे आदरणीय आणि मला ज्येष्ठ असणारे माननीय श्री. सुभाष देसाई हे मंत्री आहेत. त्यांच्यामुळे मला आज सभागृहात बोलण्याची संधी मिळालेली आहे. त्याबद्दल मला मनापासून बरे वाटत आहे. त्यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन केलेले आहे. ते मीत भाषी असून विभाग कसा सांभाळावयाचा हे त्यांनी दाखवून दिलेले आहे. आपल्याला निर्णय कळतात. मी पूर्वीपासून त्यांना ओळखत आहे. मला त्यांच्या उपस्थित मन मोकळे करता आले त्याबद्दल मी मनापासून त्यांना धन्यवाद देतो.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, सभागृह हे आपल्या जीवनात आलेला एक भाग आहे. किंबहुना सभागृह हे एक निमित्त आहे. आपण सामाजिक क्षेत्रात शेवटपर्यंत काम करीत राहतो. ते काम कधीही संपत नाही.

सभापती महोदय, माननीय उप सभापती, डॉ.नीलमताई गोऱ्हे यांना सुद्धा मी मनापासून धन्यवाद देतो. माननीय डॉ.नीलमताई गोऱ्हे या उप सभापती झाल्यामुळे आम्हाला फार बरे वाटले. मी त्यांना मुद्दाम कोणत्या नावाने हाक मारतो हे त्यांना माहीत आहे. उप सभापती पदावर एक हक्काची, आपल्या घरची व्यक्ती बसली होती. परंतु या सभागृहात एकच उणीव आहे की, या सभागृहात महिला सदस्यांची संख्या खूप कमी आहे. पूर्वी या सभागृहात महिला सदस्या जास्त होत्या. ती व्यथा मांडण्यासाठी देखील फार मोल लागते. मी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलांचे अश्रू बघितले आहेत.

सभापती महोदय, मी सर्वांना कृतज्ञतापूर्वक मन:पूर्वक वंदन करतो. मी कधीच कोणाला व्यक्तिगत बोलत नाही, परंतु एखाद्या मुद्यावर नक्की रागावतो. परंतु जर अनवधानाने कोणाला रागाने बोललो असेल आणि त्यामुळे कोणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर मी मन:पूर्वक क्षमा मागतो. आपण मला आतापर्यंत जे सहकार्य दिले, जी साथ दिली त्याबद्दल पुनश्च एकदा सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

सभापती महोदय, मला आपल्या स्थानावरुन केवळ सहकार्यच नव्हे तर शुभेच्छा आणि आशीर्वाद देखील मिळाले. कारण सभापती महोदयांचे आशीर्वाद व शुभेच्छा असल्याशिवाय आपल्याला काहीच करता येत नाही. त्याबद्दल आपले मनापासून धन्यवाद व्यक्त करतो व माझे मनोगत आटोपते घेतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र. वंदे मातरम्.

-----------

असुधारित प्रत

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, निरोप समारंभाचे गांभीर्य टिकविण्यासाठी सरसकट सर्वच सन्माननीय सदस्यांनी बोलण्याऐवजी ज्या सन्माननीय सदस्यांना निरोप देणार आहोत त्यांनीच आपल्या भावना व्यक्त केल्या तर बरे होईल, असे मला वाटते. हे माझे आदेश वा निदेश नाहीत. कृपया सर्वांनी मला सहकार्य करावे.

आता सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांनी आपल्या भावना व्यक्त कराव्यात.

असुधारित प्रत

श्री.सुरेश धस (उस्मानाबाद-बीड-लातूर स्था.प्रा.संस्था) : सभापती महोदय, या सभागृहाचे एकूण १० सन्माननीय सदस्य निवृत्त होणार असून त्यांना सभागृहाच्या माध्यमातून निरोप देण्यात येत आहे.

माननीय सभागृह नेते तथा माननीय उप मुख्यमंत्री यांनी निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या बाबतीत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सुद्धा आज निरोप देण्यात येत असून, त्यांनी सुद्धा आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

सभापती महोदय, आपण सुद्धा निवृत्त होणार आहात. परंतु मी आपल्यावर फार काही बोलणार नाही. कारण आपण या ठिकाणी कायम सभापती पदी राहणार आहात. मी माननीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर यांना सभापती म्हणून नव्हे तर पूर्वीपासून ओळखतो. १९९५ साली माननीय श्री.मनोहर जोशी साहेब राज्याचे मुख्यमंत्री आणि माननीय गोपीनाथ मुंडे साहेब उप मुख्यमंत्री असताना, कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या उपाध्यक्ष पदाची जबाबदारी माननीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर साहेबांकडे देण्यात आली होती. त्यावेळी या राज्यात ४५ आमदार अपक्ष म्हणून निवडून आले होते. त्या अपक्ष आमदारांचे नेतृत्व आदरणीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर साहेब करायचे. त्या कालावधीत आमच्या मतदारसंघाचे आमदार साहेबराव दरेकर होते. त्यावेळी आमच्या मतदारसंघात आष्टी व पाटोदा हे दोनच तालुके होते. माननीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर साहेबांनी आमच्या मतदारसंघात साठवण बंधाऱ्यांची श्रृंखला केली. त्यांनी या माध्यमातून त्या भागात फार मोठे काम केले. त्यांचा कृष्णा खोऱ्याच्या बाबतीत अतिशय चांगला अभ्यास राहिलेला आहे. त्यानंतर माननीय श्री.अजितदादा पवार यांनी सुद्धा या खोऱ्याची जबाबदारी स्वीकारली आणि त्यांनी सुद्धा जलसंपदा मंत्री या नात्याने खूप मोठे काम केल्याचे आम्ही बघितलेले आहे. माननीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर साहेबांना पुन्हा या सभागृहात येण्याबद्दल मी शुभेच्छा देतो.

असुधारित प्रत

श्री.सुरेश धस....

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर साहेब हे सुद्धा निवृत्त होणार आहेत. माननीय श्री.प्रवीण दरेकर साहेबांनी १२०० कोटी रुपये भाग भांडवल असलेली मुंबै बँक १० हजार कोटी रुपयांपर्यंत नेली. त्यांचे काम अतिशय चांगले आहे. माननीय श्री.प्रवीण दरेकर साहेबांना सुद्धा या सभागृहात पुन्हा येण्याबद्दल मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई हे सुद्धा निवृत्त होणार आहेत. माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई यांनी माननीय बाळासाहेब ठाकरे साहेब यांच्यासोबत काम केलेले आहे आणि आता माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धवजी ठाकरे साहेब यांच्यासोबत काम करीत आहेत. मागच्या कालावधीत सुद्धा आम्ही त्यांना राज्याचे उद्योग मंत्री म्हणून पाहिले असून आजही पाहत आहोत. त्यांचे काम अतिशय चांगले आहे. माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई यांना सुद्धा या सभागृहात पुन्हा येण्याबद्दल मी शुभेच्छा देतो.

सभाापती महोदय, माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांना शुभेच्छा देत असताना सांगू इच्छितो की, ते आमच्याशी एक प्रकारे अधिकाराने किंवा रागाने बोलत असत. ते बोलल्यानंतर त्यास कोणीही नकार दिलेला नाही किंवा त्यांच्या शब्दाच्या पुढे गेलेले नाही. मराठवाड्यातील परभणी आणि संपूर्ण मराठवाड्यात त्यांनी केलेल्या कामामुळे शिवसेना त्या ठिकाणी रुजली. याचे श्रेय निश्चितपणे त्यांना द्यावे लागेल. जेम्स लेन प्रकरणानंतर परभणी लोकसभेची जागा शिवसेना हरेल अशी परिस्थिती होती. स्व.आर.आर.पाटील साहेबांनी लोकसभा निवडणुकीच्या वेळी जेम्स लेनचा मुद्दा फार प्रभावीपणे मांडण्याचे काम केले होते. परंतु तरी सुद्धा परभणीच्या जागेवर शिवसेना पक्षाने विजय मिळविला. माननीय श्री.दिवाकर रावते यांचे काम संपूर्ण मराठवाड्यात उल्लेखनीय असेच आहे. आपला पक्ष जीवंत कसा ठेवायचा आणि त्यातल्या त्यात विरोधी पक्षात असताना कसा जीवंत ठेवायचा हे त्यांच्याकडून शिकणे महत्त्वाचे आहे. सत्ताधारी पक्षात असताना पक्ष जीवंत ठेवणे सोपे जाते. परंतु विरोधी पक्षात असताना आणि ज्याला काही मिळेल अशी अपेक्षा

असुधारित प्रत

श्री.सुरेश धस....

नसताना सुद्धा पक्षात माणसे उभी करुन त्यांना ताकद देण्याचे काम माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांनी निश्चितपणे मराठवाड्यात केलेले आहे. माननीय श्री.दिवाकर रावते यांना सुद्धा या सभागृहात पुन्हा येण्याबद्दल मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, माननीय श्री.विनायक मेटे हे सुद्धा निवृत्त होणार आहेत. मला वाटते माननीय श्री.विनायक मेटे हे या सभागृहातील सर्वात जेष्ठ सदस्य झालेले आहेत. कदाचित माननीय श्री.दिवाकर रावते साहेबानंतर ज्येष्ठ म्हणून त्यांचाच नंबर असेल. माननीय श्री.विनायक मेटे साहेब हे शिवसेना पक्षाकडून असोत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून असोत. भारतीय जनता पक्षाकडून असोत, पण त्यांचे एक वैशिष्ट्य आहे की, ते ज्या पक्षासोबत असतात त्या पक्षाच्या नेत्यांच्या अगदी जवळचे असतात. जेव्हा ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात होते तेव्हा ते माननीय श्री.अजितदादा पवार यांच्या अगदी जवळचे होते, आर.आर.पाटील यांच्याही अगदी जवळचे होते. माननीय आर.आर.पाटील यांचे पद गेल्यानंतर सुद्धा माननीय श्री.विनायक मेटे त्यांच्या सोबत होते. माननीय गोपीनाथ मुंडे यांच्या सोबत सुद्धा त्यांनी अतिशय चांगले काम केल्याचे आम्ही पाहिले आहे. ते १०० टक्के पुन्हा या सभागृहात येणार आहेत याबद्दल माझ्या मनात काही शंका नाही. केवळ मराठा समाजाच्या आरक्षणाबद्दलच नव्हे तर ते त्यांच्या एकूण संघटनेत अतिशय प्रामाणिकपणे काम करणारे आहेत. एखाद्या विधानसभा मतदारसंघात त्यांची निवडून येण्यासारखी परिस्थिती असताना सुद्धा पक्षाने त्यांना माघार घेण्यास सांगताच ते माघार घेऊन, त्या ठिकाणी ज्यांना संधी दिलेली असेल त्यांच्या बाजूने काम केल्याचे मी अनेक वेळा बीडमध्ये बघितलेले आहे. माननीय श्री.विनायक मेटे साहेबांचे भविष्यात अधिक चांगले होवो अशी शुभेच्छा मी त्यांना देतो.

श्री.सुरेश धस....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड हे सुद्धा निवृत्त होणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांच्या बाबतीत भावना व्यक्त करताना माननीय श्री.अजितदादा पवार यांनी त्यांच्याबद्दल 'प्रसाद' आणि 'लाड' असा उल्लेख केला. माननीय श्री.अजितदादा पवार यांनी सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांना आशीर्वाद दिला, परंतु त्यांना परत या सभागृहात येण्याबद्दल शुभेच्छा दिल्या नाहीत. कदाचित ते गडबडीत विसरले असतील, असे मला वाटते.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. सुरेश धस ....

**ते येतील अशी अपेक्षा आहे. कारण ते पक्षामध्ये अतिशय मन लावून काम करतात. सर्वांना मदत करण्याची त्यांची मानसिकता आहे. ती खूप चांगली आहे. सहकाऱ्यांना काही अडचण आली तर मदत करण्याची सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड यांची अतिशय चांगली भूमिका असते. त्यामुळे त्यांनीही परत यावे अशा मी शुभेच्छा देतो.**

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत यांना मी माढामध्ये लढलेले पाहिले आहे. ते शेतकऱ्यांच्या बाबतीत खूप आग्रही असतात. ते लोकसभा लढले होते. कमी मताने काही गोष्टी झाल्या. त्यावेळी असे वाटत नव्हते की, एवढे मते घेतील. कोणत्याही प्रश्नांच्या बाबतीत विशेषत: शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या बाबतीत अगदी कालपरवापर्यंतचा एफआरपीचा विषय असेल त्यांनी म्हणणे मांडले. लॉबीमध्ये बसल्यानंतरही अतिशय चांगले मार्गदर्शन करतात किंवा काही गोष्टी निश्चितपणे ते सांगतात. मी त्यांनाही येथे येण्याच्या शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुजितसिंह ठाकूर हे पुढील सदस्य आहेत. मी येथे आलो आहे, त्यामध्ये त्यांचा अतिशय महत्त्वाचा वाटा आहे. माझ्या निवडणुकीमध्ये त्यांची खूप मोठी मदत झाली आहे. अतिशय कमी कालावधी मिळाला. परंतु पक्षाचे काम काय असावे हे त्यांना माहीत आहे. अडवाणी साहेबांची रथयात्रा असो, कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन सन्माननीय सदस्य श्री. सुजितसिंह ठाकूर यांच्याकडे असायचे. मुंडे साहेबांची संघर्ष यात्रा असो, गोदा परिक्रमा असो, संघर्ष दुसरी यात्रा असो सारथ्य करण्याची जबाबदारी सन्माननीय सदस्य श्री. सुजितसिंह ठाकूर यांनी घेतली होती. मागच्या काळात माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेच्या अगोदर महाजनादेश यात्रा काढली, त्याचे देखील पूर्ण नियोजन त्यांनी केले. नियोजन म्हणजे अगदी पुढे जाऊन सतरंजी कुठे असली पाहिजे, खुर्च्या कुठे ठेवल्या पाहिजेत, हार कोणी घालायचा हे पाहिले. पक्षामध्ये या कामांकडे कोणी पाहत नाही. स्टेजवर बसण्यासाठी बरीच मंडळी असतात. स्टेजवर महत्त्वाची मंडळी बसतात. सन्माननीय सदस्य श्री. सुजितसिंह ठाकूर साहेबांना स्टेजवर फार कधी

असुधारित प्रत

श्री. सुरेश धस ....

बसलले मी पाहिलेले नाही. दुर्दैवाने मागच्या कोरोना काळात त्यांना, त्यांच्या वडिलांना खूप त्रास झाला. एवढे दोन वेळा दुखणे होऊन सुध्दा ते चांगले आहेत. जीवावर बेतलेले होते, ते त्यातून १०० टक्के चांगले बरे झाले आहेत. काही दिवसांमध्ये ते अजून चांगले व्हावेत आणि पुन्हा येथे यावेत अशी अपेक्षा आहे. खूप वर्षांपासून अगदी आमच्या लहानपणापासून त्यांना पक्षाच्या कामामध्ये पाहिले आहे. आज त्यांना निरोप देण्याची वेळ आली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र फाटक हे आमचे लॉबीतील मित्र आहेत. महाराष्ट्रातील प्राधिकारी मतदारसंघांत सर्वाधिक जास्त मते असलेला तो मतदारसंघ आहे आणि त्यानंतर उस्मानाबाद-बीड-लातूर मतदारसंघ आहे. आता वाटते की, त्यांचा मतदारसंघ दीड हजार मतांचा होऊन जाईल. दीड हजारांच्याही पुढे जातो की काय माहीत नाही. मतदारसंघांमध्ये सर्वात अवघड कोणता मतदारसंघ असेल तर तो प्राधिकारी मतदारसंघ आहे. त्या मतदारसंघातून निवडणूक लढविण्याचे आमच्यासारख्या माणसाचे काम नाही. एक वेळा निवडणूक लढविली आहे. आयुष्यात पुन्हा त्या जागेवर निवडणूक लढवायची नाही असे मी तरी ठरवले आहे. त्यांनी त्याबाबत ठरविण्याची आता तशी अडचण नाही. तीन पक्ष एकत्र असल्यामुळे त्यांचे काम सोपे होणार आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना, कॉंग्रेस असे ३ पक्ष एकत्र असल्यामुळे हे ठीक आहे. त्यांचा स्वभाव चांगला आहे. कायमस्वरुपी, अतिशय चांगले मित्र म्हणून आम्ही काम केले आहे. त्यांनी परत यावे अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दौंड हे पुढील सदस्य आहेत. सन १९९७ पासून जिल्हा परिषदेचे सहकारी राहिलो आहोत. कदाचित मला ते ५ वर्षे म्हणजे एक टर्म सिनिअर आहेत. माझ्या अगोदरचे आहेत. सन १९९२ मध्ये जिल्हा परिषदेमध्ये ते होते. त्यांचे वडील आदरणीय पंडितराव दौंड यांनी राज्याचे राज्यमंत्री

असुधारित प्रत

म्हणून काम केले आहे. सन १९८५ मध्ये मुंडे साहेबांना पराभूत करुन ते येथे निवडून आले होते. मुंडे साहेबांचा रेणापूर मतदारसंघ होता. पुढे मुंडे साहेब कंटिन्यू झाले.

श्री. सुरेश धस ....

जिल्हा परिषदेमध्ये आम्ही एकत्र काम केले. चांगले, अभ्यासू सदस्य म्हणून जिल्हा परिषदेमध्ये ते काम करीत होते, त्यांचे तेथे कंटिन्यू राहते. मागच्या वेळी त्यांच्या सौभाग्यवती जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा होत्या. त्यांचा निर्णय करण्याची जबाबदारी सुध्दा माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी माझ्यावर दिली होती. अतिशय कटू निर्णय असतानाही राष्ट्रवादी आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांना एकत्र करण्याचे काम होते. श्रीमती रजनीताई खासदार आहेत. त्या काँग्रेस पक्षाच्या वतीने आणि मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने होतो. काँग्रेस पक्षाचे ते एकमेव सदस्य होते. ते जोपर्यंत काँग्रेस पक्षात होते, त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे काँग्रेस पक्षाचे काम केले. मागच्या निवडणुकीमध्ये ते राष्ट्रवादीमध्ये गेले. अल्पशी का होईना, त्यांना संधी मिळाली आहे. मी त्यांच्या पुढील भवितव्यासाठी शुभेच्छा देतो. त्यांना चांगल्या पध्दतीने आणखी संधी मिळत राहो अशी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, मी सर्वच १० सन्माननीय सदस्यांना पुन्हा एकदा शुभेच्छा देतो. निश्चितपणे यातील बहुतेक जण परत येणारेच आहेत. त्यामुळे अधिकच्या शुभेच्छा न देता त्यांच्या भावी आयुष्याला चांगल्या शुभेच्छा देऊन थांबतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

----

असुधारित प्रत

श्री. विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज आपण जवळपास १० सन्माननीय सदस्यांना निरोप देत आहोत. ११ वे सदस्य दुर्दैवाने आपल्यातून गेले आहेत. अनेक मंडळी निरोप समारंभामध्ये बोलत नाहीत किंवा उपस्थित देखील राहत नाहीत. मी देखील यावेळी पहिल्यांदाच बोलत आहे, या अगोदर निरोप समारंभामध्ये बोललो नाही.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे...

गेल्या २५ ते २६ वर्षापासून या सभागृहात काम करीत असताना सभागृहाच्या माध्यमातून अनेक थोर व्यक्तींचे विचार व मार्गदर्शन मला लाभले आहे. खेडेगावातून येथपर्यंतचा प्रवास करीत असताना अनेकांचे मार्गदर्शन लाभले तसे या प्रवासात अनेकांनी मदत देखील केली. खरे तर माझा राजकीय पिंड नाही माझा पिंड सामाजिक व संघटात्मक आहे. मराठा महासंघात काम करीत असताना वेगवेगळ्या पध्दतीने ग्रामीण भागात अन्याय व अत्याचार होत असताना ते उघड्या डोळ्यांनी पहावे लागत होते. तेव्हा आम्ही कोणत्याही लोकप्रतिनिधीकडे गेलो तर आम्हाला फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे आमच्या संघटनेने असे ठरविले की, आपले प्रश्न मांडण्याकरिता व अन्यायाला वाचा फोडण्याकरिता आपले सदस्य त्या त्या सभागृहात असणे आवश्यक आहे. तो विचार घेऊन राजकीय प्रवास करण्यात सुरुवात झाली तो प्रवास आजतागायत तसाच सुरु आहे. या प्रवासात आपले विचार मांडत असताना अनेक वेळा अनेक ठिकाणावरुन हेटाळणी ऐकावी लागली. हेटाळणीपेक्षा या राज्यातील गोरगरिबांच्या मुलामुलींना न्याय देणे मला जास्त महत्वाचे वाटते. देश व राज्य असेल देश व राज्य म्हणजे काय तर दगड धोंडे,इमारती व समुद्र म्हणजे देश नाही त्यामध्ये असणारी माणसे, लोकसमूह याला देश व राज्य म्हणतात. त्यांच्या सुखदु:खाचा विचार करताना त्यांच्यावर होणारे अन्याय व अत्याचार यांचा विचार सभागृहात मांडणे हे आपले कर्तव्य आहे व त्याला वाचा फोडून न्याय कसा मिळेल हे करण्यासाठी येथे आलो व ते काम प्रामाणिकपणे केले पाहिजे त्यासाठी येथे सातत्याने आवाज उठविण्याचे काम केले. मी मराठा महासंघात काम करीत होतो. तेव्हा मराठा आरक्षणाचा विषय सर्वांच्या तोंडी आला होता व इतर आरक्षणाचा विषय समोर आलेला आहे. आम्ही मराठा आरक्षणाचा विषय मांडत होतो तेव्हा अनेक राजकीय मंडळी आम्हाला भेटत नव्हती. आमची हेटाळणी करीत होती आम्हाला वेळ देत नव्हती. त्याचे कारण आम्ही त्यांच्या जवळ बसलो तर त्यांना जातीवादी म्हणतील. स्व.अण्णासाहेब पाटील त्यांची आज पुण्यतिथी आहे त्यांच्या विचाराने प्रभावीत होऊन आम्ही काम करायला लागलो. त्यांचा विचार असा होता की, जो आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना आरक्षण मिळावे. हा विचार शिवसेना पक्षाचा देखील

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे....

होता. याबाबत अनेक वर्षे काम केल्यानंतर असे करुन काहीही उपयोग होत नाही. म्हणून ज्यांना आरक्षण मिळते त्यांना मिळाले पाहिजे. ज्यांना आरक्षण मिळत नाही त्यांच्यात सामाजिक व शैक्षणिकदृष्टया जे सर्व बाजुंनी गरीब असतील त्यांच्या मुलामुलींना आरक्षण मिळाले पाहिजे. आज जी ओबीसी मंडळी आहेत. ते सर्व लोक अण्णासाहेबांच्या मोर्च्यात आमच्या बरोबर होते. मंडल आयोगानंतर ओबीसी व इतर समाज वेगळा झाला. तोपर्यंत सर्व लोक एकत्रित काम करीत होते व लढा देऊन आपल्या मुलामुलींना शिक्षण मिळायला पाहिजे. अशा प्रकारे राजकीय प्रवास सुरु झाला व त्यामध्ये राजकारण करण्याचा निर्णय घेतला ती बाब आज सांगणे योग्य आहे की, नाही याची मला माहिती नाही. राजकारण करण्याचा निर्णय झाला तेव्हा काँग्रेस पक्षाकडे ओढा होता. काँग्रेसचे लोक आम्हाला भेटही देत नव्हते. तेव्हा काँग्रेस एकत्रित होती. ही गोष्ट नाईलाजास्तव स्व.गोपीनाथ मुंडे यांना कळली. त्यांनी असे सांगितले की, तुम्ही व आपण एकत्र होऊ. ते आम्हाला घेऊन स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे गेले. स्व.बाळासाहेब म्हणाले की, तुम्ही भगव्याचे पुजारी आहात व आम्ही देखील भगव्याचे पुजारी आहोत, आपण व्यापारी थोडे आहोत. आपण महाराष्ट्रासाठी एकत्र काम करु या. त्यावेळी शिवसेना व भारतीय जनता पक्षाबरोबर १९९५ मध्ये मराठा महासंघाने युती केली व निवडणूक लढविली. ही निवडणूक लढवित असताना शिवसेनेच्या वतीने माननीय श्री.उद्धव ठाकरे, भारतीय जनता पक्षाच्या वतीने स्व.गोपीनाथ मुंडे व मराठा महासंघाच्या वतीने मी अशा आमच्या तिघांच्यावतीने ॲग्रीमेंट केले. त्यामध्ये मराठा महासंघाला आमदारकी देण्याचे ठरले. त्यावेळी आरक्षणाला विरोध असताना स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी १० टक्के आरक्षण आर्थिक दुर्बल घटकांना, छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, महात्मा जोतिबा फुले अशा सहा राष्ट्रीय नेत्यांचे स्मारक उभारावेत असे वचननाम्यात व जाहीरनाम्यात नमूद केले होते. मी आमदार झाल्यावर आमच्यात थोडे मतमतांतरे झाली. या सभागृहात येण्यासाठी त्या काळात मला सर्वात आधी मदत माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे यांनी केली होती. हा प्रवास करीत असताना स्व.सुधीर जोशी यांची मला आठवण होते ते अतिशय सुसंस्कृत व चांगले होते त्यांनी खूप मदत

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे....

केली. त्यावेळी मी अखिल भारतीय मराठा महासंघाचा आमदार होतो. त्यावेळी निम्मी निम्मी मते शिवसेना व भाजपने द्यावी असे ठरले होते. निवडून आलो नाही तर राज्यपाल नियुक्त आमदार करावे असे ठरले होते. त्या सर्व इतिहासात मी जात नाही. ज्या विचाराने मी येथपर्यंत आलो, तो विचार कसा रुजेल,कसा वाढेल व न्याय कसा मिळेल हेच पाहण्याचा प्रयत्न मी केला आहे. फक्त मराठा समाज नाही तर इतर सर्व समाजासोबत राहून त्यांना सोबत घेऊन मी प्रामाणिकपणे माझे काम करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या पुढील काळात माननीय श्री.शरद पवार यांचे मला मार्गदर्शन लाभले. स्व.गोपीनाथ मुंडे, स्व.आर.आर.पाटील यांची खूप मदत मला झाली त्यांनी खूप प्रेम दिले. अलिकडील काळात माननीय श्री.अजित पवार, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांची मदत झाली. मी एकच पथ्य पाळले की, ज्या पक्षात आहे त्या ठिकाणी प्रामाणिकपणे राहायचे आज भारतीय जनता पक्षासोबत आहोत तेथे प्रामाणिकपणे काम करीत आहोत. अनेक सन्माननीय सदस्यांशी वैयक्तीक जीवापाड संबंध आहेत. माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई हे मी आमदार झाल्यावर माझा पहिला सत्कार करण्यासाठी आले होते. अशा अनेक सन्माननीय सदस्यांचे माझे जवळचे संबंध आहेत. त्या सर्वांचे ऋण व्यक्त करणे फार गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी प्रामाणिकपणाबाबत मघाशी उल्लेख केला. राष्ट्रवादी पक्ष स्थापन झाल्यावर श्री.दत्ता मेघे यांनी निवडणूक लढविली व त्यामध्ये त्याचा पराभव झाला होता. परंतु त्यांना विदर्भातून मंत्रिमंडळात घेण्याचे ठरले होते. त्यावेळी मी राष्ट्रवादी पक्षाकडून आमदार झालो होतो. त्यावेळी कोणीही आमदारकीचा राजीनामा देण्यास तयार नव्हते. माननीय श्री.शरद पवार अमेरिकेत होते. त्यांनी माननीय श्री.प्रफुल पटेल व मला तेथून फोन केला व असे सांगितले की, विनायकराव तुम्हाला अशा अशा कामासाठी राजीनामा द्यावा लागेल, ते तुम्हाला जमेल काय, मी विचारले की, मीच राजीनामा द्यायचा काय, ते म्हणाले दुसरे कोणीही राजीनामा देण्यास तयार नाहीत. ते मला म्हणाले तुम्ही राजीनामा देऊ शकाल काय, मी त्यांना म्हटले साहेब तुम्ही पक्ष प्रमुख आहात तुम्ही आदेश द्यायचा आम्ही कार्यकर्ते आहोत तो आदेश आम्ही पाळायचा त्यावेळी मी एका क्षणाचाही विचार न करता कोणाकडे

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे...

राजीनामा द्यायचा ते सांगा. त्यावेळी मी त्यांच्याकडे राजीनामा दिला व माझे काय होईल याचा मी विचार केला नाही. आजही तेच तत्व माननीय श्री. अजित पवार यांच्याबाबत पाळले आहे. स्व.आर.आर.पाटील यांच्याबाबतही पाळले आहे. आज माननीय श्री.देवेंद्र फडणवीस व भारतीय जनता पक्षाबाबत तेच तत्व पाळण्यात येत आहे. सन्माननीय ॲड.अनिल परब असे सर्वच माझे मित्र आहेत. वैयक्तीक पातळीवर आमचे जीवापाड प्रेम आहे. राजकीय निष्ठा,तत्व व प्रेम यामध्ये कधीही गोंधळ केला नाही. ज्या पक्षासोबत आहोत त्यांच्याबाबत निश्चितपणे राहण्याचे काम १०० टक्के केले आहे. या सभागृहात आल्यानंतर सर्वांच्या सहकार्याने आरक्षणाचा प्रश्न असेल,स्मारकाचा प्रश्न असेल, अण्णासाहेब पाटील महामंडळाचा प्रश्न असेल हे सर्व प्रश्न येथे आलो म्हणून मार्गी लागू शकले आहेत.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे.........

ते विषय पूर्ण झाले का झाले नाहीत हा वेगळा भाग आहे. परंतु राज्यातील महत्वाच्या चर्चेत ते मुद्दे आलेले आहेत याचे श्रेय सभागृहाला आहे. सभागृहातील तत्कालीन सन्माननीय सदस्य व आताच्या सन्माननीय सदस्यांनी त्या प्रश्नांसाठी समर्थन, पाठिंबा आणि सहभाग नोंदविलेला आहे. त्यामुळे त्यांचेही आभार मानने गरजेचे आहे. मी जास्त न बोलता एवढेच सांगू इच्छितो की, मला आपल्या सर्वांचे प्रेम मिळाले, मोठ्यांचे आशीर्वाद मिळाले आणि यापुढेही ते मिळत राहील. आपण काम करीत राहावे. यश, अपयश या पुढील गोष्टी आहेत. आपण त्या गोष्टींचा विचार न करता काम करीत राहिले पाहिजे.

सभापती महोदय, आपण आज १० सन्माननीय सदस्यांना निरोप देत आहोत. त्यामध्ये आपला देखील समावेश आहे. आपण राजेशाही घराण्यातील आता. परंतु राजेशाही घराण्यातील असून सुद्धा सर्व सामान्य कसे होता येते याचे उदाहरण म्हणजे आपण स्वत: आहात. आपण सन १९९४-९५ पासून एकत्र काम करीत आहोत. त्यामुळे मी प्रत्येक गोष्टीचा साक्षीदार आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी सन १९९५ मधील घटनेचा उल्लेख केला. आपण सन १९९५ मध्ये अपक्ष आमदार म्हणून निवडून आले होते. त्यावेळी अनेक अपक्ष आमदार आम्हाला मंत्रीपद मिळाले पाहिजे अशी मागणी करीत होते. परंतु पश्चिम महाराष्ट्रातील आमदारांनी आपल्या नेतृत्वाखाली सांगितले की, आम्हाला कृषणा खोरे महामंडळ द्यावे. स्व.बाळासाहेब ठाकरे, स्व.प्रमोद महाजन, स्व.गोपीनाथ मुंडे, श्री.मनोहर जोशी यांच्याकडे तशी मागणी करण्यात आली. आपल्या व आपल्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे ७२०० कोटी रुपयांचे कृष्णा खोरे महामंडळ झाले. आज पश्चिम महाराष्ट्रात जे पाणी खेळते ती आपली देण आहे हे विसरुन चालणार नाही. आपण अशी अनेक कामे केलेली आहेत. आपण सभापती म्हणून सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहात. आपण आम्हाला सुद्धा न्याय देत आहात, आशीर्वाद देत

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे.........

आहात. आपण आम्हाला मार्गदर्शन केलेले आहे. माननीय सभागृहनेते श्री.अजित पवार साहेबांनी आपण सन २०२४ पर्यंत सभापती पदावर असावे अशा शुभेच्छा दिलेल्या आहेत. आपण सन २०२४ पर्यंत सभापती म्हणून पीठासीन अधिकाऱ्यांच्या खुर्चीत बसलेले आम्हाला बघावयास मिळावे, अशी सभागृहाची इच्छा आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर साहेब सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांनी अतिशय कमी कालावधीत आपल्या कामाचा ठसा उमटविला. विरोधी पक्षनेता कसा असावा हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. या सभागृहाची परंपरा आहे आणि त्या परंपरेला सोजेसे काम करण्याचा ते सातत्याने प्रयत्न करीत असतात. लढवय्या विरोधी पक्षनेता कसा असावा याचे प्रत्यंतर त्यांच्या कामातून दिसून येते. मी त्यांना देखील शुभेच्छा देतो. त्यांचे काम पाहता ते पुन्हा या सभागृहाचे सदस्य म्हणून निवडून येतील याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांना आम्ही मराठवाड्यातील नेते म्हणून ओळखत होतो. ते वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष असताना त्यांनी खूप काम केले. त्यांनी तालुक्यापासून गावात जाऊन चांगल्या प्रकारे काम केले. वेगवेगळ्या कल्पना, नियोजन व प्रभावी योजना राबविण्याचे काम ते करीत होते. मला आठवते की, त्यांनी नापासाची शाळा हा नवीन उपक्रम सुरु केला होता. तो उपक्रम खूप गाजला आणि त्या उपक्रमाचा फायदा देखील झाला. त्यांनी कापूस दिंडी काढली होती. त्या काळात शिसेना पक्ष वाढण्याचे काम झाले. मी त्यांना देखील शुभेच्छा देतो. मी माननीय संसदीय कार्यमंत्री ॲड.अनिल परब साहेबांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी स्मारकाचे आणि शौर्याचे उदाहरण दिले. आपल्याला सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांच्या रुपाने शेलार मामा नक्की हवे असतील. माननीय उद्योग मंत्री श्री.सुभाष देसाई साहेब देखील सभागृहात उपस्थित आहेत. सभागृहात दोन्ही शेलार

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे.........

मामा उपस्थित आहेत. आपण त्यांचा उपयोग सभागृहाला नक्की करुन द्याल याबद्दल आपल्याला विनंती करीत आहे. माननीय उद्योग मंत्री श्री.सुभाष देसाई साहेबांचे देखील मी आभार मानतो. त्यांनी व सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी पुन्हा सभागृहात निवडून यावे, अशा मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत माझे सहकारी आहेत. आम्ही महायुती, घटक पक्ष म्हणून एकत्र काम करीत आहोत. ते शेतकऱ्यांचे नेते आहेत. मी त्यांच्या विषयी जास्त बोलणार नाही. शेतकऱ्यांविषयी कळवळा असणारा नेता, रांगडा गडी आहे. आजही त्यांचे भाषण युट्यूबवर प्रसारीत होते. दूध कशा प्रकारे विकावे, पाणी किती टाकावे, व्यायाम कसा करावा, भाषण फुलविण्याची चांगली वक्तृत्व शैली त्यांच्याकडे आहे. त्यांचे काम अतिशय चांगले आहे. ते पुन्हा सभागृहाचे सदस्य म्हणून निवडून येतील याबद्दल माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. कारण ते अतिशय चांगले नियोजन करणारे आहेत. ते कधी काय करतील हे सांगता येत नाही. कारण मागील काळात घटक पक्षाच्या सदस्यांना मंत्री करावयाचे होते. त्यावेळी सन्माननीय सदस्य सर्वश्री महादेव जानकर व सदाभाऊ खोत केव्हा माझ्या पासून दूर गेले आणि मंत्री झाले हे मला सुद्धा कळले नाही. ते पुन्हा या सभागृहाचे सदस्य म्हणून निवडून येतील. ते पुन्हा या सभागृहात आले तर मला त्याचा आनंदच होईल. मी त्यांना मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड माझ्या जिल्ह्यातील आहेत. ते सज्जन, सुसंस्कृत आहेत. ते पुन्हा या सभागृहाचे सदस्य म्हणून निवडून येतील याबद्दल मला शंका नाही. मी त्यांना शुभेच्छा देतो. जे सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्या सर्वांना मी मनापासून शुभेच्छा देतो.

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे.......

सभापती महोदय, माननीय उप सभापती यांनी मला सांभाळून घेतले. त्यांचा व माझा अनेक वेळा सुसंवाद होत होता तरी देखील त्या मला सांभाळून घेत होत्या. मी त्यांचे देखील मन:पूर्वक आभार मानतो. माझ्या सहकाऱ्यांचे देखील आभार मानतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--------

असुधारित प्रत

ॲड.अनिल परब (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, दिनांक ८ जून, २०२२ व दिनांक ७ जुलै, २०२२ रोजी निवृत्त होणाऱ्या एकूण १० सन्माननीय सदस्यांना आपण निरोप देत आहोत.

सभापती महोदय, जे सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्यापैकी एकही सदस्य निवृत्त होऊ नये असे सर्वांचे कर्तृत्व आहे. यापैकी कोणीही निवृत्त होऊ नये, अशा मी भावना व्यक्त करतो. त्याचे कारण असे आहे की, जे सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्यांच्याकडून आम्ही काही ना काही शिकलेलो आहोत. मी सभागृहात निवडून आलो त्यावेळी यापैकी काही लोक या सभागृहाचे सदस्य होते आणि त्यानंतर काही लोक सदस्य झाले.

सभापती महोदय, मी पहिली निवडणूक लढविली त्यावेळी आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून निवडणुकीसाठी उभे होता. आपण पहिल्या फेरीत ३२ मते मिळविली आणि उर्वरित सर्व मते एकाच झटक्यात टान्सफर करुन मला निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर फेकून दिले ते मी कधीही विसरु शकत नाही. या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. एका व्यक्तीसाठी २७ मतांचा कोटा असताना त्या व्यक्तीला ३२ मते पडतात आणि दहाव्या क्रमांकावरील उमेदवार बाहेर कसा फेकला जातो हे मी त्या निवडणुकीतून शिकलो आणि तेंव्हा पासून आपली छबी माझ्या हृदयात बसलेली आहे. आपल्याला ३२ मते कशी मिळाली याबाबत मी विचार करीत होतो. साधारणत: २७, २८, २९ मतांचा कोटा असतो. मी विधानपरिषद निवडणुकीतील कार्यकर्ता असल्यामुळे मला माहिती आहे. परंतु इतकी वर्षे आपल्या सोबत काम केल्यानंतर आपल्याला ३२ मते का मिळाली हे मला कळले. आम्ही वेगवेगळया पक्षचे कार्यकर्ते आहोत. आम्ही सभागृहाचे सदस्य म्हणून निवडून आलो. परंतु आपण पीठासीन अधिकारी असून देखील आमच्या हक्काचे व्यासपीठ आपल्या कार्यालयात आहे. सभागृहातील कोणताही आमदार स्वत:च्या पक्ष कार्यालयात जाण्यापूर्वी आपल्या कार्यालयात बसतो, पाहुणचार घेतो आणि त्यानंतर कामाला लागतो. आपण एवढे या सभागृहाला एकत्र केले. आपण अशा प्रकारे या सभागृहावर

ॲड.अनिल परब........

ताबा मिळविलेला आहे. आपल्याला सर्वांनी सन २०२४ पर्यंत शुभेच्छा दिलेल्या असल्या तरी माझी इच्छा आहे की, तह्यात हे पद तुमच्याकडे असले पाहिजे. त्याचे कारण असे की, आपल्याकडे सभागृह चालविण्याची हातोटी आहे. मी सभागृहातील वाद, संवाद, संघर्ष बघितलेला आहे. परंतु अडचणीच्या वेळी त्यातून रस्ता कसा काढायचा आणि सभागृहाचे कामकाज पुढे कसे न्यायचे हे आम्ही आपल्याकडून शिकलेलो आहोत. आपला आदर्श, आपले मार्गदर्शन आम्हाला मिळाले. आम्ही आपल्याकडून अनेक गोष्टी शिकलेलो आहोत.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

ॲड.अनिल परब.....

सभापती महोदय, मी आज संसदीय कार्य मंत्री असलो तरी पहिल्या दिवशी आलेला शिवसेनेचा कार्यकर्ता व आपल्या सर्व कार्यामुळे मी अतिशय प्रभावित झालो आहे. त्यामुळे मी खास आपल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी येथे आलो आहे. या सदनातील शिवसेनेचे दोन नेते, आम्ही ज्यांच्याकडून शिवसेनेचे धडे घेतले, सर्व गोष्टी शिकलो आहोत असे शिवसेनेचे २ प्रमुख स्तंभ या सदनातून निवृत्त होत आहेत. परंतु त्यांच्याकडून आम्हाला सदनामध्ये सातत्याने मार्गदर्शन मिळावे अशी माझ्यासारख्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते सदनामध्ये होते तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देसाई सदनामध्ये सदस्य नव्हते. माझी नेहमी जबाबदारी असायची की, मी श्री.दिवाकर रावते साहेबांच्या मागे उभे रहायचे. आम्हाला शिवसेनेमध्ये नेहमी शिकवण्यात आले आहे की, नेत्याने आपल्याकडे बघितले आणि एखादी ऑर्डर दिल्यानंतर त्यापुढील काम करण्याची आमच्यावर जबाबदारी असायची. जेव्हा श्री.दिवाकर रावते साहेब तीन वेळा निलंबित झाले तेव्हा मला नेहमी भीती वाटायची की, जेवढया वेळा ते निलंबित होतील तेवढया वेळेस मी देखील निलंबित होतो की काय ? याचे कारण असे आहे की, मी शिवसेनेमध्ये त्यांच्याकडून सैनिकी बाणा शिकलो. आपल्या वरिष्ठांनी एकदा आदेश दिल्यानंतर तो पूर्ण करण्याची जबाबदारी हा शिवसैनिकाचा मूळ गाभा आहे. हा गाभा आम्ही त्यांच्याकडून घेतला आहे. माननीय श्री.सुभाष देसाई यांनी आम्हाला प्लॅनिंग शिकवले. माननीय श्री.सुभाष देसाई यांच्याकडे एखादी गोष्ट गेल्यानंतर ती कशा प्रकारे तडीस किंवा पूर्णत्वास न्यायची ? आम्ही ही बाब त्यांच्याकडून शिकलो आहोत. शिवसेना मोठी झाली त्यात जे विविध पैलू आहेत. त्यात शिवसेनेला मोठे करण्यामध्ये या दोन नेत्यांचे फार मोठे योगदान आहे. त्यामुळे त्या दोन्ही सन्माननीय सदस्यांकडून सदनाला कायम मार्गदर्शन मिळत राहो अशी माझी मनापासून इच्छा आहे.

असुधारित प्रत

ॲड.अनिल परब.....

सभापती महोदय, माननीय श्री.प्रवीण दरेकर विरोधी पक्षनेता आहेत. एकमेकांना अरे..तुरे करणारे आम्ही विद्यार्थी सेनेचे कार्यकर्ते आहोत. मूळ शिवसैनिक असलेले श्री.प्रवीण दरेकर पहिल्या बाकावर येण्याचे मूळ कारण म्हणजे त्यांच्यामध्ये भिडण्याचा मूळ शिवसेनेचा स्वभाव आहे. ते भिडले, लढले, त्यांनी मेहनत केली म्हणून ते आज विरोधी पक्षनेते आहेत. ते विरोधी पक्षनेते असले तरी प्रत्येक गोष्टीमध्ये स्वत:ची ताकद लावणे, विषय मांडणे, त्याकरिता भिडणे, समोरच्या व्यक्तीला अंगावर घेणे हा त्यांचा मूळ स्वभाव असून तो त्यांच्या कर्तृत्त्वाला साजेसा आहे. मला माहीत आहे की, यामधील बहुतेक सन्माननीय सदस्य या सदनामध्ये परत येणार आहेत. मी त्यांना अशा शुभेच्छा देतो की, त्यांनी जे कर्तृत्त्व दाखविले आहे, त्यातून ते आणखी प्रगती करीत राहो अशा मी त्यांना शुभेच्छा देतो. मला तो दिवस आज देखील आठवतो की, श्री.प्रवीण दरेकर जेव्हा मजूर संस्थेची पहिल्यांदा निवडणूक लढले होते. तेव्हा मी विद्यार्थी सेनेचा कार्यकर्ता होतो. राजा शिवाजी विद्यालयाच्या इमारतीमध्ये निवडणूक सुरु होती. सकाळी ७.०० वाजेपासून रात्री १०.०० वाजेपर्यंत कठाडयावर बसून आम्ही सर्व कार्यकर्ते कामे करीत होतो. अशा प्रकारे यापूर्वी एकत्रितपणे कामे केलेले आम्ही सर्व कार्यकर्ते आहोत. आमचा एखादा कार्यकर्ता वेगळया पक्षात गेला असेल, आमचे वैचारिक मतभेद वेगळे झाले असले तरी ते एका उंचीवर गेलेले कार्यकर्ते असल्यामुळे हा त्यांचा गौरवच आहे. ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांची कष्टकऱ्यांचा नेता म्हणून ओळख आहे. माझी त्यांच्यासमवेत प्रत्यक्ष भेट फार उशिरा झाली. आम्ही आपले कर्तृत्त्व फार वर्षांपासून बघत आहोत. स्वाभिमानी संघटनेचे नेते, सदनामध्ये लाल बॅज लावलेले आपण स्वत: आणि माननीय श्री.राजू शेट्टी अशा दोन व्यक्ती आम्हाला नेहमी दिसायच्या. स्वाभिमानी संघटनेमध्ये श्री.राजू शेट्टी तसेच श्री.शरद जोशी यांची आंदोलने सुरु असायची. आम्ही या सर्व गोष्टी बघत होतो. आम्ही त्याचे वाचक होतो. आम्ही संघटनेमध्ये काम करीत होतो. लोकांना जमा करुन एखादे

ॲड.अनिल परब.....

आंदोलन शेवटपर्यंत कसे न्यायचे किंवा एखादे आंदोलन कसे पेटवायचे ? मी आता देखील आंदोलन पेटल्याचे पाहिले आहे. मी या गोष्टी तेव्हापासून बघत होतो की, नेतेगिरी कशी करायची, लोकांचे प्रश्न कसे मांडायचे, ते प्रश्न पुढे कसे घेऊन जायचे ? आता माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी सांगितले आहे की, आता त्यात काही तरी स्थित्यंतरे आली आहेत. त्यामुळे आम्ही यापूर्वी रस्त्यावर पाहिलेले सदाभाऊ खोत आज आणि उद्या देखील आम्हाला पाहिजे आहेत. आम्ही मध्यंतराच्या काळात युटयुबवर आपली अनेक भाषणे पाहिली आहेत. अशा प्रकारची भाषण शैली आपल्याला याच सदनामध्ये बघावयास मिळते. ज्याप्रमाणे तत्कालीन सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांची भाषणे वेगळया शैलीची होती. तसेच सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांची भाषण शैली देखील वेगळया प्रकारची आहे. सभापती महोदय, हे बहुरंगी सदन आहे. या सदनामध्ये विविध गूण बघावयास मिळतात. त्यामुळे आपल्यामध्ये असलेले नेतेपण किंवा आपण त्याला लीडरशीप असे म्हणतो... आपल्यामध्ये प्रश्न मांडण्याची वेगळी ताकद आहे. मी आपल्या कर्तृत्त्वाला मनापासून सलाम करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुजितसिंह ठाकूर यांच्या संदर्भात सांगायचे झाल्यास आम्ही ज्याप्रमाणे शिवसेनेचे कार्यकर्ते आहोत. त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.सुजितसिंह ठाकूर हे भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांनी सांगितल्याप्रमाणे सतरंजी कोठे असली पाहिजे ? हा खऱ्या कार्यकर्त्याचा गूण असतो. सतरंजी कोठे असली पाहिजे, किती खुर्च्या लागल्या पाहिजेत, सभा कशी झाली पाहिजे, सभेचा नेता कोठून येणार व कोठे जाणार ? सभापती महोदय, आम्ही शिवसेनेचे कार्यकर्ते याच प्रमाणे आहोत. ज्याला सतरंजी, खुर्च्या मांडण्यामध्ये नेत्यांची सभा तसेच त्यांची सभा यशस्वी करण्यामध्ये सर्वात जास्त आनंद वाटतो. अशा प्रकारचा कार्यकर्ता सन्माननीय सदस्य श्री.सुजितसिंह ठाकूर यांच्या रुपाने या सदनामध्ये आला. आम्ही त्यांच्या कर्तृत्त्वाला या निमित्ताने सलाम करतो.

ॲड.अनिल परब.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे बहुरंगी, बहुढंगी आयामी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांना प्रत्येक पक्षाने येथे पाठविलेले असल्यामुळे आपण त्यांची ताकद ओळखली पाहिजे. त्यांना कोणत्याही पक्षाने नाकारलेले नाही. ते ज्या पक्षाबरोबर आहेत त्या पक्षासोबत ते कायम निष्ठेने राहिले व त्यांनी पक्षाचे काम अगदी मनापासून केले. तसेच कोणी नाही म्हटले तरी माननीय सभापती यांना जास्तीत जास्त त्रास देण्याचे काम सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी केलेले आहे. परंतु ते प्रेमाने त्रास देतात आणि त्यानंतर माननीय सभापती यांच्याकडे जाऊन त्यांच्याशी काय बोलतात, माहीत नाही. सभापती महोदय, पुन्हा त्यांनाच सदनामध्ये बोलण्याची संधी देतात. अनेक वर्षांपासून मी हे समीकरण या सदनामध्ये बघत आहे. सभापती महोदय, या सदनामध्ये साधारणत: १३ आयुधे आहेत. परंतु त्यांच्याकडे नेहमी चौदावे आयुध असते. जेव्हा कोणतेही आयुध चालत नाही तेव्हा ते सदनामध्ये येतात व स्वत:चा विषय कशाप्रकारे घुसवतात व सदनाला वेगळया दिशेने कसे घेऊन जातात ? आजपर्यंत ही बाब या बाजूला बसलेल्या कोणत्याही सन्माननीय सदस्यांना समजू शकली नाही. सदनामध्ये त्यांच्यासारखे व्यक्तिमत्त्व असले पाहिजे. आम्ही शिकणारे लोक आहोत. काही सन्माननीय सदस्यांच्या मनात असा विचार येतो की, आज सदनामध्ये लक्षवेधी सूचना लागत नाहीत, आज आपल्याला नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यास मिळणार नाही. यावर मी त्यांना असे सांगतो की, तुम्ही सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांच्याकडे जाऊन टयुशन घ्यावी. तसेच आपल्याला एखाद्या विषयावर बोलायचे असल्यामुळे त्यावर कसे बोलायचे, विषय कसा काढायचा, तसेच कोणताही विषय असो तो शेवटी मराठा आरक्षणावर कशा प्रकारे घेऊन जायचा ? ही गोष्ट त्यांच्याकडून शिकण्यासारखी आहे. अशाप्रकारे त्यांच्यासारखे व्यक्तिमत्त्व ही सदनाची खरी गरज आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड आणि सन्माननीय सदस्य श्री.रवींद्र फाटक हे दोन्ही सन्माननीय सदस्य या सदनाचे स्टाईल आयकॉन आहेत. हे दोन्ही सन्माननीय सदस्य जेव्हा गेटमधून आतमध्ये येतात, तेव्हा तुम्ही बघावे कोणी

असुधारित प्रत

ॲड.अनिल परब.....

नेता असो, कोणीही त्यांच्याकडे बघत नाही. परंतु हे दोन्ही सन्माननीय सदस्य जेव्हा सदनामध्ये येतात तेव्हा सर्व कॅमरे व लोक त्यांच्याकडे बघत असतात. त्यांची स्टाईल सॉलिड आहे. आम्ही नेहमी म्हणतो की, ते स्टाईल आयकॉन आहेत. सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांचे सर्वांसमवेत चांगले व मैत्रीचे संबंध आहेत. आपला विषय कशाप्रकारे पुढे घेऊन जायचा हे त्यांना चांगले माहीत आहे. साधारणत: इतक्या कमी वयात अशा प्रकारचे यश कोणालाही मिळत नसते. त्याकरिता वेगळे गूण असावे लागतात. ते सर्व गूण आत्मसात करुन त्यांनी आपल्या राजकीय व उद्योग क्षेत्रात घवघवीत यश मिळवले आहे. मला त्यांची जॅकेटस् बघण्यात फार इंट्रेस्ट असतो. मी मोजत असतो की, या अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी किती जॅकेटस् घातली ? त्यांच्या संदर्भात सांगायचे झाल्यास सकाळी वेगळे, दुपारी वेगळे आणि संध्याकाळी वेगळे जॅकेट असते. आम्हाला कोणी कितीही व फुकट जॅकेटस् आणून दिली तरी आम्हाला तसे काही जमणार नाही. आपली बाजू उत्कृष्टपणे मांडण्याची कला त्यांना नेहमी जमली आहे. मी त्यांना देखील शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रवींद्र फाटक यांच्या बाबतीत सर्वांनी असा उल्लेख केला होता की, ते हाडाचे शिवसैनिक आहेत. त्यांची सर्वांसमवेत मैत्री असून त्यांचा कोणाशीही राग, लोभ आणि वैर नाही. प्रत्येकाला आपलेसे करण्याची त्यांच्यामध्ये ताकद आहे. त्यामुळे मी नेहमी म्हणतो की, स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून येणे हे आपले काम नाही. त्याकरिता सन्माननीय सदस्य श्री.रवींद्र फाटकच पाहिजे. याचे कारण असे आहे की, त्यांचे फाटक एकदा उघडल्यानंतर सर्व गाडया एकाच वेळी त्यातून पास होतात. तेवढी ताकद त्यांच्यामध्ये आहे. मला पूर्ण खात्री आहे की, पुढील वेळी ते या सदनामध्ये निश्चितपणे दिसतील.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड यांच्या बाबतीत मी सर्व काही ऐकले. माझा व त्यांचा परिचय फार कमी आहे. परंतु आपल्या सर्वांना जे जमले नाही, आपण येथे किती ओरडून बोललो तर एखाद्या वर्तमानपत्रामधील

असुधारित प्रत

ॲड.अनिल परब.....

एखाद्या कोपऱ्यात कोठेतरी आपले नाव छापून येते. याउलट त्यांनी फक्त एक शीर्षासन केले. त्यानंतर सर्व इंग्रजी वर्तमान पत्रांपासून सर्व वर्तमानपत्रांमधील टायटल लाईन ते घेऊन गेले. अशा प्रकारे एका झटक्यात प्रसिद्धी कशी मिळवायची ? हे आपल्याला शिकायचे असल्यास ते आपण त्यांच्याकडून शिकले पाहिजे.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत

ॲड अनिल परब .....

म्हणून असे लोकही सभागृहात असले पाहिजेत. मला असे वाटते की, या सदनाचा मी अनेक वर्ष सदस्य आहे. त्यामुळे या सदनाशी माझी थोडी जास्त जवळीक आहे. या सदनाच्या प्रत्येक सदस्यांबद्दल माझे एक वेगळे प्रेम आहे. या प्रेमासाठी मला असे वाटते की, या सदनातील कोणताही सदस्य निवृत्त होऊ नये. कित्येक वर्ष आपण सर्व एकत्र आहोत, असेच गुण्यागोविंदाने आपण पुढे काम करीत राहू, वैचारीक मतभेद तर होत राहतील. सभागृहामध्ये हे सर्व चालू असते, सभागृहाबाहेर आपण सर्व जण एकमेकाचे साथीदार आहोत. आपणा सर्वांना दिर्घ आयुष्य मिळो. सन्माननीय सदस्य श्री. सुजितसिंह ठाकूर यांची तब्येत लवकरात लवकर बरी होवो अशी प्रार्थना करतो. सर्वांना मी पुन्हा एकदा शुभेच्छा देतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

-----

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बघता बघता सहा वर्षे संपली आहेत व निरोप समारंभ होत आहे. खऱ्या अर्थाने या सभागृहाचे आमदार होऊ असे स्वप्नातही कधी वाटले नव्हते. कारण एका खेडेगावात शेतकरी कुटूंबात जन्म झाल्यानंतर कमी शिक्षण झाले होते. त्यानंतर ख-या अर्थाने शेतकरी चळवळीशी नाळ जोडली गेली. आमच्या भागातील रघुनाथदादा पाटील यांनी १९७६ मध्ये मला शेतकरी चळवळीशी जोडले. १९७८ साली मी एका दूध डेअरीमध्ये ५० रुपये महिना पगारावर काम करीत होतो. १९८४ मध्ये मी स्वत:ची दूध डेअरी काढली व चेअरमन झालो. १९८६ मध्ये पुन्हा मी शेतकरी चळवळीकडे ओढलो गेलो. अनेक आंदोलने झाली. दूध, कापूस, सोयाबीन, कर्जमाफी, वीज, ऊस एवढी सर्व आंदोलन केली, बरेच कार्यक्रम असायचे. बऱ्याच वेळा या आंदोलनामुळे अंगावर गुन्हे होत गेले. मी लोकसभेला उभे राहिले तेव्हा २६३ गुन्हे माझ्यावर होते, त्यांच्या नकलांची मोठी फाईल झाली होती. नेमके कोणत्या न्यायालयात कधी जायचे समजतच नव्हते. वॉरंट आल्यावर जायचे. कारण तो मेळच बसत नव्हता. एक एका दिवशी १०-१० न्यायालयाची वॉरंट असायची. एकाच दिवशी सर्व ठिकाणी जाणे खऱ्या अर्थाने शक्य नव्हते. पण चळवळीत काम करीत असताना शरद जोशी यांनी खऱ्या अर्थाने एक विचार दिला की, एका दाण्याचे हजार दाणे करणारा शेतकरी गरीब का राहतो हा विचार समोर ठेवला, त्या विचाराने दोन महिने आम्ही घराच्या बाहेर असायचो. मराठवाडयात गमजा गळयात घालतात, तो टॉवेल आमच्या गळयात असायचा. भाषण झाले की, तो टॉवेल आम्ही पुढे अंथरायचा. आम्ही समोर सांगायचो की, पुढच्या गावात जायला तुम्हाला खिशात हात घालावा लागेल. चार आणे, आठ आणे, रुपया असा खुर्दा जमायचा. महिना महिना आम्ही बाहेर राहायचो, तेव्हा फोनची व्यवस्था नव्हती. मी व लक्ष्मण वडले बरोबर असायचो. लक्ष्मण वडले यांच्या मुलाला कॅन्सर झाल्यामुळे व्हॉल्व दर दोन महिन्याला बसवावा लागत होता, त्याची किंमत ७ हजार रुपये होती. ते ७ हजार बाजूला काढायचे व राहिलेले पैसे वाटून घ्यायचो व गावाकडे यायचो. घरात आलो की, आई वडीलांच्या चेहऱ्यावर आनंद असायचा की, पोरगं नोकरीवरुन यावे. तसा आम्ही तो खुर्दा आईजवळ ठेवायचे. आई त्याचे १०-१० रुपयांचे ढीग लावायची. यातून गिरणी व दुकानदाराचे

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत.....

भागवायचे. १०-१५ दिवस त्या आलेल्या पैशातून घर चालायचे, १५ दिवसांनी बॅग भरायची, पुन्हा बाहेर पडायचे. शरद जोशी जेथे सांगतील, जेथे मेळावा असेल, जेथे आंदोलन असेल, तेथे एक एक महिना आम्ही अगोदर जायचो. जसे अगोदर बैल नागंरतात व नंतर मालक पेरायला येतो त्या पध्दतीने आम्ही रान तयर करायचो. गडचिरोली, चंद्रपूर पर्यत गेलो असेल. मला आठवते की, आम्ही यवतमाळवरुन वाशिमला आलो होतो. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे तेव्हा आमदार होते, विश्रामगृहावर त्यांची रुम बुक होती. मला प्रचंड ताप आलेला होता. लक्ष्मण वडलेच्या पाठीवर सर्व गाजा-बोजा दिला व विश्रामगृहावर गेलो. त्यावेळी आम्हाला विश्रामगृहावर कशी रुम मिळणार. तेथे आम्हाला समजले की, श्री.विनायक मेटे यांनी येथे दोन रुम बुक केल्या होत्या, त्या तुम्हाला देता येणार नाही असे सांगितले. श्री.विनायक मेटे साहेब पहाटे येणार होते. आम्ही १२ वाजता पोहचलो होतो. तेथील शिपायाने आम्हाला दरवाजा उघडला नाही. बाहेरच्या बाकडयावर आम्ही झोपलो. माननीय श्री.विनायक मेटे पहाटे ४-५ वाजता आले तेव्हा त्यांना समजले की, अशी दोन माणसे बाहेर झोपली आहेत. त्यांनी लगेच आम्हाला रुम उघडून दिली व अगोदर आमची सोय केली. म्हणजे चळवळीमध्ये काम करीत असताना असा आधारभाव अनेक लोकांच्या मनामध्ये असायचा. चळवळीमध्ये आंदोलन सुरु झाले की, वेगळी स्फूर्ती असायची. काही लोक म्हणायचे की, तुम्ही एवढे जहाल बोलता त्यामुळे तुम्ही अडचणीत याल. आम्ही म्हणायचो की, आमचे पहिलेच फाटले आहे, आता कोण फाडणार आहे. फाडायला काही शिल्लक पाहिजे की नाही. चळवळीमध्ये काम करीत असताना लोकांच्या प्रश्नांना हात घालून प्रस्थापित विरुध्द विस्थापित ही भावना लोकांच्या मनात त्या काळात तयार करणे हे जिकरीचे काम होते. ऊस आंदोलनात मारही मिळाला. झोनबंदी आंदोलनात काळबा जेलमध्ये गेलो. ऊस आंदोलनात आम्ही येरवडा जेलमध्ये गेलो. ब-याच वेळा जेलमध्ये जाण्याबाबत मनामध्ये भिती असायची. शरद जोशी यांनी आम्हाला सांगितले होते की, क्रांतीसिंह नाना पाटील हे स्वातंत्र्य मिळाल्यावर सुध्दा शेतक-यांकरीता चळवळी करीत राहिले. त्यांनी एक वाक्य वापरले होते, मी पंढरीचा वारकरी आहे व माझा पांडुरंग हा येरवडा

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत.....

जेलमध्ये आहे, तुम्हाला तुमच्या पांडुरंगाला प्रसन्न करायचे असेल तर ही वारी करावी लागेल. खऱ्या अर्थाने एक विचार त्या व्यक्तीमत्वाने दिला व आम्ही येथपर्यंत येऊ शकलो. चळवळीतून एक वक्ता म्हणून मी पुढे आलो. आंदोलन करीत आलो. नंतर संघटनेत फूट पडली, स्वाभिमानी शेतकरी संघटना झाली, ऊसाचे आंदोलने आम्ही उभी केली. सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे हे त्याचे साक्षीदार आहेत. १५ दिवस, महिनाभर पश्चिम महाराष्ट्रात साखर कारखान्याची चाके जागेवरच राहायची. एकही वाहन चालत नव्हते. चळवळीमध्ये पुढे आमदार म्हणून आलो, युती झाली, लगेच मंत्री झालो, मंत्री झाल्यावर लगेच अधिवेशनही आले. अधिवेशनात प्रश्नोत्तरे आली, प्रश्नांचा मी रात्रभर अभ्यास करायचो, मी रात्री १२-१ वाजेपर्यंत वाचून झोपलो तरी ते ध्यानात राहात नव्हते. कसे बोलायचे, काय बोलायचे. मी येथे कागदाचा मोठा गठ्ठा घेऊन यायचो. छापील प्रश्नांवर अभ्यास केलेला असायचा पण समोरुन वेगळेच प्रश्न विचारले जायचे. पुन्हा खाली कागद बघायला गेले तर कागदाचा मेळच लागत नसायचा. विरोधी पक्षातील सदस्य म्हणायचे की, आता शेतकऱ्यांवर बोला. तेव्हा काय बोलावे ते कळायचे नाही. मग मला माननीय श्री. एकनाथराव खडसे यांनी सांगितले की, चौकशी केली जाईल, कारवाई केली जाईल, पटलावर ठेवले जाईल ही वाक्य ध्यानात ठेवायची. अडचणीत आले की, निश्चितपणे कारवाई केली जाईल, तुमचे मत बरोबर आहे एवढे म्हणून बाजूला व्हायचे. तेव्हा एवढे वाचावे लागत होते. एवढा अभ्यास शाळेत केला असता तर मी जिल्हाधिकारी झालो असतो. येथे आल्यानंतर प्रश्नोत्तराच्या तासात सभापती महोदयांकडे व घडयाळाकडे बघत बसायचो. प्रश्नोत्तराचा तास संपला असे सभापती महोदयांनी म्हटले की झाले. विरोधी पक्षाने गोंधळ घातला तर सर्वात जास्त आनंद मंत्री महोदयांना होतो. गोंधळ झाला, सभागृह बंद पडले, काम खत्म. मी सत्ताधारी बाकावरुन पुन्हा विरोधी बाकावर आलो. मला वाटले की, येथेही नुसतेच विचारावे लागते. पण विरोधी पक्षाच्या बाकावर आल्यावर वि.प.स. नियम ९३, नियम ९७, नियम १०२ कळाले.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत......

येथे पण अभ्यास करायला लागतोच ! साधं सरळं काही नाहीच ! खरे बघितले तर ताई, माझ्या लोकसभेच्या सभेला आल्या होत्या. माझ्याकडे कृषी पणन खाते होते. मी अडत नियमन मुक्तीचा आग्रह धरला होता. भाजीपाला नियमन मुक्तीचा आग्रह धरला होता. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे एका बाजूला होते. मी एका बाजूला होतो. मी माझ्या विषयाशी ठाम होतो. परत माझ्याकडे पाणीपुरवठा खाते आले. ते खाते माझ्याकडे खूप मजेशीरपणे आले. माननीय श्री.देवेंद्रजी फडणवीस हे एका कार्यक्रमाकरिता तासगाव, सांगली येथे आले होते. आम्ही दोघे हेलिकॉप्टरमध्ये बसलेलो असताना ते मला म्हणाले की, सदाभाऊ, तुम्हाला एक पाणीपुरवठा नावाचे नवीन खाते देतो, त्यावर मी म्हटले की, द्या, बरे झाले. त्यानंतर आम्ही शिराळला कार्यक्रमाकरिता गेलो. त्या कार्यक्रमात साहेब, बोलता बोलता म्हणाले की, मी आता भेट देणार आहे. आता ज्याने कार्यक्रम घेतला, त्याला वाटले की, माझे मंत्रिपदच जाहीर होत की काय, "त्याने लावल्या फटाकडयाच्या माळा आणि खातं जाहीर झाले सदाभाऊच !" त्या फटाकडयाच्या माळांचा आणि त्या खात्याचा काहीही संबंध नव्हता. तेथे मला अशा पध्दतीने पाणीपुरवठा खाते मिळाले. लोणीकर साहेबांच्या पी.ए.चा फोन माझ्या पी.ए.ला आला. त्याने म्हटले की, सदाभाऊला कॅबिनेट दिलं की काय ! टीव्हीला लगेच बातम्या चालू झाल्या ना, सदाभाऊला पाणीपुरवठा खाते, त्यांना वाटले की, आपले गेले ! परंतु ते पाणीपुरवठा खात्याचे राज्यमंत्रीपद होत हो ! मंत्रीपदाच्या वेळी काय झाले ! आम्ही घटकपक्ष !

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत, याबाबत आता काही नका सांगू.

श्री.सदाभाऊ खोत : काय झाले की, आम्ही म्हणत होतो की, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेबांना कॅबिनेट मंत्रीपद मिळाले पाहिजे, ही आमची रास्त भूमिका होती. परंतु काय झाले की, मंत्रीमंडळाचा ज्यावेळी निर्णय झाला, त्यावेळी मला संध्याकाळी फोन आला की, उद्या शपथविधी आहे, संध्याकाळी वर्षावर येऊन जायचं ! यांनाबी फोन आला, पण वरनं सांगितलं की हे कोणाला बोलायच नाही.

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत......

मला सन्माननीय सदस्य श्री.महादेवराव जानकरांचा फोन आला की, सदाभाऊ तुम्हाला निरोप आला का ? मी म्हटले तुम्हाला फोन आला का, ते पण मला नाहीच म्हणाले. मला वाटायला लागलं की, मला एकटयालाच फोन आला. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेबांचा एक वाजेपर्यंत मला फोन येत होता. नक्की, सदाभाऊ निरोप आला का, मी म्हटले अजिबात ! मला निरोप आलेला नाही. मला निरोप आला तर मी तुम्हाला सांगेल. पुन्हा मग रात्री एक-दोन वाजता मी फोनच बंद केला. म्हटल, हा गडी काही झोपनां झालाय ! आम्ही सकाळी ज्यावेळी शपथविधीकरिता निघालो, त्यावेळी घटक पक्षाचा गडी आहे तर सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेबांना फोन लावावा असे मी मनात म्हटले. त्यावेळी त्यांचाही फोन स्विच-ऑफ झाला होता.

सभापती महोदय, खरे जर बघितले तर राजकारणामध्ये चळवळ, सहकार क्षेत्रात काम करत असताना आपल्यासारख्या माणसाला एवढया मोठया सभागृहामध्ये यायला मिळाले. हे सर्व निवृत्त होणारे सन्माननीय सदस्य परत येतीलच.

सभापती महोदय, सन २०२४ व त्याच्यानंतर पण तुम्हीच तेथे सभापती पदी राहा. कशाला माढयात जात आहात. केवळ माढयाची घोषणा केली तर तिकडं सर्व वातावरण तयार झाले असेल. तिकडेही हालचाल झाली असेल. परंतु तुम्ही काहीही म्हणा, परंतु मला तुम्ही सभापती म्हणून कायम पाहिजे आहात. आपण सभापती म्हणून आदर्शवत काम केले. खऱ्या अर्थाने आम्हा सगळयांना, प्रत्येकाला बरोबर घेऊन बोलण्याची संधी दिली. आपण सर्वांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. आम्हाला समाजाच्या सर्व व्यासपीठावर अनेक प्रश्नांच्या माध्यमातून आपण येऊ दिले. मी मंत्री असताना बऱ्याच वेळा ज्यावेळी मला उत्तर देण्याकरिता गडबड होत होती,त्यावेळी माननीय सभापती उत्तर देत होते, लगेच पुढील प्रश्न पुकारत होते. म्हणजे, खऱ्या अर्थाने ग्रामीण भागाची जाण असणारे अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून सभापती महोदय, यांच्याकडे बघावे लागेल.

श्री.सदाभाऊ खोत.....

सभापती महोदय, निश्चितच आमचे सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड, विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर असतील, त्यांनी अतिशय चांगले काम केलेले आहे. विरोधी पक्ष नेते म्हणून श्री.प्रवीण दरेकर यांनी चांगले काम केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड यांनी देखील अल्पावधीत चांगले काम केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे तर सातत्याने आमचे मार्गदर्शक राहिलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि माझ्या कुटुंबाचे वैयक्तिक संबंध आहेत. आजही माझी आई त्यांना नावाने ओळखते. ते देखील माझ्या आईला ओळखतात. आजही ते अध्ये-मध्ये माझ्या आईशी घरी फोन करुन बोलत असतात. सन्माननीय सदस्य श्री.सुजितसिंह ठाकूर, सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. सुभाष देसाई, सन्माननीय सदस्य रविंद्र फाटक यांनी देखील खूप चांगले योगदान सभागृहाला दिलेले आहे. आपण सर्वांनी एक कुटुंब म्हणून सभागृहात काम केलेले आहे. निश्चितच या ठिकाणी विरोधी पक्ष नेते म्हणून माननीय श्री.प्रवीण दरेकर यांच्या समवेत काम करण्याची मला संधी मिळाली. सन्माननीय श्री.प्रवीण दरेकर हे एक अभ्यासू आणि करारी व्यक्तिमत्त्व आहे. अत्यंत परखडपणाने आपले मत मांडणारे एक करारी व्यक्तिमत्त्व म्हणून आपल्याला त्यांच्याकडे पाहावे लागेल. मी जाता जाता एवढेच म्हणेल की......

निरोप घेतला तरी, आपुलकीचे एक नाते हवे,

तुम्हा सगळयांच्या हृदयात सदाभाऊ नावाचे एक खाते हवे

आयुष्याशी अजून माझा करार बाकी आहे,

मावळतांना धगधगण्याचा विचार बाकी आहे.

आयुष्याची सकाळ माझी खरच सुंदर गेली,

संध्येची मज फिकिर नाही, दुपार अजून बाकी आहे.

कितीही सुखद असली तरी कुठेतरी संपणारी वाट असते

श्री.सदाभाऊ खोत.........

पण संपणाऱ्या वाटेसोबतच जन्मणारी नवी पहाट असते

सहवास सुटला तरी सोबत सुटणार नाही

तुम्ही निरोप दिल्याने नाती कधी तुटणार नाहीत

एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------------

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड ( विधानसभेने निवडलेले ): सभापती महोदय, आजच्या या वरिष्ठ सभागृहामध्ये खरंतर निरोप समारंभ घेत असताना असे वाटते की, माझ्या मॅनेजमेंट कॉलेजचा निरोप मी घेत आहे. सगळे तरुण चेहरे येथे आहेत. हा एक वेगळा अनुभव मी येथे घेतलेला आहे. सभापती महोदय, आपल्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांच्या सहवासात खरंतर मला पूर्ण सहा वर्षाच्या कालावधीपैकी केवळ पावणेपाच वा पाच वर्षांचा कालावधी मिळाला. परंतु हे पाच वर्ष कधी गेले हेही मला कळले नाही. अडीच वर्षे माननीय श्री.देवेंद्रजी मुख्यमंत्री होते, त्यावेळी सत्तेमध्ये विधानपरिषदेचा सदस्य म्हणून अडीच वर्षांचा काळ मला मिळालेला आहे. उर्वरित अडीच वर्षांचा काळ विरोधी पक्षाचा आमदार, नंतरच्या काळात प्रतोद म्हणून मला मिळालेला आहे. खर तरं जे काही शिकलो, आमदाराची ताकद किती आणि त्याच्या आयुधाची किंमत किती हे विरोधी पक्षात आल्यानंतर मला कळले. माझी अशी इच्छा नाही की कायम विरोधी पक्षात राहावे. परंतु खरंच हा सर्व अनुभव विलक्षण होता. ज्या काही तेरा आयुधांचा वापर करायचा, त्या सर्व आयुधांचा वापर या सभागृहात अडीच वर्षात मी केलेला आहे.

सभापती महोदय, आयुष्यात सर्व काही मला फार लवकर लवकर मिळालेले आहे. माझे लग्नही लवकर म्हणजे वयाच्या एकोणिसाव्या वर्षी झाले. एकविसाव्या वर्षी मला मुलगी झाली. माननीय श्री.जयंतराव पाटलांमुळे त्यावेळी सिध्दीविनायक मंदिर न्यासाचा मी विश्वस्त झालो होतो. त्यावेळी मी ३१ वर्षांचा होतो. त्यावेळी ३१ वर्षांचा विश्वस्त होणे थोडे कठीण होते. कारण सर्व ज्येष्ठ लोक त्या न्यासावर विश्वस्त होऊन गेले. माननीय श्री.शरद पवार, माननीय श्री. अजित पवार, माननीय श्री.छगन भुजबळ साहेब ही नावे मी मुद्दाम घेणार आहे. यांनी म्हाडाचा सभापती म्हणून मला संधी दिली. मुंबई म्हाडाचा सभापती म्हणजे मुंबईतील राजकारणातील सर्वात मोठे व महत्त्वाचे पद मला मिळाले. माझ्यापूर्वी माननीय श्री. सचिन अहिर, श्री.मधु चव्हाण असे ज्येष्ठ लोक त्या पदावर राहिले होते. या पदावर असताना मला लाल बत्तीची गाडी मिळाली होती. मला राज्यमंत्री पदाचा दर्जा मिळाला होता. त्या काळात हे सर्व

अप्रकाशित प्रत

देखील मला वयाच्या चाळीसाव्या वर्षी मिळाले होते. राज्यमंत्रीपदाच्या लाल बत्तीतील त्या कामात पाच वर्षांचा तो काळ कसा गेला, हे मला कळलेच नाही. मुंबई

श्री.प्रसाद लाड .........

शहराचे जे विषय आहेत, ते सातत्याने सोडविण्याचा प्रयत्न करुन मी पुढे जाण्याचा प्रयत्न केलेला आहे. आज सर्वांनी माझी ओळख यशस्वी उद्योगपती म्हणून करुन दिलेली आहे. सभापती महोदय, तुम्ही मला बोलण्याकरिता संधी दिल्यामुळे मी थोडं माझ्याबद्दल देखील सांगणार आहे. खरंतर एका गरीब घरात जन्माला आलेला मी एक सर्व साधारण मुलगा आहे. माझे वडील माझंगाव डॉकमध्ये कामगार होते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई साहेबांबरोबर काम करणारे तेव्हाचे १९६८ सालातील ते शिवसैनिक होते.

यानंतर श्री.सोनावणे....

असुधारित प्रत

श्री. प्रसाद लाड.............

मी त्यावेळी परळला दहा बाय दहाच्या खोलीत राहत होतो. त्यावेळी माझ्या जीवनाला खरी सुरुवात केली होती. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना प्रेम प्रकरण झाले. माझ्या पत्नीचे वडील हे विधानपरिषदेत माननीय श्री. बाबुराव बापसे हे सदस्य होते. ते एक वेळा विधानपरिषदेत आणि एक वेळा विधानसभेत निवडून आले होते. मी त्यावेळी माननीय श्री. बाबुराव बापसे यांचा मुंबईतील रुबाब पाहिलेला आहे. त्यावेळी मी ठरविले की, एकदा तरी दोन्ही सभागृहांपैकी एका तरी सभागृहात आमदार म्हणून काम करण्याचा मी निश्चय केला होता. आमदाराचा रुबाब खूप असायचा. पोलीस सलाम करायचे आणि कायकर्ते रोज घरी या ना त्या कामासाठी गर्दी करायचे आणि त्यांचे प्रश्न सोडविताना खूप आनंद वाटत होता. अशा प्रकारे सामाजिक बांधिलकीतून काम होतात हे मी जवळून पाहिले आहे. मी पळून जाऊन लग्न केलेले आहे. त्यावेळी विधानपरिषदेतील माननीय श्री. बाबुराव बापसे यांच्या मुलीला पळवून नेऊन लग्न करणे ही खूप मोठी आणि धाडसाची गोष्ट होती. सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांना माहीत आहे. मी जेलमध्ये गेल्यावर त्यांनी मला सोडविले आहे. त्यावेळी खिशात पैसा नव्हता. त्यावेळी मी बीएस्सीच्या शेवटच्या वर्गात शिकत होतो. त्यावेळी मी टुरिस्टचा व्यवसाय करण्याचे ठरविले होते. त्या माध्यमातून मी मेहनत करायला सुरुवात केली. मला सांगताना अतिशय आनंद होत आहे की, मी पहाटे ४.०० वाजता टाईम्स ऑफ इंडियामध्ये जाऊन हमाली केलेली आहे. त्यावेळी खेमका नावाची एजन्सी होती. त्यावेळी लोडींग-अनलोडींग होत होती. माझी टुरिस्टची गाडी मी सकाळी चालवत होतो. अर्ध्या तासाच्या लोडींग-अनलोडींगमध्ये मला ७० रुपये मिळत होते आणि त्यातील ४० रुपये मी माझ्या धर्मपत्नीला देत होतो आणि उर्वरित ३० रुपयांमध्ये मी विद्यार्थी दशेतील राजकारण करीत होतो. मी माझी गाडी घेऊन सकाळी ५.३० वाजता टाईम्स ऑफ इंडियाची मॅक्झिन्स बोरिवलीला ड्रॉप करीत होतो. त्यानंतर सकाळी ९.०० वाजता किर्ती महाविद्यालयात जाऊन माझे शिक्षण पूर्ण करण्यासाठी धडपड करीत होतो आणि दुपारी दोन तास झोपायचो. असा माझा नित्याचा दीनक्रम असायचा. अशा प्रकारे मी

श्री. प्रसाद लाड.............

संघर्ष करीत मी माझे स्वत:चे विश्व निर्माण केलेले आहे. त्यावेळी माझ्याकडे एक गाडी होती. आज माझ्याकडे ३५ गाड्या आहेत. गाड्यांच्या व्यवसायात कॉम्पेटेटिव्ह आला. त्यावेळी वृत्तपत्रात "फॉरेन इन्व्हेस्टमेंट" येत असल्याची बातमी छापून आली होती. त्यावेळी मी मॅनेजमेंटच्या शेवटच्या वर्गात शिक्षण घेत होतो. हा धागा पकडून मी आणि माझ्या पत्नीने सन २००० मध्ये व्यवसाय सुरु केला. त्यावेळी बँकेत माझ्या खात्यावर १ लाख ३८ हजार रुपये होते. त्यावेळी मला ३५ लोकांचे काम मिळाले होते. मला आज खरोखर सांगताना आनंद होत आहे की, मी त्या कंपनीमध्ये नाही. कारण आमदार झाल्यानंतर मी त्या कंपनीचा राजीनामा दिला आहे. परंतु, आजही त्या कंपनीत ८५ हजार लोक कामे करीत आहेत आणि १२०० कोटी रुपयांचा टर्नओव्हर आहे. व्यवसाय हा भाग झाला. मला राजकारणात काम करण्याची संधी माननीय श्री. जयंत पाटील, माननीय श्री. अजितदादा पवार, माननीय श्री. छगन भुजबळ आणि माननीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांनी दिली. मी त्या संधीचे सोने केलेले आहे. मघाशी माननीय श्री. अजितदादा पवार साहेबांनी सांगितले की, प्रसाद आणि लाड या दोघांमध्ये आम्हाला ॲट्रॅक्ट करण्याची कला ही मी अतिशय बिकट परिस्थितीमधून शिकलो आहे. जीवनात आपला एकही शत्रू नसावा. प्रत्येकजण आपले मित्र असावेत. मित्रत्वतेच्या भावनेतून ज्यावेळी आपण मोठे होतो तेव्हा आपल्या बरोबर आपला मित्र देखील मोठा व्हावा आणि प्रत्येकाला पुढे घेऊन जाता आले पाहिजे या भावनेतून मी काम करीत गेलोलो आहे. सन २०१५ मध्ये ज्यावेळी मी विधानपरिषदेची निवडणूक लढली होती त्यावेळी माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे माझ्या विरुध्द उभे होते. त्यावेळी भाईंची मुंबईत एक प्रतिमा होती. कॉंग्रेस पक्षाची प्रतिमा आणि नेतृत्व असणाऱ्या भाईंच्या समोर कोणीही लढू शकत नाही. मी ज्यावेळी निवडणुकीचा फॉर्म भरला त्यावेळी मी भाईंसमोर एक आवाहन निर्माण केले होते. पक्षांतर्गत कलहामुळे मी ती निवडणूक एक मताने हरलो होतो. पण मी आमदार होणार अशी मनात जिद्द होती. त्यावेळी मला माननीय श्री. देवेंद्र फडणवीससारख्या नेतृत्वाने मला हात आणि मोलाची साथ दिली होती. माझ्या

असुधारित प्रत

श्री. प्रसाद लाड.............

कलागुणांना कदाचित त्यांनी वाव देण्याचा प्रयत्न केला. माननीय श्री. नारायण राणे साहेबांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांची विधानपरिषदेतील एक जागा रिक्त झाली. त्यावेळी मी आमदार होणार हे मला माहीत नव्हते. मी त्यावेळी लंडनला होता. दिनांक २५ नोव्हेंबरला निवडणुकीचा फॉर्म भरावयाचा होता. मला दिनांक १८ नोव्हेंबरला माननीय श्री. देवेंद्र फडणवीस साहेबांचा फोन आला आणि सांगितले की, तू दिनांक २२ नोव्हेंबरला मुंबईत कोणत्याही परिस्थितीत ये. तुला विधानपरिषदेचा फॉर्म भरावयाचा आहे. त्यानंतर मी आमदार झालो. आमदार झाल्यावर एक उद्योगपती आमदार कसा होऊ शकतो, माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचा आमदार कसा काय होऊ शकतो म्हणून माझ्यावर टीका करण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री. अभिजीत वंजारी यांना सांगू इच्छितो की, आपण या सभागृहात नव्याने आलेला आहात. आपली ही विधानपरिषदेतील आमदारकीची पहिलीच टर्म आहे. अशा टीका होत राहतात. आपल्या कर्तुत्वातून आपण काय करु शकतो हे जर आपण जगाला दाखवून दिले तर पक्षाला देखील त्याची किंमत कळते आणि भारती जनता पार्टीमध्ये काम करताना पक्षाला माझी किंमत कळाली होती.

सभापती महोदय, मी माननीय, गुरुवर्य आणि वंदनीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांना मागील महिन्यात माझ्या मुलीच्या लग्नाची पत्रिका देण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी मला साहेब म्हणाले की, प्रसाद मी तुझ्यावर थोडासा रागावलो आहे. कारण आम्ही तुझ्यावर कुटुंबासारखे प्रेम केले. तुला म्हाडाचा अध्यक्ष केले. हे मुंबईतील महत्वाचे पद आहे. पण तु आमचा पक्ष सोडला. त्यावेळी मी त्यांना नम्रपणे सांगितले की, तुम्हाला अभिमान देखील वाटला पाहिजे की, मी भारतीय जनता पार्टीसारख्या एका जॉईंट पक्षामध्ये जाऊन स्वत:चे एक वेगळे अस्तित्व निर्माण करुन माननीय श्री. देवेंद्र फडणवीससारख्या नेतृत्वाबरोबर बसण्याची किमया घडवून दाखवून दिलेली आहे. हे कदाचित तुमच्या दिलेल्या शिकवणीमुळे असेल. माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी जी मला मोलाची साथ दिली किंवा जो आशीर्वाद दिला त्यामुळे हे घडले असावे असे मला तरी वाटते. या सभागृहात मला काम करण्याची

असुधारित प्रत

श्री. प्रसाद लाड.............

संधी मिळालेली आहे. माननीय श्री. दिवाकर रावते यांचा चिरंजीव आणि मी एका महाविद्यालयात एका वर्गात शिक्षण घेत होतो. मी माननीय श्री. दिवाकर रावते यांना वैयक्तिक भेटल्यानंतर काका म्हणून हाक मारतो. त्यावेळी माननीय श्री. सुभाष देसाई साहेबांचा मुलगा हा आम्हाला ज्युनियर होता. मी माननीय श्री. सुभाष देसाई यांना वैयक्तिक भेटल्यानंतर काका म्हणून हाक मारतो. अशा प्रकारे काम करीत असताना सर्वांनी मला भरभरुन प्रेम दिले आणि सर्वांनी मला काही तरी शिकविण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल मी या सार्वभौम सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचा मनापासून ऋणी आहे.

सभापती महोदय, माननीय उप सभापती महोदय ज्यावेळी चेअरवर येऊन काम करायच्या त्यावेळी मला असे वाटत होते की, मी पुन्हा शाळेत आलो की काय ? त्यावेळी मला त्यांची फारच भिती वाटत होती. ताई मला आता दम देणार. त्यामुळे मी ताईंकडे न पाहता खाली मान घालून भाषण करायचो. पंरतु, त्या अतिशय शिस्तबध्द आणि प्रेमळ आहेत. त्यांनी मला नेहमीच प्रेमाने समजाऊन सांगितले आहे. त्यामुळे मी माननीय उप सभापती महोदयांचे देखील मी मनापासून आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय श्री. विनायक मेटे साहेबांना मी माननीय गोपीनाथ मुंडे यांच्यापासून ओळखत आहे. त्यांचे मराठा समाजाप्रती काम आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होण्यासाठी त्यांची तळमळ मी अतिशय जवळून पाहिलेली आहे. ही इच्छा त्यांची पुढील टर्ममध्ये पूर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय श्री. सदाभाऊ खोत यांनी त्यांच्या जीवनातील सर्व रंग सांगितले आहेत. त्यांच्यासारखे नेते असल्यामुळे महाराष्ट्रातील नेतृत्वाला वलय आहे आणि नेतृत्वाची किंमत आहे. तळागाळातील कार्यकर्ता मोठा कसा होतो, तो समाजामध्ये कसा जातो आणि कार्यकर्त्यांची छबी किंवा संघ कसा तयार करतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे माननीय श्री. सदाभाऊ खोत यांचे देता येईल.

असुधारित प्रत

श्री. प्रसाद लाड.............

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर हे माझे महाविद्यालयीन आणि अतिशय जवळचे मित्र आहेत. ते भारतीय विद्यार्थी सेनेत काम करीत होते. कदाचित माननीय श्री. दिवाकर रावते यांना माहिती असेल की, आयसो नावाची एक संघटना होती. मी "ऑल इंडियन स्टुडंट ऑर्गनायजेशन" मध्ये अध्यक्ष या नात्याने काम केलेले आहे. माननीय श्री. विनोद तावडे, माननीय ॲड.आशिष शेलार, माननीय श्री. राजसाहेब, माननीय श्री. प्रवीण दरेकर आणि माननीय ॲड.अनिल परब साहेब होते. त्यावेळी मी त्या मान्यवर मंडळीच्या विरोधात जाऊन काम केलेले आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे हे देखील होते. ऑल इंडियन स्टुडंट ऑर्गनायजेशन नावाची संघटना मुंबईत विद्यार्थी दशेपासून कार्यरत होती. त्यावेळीपासून मी माननीय श्री. प्रवीण दरेकरांसमवेत कामे केलेली आहेत. ते मुंबै जिल्हा बँकेचे अध्यक्ष होते. त्यांच्यावर ज्यावेळी आरोप झाले त्यावेळी मी एका पहाडासारखा त्यांच्या मागे उभे राहण्याचा प्रयत्न सातत्याने केलेला आहे आणि भविष्यात देखील करीत राहीन. भारतीय जनता पार्टीचा विरोधी पक्षनेता म्हणून माननीय श्री. प्रवीण दरेकर साहेबांनी उल्लेखनीय आणि प्रशसंनीय कामे केलेली आहेत. विधानपरिषदेत मोठ मोठे दिग्गज नेते मंडळींना विरोधी पक्षनेते पदी काम करण्याची संधी मिळालेली आहे. माननीय श्री. नितीन गडकरी, माननीय श्री. रामदास कदम, माननीय श्री. एकनाथ खडसे साहेब, माननीय श्री. गोपीनाथ मुंडे साहेब आणि माननीय, आदरणीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांनी विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते पदी कामे केलेली आहेत. आता माननीय श्री. प्रवीण दरेकरांना विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते पदी काम करण्याची संधी मिळालेली आहे. कदाचित विरोधी पक्षनेता मी होईल म्हणून त्यावेळी अनेक लोकांनी माझे अभिनंदन केले होते. परंतु, मला माहीत होते की, ती कॅपेसिटी ही माननीय श्री. प्रवीण दरेकर यांच्यामध्ये आहे आणि निश्चितपणे त्यांनी न्याय देण्याचे काम मागील अडीच वर्षात केलेले आहे आणि त्याचा अनुभव महाविकास आघारी सरकारला आलेला आहे. त्यांनी तसे प्रत्येक क्षणाला जाणवून दिलेले आहे. मी निरोप देताना खरे पाहता बोलले नाही पाहिजे. परंतु, मी

श्री. प्रसाद लाड.............

त्यांच्या कामाची जाणीव करुन देत आहे. त्यांनी उत्तमप्रकारे कामे केलेली आहेत. आजही मी त्यांच्यासमवेत बँकेत सहकारामध्ये सहकारी म्हणून काम करीत आहे. भविष्यात देखील भारतीय जनता पार्टीचा एक कार्यकर्ता म्हणून मी त्यांच्यासमवेत सहकारी म्हणून राहीन.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दौंड यांच्याबद्दल अनेकांनी छान माहिती दिलेली आहे. एक खराखुरा शेतकरी कार्यकर्ता आणि हाडामासाचा मराठवाड्यातील एक सच्चा कार्यकता आहे. त्यांनी गेल्या अडीच वर्षात स्वत:चा वेगळा ठसा उमटविला आहे.

सभापती महोदय, माननीय श्री. दिवाकर रावते आणि माननीय श्री. सुभाष देसाई यांच्याबद्दल बोलण्याइतपत मी मोठा नाही. त्यांचा मार्गदर्शक म्हणून सहवास या सदनाला पुनश्च लाभला तर आमच्या नंतर येण्याऱ्या पिढीला देखील एक वेगळा फायदा होणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र फाटक हे माझे जवळचे मित्र आहेत आणि ते पुन्हा विधानपरिषदेवर निवडून येतील यात तीळमात्र शंका नाही. कारण त्यांचे तीन जणांचे सरकार आहे आणि त्या माध्यमातून ते निश्चितपणे निवडून येतील यात तीळमात्र शंका नाही.

सभापती महोदय, माननीय श्री. अजितदादा पवार यांना नम्रपूर्वक सांगू इच्छितो की, मी आपल्या अनुपस्थितीत आपल्याप्रती बोललो आहे. माननीय श्री. अजितदादा पवार यांनी आम्हाला भरभरुन प्रेम दिलेले आहे. सभागृहात काम करीत असताना माननीय श्री. अजितदादा पवार यांचे अनुभव आणि मार्गदर्शन आमच्याप्रती खूप महत्वाचे आहे.

माननीय सभापती श्री. रामराजे नाईक-निंबाळकर हे पुन्हा याल, पुन्हा येणार नाही असे म्हणत नाही. मी पुन्हा याल असे म्हटले आहे आणि निश्चितपणे आपण पुनश्च एकदा सभापती पदी विराजमान व्हाल आणि पुन्हा एकदा आपल्या मार्गदर्शनाखाली या सभागृहाला मार्गदर्शन मिळेल अशी आशा व्यक्त करतो.

श्री. प्रसाद लाड.............

सभापती महोदय, या सार्वभौम सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी मला जी संधी दिली, प्रेम दिले त्याबद्दल मी आभार व्यक्त करतो आणि जाता जाता एवढेच सांगतो की, वरस येतील वरस जातील, पण ही नाती कायम आपली राहतील.

धन्यवाद.

-----------

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**पृ.शी.** : विनियोजन विधेयक

L. A. BILL NO.XII OF 2022
(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES AND PURPOSES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2023)

श्री.अजित पवार (वित्त मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-१२, दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या सेवांसाठी व प्रयोजनांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

असुधारित प्रत

**सभापती**.....

(खंड २ व ३ (अनुसूची), खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप.

(पुढे सुरु......)

ॲड.निलय नाईक (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहातून एकूण १० सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत.

सभापती महोदय, आपण सुद्धा निवृत्त होणार आहात. या पवित्र सभागृहात मी असेल किंवा सन्माननीय सदस्य सर्वश्री रामराव पाटील असतील, रमेशदादा पाटील असतील, आमच्यासारखे नवीन सदस्य या सभागृहात आल्यानंतर आमच्या मनात थोडेसे भीतीचे वातावरण होते. परंतु आपण वडिलधाऱ्याच्या भूमिकेत आम्हा सर्व नवीन सन्माननीय सदस्यांना सांभाळून घेतले. किंबहुना आमच्यासारख्या नवख्या सदस्यांना आपण संरक्षण दिले. ही बाब राजकीय कारकिर्दीमध्ये आयुष्यभर आमच्या स्मरणात राहील. माननीय श्री.अजितदादा पवार यांनी उल्लेख केला की, आपण खेळाडू आहात, आपण राजघराण्यातील आहात. खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात राज परिवारातील लोक कसे असावयास पाहिजेत याचे आपण ज्वलंत उदाहरण आहात. आपण एक सुसंस्कृत आणि सज्जन व्यक्तिमत्त्व आहात. आपला इंग्रजी भाषेत एकाच शब्दात उल्लेख करावयाचा झाल्यास आपण 'Gentleman' आहात. महाविद्यालयीन जीवनापासून आपल्या परिवारामध्ये मी येत-जात होतो. आपल्या बंधुसमवेत आपल्या घरी मी जेवण केलेले आहे. परंतु मला कुठेही जाणवले नाही की, मी एका राजाच्या घरी आहे. सभापती महोदय, आपले कौतुक करावे तेवढे कमीच आहे. एका सज्जन व्यक्तिमत्त्वाच्या हाताखाली आम्हाला अनेकदा शिकावयास मिळाले हे आम्ही आमचे भाग्य समजतो. आपण पुन्हा सभापती म्हणून यावे अशी अपेक्षा व्यक्त करुन, आपणास शुभेच्छा देतो .

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर हे सुद्धा निवृत्त होणार आहेत. सध्या ते सभागृहात उपस्थित नाहीत. परंतु महाविद्यालयीन जीवनापासून, विद्यार्थीदशेपासून झगडणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. माननीय श्री.राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाच्या माध्यमातून त्यांनी

असुधारित प्रत

ॲड.निलय नाईक.....

विधानसभेत प्रवेश केला होता. त्यांनी सुमारे १३ वर्षे मुंबै सहकारी बँकेचे नेतृत्व केले आणि त्या बँकेला संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकीक मिळवून दिला. माननीय श्री.प्रवीण दरेकर साहेब असतील, माननीय श्री.प्रसाद लाड साहेब असतील, हे आमच्या बाजूला बसून आम्हाला सभागृहात बोलण्यासाठी प्रवृत्त करायचे. सुरुवातीला आम्हाला सभागृहात भाषण करण्याची भीती वाटत होती. परंतु माननीय श्री.प्रवीण दरेकर साहेबांनी आम्हाला अतिशय चांगल्याप्रकारे मार्गदर्शन केले. त्यांनी विरोधी पक्ष नेते म्हणून केलेले कार्य खरोखरच उल्लेखनीय असेच आहे. त्यांनी सभागृहात अनेक प्रश्नांची अतिशय चांगल्या पद्धतीने मांडणी केली. ते पुन्हा या सभागृहात निश्चितपणे येतील अशी अपेक्षा व्यक्त करतो व त्यासाठी त्यांना मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे सुद्धा निवृत्त होणार आहेत. ते एक सज्जन आणि प्रामाणिक व्यक्तिमत्त्व आहे. ते आम्हाला मोठ्या भावासारखे आहेत. त्यांनी मला वारंवार योग्य मार्गदर्शन केलेले आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून त्यांनी कधीही स्वत:चा मानपान बघितला नाही. सातत्याने मराठा समाजासाठी झगडणारा खरा मराठी नेता म्हणून मी त्यांचा उल्लेख करतो. मराठा समाजाच्या प्रश्नांसाठी झगडत असतानाच त्यांनी आमच्यासारख्या सर्व समाजाला सोबत घेऊन चालण्याची किमया करुन दाखविली. त्यांना भावी आयुष्यासाठी मी शुभेच्छा देतो आणि त्यांनी पुन्हा या सभागृहात यावे यासाठी देखील त्यांना शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, माझे मित्र आणि बंधुतुल्य सन्माननीय श्री.प्रसाद लाड यांच्या राजकीय जीवनाबाबत आपल्या सर्वांना कल्पना आहे. ते प्रसिद्ध उद्योगपती असले तरी त्यांच्या पुणे, नगर आणि मुंबईत अनेक शैक्षणिक संस्था आहेत. आरोग्य क्षेत्रात सुद्धा त्यांनी अतिशय उल्लेखनीय काम केलेले आहे. डायलीसीस सेंटर्स उभारण्याच्या बाबतीत सुद्धा त्यांनी काम केले आहे. कोरोना काळात त्यांनी ७ कोरोना सेंटर्स उघडले आहेत. विशेष म्हणजे त्यांनी २५ हजार विद्यार्थ्यांसाठी बुक

असुधारित प्रत

ॲड.निलय नाईक.....

बँक निर्माण केली आहे. त्यांचे दुसरे पैलू सुद्धा अतिशय चांगल्या पद्धतीचे असेच आहेत. माननीय श्री.अजितदादा पवार यांनी सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांच्या बाबतीत बोलताना सांगितले की, प्रसाद लाड यांना सर्वच पक्षात अतिशय चांगले स्थान आहे. यामागील कारण म्हणजे त्यांचे कर्तृत्व चांगले आहे. माननीय श्री.अजितदादा पवार यांनी सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड आणि माझ्यावर खूप प्रेम केले. माननीय श्री.अजितदादा यांनी ज्यांच्यावर प्रेम केले ते अतिशय मनापासून केले आणि तीच पद्धत सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी सुद्धा अवलंबिली आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांना शुभेच्छा देतो आणि ते या सभागृहात आमच्याबरोबर निश्चितपणे परत येतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, शिवसेना पक्षाचे नेते सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे सुद्धा निवृत्त होणार आहेत. त्यांनी आमच्या पश्चिम विदर्भातील प्रत्येक तालुक्यात, जिल्ह्यात कापूस दिंडी काढली होती. त्यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय मनापासून काम केले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या बाबतीत मला अनेक गोष्टी बोलायच्या आहेत. परंतु वेळ कमी असल्यामुळे मला बोलता येत नाहीत. मी माननीय श्री.दिवाकर रावते यांना मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई हे सुद्धा निवृत्त होणार आहेत. त्यांना सुद्धा मी मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत हे सुद्धा निवृत्त होणार आहेत. त्यांचा उल्लेख ग्रामीण भागाचा 'लखलखता तारा' असा करतो. ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारे नेते आहेत. ते पुन्हा या ठिकाणी परत येतील, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दौंड, रविंद्र फाटक, सुजितसिंह ठाकूर हे सुद्धा निवृत्त होणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुजितसिंह

ठाकूर यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे ते सभागृहात उपस्थित नाहीत. सामान्य

अॅड.निलय नाईक....

कार्यकर्ता म्हणून, भारतीय जनता पक्षाचे नेते म्हणून त्यांनी उत्कृष्ट काम केले आहे. या सर्व सन्माननीय सदस्यांना मी मनापासून भावी राजकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, आपण मला माझ्या भावना व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व माझे मनोगत संपवितो.

धन्यवाद.

-----------

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, आपल्यासह या सभागृहातील सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, संजय दौंड, रविंद्र फाटक, माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई, सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रसाद लाड, विनायक मेटे, सुजितसिंह ठाकूर, सदाभाऊ खोत आणि मी स्वत: निवृत्त होणार आहे.

सभापती महोदय, या निरोप समारंभाच्या अनुषंगाने सभागृहातील अनेक मान्यवरांची भाषणे झालेली आहेत. सर्वच मान्यवरांनी या सभागृहाची प्रथा, परंपरा राखत निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांचे कौतुक केल्याचे मला समजले. शेवटी आपण कोणत्याही पक्षाच्या माध्यमातून या सभागृहात आलो असलो तरी, सत्ताधारी पक्ष असेल किंवा विरोधी पक्ष असेल, या सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला मिळालेल्या अधिकारातून सर्वसामान्य जनतेची सेवा आणि विकास करणे हाच आपला अंतिम उद्देश असतो.

सभापती महोदय, आपण सभापती या नात्याने आम्हा सर्वांना सांभाळून घेऊन बोलण्याची संधी दिली. आमचे जर काही चुकत असेल तर अधिकारवाणीने सांगण्याचा सुद्धा आपण प्रयत्न केला.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

अतिशय चांगल्या वातावरणात सभागृहाचे कामकाज होण्यामध्ये आपले एक मोलाचे योगदान, वाटा आहे असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे देखील सभागृहातून निवृत्त होत आहेत. मला त्यांचे काम जवळून माहीत आहे. संघटनात्मक काम आहे. मी संघटनात्मक कामासाठी आदर्श मानतो. कामाचा झपाटा, फिरणे, वेगवेगळ्या प्रकारच्या अभिनव संकल्पना घेऊन पक्ष वाढविणे असे त्यांनी काम केले. लोकांचे विषय जनतेसमोर आणण्याचा प्रयत्न करणारा नेता म्हणून मी त्यांना माझ्या विद्यार्थी चळवळीपासून पाहत आहे. सभागृहामध्ये देखील त्यांचे सातत्याने योगदान राहिले आहे. मराठी भाषेविषयी, मराठी माणसांविषयी आग्रही भूमिका मांडली. कोणी इंग्रजीमध्ये उच्चारले तर ते समोरुन बोललेच पाहिजेत, असे त्यांचे मराठीवर निस्सिम प्रेम असल्याचे वारंवार दिसत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दौंड यांनी देखील चांगले कॉंट्रिब्युशन या सभागृहाकरिता दिले आहे, राज्यातील जनतेकरिता दिले आहे. सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र फाटक हे आमचे अगदी जवळचे मित्र आहेत. त्यांनीही खासकरुन पालघर, ठाणे आणि त्यांच्या मतदारसंघातील सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. आदरणीय मंत्री श्री. सुभाष देसाई यांचे देखील शिवसेनेचे नेते म्हणून, मंत्री म्हणून सरकारच्या, सभागृहाच्या माध्यमातून कॉंट्रिब्युशन राहिले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड हेही माझ्यासोबत निवृत्त होत आहेत. माझे जवळचे स्नेही, मित्र आहेत. सुरुवातीला असे वाटायचे की, सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड सभागृहात किती कॉंट्रिब्युशन देतील, काय करतील. पण अलीकडच्या काळात त्यांचे सभागृहात जास्त वेळ बसणे, सभागृहाच्या कामकाजात सहभाग घेणे दिसले. विविध आयुधांच्या माध्यमातून सभागृहाच्या

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

कामकाजात सहभाग घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अलीकडच्या काळात आपण संधी दिल्यामुळे अतिशय चांगली भूमिका मांडली आहे. सभागृहात चांगली भाषणे केली आहेत.

सभापती महोदय, आमचे मित्र, नेते सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांच्याविषयी तर आपल्यालाच जास्त माहीत आहे. सभागृहामध्ये सातत्याने आग्रही भूमिका त्यांनी घेतली. एखादा विषय असेल तर टोकाचा आग्रह धरुन तो विषय मांडणारा नेता मी त्यांच्यामध्ये पाहिलेला आहे. मराठा आरक्षणाचा विषय आला तर मराठा समाजाच्या व्यथा, वेदना हा त्यांच्या प्राधान्याचा विषय असायचा हेही सातत्याने वेगवेगळ्या प्रकारच्या त्यांच्या सभागृहातील कामकाजातून दिसून येत आहे. सन्मानीय सदस्य श्री. सुजितसिंह ठाकूर यांना आजारपणामुळे सहभाग घेता आला नाही. परंतु भारतीय जनता पक्षाच्या आमच्या एका बिनीच्या संघटनकुशल असणाऱ्या नेत्याला दुर्दैवाने सभागृहाच्या कामकाजामध्ये सहभाग घेता आला नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत शेतकऱ्यांचे नेते आहेत. शेतकऱ्यांच्या विषयांवर सातत्याने या सभागृहात किंवा सभागृहाच्या बाहेर प्रश्न मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ते एका बाजूला रस्त्यांवर आंदोलने करायचे आणि दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सभागृहाच्या माध्यमातून वाचा फोडत सरकारचे लक्ष केंद्रीत करायचे. आम्ही सभागृहामध्ये त्यांचे काम पाहिले आहे. एफआरपीच्या प्रश्नावर त्यांनी २ दिवसांपूर्वी आंदोलन केले. सभागृहात देखील भूमिका मांडली. शेतकरी व शेतकऱ्यांचे प्रश्न यांच्या प्रती बांधिलकी असणारा एक नेता सभागृहाने, महाराष्ट्राने पाहिला आहे.

सभापती महोदय, मी या सभागृहात आलो, त्या अगोदर विधानसभेत ५ वर्षे काम केले. भारतीय जनता पक्षात आल्यानंतर त्यांनी माझा प्रचंड सन्मान केला. नवीन

सभासद पक्षात येतो, त्याला आमदार बनवितात, आमदार झाल्यानंतर लगेच राज्याच्या विरोधी पक्षनेते पदाची जबाबदारी देतात. मी भारतीय जनता पक्षाचा

श्री. प्रवीण दरेकर ....

मनापासून ऋणी आहे. आमचे माननीय केंद्रीय अध्यक्ष श्री. जे.पी.नड्डा, माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी, माननीय केंद्रीय मंत्री श्री. अमित शहा यांचे आभार मानतो. विशेषत: माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या आशीर्वादामुळेच अशी मोठी जबाबदारी मला मिळाली. माननीय श्री. चंद्रकांत पाटील यांचेही सहकार्य होते.

सभापती महोदय, माझ्यावर मोठे दडपण होते. कारण अत्यंत महान नेते विरोधी पक्षनेता या पदावर बसले आहेत. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी देखील विरोधी पक्षनेते पदावर काम केले आहे. माननीय श्री. नितीन गडकरी, माननीय श्री. विनोद तावडे अशा मोठ्या नेत्यांनी या पदावर काम केले आहे. मला आदरणीय श्री. शरद पवार साहेब हे या पदावर राहिले असल्यामुळे एक प्रचंड दडपण होते. या पदावर ही सर्व नेते मंडळी राहिली असल्यामुळे मी विरोधी पक्षनेता म्हणून या सभागृहाचे कामकाज कसे करणार असे वाटत होते. आमदार म्हणून बोलू शकतो. चुकलो तर चार गोष्टी समजू शकतात. पण संविधानिक जबाबदारीचे पद असल्यानंतर पदाला न्याय दिला पाहिजे ही भावना सातत्याने, पहिल्या दिवसापासून मनामध्ये होती. मी मैदानी भाषण कुठेही, कधीही, कसेही करीन, राजकीय भाषण करीन. परंतु विरोधी पक्षनेता म्हणून करावयाच्या भाषणात कंटेन्ट असले पाहिजेत. आपण एखादी बाब सभागृहात मांडली तर उद्या आपल्याला कोणी खोडून काढू नये याची मी सातत्याने काळजी घेतली.

सभापती महोदय, मी आरटीआयच्या माध्यमातून माहिती मागवायचो, विरोधी पक्षनेता म्हणून असणाऱ्या अधिकारातून माहिती मागवायचो, असे करुन मी भाषणज्ञला कंटेन्ट देण्याचा प्रयत्न केला. सतत बाहेर फिरत लोकांच्या भावना समजून घेतल्या. मी एक गोष्ट केली, त्याचे कौतुक आदरणीय उप मुख्यमंत्री श्री. अजित दादा

असुधारित

पवार यांनी केले. मी निरोप समारंभाची सर्व भाषणे ऐकत होतो. मी माझ्या न्यायालयीन कामासाठी न्यायालयात असल्यामुळे मला येण्यास उशीर झाला. मी विरोधी पक्षनेता म्हणून सर्वाधिक फिरलो. माझी विरोधी पक्षनेत्याची कारकीर्द अशीच आहे. एक दिवस असा नाही की मी महाराष्ट्रात फिरलो नाही. कुठे एखादी घटना

श्री. प्रवीण दरेकर ....

घडली, तौक्ते वादळ आले, निसर्ग वादळ आले, इतर वादळे आली, महिलांवर अत्याचार झाले तर मी तेथे जाऊन माहिती घेतली. मी कोविडच्या भयभीत वातावरणातही फिरत राहिलो. मला ग्राऊंडवर गेल्यामुळे, शेताच्या बांधावर गेल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न, व्यथा समजल्या. मी शहरात राहिलेलो असलो तरी प्रश्नांचे फार लवकर आकलन करीत ते समजून घेण्याचा प्रयत्न केला. माझ्या विरोधी पक्षनेत्याच्या कारकिर्दीकरिता फिरण्याचा, ग्राऊंडवर जाण्याचा निश्चितपणे फार मोठा उपयोग झाला. मी माझ्या परीने विरोधी पक्षनेता म्हणून सभागृहात असेल किंवा बाहेर असेल प्रामाणिकपणे काम करण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, आज सभागृहात येता येईल की नाही असे मला वाटले. कारण आज माझी न्यायालयात केस होती. मला कायमची रुखरुख राहिली असती. शेवटी सत्याच्या मागे परमेश्वर असतो. त्यामुळेच "सत्यमेव जयते" असे म्हणतात. न्यायालयाने देखील दिलासा दिला. सर्व गोष्टींत न्यायालय दिलासा देईल असा आत्मविश्वास आहे. मी आयुष्यात कोणतेही काम करताना संघर्ष केला. विद्यार्थी चळवळीत संघर्ष केला. पक्षामध्ये काम करताना संघर्ष केला. येणाऱ्या कोणत्याही संकटांना, आव्हानांना कधीच घाबरलो नाही. त्यामुळे माझ्यातील कार्यकर्ता घट्ट होत गेला. येईल त्या संकटाला सामोरे जात काम करण्याची सवय असल्यामुळे माझ्या वाटचालीत त्याचा उपयोग झाला. मी सभागृहाचे मनापासून आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, सभागृहात कधी-कधी पक्षीय अभिनिवेशातून काही गोष्टी आल्या असतील. मात्र त्या मागचा उद्देश कोणाला दुखविणे नसतो. कोणाला टोमणे मारणे, टीकाटिप्पण्या करणे असे कधीही नव्हते. मी त्याची काळजी घेतली. परंतु

असुधारित प्रत

तरीही कोणाच्या भावना दुखावल्या असल्या तर मनापासून त्याविषयी दिलगिरी व्यक्त करतो.

सभापती महोदय, आपले मनापासून आभार व्यक्त करतो. विरोधी पक्षनेता म्हणून काम करताना आपण मला अनेकदा बोलण्यास संधी दिली. विरोधी पक्षनेता

श्री. प्रवीण दरेकर ....

पदाची गरिमा ठेवली आणि त्या पलीकडे जाऊन एखादा महत्त्वाचा विषय असला तर आपल्या विशेषाधिकारामध्ये संधी दिली. काही गोष्टींमध्ये मार्गदर्शन केले. आम्ही कमी अनुभवाचे असल्या कारणामुळे आपल्या अनुभवाचे बोल ऐकून आम्ही आमच्यामध्ये बदल करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. सर्वाथाने सर्वांनी मदत केली, त्याबाबत सभागृह, आपण, माननीय उप सभापती या सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करतो आणि आपल्या सर्वांना धन्यवाद देऊन मी थांबतो. धन्यवाद ! जय हिंद, जय महाराष्ट्र ! भारत माता की जय !

----

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

डॉ.नीलम गोऱ्हे (उप सभापती) : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांची मुदत संपत आहे, त्यामध्ये माननीय सभापती श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक निंबाळकर, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर, माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत, सन्माननीय सदस्य श्री.सुजितसिंह ठाकूर, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड, सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र फाटक व सन्माननीय सदस्य श्री.संजय दौड.

सभापती महोदय, निरोप समारंभ करण्याचा प्रसंग दर दोन तीन महिन्यांनी आपल्यावर येतो. ट्रेन सुटत आली तरी निरोपाचे हात फलाटावर हलत असतात त्याची आठवण मला येते. त्यामुळे हा निरोप कधी संपू नये असे वाटत असते. मी सर्वांना पुनरागमनाच्या मनापासून शुभेच्छा देते. प्रत्येकाचे काम वैशिष्ट्य पूर्ण आहे. सर्व तपशीलात जाता आले नाही तरी काही बाबी मला नोंदविल्या पाहिजेत कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. प्रत्येकाचे मिळालेले सहकार्य व प्रत्येकाचे विशेष काम याबाबत च्या नोंदी अगदी थोडक्यात मी मांडते.

माननीय सभापती महोदय, पाणी हा आपला सर्वात आवडता विषय आहे, कृष्णा खोऱ्याच्या संदर्भात टेंभू योजना असेल, धोम बलकवडीचा पाण्याचा प्रश्न असेल, कृष्णा पाणी तंटा लवादामध्ये ८१ टीएमसी पाणी महाराष्ट्राला मिळवून देण्यात आपण यशस्वी झाला आहात. आपण विधानसभेचे सदस्य म्हणून तीन वेळेला तर विधानपरिषदेचे सदस्य म्हणून दोन वेळा निवडून आला आहात. दीर्घ कालावधीपासून आपण विधिमंडळात आहात. मी असे म्हणेन की, सुसंस्कृत, हजर जबाबी, उमदे व्यक्तीमत्व आणी त्याच बरोबर आपण मुळचे वकील असल्यामुळे कायद्याची चौकट काय आहे, नियम काय आहेत, न्यायालयीन प्रसंगा वेळी सरकारच्या मर्यादा पाहून काय मार्ग काढू शकतो असे ऐतिहासिक स्वरुपाचे निर्णय घेण्याची वेळ आपणावर आली. पुढील काळात काम करीत असताना जे सदस्य निवृत्त होत आहेत त्यांची मानसिकता मी समजू शकते. प्रत्येक व्यक्ती या फेजमधून कधी ना कधी गेलेला असतो. खरे सांगायचे तर मनात एक साशंकता असते. एप्रिल

डॉ.नीलम गोऱ्हे....

महिन्यात मला आठवते की, माझी सदस्यत्वाची मुदत संपणार होती व त्यावेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित होते. माननीय श्री.प्रवीण दरेकर म्हणाले होते की, त्यांना पुन्हा संधी दिली पाहिजे. मुख्यमंत्री महोदय म्हणाले होते की, आपण बोलला नाही तर ताईंना पुन्हा संधी देईल. त्यावेळेस माननीय श्री.प्रवीण दरेकर यांनी त्यांचे भाषण थांबविले होते. कोणाला संधी द्यावी हे पक्षश्रेष्ठी ठरवीत असतात. हे ठरवित असताना कोणाला तिकीट द्यावे हे अवघड काम असते. कारण प्रत्येकाचे कार्य खूप मोठे असते. असे असताना आपल्या अपेक्षा, आशा व आकांक्षा पुढील काळात पूर्ण व्हाव्यात व सभापती म्हणून आपणच येथे असावे. अशी मी उप सभापती म्हणून व विधीमंडळातील आपली सहकारी म्हणून आपणाला मनापासून शुभेच्छा देते. अलिकडील काळात माझ्या बऱ्याच शुभेच्छा खऱ्या झाल्या आहेत. माननीय श्री.उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होतील अशी खात्री नव्हती पण माझी इच्छा होती ती पूर्ण झाली. त्यामुळे आपण परत सभापती व्हाल अशी आमची इच्छा पूर्ण होईल अशी मला खात्री आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई आता सभागृहात नाहीत. उद्योग मंत्री व शिवसेना नेते म्हणून त्यांचे अभूतपूर्व व ऐतिहासिक स्वरुपाचे कार्य आहे. मला येथे सांगायला पाहिजे की, उद्योग मंत्री म्हणून काम करीत असताना ते जेव्हा विधानपरिषदेमध्ये सदस्य म्हणून निवडून आले त्या अगोदर ते विधानसभेत आमच्या पक्षाचे गटनेते होते. अत्यंत कठीण काळात म्हणजे आमच्या पक्षातून काही सदस्य निघून गेले व पक्ष संपविण्याची भाषा केली जात होती. त्या काळात माननीय श्री.सुभाष देसाई यांनी अतिशय चांगल्या प्रकारे सर्व आमदारांना एकत्र ठेवण्याचे काम केले. त्यांचे नेतृत्व, मार्गदर्शन खूप मोलाचे आहे. मला असे आठवते की, गेल्या २५ वर्षात शिवसेना पक्षाची शिबिरे असतील त्याचे संयोजन, सूत्रसंचालन व कार्यक्रमाची रुपरेषा माननीय श्री.सुभाष देसाई यांनीच ठरविलेली आहे. सर्व मोठे कार्यक्रम अचूक करणे, निर्दोष करणे, त्यासाठी रिसोर्स मटेरिअल मिळविणे, आमदारांसाठी अभ्यासवर्ग ठेवणे ही सर्व कामे त्यांनी केली आहेत. आता उद्योग मंत्री म्हणून काम

असुधारित प्रत

डॉ.नीलम गोऱ्हे...

करीत असताना हिंदू हृदयसम्राट माननीय स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी जे मांडले असेल किंवा आता माननीय श्री.उद्धव ठाकरे यांनी जे विषय मांडले असतील ती सर्व कार्यवाही उद्योग विभागामार्फत करण्याची कामे आधीच्या मंत्रिमंडळात व या मंत्रिमंडळात उत्कृष्ट पध्दतीने केले आहे. त्याच बरोबर मला कार्यकर्ता म्हणून ज्या अडचणी आल्या त्यासाठी त्यांनी मला मदत केली आहे. मी पुणे जिल्ह्याची संपर्क प्रमुख म्हणून काम केले. उप नेता, प्रवक्ता असे काम करताना अनेक वेळा प्रश्न पडतो की, नक्की काय बोलावे, काय करावे, त्यासाठी मला माननीय श्री.सुभाष देसाई यांनी अनेक वेळा मार्गदर्शन केले आहे. त्यांची एक आठवण मला मुद्दाम सांगायला पाहिजे की, मी जेव्हा शिवसेना पक्षात प्रवेश केला त्यावेळी मला व्यासपीठापर्यंत नेण्याची जबाबदारी मोठ्या साहेबांनी माननीय श्री.सुभाष देसाई यांच्या सचिवांवर सोपविली होती. मी तेथे जात असताना तेथे जे संयोजन केले होते ते मी आजही विसरु शकत नाही. मोठ्या साहेबांना आम्ही नेहमी वंदन करीत होतो. माननीय श्री.उद्धव ठाकरे हे आमच्या बरोबरचे आहेत, वयाने थोडे लहान आहेत, माननीय श्री.सुभाष देसाई यांच्यापुढे नतमस्तक व्हावे असे त्यांचे व्यक्तीमत्व आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व माननीय श्री.सुभाष देसाई या दोन्ही सन्माननीय सदस्यांचे पुनरागमन सभागृहात होईल अशी मी शुभेच्छा देते.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी भाषण करतांना बरीच उदाहरणे दिली आहेत. आपले व्यक्तीमत्व एक वेगळ्या प्रकारचे आहे. माननीय श्री.सुभाष देसाई यांचे व्यक्तीमत्व वेगळ्या प्रकारचे आहे. अशा वेगवेगळ्या व्यक्तीमत्वांना बरोबर ठेवण्याचे काम हिंदू हृदयसम्राट शिवसेना प्रमुख यांनी केले आहे. त्यातून प्रत्येकांच्या गुणांना वेगवेगळ्या प्रकारे वाव दिला. मी शिवसेना पक्षात प्रवेश केला त्यावेळी माननीय श्री.सुभाष देसाई हे युती शासनाच्या काळात मंत्री होते. पहिला कार्यक्रम शेलू येथे ठेवण्यात आला होता तेथे मी गेले होते. त्या कार्यक्रमात महिला असतील असे मला वाटले होते. स्वत: माननीय श्री.दिवाकर रावते हे माझ्या स्वागतासाठी थांबले होते. त्यांनी मला सांगितले की, मी सहकार मंत्री असलो तरी

डॉ.नीलम गोऱ्हे....

मी कार्यक्रमात अगोदर बोलेल व तुम्ही नंतर बोला. विशेष म्हणजे शेकडो मुस्लिम महिला भगवे झेंडे घेऊन त्या कार्यक्रमात उपस्थित होत्या. अशा प्रकारे त्यांचे संघटन कौशल्य आम्ही शेतकरी दिंडीत पाहिले आहे. तासनतास ते चालत होत, स्वत: माननीय श्री.उद्धव ठाकरे त्या दिंडीत चालले होते. मी स्वत : तेथे गेले होते. सभागृहात छोट्या छोट्या गोष्टींचे पण महत्वाचे मुद्दे मांडणे, विधेयकावर बोलणे, मराठी भाषा, शेतकरी प्रश्न यावर ते बारकाईने बोलतात. आपणा सर्वांना त्यांचा स्वभाव माहिती आहे. त्यांचा स्वभाव मनस्वी आहे, काही वेळा ते रागवतात. कधी तरी त्यांच्या रागाचा फटका आम्हाला पण बसला नाही असे नाही. यामध्ये पक्षाचे काम चांगले व्हावे असाच नेहमी हेतू असायचा. त्यामुळे हळूहळू असे झाले की, चार ते पाच वर्षानंतर आमचा राग त्यांना आला तरी त्यांचा राग आम्हाला येईनासा झाला. या बाबी त्यांच्या लक्षात आल्यावर ते आमच्याकडे येऊन चर्चा करीत होते. त्यांच्या पत्नीला सर्व लोक ताई म्हणतात. प्रबोधनकार ठाकरे यांच्या सहाय्यक म्हणून त्या काम करीत होत्या. ते पुस्तक तयार करीत होत्या. मा साहेबांच्या शेवटच्या अंतसंस्कारापर्यंत माननीय श्री.दिवाकर रावते यांनी कामे केली आहेत. त्यामुळे मला असे वाटते की, शिवसेना भाग्यवान आहे. त्यामुळे माननीय श्री.सुभाष देसाई व माननीय श्री.दिवाकर रावते यांच्या सारखे नेते आम्हाला लाभले. मी आपणा दोघांना मनपूर्वक शुभेच्छा देते.

सभापती महोदय, अन्य सदस्यांमध्ये सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र फाटक यांचा व आमचा अगोदर परिचय नव्हता. परंतु माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे हे आमच्या पक्षातील उत्तम कार्यकर्ते व किंग मेकर आहेत. श्री.एकनाथ शिंदे यांच्याकडून आम्हाला कळले की, श्री.रविंद्र फाटक आले व त्यांना पक्षाची जबाबदारी मिळणार आहे. मग श्री.मिलिंद नार्वेकर यांनी मला सांगितले की, यांना मदत करायची आहे. मी म्हटले काही हरकत नाही. ठाणे शहरात हे वाक्य नेहमी असायचे की, आता विजयाचे फाटक उघडणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र फाटक यांनी पालघर जिल्ह्यात अनेक कामे केली, तेथील प्रश्नांचा पाठपुरावा करणे, तेथील कामांना निधी

डॉ.नीलम गोऱ्हे...

मिळवून देणे, शिवसेना विरुध्द भाजप ही आपली ऐतिहासिक निवडणूक होती. साम,दाम,दंड, भेद यामध्ये सर्व लोक बरोबर होते. त्यामुळे मी आपणाला मनापासून शुभेच्छा देते. मी उप सभापती म्हणून निवडून आले त्या दोन्ही निवडणुका मला अविस्मरणीय आहेत. त्यावेळी मला शिवसेनेचे सर्व सदस्य, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड आपण व सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे हे दुसऱ्या वेळी माझे सूचक व अनुमोदक होते. या सर्वांकडून मला सहकार्य मिळाले. निवडणूक झाली की, दुसऱ्या दिवसापासून आपण सर्वजण एकत्र होऊन कामाला लागतो. हे या सभागृहाचे वेगळे वैशिष्ट्य आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. प्रवीण दरेकर मी आपले नाव तातडीने घ्यायला पाहिजे होते. परंतु शिवसेना पक्षातील सदस्यांची नावे मला पहिल्यांदा घ्यावे लागली. माननीय श्री.प्रवीण दरेकर व माझा खूप वर्षापासूनचा परिचय आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत जाण्याअगोदर आपण शिवसेना पक्षात होता. माननीय श्री.राज ठाकरे यांचे खास माणसे म्हणून आम्ही त्यांना ओळखत होतो. पक्षात बऱ्याच राजकीय घडामोडी होण्या अगोदर कोण कोणाचे असले तरी आम्ही सर्व कार्यक्रमात एकत्र असायचो. ते पहिल्यांदा महाराष्ट्र नव निर्माण पक्षातून आमदार झाले. त्यानंतर भारतीय जनता पक्षाचे आमदार झाले व या सभागृहात आले. आम्ही ज्यावेळी कार्यक्रमांना बरोबर भेटतो त्यावेळी ते अत्यंत खुल्या भूमिकेतून चांगल्या प्रकारे काम करीत असतात. तुमच्या उदया बद्दल वेगवेगळ्या लोकांचे वेगवेगळे प्रवाद आहेत, मला असे वाटते की, पक्ष जे ठरवितो त्याबाबत कोणीही काही केले तरी परिणाम होत नसतो. त्यामुळे जे घडेल ते तुमच्या चांगल्यासाठी घडेल तुम्हाला पुनरागमनाच्या मी मनापासून शुभेच्छा देते. विरोधी पक्ष नेते कोणत्याही गोष्टींचे सुक्ष्म निरीक्षण ही आवड तुमच्या परिचयात नोंदविली आहे. त्यामुळे तुम्ही समोरच्या पक्षाचे सुक्ष्म निरीक्षण करुन ते भाषणात सातत्याने बोलत असतात.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

**डॉ.नीलम गोऱ्हे........**

**आपले रायगड जिल्ह्यातील कामाचे प्रतिबिंब सभागृहाच्या कामकाजात उमटत असते.**

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांचे भाषण ग्रेटच असते. आपण आजही सभागृहात मनापासून भाषण केले. तुमचा व माझा अनेक वर्षांपासून परिचय आहे. सन २०१४ मध्ये आपण निवडणुकीसाठी उभे होता त्यावेळी मी आपल्या प्रचारासाठी आले होते. त्यावेळी त्यांच्या प्रचाराची ती पहिलीच सभा होती. माननीय उद्योग मंत्री सुभाष देसाई साहेबांनी मला सांगितले की, नीलमताई तुम्ही त्या भागात असल्यामुळे तुम्हीच त्या सभेसाठी उपस्थित राहावे. मी शेतकरी संघटनेची आंदोलने, कार्यक्रम बघितले होते. परंतु सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांची सभा बघितली नव्हती. आम्ही शिरपूर येथे सभेसाठी गेलो त्यावेळी सभेवर दगडफेक झाली आणि त्यामध्ये एका मुलाचे डोके फुटून त्याच्या डोक्यातून रक्त वाहत होते. मी म्हटले की, त्या मुलाच्या डोक्याला बॅन्डेज करावयाचे नाही काय तर त्यांनी सांगितले की नको, राहू दे, असेच रक्त वाहते. मी पर्समधून रुमाल काढून तो त्या मुलाच्या डोक्याला बांधला. त्यावेळी दूरचित्रवाहिन्यांनी सदाभाऊच्या सभेत रक्तपात अशी ब्रेकिंग न्यूज दाखविण्यास सुरुवात केली. शेतकरी संघटनेच्या सभेत तो मुलगा कसा जखमी झाला हे दाखविले जात होते. त्या मुलाला रुग्णालयात घेऊन जावे असे मी सांगितले असता तो मुलगा म्हणाला की, मला काहीही होत नाही, मी सदाभाऊंचे भाषण संपल्याशिवाय येथून जाणार नाही. तो मुलगा तेथेच बसून होता. आमच्या सभेवर कधीही दगडफेक झाली नाही. शिवसेना पक्षाच्या सभेवर शक्यतो दगडफेक होत नाही. त्यावेळी मी दगडफेक झाल्याचा प्रकार प्रथमच बघितला. दगडफेक करणारा समूह आत आणि पोलीस बाहेरुन गोल फेरी मारत होते, जणू काही ते दगडफेक करणाऱ्यांचे संरक्षण करीत असल्याचे चित्र बघावयास मिळत होते. (...अडथळा...) प्रत्येक भागातील संस्कृती वेगळी असते. आम्ही रायगड येथील मतदार संघात गेलो होतो. तेथे दगडफेक करुन सर्वांना पळवून लावले जाते. बऱ्याच

डॉ.नीलम गोऱ्हे........

ठिकाणी अशा गोष्टी घडत असतात. मी सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांना मनापासून शुभेच्छा देते. आपण ऊसाला भाव मिळवून देण्यासाठी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने काम करीत असता आणि अशा प्रकारे काम करणाऱ्या सदस्यांची सभागृहाला आवश्यकता आहे. त्यामुळे मी आपल्याला मनापासून शुभेच्छा देते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुजितसिंह ठाकूर परांडा नगरपरिषदेचे सदस्य म्हणून अनेक वेळा निवडून आलेले आहेत. त्यांनी नगराध्यक्ष म्हणूनही काम केलेले आहे. ते पडद्यामागून काम करणारे नेते आहे. ते राजकारणातील अत्यंत प्रभावी व्यक्तीमत्व आहे. ते आजारी असल्यामुळे सभागृहात उपस्थित नाहीत. एखादी व्यक्ती राजकारणात दिसली नाही तर ती व्यक्ती नाराज आहे की काय अशी शंका निर्माण होते. ते त्यांच्या जिल्ह्यात काम करीत आहेत. मी त्यांना मनापासून शुभेच्छा देते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांचा व माझा अनेक वर्षांपासून परिचय आहे. आपण ४ वेळा सदस्य म्हणून निवडून आलेला आहात. छत्रपती शिवाजी महाराजांचा सच्चा शिष्य, कार्यकर्ता, सैनिक असे मी आपले वर्णन करते. आपण मराठवाड्यातून राज्य पातळीवर काम करीत आहात. आपण विविध आयुधांच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न मांडून ते सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. मध्यंतरी आपला सभागृहात वादविवाद झाला होता. मला आठवते की, पूर्वी एकदा वादविवाद झाला होता, त्यावेळी आपण खूप रागवलेले होते. आपण बोलताना माईक तोडला होता. परंतु यावेळी तशी वेळ आली नाही. मी आपल्या मनापासून शुभेच्छा देते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड हे देखील निवृत्त होत आहेत. आपण केलेल्या शिरशासनावर अनेक लोक भाष्य करतात. आपण सभागृहात अनेक चांगली भाषणे केलेली आहेत. शिरशासन केले तर प्रसिद्धी मिळते परंतु चांगले बोलून प्रसिद्धी मिळत नाही. आपण बीड जिल्हा परिषदेत चांगले काम

डॉ.नीलम गोऱ्हे........

असुधारित प्रत

केलेले आहे. सभागृहात बीड जिल्ह्यातील प्रश्नावर चर्चा सुरु असेल तर आपला हात नेहमीच वर असतो. आपल्याला त्या प्रश्नावर बोलायला मिळाले पाहिजे यासाठी आपली तगमग सुरु असते. मंत्री, लोकप्रतिनिधी वेगवेगळया मतदारसंघातून निवडून आलेले असतात. परंतु त्या त्या भागातील पाणी पुरवठ्याच्या योजना, रस्ते, ग्रास रुटची माहिती असणारे आमदार सभागृहात असतील तर सरकारला त्याचा फायदा होतो. मी सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड यांना देखील मनापासून शुभेच्छा देते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी त्यांच्या भाषणात अनेक गोष्टींचा उल्लेख केला. आपण माझ्या नावाचा उल्लेख केला असे मला अनेकांनी सांगितले. मी त्यांना सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब माझ्या नावाचा उल्लेख करणार नाहीत असे होणारच नाही. आपण नागपूर अधिवेशन सुरु असताना शेतकरी दिंडी काढली. त्यावेळी आपण ताईंना ट्रॅक्टरवर घ्यावे असे सांगितले होते. अनेक संयोजनात, कार्यक्रमात आपला सातत्याने सहभाग राहिलेला आहे. आपण सर्वांनी सभागृहाची प्रतिष्ठा, गरीमा वाढविलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांना मी अनेक वर्षांपासून ओळखते. ते सिद्धी विनायक ट्रस्टवर असल्यापासून त्यांचा व माझा परिचय आहे. एखाद्या व्यक्तीला राजकारणात स्थान का मिळते तर त्यांचे काम उपयोगी पडणारे असले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड व विधान सभेचे माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस यांचे चांगले संबंध आहेत. नेते कोणावर अवलंबून नसतात. परंतु माननीय श्री.देवेंद्र फडणवीस त्यांच्यावर अवलंबून आहेत. कारण मदतीला धावून येणारे कार्यकर्ते कधीही नेत्याला प्रिय असतात. आपण या दृष्टिकोनातून काम केलेले आहे. ठीक आहे, प्रत्येकाच्या हातून काही गोष्टी कमी जास्त होतात. मला असे वाटते की, वैर भावना न ठेवता मतभेद शिल्लक राहणे ही राजकारणातील परिपक्वता असते आणि ती तुमच्याकडे आहे. माननीय उप मुख्यमंत्री

डॉ.नीलम गोऱ्हे........

असुधारित प्रत

श्री.अजित पवार साहेबांनी प्रसाद आणि लाड असा आपला उल्लेख केलेला आहे. परंतु त्यांच्या विधानाचा अर्थ काही महिन्यांची लक्षात येतो. त्यामुळे मी त्याबाबत भाष्य करणार नाही. मी आपल्याला सुद्धा पुनरागमनासाठी शुभेच्छा देते.

सभापती महोदय, आपण सहनशक्तीने सर्वांची भाषणे ऐकून घेतली. आम्हाला आपल्यासारखे दुसरे सभापती मिळणार नाहीत. त्यामुळे आपण नक्की पुनरागमन करावे, असे मी सुचविते आणि माझे दोन शब्द संपविते.

--------

असुधारित प्रत

**सभापती :** मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आपले नाव नसताना आपण भाषण कसे करावे हे मी आपल्या सर्वांकडून शिकलो आहे. विशेष करुन सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेबांकडून मी हे शिकलो आहे. मी मघाशीच सांगितले की, निरोप समारंभ असल्यामुळे सर्वांनी बोलू नये. ज्यांना निरोप घ्यायचा आहे आणि ज्यांना निरोप द्यायचा आहे ते सुद्धा कंटाळतील, अशी परिस्थिती कृपया निर्माण करु नये. परंतु आपली परंपरा थोर आहे. त्यामुळे आपण सर्वच बोलणार याची मला खात्री होती.

माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार साहेब सभागृहात उपस्थित आहेत. आपण माझ्या विषयी काही गोष्टींचा उल्लेख केला. मी शेवटच्या मॅचमध्ये ८२ रन केले हे आपल्याला कसे कळले यावर मला एसआयटी नेमावी असे वाटते. आमच्याकडे सीबीआय वगैरे चालत नाही. येथे एसआयटीच असते. एसआयटी, चौकशी, निलंबन हे आमचे पर्वणीचे शब्द आहेत. आपण काही अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत. हे झाडच तुम्ही लावलेले आहे, ते पुढे कोठपर्यंत न्यायचे हे तुमच्याच हाती आहे, मी आपल्याला काय सांगणार आहे. मी बोलावे किंवा नको असा विषय आहे. सन १९९५ मध्ये मला संपूर्ण महाराष्ट्रातून कोणी मदत केली असेल तर ती माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार साहेबांनी केली. काही गोष्टी न बोललेल्या बऱ्या असतात. दादांना स्वत:ला ते आवडत नाही. काही का असेना, जे होईल ते होईल, आपले सर्वोच्च नेते ठरवितील ते मान्य आहे. तुम्ही मनावर घेतले तर सर्वच होते. ही केवळ माझी भावना नाही. ही संपूर्ण महाराष्ट्राची भावना आहे. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे माझ्या जिल्ह्यातील आहेत. आपण मनावर घेतले तर आपण काहीही करु शकता. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना करावयाचे किंवा नाही हे ठरवावे, परंतु मला विचारुन ठरवावे. माझे आयुष्य वाढवायचे असेल तर मेटे यांना घेऊ नये. मी जास्त बोलणार नाही. कारण सर्वच नेहमी प्रमाणे भरभरुन बोलले आहेत. मी नवीन आमदारांना एक सूचना करु इच्छितो. हे ज्येष्ठांचे, श्रेष्ठांचे सदन आहे. शेलार मामा लागतात हे बरोबर आहे. परंतु या सभागृहाचे स्वरुपच बदलत चालले आहे, हे आपल्या लक्षात आले असेल. या सभागृहात ज्येष्ठ सदस्य कमी

असुधारित प्रत

**सभापती...........**

आणि तरुणांचा भरणा जास्त दिसत आहे. हे वाईट आहे असे मला स्वत:ला वाटत नाही. आपण माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांचेच उदाहरण घ्यावे. ते या सभागृहाचे सदस्य म्हणून निवडून आले. मागील दोन-अडीच वर्षात त्यांनी परंपरेला शोभेल अशा प्रकारे विरोधी पक्षनेते पद सांभाळले हे मी सभापती म्हणून निश्चितपणे सांगतो. माझी सर्वच आमदारांना विनंती आहे की, विधानपरिषद सभागृहाला, महाराष्ट्र राज्याला, विधिमंडळाला विशिष्ट परंपरा आहे. ज्यावेळी मी परदेशात जातो त्यावेळी आवर्जून या गोष्टीचा उल्लेख करतो. मी ऑस्ट्रेलिया येथे गेलो होतो. त्यावेळी मी सांगितले होते की, संपूर्ण देशात बेस्ट लेजिस्लेचर कोणते असेल तर ते महाराष्ट्र लेजिस्लेचर आहे. या सभागृहात काम होते, दंगा देखील होतो. मध्यंतरी आम्ही सिडनी येथे गेलो होतो. त्यावेळी माननीय उप सभापती देखील आमच्या बरोबर होत्या. सिडनी येथील अप्पर हाऊसमध्ये मला चेअरमनच्या शेजारी बसून माझा सत्कार करण्यात आला, आणखी काय पाहिजे. आम्हाला महाराष्ट्राची शान तेथपर्यंत वाढविता आली हे आमचे भाग्य आहे असे मी समजतो. मी जास्त बोलून सभागृहाचा वेळ घेणार नाही. मला निरोपाचा कार्यक्रम आवडत नाही हे मी यापूर्वीच सांगितले होते.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

**सभापती....**

आपण एकमेकांना भेटतो म्हणून निरोप घेण्याची वेळ येत असते. मी मनापासून निरोपाचे कार्यक्रम टाळणारा माणूस आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील दुपारपासून मला विचारत होते की, निरोपाचा कार्यक्रम कधी घेणार आहात ? मी सदर कार्यक्रमासाठी येणारच नाही. इतके निरोप घेतले तेव्हा मी कधीही आलो नाही. अशा प्रकारे माझा आणि त्यांचा स्वभाव या बाबतीत निश्चितपणे सारखा आहे. आपल्या सर्वांचे या सदनामध्ये पुनरागमन होईल या बाबतीत मला फार काही शंका नाही. या गोष्टी पक्षामधील सर्वोच्च नेत्याच्या मनावर असतात. राजकीय गणितं मांडली जातात, कार्यक्रम बघितले जातात, कारकिर्द बघितली जाते. एक बाब निश्चित आहे की, मी आपल्याला येथे परत सभापती म्हणून भेटेन की, दादा म्हणतात तसे आणखी कोठे संसदेमध्ये जाईन. आपण हा विषय सोडावा. आपले एकमेकांसमवेत अतिशय चांगले वैयक्तिक संबंध तयार झालेले आहेत. आपण आपल्या कुटुंबीयांसमवेत कधीही सातारा जिल्हयात फलटण भागात, पंढरपूरच्या वारीला, शिंगणापूरच्या देव दर्शनाला आल्यास माझ्या राजवाडयाचे दरवाजे आपल्या सर्वांकरिता कायम उघडे राहतील. आपण सर्वांनी माझ्याकडे यावे असे मी आपल्या सर्वांना आग्रहाचे निमंत्रण देऊन आता हा निरोपाचा कार्यक्रम संपल्याचे जाहीर करतो.

आता नेहमीच्या प्रथेप्रमाणे विधानसभेच्या मुख्य प्रवेशाद्वाराजवळ एकत्रित छायाचित्र काढण्याचा कार्यक्रम होईल व त्यानंतर विधान भवनाच्या वातानुकुलित उपाहारगृहात चहापाण्याचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी सदर कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित रहावे अशी माझी विनंती आहे.

---------

**सभापती** : मला सदनाचा सेन्स घ्यावयाचा आहे की, उद्याच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये नियम २६० अन्वये असलेले प्रस्ताव, लक्षवेक्षी सूचना, नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा राहणार आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव हा गृहनिर्माण, एसआरए आणि नगरविकास विभागाशी संबंधित आहे. तसेच आमच्याकडील प्रस्ताव हा नगरविकास आणि एमएमआरडीएशी संबधित आहे. त्यामुळे दोन्ही प्रस्ताव क्लब केल्यास सदनाचा वेळ वाचू शकेल....

श्री.अजित पवार : सभापती महोदय, ही बाब मान्य आहे.

**सभापती** : ठीक आहे. आपण उद्या सकाळी १०.०० वाजता नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करु. तसेच उद्याच्या कार्यक्रमपत्रिकेतील २६० अन्वये असलेले दोन्ही प्रस्ताव एकत्रित करु.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता पुन्हा भरेल. सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. उक्त बैठकीत आजच्या कार्यक्रमपत्रिकेमधील प्रलंबित असलेला विरोधी पक्षाचा आणि सत्तारुढ पक्षाचा नियम २६० अन्वयेचा प्रस्ताव मर्ज करुन चर्चेला घेण्यात येईल. त्यानंतर दुपारी १२.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ६ वाजून ४३ मिनिटांनी गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२ च्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

असुधारित प्रत